# अशोकचरित्र

लेखक

वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.

किंमत ३ रुपये

प्रकाशक

यशवन्त गोपाळ जोशी, बी. ए. ( ऑ. )
व्यवस्थापक, आनंद कार्यालय
१०१५ सदाशिव, पुणें २

卐

आवृत्ति, १९६४

卐

मुद्रक

यशवन्त गो. जोशी,
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

सन १८९८ सालीं सम्राट् अशोक याच्या चरित्राची रूपरेखा मीं लिहिली होती व कै. प्रो. विजापूरकर यांनीं ती आपल्या '**ग्रंथमाला**' मासिकाच्या द्वारें प्रकाशित केली होती. त्या काळीं अशोकाच्या चरित्राचीं फार थोडीं साधनें उपलब्ध झालेलीं होतीं. इंग्रजींत सुद्धां अशोकाचें एकहि चरित्र झालेलें नव्हतें; माझाहि अशोककालीन लिपीशीं व पाली भाषेशीं बिलकुल परिचय झालेला नव्हता; आणि ग्रंथलेखनाच्या बाबतींत तो पहिलाच प्रयत्न होता. यामुळें मीं भीत भीतच आपली कृति प. वा. गुरुवर्य डॉ० सर रामकृष्ण भांडारकर व न्यायमूर्ति रानडे यांच्या नजरेस आणिली. पण ह्या दोघांहि थोर विभूतींनीं माझ्या कृतीचें कौतुक करून मला प्रोत्साहन दिलें. डॉ० भांडारकरांनीं खाजगी संभाषणांत इतिहाससंशोधनाची दृष्टि मला प्राप्त करून दिली आणि पुण्याच्या प्रार्थनासमाजाच्या साप्ताहिक उपासनेसाठीं अशोकाचें धार्मिक जीवन हा विषय घेऊन तो ऐकण्यास मला मुद्दाम पाचारण केलें. न्या. मू. रानडे यांनीं माझें पुस्तक काळजीपूर्वक वाचून गोड शब्दांनीं माझा गौरव केला आणि बौद्धधर्माचा इतिहास मराठींत लिहिण्याचें काम मीं हातीं घ्यावें अशी मला सूचना केली. माझें पुस्तक मोठ्या ग्रेटप्रायमर टाइपांचें ८८ पृष्ठांचें म्हणजे फार लहान होतें. तरी डे० व्ह० ट्रान्स्लेशन सोसायटीनें त्याला ३० रुपयांचें बक्षीस मंजूर केलें. प्रमुख मराठी पत्रांच्या व मासिकांच्या संपादकांनीं पुस्तकाची प्रशंसा केली. ग्रंथपरीक्षण करतांना अतिशय निष्ठुरपणानें ग्रंथांचे वाभाडे काढण्याविषयीं प्रसिद्ध असलेल्या एका तत्कालीन मासिकाच्या संपादकाला माझ्या पुस्तकावर हवी तेवढी कडक टीका करण्यास मीं मुद्दाम आव्हान केलें असतांहि त्यानें नांगी टाकिली आणि नकोसा होईल इतका माझ्या पुस्तकावर स्तुतीचा वर्षाव केला! सदर पुस्तकाचीं गुजराथी, हिंदी व उर्दू भाषांतून भाषांतरेंहि

झालीं. तसें पाहिलें तर माझ्या त्या पुस्तकांत काय मोठेंसें होतें ? पांच चार बौद्ध दंतकथा, अशोकाच्या कांहीं लेखांचा सारांश, व त्यांवरून अशोकाचा स्वभाव, राज्यव्यवस्था वर्तन, धर्मपरायणता, तत्कालीन समाजस्थिति इ० गोष्टींच्या संबंधानें काढलेलीं अनुमानें हींच होतीं..पण तो काळच असा होता कीं त्या काळीं अशा तऱ्हेचा मराठींत केलेला सामान्य प्रयत्न सुद्धां गुणज्ञांना अपूर्व वाटावा.

त्या गोष्टीला आज तिसांवर वर्षें झालीं. या अवधींत अशोकासंबंधानें किती तरी नवीन शोध लागले आहेत ! त्याच्या लेखांची पाश्चात्य व भारतीय पंडितांनीं केलेली चिकित्सा ग्रंथांच्या रूपानें व इंडियन अँटिक्वेरीसारख्या प्राच्येतिहाससंशोधनास वाहिलेल्या नियतकालिकांतल्या चर्चेच्या रूपानें वाचकांस उपलब्ध झाली आहे; व बंगाली, हिंदीसारख्या देशी भाषांतून सुद्धां मोठमोठ्या संशोधकांनीं ग्रंथ लिहिले आहेत. आतां अशोकाचें चरित्र लिहिण्याचें कोणी मनांत आणिलें तर पूर्वींच्यासारखा जुजबी प्रयत्न करून मुळींच भागावयाचें नाहीं. इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, भारतीय, सिंहली, चिनी, ब्रम्ही इ० सर्व भाषांतल्या ग्रंथोदधीचें मंथन करून नवनीत काढण्याचा प्रयत्न केला तरच तो आदरणीय वाटेल ! इतकें प्रचंड परिवर्तन गेल्या तीस वर्षांत घडून आलें आहे.

येवढा खटाटोप करणें माझ्या शारीरिक व मानसिक अल्प शक्तीच्या आवाक्याबाहेरचें आहे हें मी जाणून होतों. म्हणूनच माझे विद्वान् इतिहास-प्रवीण मित्र व सुप्रसिद्ध समालोचक रा. बाळकृष्ण नारायण देव यांनीं अशोकाचें विस्तृत चरित्र लिहिण्याविषयीं मला शेकडों वेळां आग्रह केला तरी माझ्यापेक्षां जास्त योग्यतेचा, उत्साहाचा व धडाडीचा लेखक हें काम हातीं घेईल या भरंवशावर मी तें करण्यास धजलों नाहीं. तथापि गेलीं ३० वर्षें मी स्वस्थ बसलों नव्हतों. नवे नवे शोध, मतें व माहिती यांचा संग्रह मी करीतच होतों. तीस वर्षें वाट पाहूनहि हें काम कोणी करीत नाहीं असें जेव्हां आढळलें व रा. देव आणि मी उभयतांहि आतां वार्धक्यामुळें वाङ्मयसेवेपासून निवृत्त होण्याची वेळ येऊन पोंचली, तेव्हां हें काम आपल्याच हातून व्हावें असा

कदाचित् परमेश्वरी संकल्प असेल असें समजून अखेर मीं तें हातीं घेऊन यथाशक्ति पार पाडलें असे. माझ्या प्रयत्नाचें हें फळ इतर कोणास रुचलें नाहीं तरी निदान माझे मित्र रा. देव यांच्या आग्रहास मीं मान दिला येवढें तरी समाधान माझ्या मनाला खास वाटेल.

प्रस्तुतचें पुस्तक ही माझ्या पहिल्या पुस्तकाची सुधारून वाढविलेली आवृत्ति नाहीं. अगदीं नवेंच पुस्तक आहे. कारण, पूर्वीच्या पुस्तकांची व्यवस्था व रचना बदलतां बदलतां अखेर पूर्वीच्यापैकीं चार दोन वाक्यांपलीकडे कांहींच यांत जागेवर राहिलेले दिसणार नाहीं. नाहीं म्हणायला अशोकाच्या थोरवीविषयींचा माझा आदरभाव मात्र अढळ असलेला, किंबहुना वृद्धिंगत झालेला आढळेल.

अशोकाविषयींच्या आजतागाईत शोधांचा समावेश या पुस्तकांत करण्याचा मीं मनःपूर्वक प्रयत्न केलेला आहे. फार काय, पण गेल्या नोवेंबरमध्यें लाहोर येथें भरलेल्या प्राच्यविद्याविशारदांच्या परिषदेपुढें वाचण्यासाठीं मुंबईचे एक विद्वान् लेखक डॉ० त्रिभुवनदास शहा यांनीं एक निबंध पाठविला होता, तोहि मीं आणून वाचला. त्या लेखाचें नांव Asoka Dislodged म्हणजे अशोकाचें त्याच्या उच्च स्थानापासून उच्चाटन असें आहे. गिरि, स्तंभ, गुहा वगैरेवरील लेख लिहिणारा 'प्रियदर्शी राजा' अशोक हा होता अशी जी आजपर्यंतची विद्वानांची समजूत आहे ती चुकीची असून अशोकाचा नातू (कुणालाचा पुत्र) संप्रति हा त्या लेखाचा प्रणेता व सदर लेखांतून उल्लेखिलेला 'प्रियदर्शी राजा' होय व तो जैनधर्मी होता असें सिद्ध करण्याचा डॉक्टरसाहेबांचा प्रयत्न आहे. हा लेख छापून प्रसिद्ध होण्याच्या पूर्वीच डॉ० शहा यांनीं मला वाचण्यास पाठविला या त्यांच्या सौजन्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. पण त्या वेळीं माझें पुस्तक छापण्याचें काम बहुतेक आटोपत आलें असल्यामुळें व त्याच वेळीं मी सपाटून आजारी पडल्यामुळें

डॉ० शहा यांच्या निबंधाचा परामर्ष मला या पुस्तकांत घेतां आला नाहीं याबद्दल फार वाईट वाटतें.

या पुस्तकाच्या रचनेच्या कामीं मला अनेक पाश्चात्य व भारतीय ग्रंथ-कारांच्या परिश्रमांचा फायदा घेतां आला, त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. तसेंच या पुस्तकाचीं प्रुफें तपासण्याच्या व सूचि तयार करण्याच्या कामीं **आनंद** मासिकाचे उपसंपादक रा. गोपीनाथ गणेश तळवलकर यांचें फार साह्य झालें. त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतों.

आनंदकार्यालय, पुणें.
पौष व. ८ शके १८५०.

**वासुदेव गोविंद आपटे.**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | |
|---|---|---|
| १ | उपक्रम ... .... .... .... | १ |
| २ | अशोकाचा कुलवृत्तांत ... ... | १० |
| ३ | चंद्रगुप्ताची कारकीर्द .... .... .... | १८ |
| ४ | बिंदुसार ... ... .... .... | ३० |
| ५ | अशोकाचें राज्यारोहण व राज्याभिषेक .... | ३५ |
| ६ | कलिंगविजय आणि बौद्धधर्माचा स्वीकार .... | ४६ |
| ७ | अशोकाचे लेखांविषयीं प्रास्ताविक माहिती .... | ६१ |
| ८ | अशोकाचे लघु गिरीलेख व मोठे गिरिलेख .... | ७३ |
| ९ | कलिंगलेख, स्तंभलेख, व स्फुटलेख ... | १०९ |
| १० | अशोकाच्या लेखांचा थोडासा विचार .... | १२९ |
| ११ | राज्यव्यवस्था व सामाजिक स्थिति ... ... | १५४ |
| १२ | अशोककालीन शिल्प व स्थापत्य ... .... | १७६ |
| १३ | तिसरी धर्मपरिषद् ... ... ... | १९२ |
| १४ | अशोकाचा अंतकाळ व त्यानंतर ... .... | २०० |
| | परिशिष्ट—निरनिराळ्या दंतकथा ... ... | २१० |

# अशोक

## प्रकरण पहिलें

## उपक्रम

हरिद्वारला जाऊन आलेले लोक सांगतात कीं, तेथें गंगेच्या कांठीं बसून हिमालय पर्वताकडे नजर टाकिली म्हणजे असें दिसतें कीं, त्या पर्वताचें अत्युच्च शिखर नीलवर्ण आकाशाला टेकलेलें आहे. त्या शिखरावरच्या बर्फावर प्रखर सूर्याचे किरण पडल्याकारणानें तो उच्च प्रदेश अत्यंत उज्ज्वल व देदीप्यमान झालेला आहे, आणि त्याबरोबरच हिमालय पर्वताच्या अलीकडल्या व नजीकच्या रांगा ढगांनीं आच्छादिल्या गेल्या आहेत; आणि हें सुंदर नैसर्गिक दृश्य पाहण्यांत प्रेक्षक इतका तल्लीन होतो कीं, तो क्षणभर देहभान विसरतो. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत अशोक राजानें अत्युच्च स्थान मिळविलें आहे. जनतेमध्यें धर्मज्ञान, सदाचार, भूतदया इ. चा प्रसार करण्यासाठीं त्यानें अलौकिक गोष्टी करून आपलें नांव चिरस्थायी करून ठेविलें आहे, व त्याच्या त्या कृत्यांवर पडलेल्या पाश्चात्त्य पंडितांच्या विचक्षण दृष्टीच्या प्रखर किरणांमुळें त्या कृत्यांची महती कमी न होतां तीं अधिकच उज्ज्वल दिसत आहेत. हें दृश्य पाहिलें आणि त्याबरोबरच अशोकानंतरचा अर्थात् अलीकडचा दीर्घकालव्यापी इतिहास अनेक भ्रम व तर्कवितर्क यांच्या दाट पटलानें आच्छादित असल्यामुळें अज्ञात राहिला आहे हेंहि दृश्य पाहिलें म्हणजे अशोकाच्या चरित्राला हिमाद्रीच्या उच्च शिखराची जी उपमा देण्यांत येते तिचें औचित्य स्पष्टपणें कळतें. या भरतखंडांत पौराणिक काळांत राजा पृथु, इक्ष्वाकु, रामचंद्र, शिबि, हरिश्चंद्र,

युधिष्ठिर प्रभृति अनेक पुण्यश्लोक नृपति होऊन गेले. अशा नृपतींची दीर्घ मालिका अभिमानानें दाखविण्याइतका भाग्यवान् देश पृथ्वीच्या पाठीवर भरतखंडाखेरीज दुसरा क्वचित्‌च सांपडेल असेंहि म्हणतां येईल. पण या नृपतींच्या संबंधानें पौराणिक कथांपलीकडे कांहींच ऐतिहासिक माहिती आज उपलब्ध नसल्यामुळें इतिहासलेखकांना त्यांच्याविषयीं मौन स्वीकारणें प्राप्त आहे. पण सुदैवानें अशोकासंबंधानें तसा प्रकार नाहीं. त्या राजाच्या वंशाचा व तत्कालीन घटनांचा इतिहास पूर्वींच्या काळच्या लोकांनीं लिहिलेला आढळतो आणि त्यांत जरी दंतकथांच्या व अतिशयोक्ति, विपर्यस्तता, अंधश्रद्धा इ. गोष्टींच्या मिश्रणामुळें थोडीशी कलुषता आलेली असली, तरी विचक्षक दृष्टीच्या माणसाला त्यांतला सत्यांश निवडून काढणें फारसें कठीण नाहीं. अशोकानें तर शिलास्तंभावर, गुहांतून व खडकांवर कोरून ठेविलेल्या लेखांच्या व बौद्ध भिक्षूंसाठीं बांधलेले मठ, विहार, स्तूप इ. च्या रूपानें स्वतःच्या कारकीर्दीचा एक तऱ्हेचा विश्वसनीय व चिरस्थायी इतिहास स्वतःच लिहून ठेविलेला आहे, आणि प्रिन्सेप, कनिंगहॅम, सेनार्ट, व्होगेल, व्हिन्सेंट स्मिथ्, फ्लीट, ऱ्हिस् डेव्हिडस्, हुल्झस्क् प्रभृति पाश्चात्त्य पंडित व राजेंद्रलाल मित्र, भांडारकर पितापुत्र, मुजुमदार, पं. के. कृष्णशास्त्री, जायस्वाल, बरुआ प्रभृति भारतीय संशोधकांच्या परिश्रमानें तो जिज्ञासूंना समजेल अशा तऱ्हेनें जनतेपुढें मांडिला गेला आहे. त्यामुळें सम्राट् अशोक याचा राज्यविस्तार, त्याची राज्यपद्धति, त्याचें प्रजावात्सल्य, धर्मपरायणता आणि अपूर्व स्वार्थत्याग यांच्या विषयींचें बरेंचसें यथार्थ ज्ञान होऊन त्याच्या मनाच्या थोरवीची चांगली कल्पना करणें शक्य झालें आहे.

## अशोकाचें चक्रवर्तित्व

अशोकाला हिंदुस्थानचा पहिला चक्रवर्ती राजा अथवा सम्राट् म्हणतात, आणि 'चक्रवर्ती' हें उपपद त्याच्या ठायीं अगदीं सार्थ झालें होतें हें त्याच्या राज्यविस्तारासंबंधानें पुढें एका प्रकरणांत जें विवेचन केलें आहे

त्यावरून दिसून येईलच. अशोकाचें चक्रवर्तित्व मि. व्हिन्सेंट स्मिथ्सारख्या पाश्चात्त्य इतिहासकारांनींसुद्धां मान्य केलें आहे. ते एके ठिकाणीं म्हणतात—

" His (Asoka's) dominions were far more extensive than British India of to-day, excluding Burma " ( V. Smith's Asoka, 3rd edition, page 81 )

म्हणजे आज ' ब्रिटिश हिंदुस्थान ' हें नांव ( ब्रह्मदेश वगळून ) जेवढ्या प्रदेशाला देण्यांत येतें, त्यापेक्षांहि जास्त विस्तृत प्रदेश अशोकाच्या सत्तेखालीं होता. जास्त विस्तृत म्हणण्याचें कारण अफगाणिस्तान व बलुचिस्तान हे देश आज ब्रिटिश सत्तेच्या अंतर्गत नाहींत; पण अशोकाच्या वेळीं ते हिंदुस्थानांतच मोडत व तेथेंहि अशोकाचें सार्वभौमत्व होतें. त्या वेळीं चोल, पांड्य, योन, गांधार, पितनिक, आंध्र; कलिंग, भोज, पुलिंद, ताम्रपर्णी वगैरे अनेक लहान लहान राज्यें होतीं व तेथील राजेमहाराजे अशोकाचें मांडलिकत्व पत्करून राहिलेले होते. येवढा विस्तीर्ण मुलूख पूर्वीच्या ऐतिहासिक काळांत तरी दुसऱ्या कोणत्याहि राजाच्या अधीन नव्हता. अर्थात् अशोकाला हिंदुस्थानचा पहिला चक्रवर्ती राजा किंवा सम्राट् हें उपपद लावल्यानें यत्किंचित्हि अतिशयोक्ति किंवा असत्य विधान केल्याचा दोष कोणाला लावतां येणार नाहीं.

## त्याच्या कीर्तींतलें रहस्य

पण अशोकाचें नांव भरतखंडाच्या इतिहासांत आज अडीच हजार वर्षें सुवर्णाक्षरांनीं अंकित व चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे तें कांहीं त्याच्या चक्रवर्तित्वामुळें नाहीं हें येथें सांगणें अवश्य आहे. राज्यविस्ताराच्या बाबतींत अशोकाची बरोबरी करणारे, किंबहुना त्याला मागें सारणारेहि सम्राट् त्याच्या नंतरच्या काळांत पृथ्वीच्या पाठीवर होऊन गेले; पण त्यांची वास्तपुस्तहि आज कोणी करीत नाहीं ! पण अशोकाचा कीर्तिदुंदुभि मात्र आज अडीच हजार वर्षांनीं केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर साऱ्या जगांत दुमदुमत आहे. याचें

कारण शोधूं गेलों असतां तें त्याच्या अफाट राज्यविस्तारांत, अतुल ऐहिक ऐश्वर्यांत, अपरंपार संपत्तींत, किंवा कलिंगविजयाच्या वेळीं झालेल्या असंख्य प्राणांच्या हानींत सांपडावयाचें नाहीं, तर त्याच्या अंतःकरणाच्या औदार्यांत, त्याच्या हृदयाच्या ऐश्वर्यांत, त्याच्या धर्मशीलतेंत, त्याच्या प्रजावात्सल्यांत व त्याच्या अतुल त्यागबुद्धींत सांपडेल. अज्ञानांत गढून गेल्यामुळें धर्माच्या खऱ्या तत्त्वास पारख्या झालेल्या आपल्या प्रजेच्या स्थितीबद्दल अंतःकरण पिळवटून तिला खऱ्या व शुद्ध धर्ममार्गाला लावण्यासाठीं व तिची आत्मिक उन्नति करण्यासाठीं त्यानें अखंड परिश्रम केले. चिरस्थायी व अपूर्व उपाय योजिले, केवळ शाब्दिक उपदेशानें नव्हे, तर प्रत्यक्ष आचरणानें त्यानें स्वतःची अढळ धर्मनिष्ठा व परमार्थसाधनाविषयींची कळकळ व्यक्त केली, आणि प्रजेचा पैसा स्वतःच्या ऐषआरामांत खर्च न करतां प्रजेच्याच आत्यंतिक हितसाधनाप्रीत्यर्थ खर्च करून स्वतः फकिरी बाणा पतकरण्यांत समाधान मानिलें, या गोष्टींतच अशोकाच्या कीर्तीचें व यशस्वितेचें खरें रहस्य आहे. अशोकानें राजशक्तीचें पाठबळ बौद्ध धर्माला दिल्यामुळें अल्प काळांत त्या धर्माचा इतका प्रसार झाला कीं, तसा त्याच्या पूर्वीच्या किंवा नंतरच्याहि काळांत कधीं झाला नव्हता; आणि आजसुद्धां पृथ्वीच्या पाठीवर लोकसंख्येच्या दृष्टीनें बौद्धधर्माचा क्रमांक तिसरा लागलेला दिसत आहे याचें श्रेय मुख्यतः अशोकाला देणें रास्त आहे. एका जर्मन ग्रंथकारानें म्हटलें[१] आहे—" एखाद्याचें नांव त्याच्या पश्चात् जितक्या जास्त लोकांत जास्त कालपर्यंत वंद्य होऊन राहील, तितकी त्याची योग्यता थोर समजावी." हें जर खरें असेल तर शार्लमेन व सीझर या प्राचीन पाश्चात्त्य इतिहासप्रसिद्ध नृपतींच्यापेक्षां अशोक फार श्रेष्ठ होता हें कबूल करणें भाग आहे.

अनेक पाश्चात्त्य लेखकांनीं इंग्रजी व इतर भाषांतून अशोकाचीं चरित्रें किंवा

1 Coppen Die Religiondes Buddha.

बौद्ध धर्मावर ग्रंथ लिहिले आहेत व त्यांत अशोकाच्या योग्यतेचें वर्णन करतांना पाश्चात्य राष्ट्रांत होऊन गेलेल्या थोर नृपतींशीं त्याची तुलना केली आहे. उदाहरणार्थ, व्हिन्सेंट स्मिथनें रोमचा सुप्रसिद्ध बादशाह कॉंस्टंटाईन याच्याशीं अशोकाची तुलना करून कॉंस्टंटाईनपेक्षां अशोकाची श्रेष्ठता एका बाबतींत मुक्तकंठानें कबूल केली आहे. ती बाब म्हणजे ही कीं, कॉंस्टंटाईननें ख्रिस्ती धर्माला जें उत्तेजन दिलें तें अनन्यगतिकत्वामुळें दिलें. ख्रिस्ती धर्माचा प्रसार त्याच्या काळीं इतका जोरानें त्याच्या राज्यांत होत चालला होता कीं, त्या धर्मप्रसाराच्या लाटेला विरोध करणें त्याला शक्य नव्हतें. अशा वेळीं त्या लाटेला स्वतःच्या इच्छेच्या विरुद्ध मदत करण्यांत कॉंस्टंटाईनची शुद्ध बुद्धि नव्हती, तरी पण राजनीतिपटुता दिसून आली. पण अशोकाचें कृत्य खऱ्या सद्बुद्धीनें केलेलें होतें. त्या कृत्यापासून राजनीतीच्या दृष्टीनें त्याला कांहीं एक फायदा करून घ्यावयाचा नव्हता. अशा सद्बुद्धिपूर्वक व निरपेक्षतेनें हातीं घेतलेल्या कार्यांत त्याला अप्रतिम यश मिळालें व त्याची विलक्षण छाप लोकांवर बसली यांत नवल नाहीं.[१]

रे. मॅक्फेल् यानें इंग्लंडचा सुप्रसिद्ध राजा आल्फ्रेड दि ग्रेट याच्याशीं अशोकाची तुलना केली आहे; आणि न्यायदानतत्परता, विद्योत्साह आणि भाविकता या बाबतींत दोघांमध्यें बरेंच साम्य दाखविलें आहे.[२] पण त्याबरोबर हेंहि कबूल केलें आहे कीं, आल्फ्रेडचें राज्य मगध साम्राज्याच्या पासंगालाहि पुरणारें नव्हतें. लहानसें राज्य सुव्यस्थित रीतीनें चालवून दाखविण्यापेक्षां ब्रिटिश साम्राज्याहूनहि विस्तृत अशा साम्राज्याचीं सूत्रें हातीं घेऊन प्रजेची सर्व प्रकारची उन्नति घडवून आणण्याचें काम अनंत पटीनें दुष्कर असतें ही गोष्ट सदर लेखकानें लक्षांत घेतली असती तर अशोक व आल्फ्रेड यांना समपातळीवर न बसवितां अशोक हा दोहोंत श्रेष्ठ होता हें त्यानें स्पष्ट शब्दांत कबूल केलें असतें. शिवाय

1 Asoka P.46. 2 Asoka P. 80-81

धर्मप्रसारार्थ आल्फ्रेडनें कांहींच केलें नाहीं, आणि अशोकानें तर धर्म व नीति यांच्या प्रसारार्थ सर्वस्व खर्च केलें. तेव्हां त्यांची बरोबरी कशी व्हावी ? पण रे. मॅक्फेल् ख्रिस्ती मिशनरी आहे, ही गोष्ट येथें विसरतां कामा नये.

प्रो. ऱ्हिस् डेव्हिडस् यानें आपल्या Buddhist India ग्रंथांत ऑलिव्हर क्रॉमवेलशीं अशोकाची तुलना केली आहे. पण ती केवळ भाषेपुरती आहे. तुलना करण्याच्या भरांत तो या मुद्द्याच्या पलीकडे गेला नाहीं यांत त्याचा शहाणपणा दिसून येतो.

कांहीं मुद्द्यांपुरतीच तुलना केली तर नेपोलियन, पीटर दि ग्रेट, अलेक्झँडर व सेंट पॉल इ. दुसऱ्या कित्येक इतिहासप्रसिद्ध पाश्चात्त्य व्यक्तींशीं अशोकाचें साम्य दाखवितां येतें; पण त्याबरोबर दुसऱ्या कित्येक बाबतींत अशोकाची श्रेष्ठता स्पष्ट दृग्गोचर होते. अशोक पूर्ववयांत नेपोलियनसारखा धाडसी, शूर, महत्त्वाकांक्षी व युक्तिबाज होता, पण त्यानें महत्त्वाकांक्षेच्या पायीं आपला नाश करून घेतला नाहीं. पीटर दि ग्रेटसारखा तो प्रजावत्सल होता; पण पीटरप्रमाणें प्रजेच्या ऐहिक सुखाकडेच केवळ त्याची दृष्टि नव्हती. ऐहिक उन्नतीपेक्षां अनेक पटींनीं श्रेष्ठ अशी तिची आध्यात्मिक व नैतिक उन्नति कशी साधावी तें त्यानें उपदेशांच्या व प्रत्यक्ष आचरणाच्या द्वारें दाखविलें. अलेक्झँडरनें दिग्विजय केला; अशोकानेंहि कलिंगविजय केला. पण सगळें भरतखंड आपल्या स्वामित्वाखालीं आल्यानंतर आतां जिंकण्यास कांहीं उरलें नाहीं म्हणून अलेक्झँडरप्रमाणें तो शोक करीत बसला नाहीं. उलट दिग्विजयाहूनहि श्रेष्ठ असा जो आत्मविजय तो त्यानें करून दाखविला. सेंट पॉल याचें धर्मप्रसाराच्या कार्यापुरतें अशोकाशीं साम्य दाखवितां येईल, पण दोघांच्या धर्मप्रसाराच्या साधनांचा विचार केला तर कोण सरस व कोण निरस तें एखादा अज्ञ मनुष्यसुद्धां सांगू शकेल. अशोकानें धर्मप्रसारार्थ पूर्णपणें शांततेच्या व सात्त्विक उपायांचें अवलंबन केलें. धर्मलेख कोरून ठेविले; धर्मप्रचारक देशोदेशीं पाठविले; साधुसंतांचा परामर्श घेतला; धर्मकार्यासाठीं अगणित द्रव्य वेंचलें; आणि परधर्माविषयीं

सहिष्णुता व समदृष्टि ठेवण्याचा उपदेश केला, आणि सेंट पॉलनें ? त्यानें काय केलें तें देशभक्त लाला लजपतराय यांच्या शब्दांत दिलेलें बरें. ते म्हणतात ( सम्राट् अशोक या त्यांच्या उर्दू पुस्तकाचें हिंदी भाषांतर पृ. १०–११ )

" यह सिद्ध है कि सेंट पॉल युद्धद्वारा ईसाइयतके प्रचार [ Militant Christianity ] की नीव डालनेवाला था। इसाई धर्ममें जितना विवाद, युद्ध और मारकाटकी स्पिरिट पाई जाती है उसका आविष्कारक और प्रचारक सेंट पॉलही था। मसीहको शान्तिका दूत कहा जाता है। उसने यहूदी धर्मकी सारी मिलिटरी स्पिरिटको इसाई धर्ममें सम्मिलित कर लिया और धर्मकी स्पिरिट बिलकुल परिवर्तन कर दी। इसाई धर्मकी शिक्षा और प्रचार में सेंट पॉलके कर्तव्य अद्वितीय है और इसाई उसपर जितना चाहिये अभिमान करें किन्तु वास्तव यह है कि धर्मकी शिक्षाको उसने संपूर्ण नवीन वस्त्र दिये और सारे संसारमें इसाई धर्मके प्रचारमें जितना रक्त बहा अथवा बहाया जा रहा है उसका प्रथम कारण वह सेंट पॉलकी ईसाइयत और शिक्षा दीक्षाकी है। इस विषयमें महर्षि कौंट टाल्सटाई रूसी पण्डितके लेख पढने योग्य है। "

पाश्चात्त्यांचा इतिहास सोडून दिला आणि प्राच्य देशांच्या अर्वाचीन इतिहासांत अशोकाशीं तुलना करतां येण्यासारखा कोणी राजा दिसतो कीं काय तें पाहूं लागलों तरी अशीच निराशा होते. अरबस्तानचा खलिफा पहिला उमर हा अशोकासारखा नामांकित राजा होऊन गेला. त्याचा प्रभाव त्याच्या राज्याच्या अगदीं दूरच्या कानाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोंचला होता. अशोकासारखाच तो मोठा दूरदर्शी, मेहनती, हरएक बाबतींत स्वतः मन घालून पाहणारा व न्यायी राज्यकर्ता होता यांत शंका नाहीं. पण त्यानें दिग्विजय मिळवून आणिलेल्या धनराशी प्रजेच्या धार्मिक व नैतिक उन्नतीसाठीं खर्च केल्या नाहींत. अशोकासारखा तो अजातशत्रुहि नव्हता. त्याच्या अधिकाऱ्यांनीं प्रजेला छळलें, लुटलें आणि जुलूम केला; पण त्यांचा बंदोबस्त त्याला करतां आला नाहीं. शेवटीं अशा जुलमानें गांजलेल्या एका माणसानेंच त्याला ठार मारलें. अशोकाची राज्यव्यवस्था

इतकी सुयंत्रित होती व त्याचें प्रजावात्सल्य इतकें नमुनेदार होतें कीं, त्याच्या कारकीर्दींत कोठेंहि गडबड, अशांतता किंवा असंतोष यांचें नांवसुद्धां ऐकूं आलें नाहीं. अशा राजाशीं शत्रुत्व कोण करील ?

मुसल्मान बादशाहांमध्यें ज्याच्याशीं अशोकाची तुलना बऱ्याच बाबतींत करतां येते असा एक अकबर बादशाह मात्र होऊन गेला. अशोकाच्या येवढें मोठें नसलें तरी अकबराच्या वेळीं मोगलांचें साम्राज्य बरेंच मोठें होतें. अशोकाचा मौर्यवंश जसा कर्तृत्ववान् म्हणून प्रसिद्ध होता, तसा अकबराचा मोगल वंशहि कर्तृत्वासंबंधानें प्रख्यात होता. अकबरानें हिंदूंचीं मनें आपल्या गोड भाषणानें आणि निःपक्षपाती वर्तनानें वश करून घेतलीं होतीं. अशोका-प्रमाणें अकबराचेंहि मन उदार होतें. त्याच्या ठायीं धर्मजिज्ञासाहि प्रबळ होती. परधर्माविषयीं सहिष्णुता हा प्रशंसनीय गुणहि त्याच्या ठायीं प्रामुख्येंकरून होता. पण धर्मांविषयींच्या त्याच्या स्वतःच्याच मतांना स्थिरता आली नव्हती; मग तो इतरांमध्यें धर्माचा प्रसार कसा करणार ? अशोकाप्रमाणें अकबराची नीतिमत्ता खरोखर उच्च प्रतीची होती कीं नाहीं याविषयीं पुष्कळ इतिहासकारांनीं शंका प्रदर्शित केली आहे. मीनाबाझार स्थापण्यांत त्याचा हेतु नीतितत्त्वांना सोडून होता असा त्याच्यावर उघड उघड आरोप करण्यांत येत असतो. नीतिमत्तेच्या बाबतींत अशोक अकबरापेक्षां निःसंशय श्रेष्ठ होता; आणि अशोकानें धर्मासाठीं केलेला वैभवाचा त्याग तर केवळ अद्वितीयच होता. या बाबतींत तो गौतमबुद्धाचा पट्टशिष्य शोभण्यासारखा होता यांत शंका नाहीं.

अशोकाच्या अंगच्या अशा अनेक गुणांच्या समुच्चयामुळें तो वर उल्लेखिलेल्या सर्व इतिहासप्रसिद्ध पुरुषांच्या तुलनेंत सर्वश्रेष्ठ ठरतो. एच्. जी. वेल्ससारख्या विद्वान, स्वतंत्र विचाराच्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या, आणि निर्भीड लेखकानें जगांतल्या सर्वश्रेष्ठ अशा सहा पुरुषांच्या यादींत अशोकाचें नांव घातलें आहे तें उगाच नाहीं. अंतःकरणाची सरळ, शुद्ध, पवित्र व सात्त्विक वृत्ति आणि अंतःकरणांत खोल जाऊन बसलेली अढळ धर्मभावना याबाबतींत येशू

ख्रिस्त व गौतमबुद्ध यांच्या तोडीचा जर कोणी झाला असेल तर तो अशोकच असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

अशा पुण्यश्लोक नृपतीचें चरित्र पाश्चात्त्य लोकहि मोठ्या आस्थेनें व आदरपूर्वक वाचतात; त्यानें मागें ठेविलेल्या लेखांचा शोध लावण्यांत आणि त्यांचा अर्थ लावण्यांत आपल्या आयुष्याचीं तपेंच्या तपें खर्च करतात; आणि त्याच्या चरित्रांतली एखादी तरी अज्ञात असलेली गोष्ट प्रकाशांत आणिल्याचें श्रेय आपणांस मिळेल काय अशा अपेक्षेनें जीवापाड परिश्रम करतात. अशी ज्या अशोकची थोर योग्यता, त्याचें चरित्र त्याचेच भारतीय बांधव अमर्याद उत्सुकतेनें, आवडीनें आणि ममत्वाच्या अभिमानानें वाचतील अशी अपेक्षा करणें मुळींच गैरवाजवी होणार नाहीं.

सम्राट् अशोक याच्या चरित्राची संगति नीट कळण्यासाठीं प्रथम त्याचें कुल व पूर्वज यांची व तत्कालीन स्थिति वगैरे संबंधाची थोडीशी माहिती आरंभीं देणें अत्यंत अवश्य आहे. म्हणून ती पुढच्या प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे.

☆ ☆ ☆

# प्रकरण दुसरें

# अशोकाचा कुलवृत्तान्त

## शिशुनाग

आपल्या पुराणग्रंथांतून पुष्कळ राजघराण्यांच्या वंशावळ्या दिल्या आहेत. त्यांतल्या अनेक वंशांसंबंधानें विश्वसनीय ऐतिहासिक माहिती आज उपलब्ध नाहीं. शिशुनाग वंश तेवढा असा आहे कीं, त्याचा काल निश्चित करतां येण्यास पुरेशी ऐतिहासिक माहिती मिळाली आहे. या माहितीच्या आधारानें पुराणेतिहास-संशोधकांनीं असें ठरविलें आहे कीं, या वंशाचा संस्थापक शिशुनाग हा ख्रि. पू. ७ व्या शतकांत होऊन गेला व त्यानें मगध देशावर ४० वर्षेपर्यंत राज्य केलें. त्यावेळीं मगधाचें राज्य फार लहान होतें व त्याची राजधानी राजगृह ( हें गयेजवळ असून हल्लीं राजगिर या नांवानें प्रसिद्ध आहे ) ही होती.[१]

## राजगृह

शिशुनाग वंशांतला पांचवा पुरुष बिंबिसार नांवाचा होऊन गेला. हा गौतमबुद्धाचा समकालीन होता. याच्याविषयीं अशी माहिती मिळते कीं, या राजानें जुन्या राजगृह राजधानीचा त्याग करून ती राजधानी ज्या डोंगरावर वसलेली होती त्याच्याच पायथ्याशीं राजगृह हेंच नांव कायम ठेवून नवें

---

१. महाभारत, रामायण व हरिवंश या ग्रंथांतून मगध देशाचा राजा जरासंध याचे वेळीं गिरिव्रज ही राजधानी होती असें सांगितलें आहे. गयेच्या ईशान्येस ३६ मैलांवर गिर्यक् नांवाचें एक स्थान आहे तेंच पूर्वीचें गिरिव्रज असें कनिंगहॅम म्हणतो, व गिरिव्रजालाच पुढें राजगृह हें नांव मिळालें असें सांगतात.

शहर वसविलें आणि तें राजधानीचें ठिकाण केलें. इ. स.च्या पांचव्या शतकांत हिंदुस्थानांत आलेल्या फा—ह्यान या चिनी प्रवाश्यानें आपल्या प्रवासवृत्तांत या नव्या राजधानीचा उल्लेख केलेला आहे. इ. स. च्या ७ व्या शतकांत आलेल्या दुसऱ्या एका चिनी प्रवाश्याच्या ( हुएन-त्सांगच्या ) प्रवास-वर्णनांत असा उल्लेख आहे कीं, नूतन राजगृहाचा बाहेरील तट उद्ध्वस्त झालेला आहे, पण आंतला तट मात्र शाबूत आहे.

## बिंबिसार

बिंबिसार हा मोठा पराक्रमी व कर्तृत्ववान् राजा होता. त्यानें आपल्या शेजारचा अंगदेश[1] जिंकून आपल्या राज्याला जोडला. इतकेंच नाहीं, तर कोसल व वैशाली हीं जीं शेजारचीं दोन राज्यें होतीं, त्यांच्या राजघराण्यांतल्या मुलींशीं विवाह करून त्यानें आपलें बळ व प्रतिष्ठा वाढविली. बिंबिसाराचा राज्यकाल इ. स. पूर्वी ५८१ ते ५५३ असा मानण्यांत आला आहे.

अशी दंतकथा आहे कीं, बिंबिसाराला त्याच्या उत्तर—वयांत राज्यकार-भाराचा कंटाळा येऊन त्यानें सगळा कारभार आपला पुत्र अजातशत्रु याचेवर सोंपविला आणि स्वतः वानप्रस्थाश्रम स्वीकारला. पण पुत्राच्या हातीं राज्या-धिकार दिला तरी राज्याची मालकी बिंबिसाराच्या मृत्यूपर्यंत त्याच्याकडेच राहावयाची होती. हें सहन न होऊन अजातशत्रूनें प्रत्यक्ष बापाला हाल हाल करून मारलें आणि राजा म्हणून स्वतःच्या नांवाची द्वाही फिरविली.

---

१. अंग देश मगधासारखाच फार प्राचीन आहे. अथर्ववेदांत मगधाबरो-बरच अंग देशाचाहि उल्लेख केलेला आढळतो. महाभारतांत कर्णाला पुष्कळ ठिकाणीं अंगराज म्हटलेलें आहे. हा देश मगध राज्याच्या पूर्व हद्दीला लागून होता. मोंघीर, भागलपूर वगैरे टापू हेंच पूर्वीचें अंगराज्य असावें असें संशोधक म्हणतात.

## अजातशत्रु

याच अजातशत्रूच्या कारकीर्दीत जैन धर्माचा संस्थापक महावीर अथवा वर्धमान आणि बौद्ध धर्म-संस्थापक शाक्य गोतम हे दोघे पुरुष उदयाला येऊन शिष्यांच्याद्वारें आपापल्या मतांचा प्रसार करीत होते. अजातशत्रूची व गौतमबुद्धाची प्रत्यक्ष मुलाखत व संभाषणहि झालें व अजातशत्रूनें या संभाषणाच्या वेळीं आपल्या हातून पितृवध घडल्याबद्दल मनाला वाटणारा तीव्र पश्चात्ताप बुद्धाजवळ व्यक्त केला आणि गौतमाजवळून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली असें बौद्ध ग्रंथांत म्हटलें आहे. बिंबिसाराप्रमाणें अजातशत्रूनेंहि शेजारचीं कोसल व तिरहूत हीं राज्यें जिंकून आपल्या राज्यास जोडलीं. अशा रीतीनें मगधाचें राज्य वाढत जात जात दोन तीन पिढ्यांच्या अवधींत एक प्रबळ राष्ट्र होऊन बसलें.

## पाटलीपुत्र

पुढें वृज्जि नांवाचे लोक[१] उत्तरेकडून हिमालयाच्या बाजूनें येऊन मगध राज्याला उपद्रव देऊं लागले, तेव्हां त्यांच्यापासून राज्याचें रक्षण करण्यासाठीं अजातशत्रूनें ख्रि. पू. ५४६ व्या वर्षी पाटलीग्राम नांवाच्या एका क्षुद्र गांवीं गंगा व शोणभद्र यांच्या संगमाजवळ एक मजबूत किल्ला बांधिला[२], व तेथेंच

१. यांना इंग्रज इतिहासकारांनीं तुरानियन म्हटलें आहे. ( R. C. Dutt's History of Ancient Indian Civilisation Vol. II, P. 221.)

२. वायुपुराणांत म्हटलें आहे कीं, अजातशत्रूचा नातू उदयाश्व यानें हा किल्ला बांधिला व त्याच्यांच जवळ पाटलीपुत्र नांवाचें नगर वसवून ती आपली राजधानी केली. महावंश नामक बौद्ध ग्रंथांत उदयाश्वानेंच किल्ला बांधल्याची व पाटलीपुत्र नगर वसविल्याची कथा आहे; पण उदयाश्वाला अजातत्रूचा पुत्र म्हटलें आहे.

एक मोठें शहर वसवून त्याला पाटलीपुत्र हें नांव दिलें. पाटलीपुत्र नगरालाच कांहीं कांहीं ग्रंथांतून कुसुमपुर किंवा पुष्पपुर अशींहि नांवें दिलेलीं आढळतात. ग्रीक इतिहासग्रंथांतून पाटलीपुत्राला 'पालिब्रोथ्रा' म्हटलेलें आहे. ग्रीक राजा सेल्यूकस निकेटर याच्या वेळेस (ख्रि. पू. ३०५) या शहराचा घेर २५ मैल होता असें वर्णन आढळतें.

महानंदिन् हा शिशुनाग वंशांतला शेवटचा राजा झाला. याला एका शूद्र जातीच्या राणीपासून झालेला महापद्मनंद नांवाचा एक पुत्र होता. यानें मगध राज्य बळकावून नंदवंशाची स्थापना केली.

### महापद्मनंद

हा महापद्मनंद मोठा शूर व पराक्रमी, पण तितकाच लोभी व निर्दय राजा होता. याच्याच वेळेस इतिहासप्रसिद्ध जगज्जेता अलेक्झांडर ऊर्फ शिकंदर याची धाड हिंदुस्थानावर आली. त्याच्याशीं युद्ध करण्यासाठीं महापद्मनंद ४०००० हत्ती, २०००० घोडेस्वार व २ लक्ष पायदळ सैन्य घेऊन निघाला होता. पण शिकंदर बादशाह पंजाबची हद्द ओलांडून खालीं आलाच नाहीं. त्यामुळें त्याचा महापद्मनंदाशीं मुकाबला झाला नाहीं.

महापद्मनंदाच्या मागून त्याचे आठ पुत्र क्रमानें एकामागून एक मगधाच्या गादीवर बसले. महापद्मनंद व त्याचे आठ पुत्र असे नऊ पुरुष इतिहास-पुराणांतून 'नवनंद' या नांवानें प्रसिद्ध आहेत.

### चंद्रगुप्त

नंदवंशाचा उच्छेद चंद्रगुप्त यानें ब्राह्मण-मुत्सद्दी कौटल्य अथवा चाणक्य याच्या साह्यानें करून मगधाचें राज्य मिळविलें (ख्रि. पू. ३२२ वर्षें)[१].

१. जैन ग्रंथांतल्या माहितीच्या आधारावर श्री. काशीप्रसाद जायस्वाल यांनीं हा काल इ. स. पू. ३२३ वर्षें असा दिला आहे. (Journal of the Asiatic Society of Bengal 1913, p. 317–323)

तेव्हांपासून मौर्यवंश मगधाच्या गादीवर आला. विष्णुपुराणांतहि अशीच कथा दिलेली आहे. चंद्रगुप्त हा मुरा नांवाच्या दासीचा पुत्र होता व त्यावरून त्याच्या वंशास ' मौर्य ' हें नांव पडलें असें सांगतात.

शेवटच्या नंदाला मारून मगधाचें राज्य मिळविण्यानें चंद्रगुप्तासारख्या बुद्धिमान्, चतुर, महत्त्वाकांक्षी आणि कर्तृत्ववान् तरुण वीराची तृप्ति होण्यासारखी नव्हती. भरतखंडांतलीं इतर राज्येंहि पादाक्रांत करून साऱ्या भारतभूवर आपलें प्रभुत्व स्थापित करावें अशी आकांक्षा मनांत धरून तत्प्रीत्यर्थ त्याचे यत्न चालले होते. यामुळें त्यानें अनेक शत्रु जागजागीं उत्पन्न करून ठेविले. त्यांपैकीं पांच बड्या बड्या राजांनीं[1] संगनमत करून चंद्रगुप्तावर हल्ला केला; पण चंद्रगुप्तानें मोठ्या धैर्यानें व युक्तीनें तो परतविला.

हिंदुस्थानांतल्याच क्षत्रियांना चंद्रगुप्तानें आपल्या तलवारीचें पाणी दाखविलें असें नाहीं, तर हिंदुस्थानावर आक्रमण करणाऱ्या ग्रीक राजांनाहि आपल्या अंगच्या क्षात्रतेजानें चकित करून सोडलें होतें.

अलेक्झांडर बादशहानें हिंदुस्थानवर स्वारी केल्याबद्दलचा आणि पंजाबची हद्द ओलांडून अलीकडे न येतां तेथूनच त्याला परत फिरावें लागल्याबद्दलचा उल्लेख वर आलाच आहे. स्वदेशीं परत गेल्यानंतर लवकरच तो मरण पावला. त्यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे इ. स. पू. ३२१ व्या वर्षी त्याच्या राज्याचे तुकडे तुकडे होऊन त्यांपैकीं एक तुकडा त्याचा सेनापति सेल्युकस याच्या वांटणीला आला. त्यानंतर सहा वर्षांनीं आंटिगोनस नांवाच्या वीराशीं झालेल्या

---

१. मुद्राराक्षस अंक १ यांत चाणक्याच्या तोंडीं घातलेल्या पुढील श्लोकांत या पांच राजांचीं नांवें आलेलीं आहेत. तो श्लोक असा —

" कौलूतश्चित्रवर्मा मलयनरपतिः सिंहनादो नृसिंहः ।
काश्मीरः पुष्कराक्षः क्षतरिपुमहिमा सैन्धवः सिन्धुसेणः ॥
मेघाख्यः पंचमोऽस्मिन्पृथुतुरगबलः पारसीकाधिराजो ।
नामान्येशां लिखामि ध्रुवमहमधुना चंद्रगुप्तः प्रमार्ष्ट ॥ "

युद्धांत सेल्युकसचा पराभव होऊन त्याला मिसर देशाला पळून जावें लागलें. तथापि तीन वर्षांनंतर त्यानें आपलें बाबिलोनचें राज्य परत मिळविलें आणि आपल्या सैन्याची चांगली तयारी करून तो आपलें राज्य वाढविण्याच्या उद्योगाला लागला. प्रथम त्यानें बॅक्ट्रिया प्रांत जिंकून घेतला, आणि तेथून मिळालेल्या विजयानें उन्माद चढून त्यानें हिंदुस्थानकडे मोर्चा वळविला. हिंदुस्थान देश जिंकून तेथें ग्रीक सत्ता स्थापित करण्याची अलेक्झांडरची आकांक्षा अतृप्त राहिली होती. ती पूर्ण करण्याचें श्रेय आपण संपादून त्रिखंड कीर्ति मिळवावी या इच्छेनें प्रेरित होऊन तो प्रचंड सेनेसह हिंदुस्थानावर चाल करून आला. पण त्याला तोंड देण्याची चंद्रगुप्ताची कडेकोट तयारी होतीच. रणभूमीवर दोन्ही सैन्यांचा मुकाबला झाला, तेव्हां सेल्युकसचा पराभव झाला व भारतविजयाची महत्त्वाकांक्षा सोडून देऊन सीमेवरूनच परत जाण्यासाठीं त्याला चंद्रगुप्ताशीं तह करावा लागला. या तहानें सेल्युकसला आपल्या राज्याचा ‘ एरिआना ’ नांवाचा कांहीं मुलूख व पांचशें हत्ती चंद्रगुप्ताला द्यावे लागले. हत्तींच्या बद्दल सेल्युकसनें तीन प्रांत[१] दिले; आणि या तहामुळें स्थापित झालेल्या स्नेहभावाच्या दृढीकरणार्थ आपली कन्याहि चंद्रगुप्ताला अर्पण केली. अशा रीतीनें चंद्रगुप्तानें आपल्या असामान्य शक्तीच्या जोरावर मगधाचें साम्राज्य हिंदुकुश पर्वताच्या पलीकडच्या प्रांतापर्यंत वाढवीत नेलें.

## मेगॅस्थनीज

वर सांगितलेला तह झाल्यानंतर सेल्युकसनें मेगॅस्थनीज नांवाचा आपला एक वकील चंद्रगुप्ताच्या दरबारांत ठेविला. हा वकील पाटलीपुत्र येथें सहा वर्षे होता. त्यानें हिंदुस्थानची भौगोलिक, सामाजिक व धार्मिक स्थिति, लोकव्यवहार

१. हे तीन प्रांत म्हणजे काबूल, हिरात व कंदाहार या तीन नांवांनीं हल्लीं प्रसिद्ध असलेले प्रांत होत.

वगैरेबद्दलची बरीच माहिती प्रत्यक्ष अवलोकनानें मिळवून ती लिहून ठेविली आहे. हिंदुस्थानच्या तत्कालीन स्थितीवर व विशेषतः चंद्रगुप्ताचें वैभव, राज्य-पद्धति, लोकस्थिति इ. वर त्या विश्वसनीय माहितीमुळें चांगला प्रकाश पडत असल्यामुळें त्यासंबंधाचें थोडेंसें सविस्तर वर्णन एका स्वतंत्र प्रकरणांत देणें योग्य होईल.

चंद्रगुप्तासंबंधानें बौद्ध ग्रंथांत दोन-तीन दंतकथा दिलेल्या आढळतात. पैकीं एक विशेष गमतीची आणि चंद्रगुप्ताच्या धोरणांत परिवर्तन घडण्यास झालेल्या कारणाचा निर्देश करणारी असल्यामुळें ती थोडक्यांत येथें देतों. महावंशावरील टीकेंत,[1] पृ. १२३ वर ही गोष्ट दिलेली आहे. ती अशी—

चंद्रगुप्ताला एकदा फिरतां फिरतां एका दरिद्री विधवा बाईच्या झोपडीचा आश्रय करण्याचा प्रसंग आला होता. इंग्लंडच्या आल्फ्रेड राजाप्रमाणें हा त्या बाईला आपण कोण आहों तें न कळूं देतां तिच्या येथें राहिला होता. एकदा असें घडलें कीं, ती बाई आपल्या मुलाच्या सकाळच्या न्याहरीसाठीं पानगे करून त्या मुलाला वाढीत होती. मुलगा पानगा खातांना त्याच्या कडा काढून टाकून मधला मऊ भाग तेवढा खात होता. हें पाहून ती बाई रागानें म्हणाली, 'ही रे कुठली खाण्याची रीत ? चंद्रगुप्त राजा नवीन राज्यें जिंकतो त्याच्यापासून ही तूं शिकलास वाटतं ?' यावर मुलानें विचारलें, 'आई, मीं काय केलें ? चंद्रगुप्तापासून मी नवीं रीत शिकलों असें तूं आत्तां म्हणालीस ती रीत कोणती ?' आई म्हणाली, 'बाळ ! पानग्याच्या कडा टाकून देऊन मधला तेवढा भाग खायचा ही तुझी रीत चंद्रगुप्ताच्या रीती-सारखीच आहे. तो राजा राज्याच्या सीमेवरचा मुलूख घ्यावयाचा सोडून देशाच्या मध्य भागांतलीं राज्यें एकामागून एक घेत सुटला आहे. त्यामुळें झालें आहे काय ? तर त्याच्या सैन्याला चारी बाजूंनीं शत्रूंचा घेरा पडल्या-

१. महावंश ( कोलंबो प्रत ).

सारखा झाला आहे. त्याची हांव पाहावी तर मोठा सम्राट् होण्याची आणि अक्कल पाहावी तर ही अशी !' चंद्रगुप्तानें हें त्या बाईचें बोलणें ऐकलें तेव्हां त्याला आपल्या हातून घडत असलेली चूक दिसून आली. तो बाईपासून धडा शिकला व तेव्हांपासून राज्यविस्तार करण्याचें आपलें धोरण त्यानें बदललें.

☆ ☆ ☆

# प्रकरण तिसरें

# चंद्रगुप्ताची कारकीर्द

## राजधानी

पाटलीपुत्र नगरी हिरण्वती ऊर्फ शोणभद्र आणि भागीरथी ऊर्फ गंगानदी यांच्या संगमाजवळ वसलेली होती. हिची लांबी पांच कोस व रुंदी सुमारें दोन कोस असून तिच्याभोंवतीं मजबूत तट व तटाच्या भोंवतीं खोल खंदक होता. तटाची भिंत ४०० हात रुंद व ३०० हात उंच होती. तटांत ५७० बुरूज व ६४ दरवाजे काढलेले होते असें वर्णन केलेलें आढळतें.

## गांवें व खेडीं

चंद्रगुप्ताच्या काळीं शहरांच्या संख्येचें गांवांच्या व खेड्यांच्या संख्येशीं प्रमाण हल्लींच्यापेक्षांहि कमी होतें. पण त्या काळचीं गांवें व खेडीं समृद्ध होतीं. मध्यें हिरवींगार शेतें व त्यांच्या भोंवतालीं गांवें वसलेलीं अशी रचना असे. गांवांतून एकास एक लागून घरें नसत. गांवकरी व खेड्यांतले लोक आपल्यांतूनच एखादा प्रतिष्ठित व आपल्या भरंवशाचा असा महाजन निवडून देत. लोकांच्या अडचणी व गाऱ्हाणीं, अत्याचार, जुलूम वगैरे गोष्टी सरकारी अधिकाऱ्यांस व राजास कळवून दाद लावून घेण्याचें काम त्याच्याकडे असे. सरकारी अधिकारी व केव्हां केव्हां स्वतः राजाहि खेड्यापाड्यांस भेट देऊन लोकस्थिति प्रत्यक्ष पहात व चौकशी करीत. गांवाची व रस्त्यांची स्वच्छता राखणें, दळणवळणाच्या नव्या सोयी करणें, प्रवासी लोकांना उतरण्यासाठीं धर्मशाळा वगैरे बांधणें व त्यांची व्यवस्था पाहणें, विहिरी, तलाव इ. खोदणें व त्यांची दुरुस्ती राखणें, गांवकऱ्यांच्या विनोदार्थ सार्वजनिक बागबगीचे करणें, गांवकऱ्यांना एकत्र जमून विचार करण्यासाठीं टाऊन-हॉलसारखें सभागृह बांधणें इ. कामें गांवकरी स्वतःच

करीत व या कामीं त्यांना स्त्रीवर्गाकडूनहि योग्य साह्य मिळत असे.[1] अशा रीतीनें प्रत्येक गांव हें एकेक लहानसें स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य असे.

## संस्कृति

वैदिक युग संपून कित्येक शतकें या वेळीं लोटलेलीं होतीं. तथापि वैदिक धर्माचा व वैदिक संस्कृतीचा लोकांच्या मनावर बसलेला पगडा अद्याप थोडा फार कायम होता. वैदिक काळांतल्याप्रमाणें मोठाले यज्ञयाग क्वचित् होत असत. ब्राह्मण पुरोहितांचें बंड विशेषसें नव्हतें. कर्मकांडाच्या आवरणाखालीं जें अनादि, अक्षर व चैतन्यमय तत्त्व प्रच्छन्न होतें तें नुकतें प्रकट होऊं लागलें होतें. अनेकत्वांत एकत्व, सान्तांत अनंतत्व व नानाविध देवतांच्या स्वरूपांत एका अचिंत्य, निर्गुण, सर्वसाक्षी, सर्वकर्मप्रवर्तक परमेश्वरी चित्शक्तीचा विकास ज्ञाते लोक पाहूं लागले होते. इतके दिवस बहिर्मुख असलेली जनतेची दृष्टि आतां अंतर्मुख होऊं लागली होती. ज्ञानयुगाची प्रभात होण्याचा हा काळ होता. पण इतक्यांत अकल्पित विघ्न उभें राहिलें. इंद्रियदमनपूर्वक ब्रह्मज्ञानप्राप्तीसाठीं तपाचरण करणारे तपस्वी त्या काळीं होते. त्यांचा प्रभाव समाजावर पडल्यावर कर्मकांडाचें प्रस्थ शिथिल होईल तें दृढ करण्यास आणि समाजांत बौद्धधर्ममतांच्या रूपानें विचारस्वातंत्र्य डोकावूं लागलें होतें त्याची हकालपट्टी करण्यास काय करावें या विचारांत कर्मठ ब्राह्मण गुंतले होते. शेवटीं उपासना, व्रतें-वैकल्यें, कृच्छ्रें, प्रायश्चित्तादि मार्ग त्यांना सोयीचा वाटल्यावरून त्यांचा प्रचार त्यांनीं जारीनें चालविला होता. त्यामुळें पुनः नानाप्रकारच्या देवदेवतांची पूजा-अर्चा, बलिदान, व्रतें, अनुष्ठानें इ. प्रकार रूढ होऊं लागले, आणि भारतीय हिंदुसमाजाच्या अध्यात्मिक व नैतिक उन्नतीचा आरंभकाळ आणखी कांहीं वर्षें लांबणीवर पडला. या उन्नतीचें बीज गौतमबुद्धानें पेरून ठेविलेंच होतें व तें रुजून अंकुरोद्भवहि चंद्रगुप्ताच्या काळीं

1. Rhys David's Buddhist India, P. 49

नगर वाचनालय सातारा

झालेला होता. पण त्या नाजूक रोपाची निगा राखून त्याला जोरानें फोंफावण्यास लावण्याला आवश्यक असें खतपाणी घालणारा असा उदारधि महात्मा माळी निर्माण व्हावयाचा होता. थोडक्याच काळानंतर अशोकाच्या रूपानें तो अवतीर्ण झाला.

## राज्यविस्तार

चंद्रगुप्तानें नंदराज्यापासून मिळविलेल्या मगधाच्या राज्यांत वेळोवेळीं भर टाकून त्याचा बराच मोठा विस्तार केल्याचें मागच्या प्रकारणांत सांगितलेंच आहे. रुद्रदामन् याच्या ताम्रपटावरून कळतें कीं, गुजराथ प्रांतहि त्यानें जिंकला होता व तेथें आपला प्रतिनिधि बंदोबस्तासाठीं ठेविला होता. म्हैसूर संस्थानांत सिद्दापूर येथें सांपडलेल्या ताम्रपटावरून त्या काळच्या मगधराजाच्या राज्यविस्ताराचें स्पष्ट चित्र डोळ्यांसमोर उभें राहतें. त्या काळीं दक्षिणेंत चोल, पांड्य, केरल इ. कांहीं मोठालीं राज्यें होतीं. चोल राज्याची राजधानी उरैयुर ही हल्लींच्या त्रिचनापल्ली-जवळ होती. पांड्य राजांची राजधानी मदुरा ही होती, आणि पश्चिमघाटापासून थेट कन्याकुमारीपर्यंतचा मलबार किनाऱ्याचा प्रदेश याला केरल राज्य असें नांव होतें. हीं चारी राज्यें मगधराज्याच्या दक्षिण सीमा होत्या, म्हणजे पश्चिमेकडील हिंदुकुशपर्वतापासून तों हिमालयाच्या पूर्वभागापर्यंतचा प्रदेश आणि हिमालया-पासून तों दक्षिणेकडच्या चोल, पांड्यादि चार राज्यांपर्यंतचा प्रदेश इतका मुलूख चंद्रगुप्ताच्या अंमलाखालीं होता.

मगधराज्याचे तक्षशिला, उज्जयिनी, तोसली व सुवर्णगिरी असे चार मोठाले भाग अथवा इलाखे पाडण्यांत आले होते. तक्षशिला प्राचीन काळच्या गांधार राज्याची राजधानी व अतिशय संपन्न नगरी होती. ही विद्येचें एक मोठें केंद्र होती. तेथें चंद्रगुप्तानें जो अधिकारी ठेविला होता त्याच्या ताब्यांत सबंध पंजाब व काश्मीर हे प्रांत होते.

उज्जयिनी ही अवंति राज्याची राजधानी होती आणि तेथील अधिकारी

माळवा, गुजराथ, सौराष्ट्र व पश्चिमेकडील मुलूख यांच्या बंदोबस्ताचें काम पाहात असे.

सुवर्णगिरी हें स्थान कोठें होतें याविषयीं नक्की माहिती मिळत नाहीं. कोणी म्हणतात कीं, खानदेश जिल्ह्यांत सोनगीर म्हणून जें ठिकाण हल्लीं आहे तेंच सुवर्णगिरी होय. कोणी म्हणतात कीं, गायकवाडी राज्यांत सोनगड नांवाचें एक स्थान आहे तेंच पूर्वीचें सुवर्णगिरी. तिसरा एक पक्ष असें सांगतो कीं, म्हैसूर संस्थानांत चितळगड जिल्ह्यांत सुवर्णगिरी हें ठिकाण होतें. हा शेवटचा तर्क खरा दिसतो.

तोसली हें स्थानहि अद्याप निश्चित झालें नाहीं.[1] पण तें पूर्वकिनाऱ्यावर कलिंगांचें राज्य होतें त्यांत कोठें तरी असलें पाहिजे. कलिंग राज्य हें पुढें अशोकानें जिंकलें. पण त्यापूर्वी चंद्रगुप्ताच्या वेळीं तेथील राजानें मगधराजाचें मांडलिकत्व कबूल केलें होतें असें दिसतें.

वर सांगितलेल्या चार इलाख्यांवर जे राजाचे प्रतिनिधि म्हणून नेमले जात ते बहुधा राजपुत्र किंवा राजघराण्याशीं नात्याचा संबंध असलेले पुरुष असत. राजाचा दरबार सर्वांना खुला असे. अधिकाऱ्यांच्या वर्तनाविरुद्ध कोणाला तक्रार करावयाची असली तर त्यानें खुशाल दरबारांत जाऊन करावी. यामुळें अधिकाऱ्यांना वचक वाटत असे आणि प्रजेवर जुलूम किंवा अन्याय करण्यास अधिकारी सहसा धजत नसत. शिवाय अधिकारी आपापलीं कामें कशा रीतीनें

---

१. धौली येथील अशोकाच्या आदेशांत तोसलीचा उल्लेख आहे, व ब्रह्मगिरी येथील गिरिलिपींत सुवर्णगिरीचा उल्लेख आहे. पण या दोन्ही उल्लेखांत हीं ठिकाणें निश्चित करण्याचें कांहीं साधन मिळत नाहीं. व्हिन्सेंट स्मिथच्या मतें ओरिसा प्रांतांतलें धौली हें ठिकाण पूर्वीचें तोसली असावें, आणि निजामच्या राज्यांत मस्की येथें सांपडलेल्या लेखांत ज्या अर्थी सुवर्णगिरीचा उल्लेख आहे त्या अर्थी तें ठिकाण निजामच्याच राज्यांत कोठें तरी जवळपास ( बहुधा रायचूर जिल्ह्यांत ) असावें असा या साहेबाचा तर्क आहे.

करीत असतात, राजाचे हुकूम बरोबर पाळतात कीं नाहींत, त्यांच्यापासून प्रजेस पीडा होते कीं काय, याविषयीं गुप्त हेरांमार्फत बातमी आणण्याविषयीं चंद्रगुप्त फार खबरदारी घेत असे. राज्यांत वेळोवेळीं जीं कारस्थानें चालत त्यांच्यावर राजाची बारीक नजर असे. राजा दिवसा कधीं निजत नसे; आणि रात्रींच्या वेळींसुद्धां दर प्रहराला तो आपलें शयनमंदिर बदलीत असे. हा नियम अशोकाच्या वेळेपर्यंत सगळेच मौर्य राजे पाळीत असत. यावरून राज्यांत गुप्त कारस्थानें व कट चालत असावेत व त्यामुळें राजाला आपल्या जीवाची भीति वाटत असावी असें दिसतें. अशीं गुप्त कारस्थानें व कट राज्यांत चालले असतांहि चंद्रगुप्तानें हिंदुस्थानच्या तीन चतुर्थांश भागावर आपली एकछत्री सत्ता स्थापित केली ही गोष्ट खरोखर नवल करण्यासारखी म्हटली पाहिजे.

## राज्यपद्धति

चंद्रगुप्ताच्या राज्यपद्धतीसंबंधानें मेगॅस्थनीस म्हणतो कीं, राज्यांतल्या प्रमुख अधिकाऱ्यांपैकीं कोणाकडे व्यापार-उदिमासंबंधाच्या देखरेखीचें काम असे, कोणाकडे सैन्याची व्यवस्था सोंपविलेली होती; कोणी जमिनीची मोजणी करीत; कोणी पाटबंधारे, कालवे वगैरेंची व्यवस्था पाहात; सरकारच्या कराच्या वसुलीच्या कामावर पुष्कळसे कामदार असत; त्याचप्रमाणें रस्ते, नद्यांचे घाट वगैरे लोकांच्या सोयींच्या गोष्टींकडे लक्ष देणें हें कांहींचें काम असे. रस्त्यांवर दर अर्ध्या कोसाच्या अंतरावर हल्लींच्या मैलाच्या दगडासारखें दूरत्वमापक चिन्ह केलेलें असे.

शहरांच्या उन्नतीसाठीं जे अधिकारी नेमिलेले होते त्यांचे ६ वर्ग केले होते. ते असे[1]–१ श्रमशिल्पखातें; २ विदेशी आतिथ्यखातें; ३ जन्ममृत्युखातें;

१. कौटलीय अर्थशास्त्र नामक चाणक्यप्रणीत एक ग्रंथ अलीकडे प्रसिद्ध होऊन मराठींतहि त्याचें भाषांतर झालें आहे. त्यांत ही माहिती सविस्तर दिली आहे ती पाहावी. येथें स्थलसंकोचास्तव तिचा केवळ उडता परिचय करून दिला आहे.

४ वाणिज्यखातें; ५ पण्यखातें व ६ वाणिज्यशुल्क ( जकात ) खातें.

## सैन्य

चंद्रगुप्तानें घालून दिलेली उत्कृष्ट राज्यपद्धति पाहून परदेशी ग्रंथकारांनीं सुद्धां प्रशंसोद्गार काढले आहेत. एवढ्या मोठ्या मगध साम्राज्याच्या वैभवाला शोभेल अशीच त्याची पाटलीपुत्र ही राजधानी होती. या शहराची लोकसंख्या ४ लाख होती. राज्याच्या रक्षणासाठीं ६० हजार पायदळ, ३० हजार घोडेस्वार व ८ हजार हत्ती होते. याशिवाय युद्धाच्या कामीं उपयुक्त अशी सहा लक्ष खडी फौज होती. युद्धखात्यांत ६ पोटखातीं होतीं. १ आरमार; २ रसद; ३ पायदळ; ४ घोडेस्वार; ५ हत्ती व ६ रथ. या खात्यांच्या अंगभूत अश्वशाला, हस्तिशाला, रथशाला, शस्त्रागार वगैरे संस्था असत. रथांना जोडलेल्या घोड्यांना विश्रांति देण्यांत येई. तेव्हां रथांना बैल जोडण्याची चाल होती. रथांपैकीं कांहीं दोन घोड्यांचे, तर कांहीं चार घोड्यांचे असत. प्रत्येक रथामागें दोन-दोन योद्धे व एकेक सारथी यांची नेमणूक असे. राजाचा रथ चार घोड्यांचा असे. युद्धाच्या वेळीं एकेका हत्तीवर तीन तीन योद्धे व एकेक माहूत बसत असे. पायदळांतल्या शिपायाजवळ एक पुरुष उंचीचें धनुष्य व सहा हात परिमाणाचे फाळ असलेले बाण असत. सर्वांच्याजवळ तलवारी असत. द्वंद्वयुद्धाच्या वेळीं योद्धे दोन्ही हातांत दोन तलवारी घेऊन लढत.

## सामान्य लोकस्थिति

भरतखंडांतील शेतकीची पद्धति व ती सुधारण्यासाठीं सतत चाललेले यत्न जमिनीची सुपीकता, येथील खनिज संपत्ति, हिरे, माणिक, पाचू इ. रत्नांची विपुलता, जडावाचें काम करणारे कुशल शिल्पी, सचोटीनें व्यवहार करून अपार संपत्ति मिळवून ठेविली असतांहि साधा पोशाख व साधी राहणी

ठेवणारे शेटसावकार, धर्मकार्यार्थ उदार देणग्या देणारे आणि मोठ्या थाटानें धर्मोत्सव करणारे धनिक, साधेभोळे व सात्त्विक आचरणाचे मध्यमवित्त व दरिद्री लोक, विद्याभिरुचि असलेला जनसमाज इ. गोष्टी पाहून मेगॅस्थनीस यानें आपल्या प्रवासवृत्तांत विस्मयाचे उद्गार नमूद करून ठेविले आहेत.

## औद्योगिक स्थिति

प्रजेच्या औद्योगिक उन्नतीच्या साधनाकडेहि राज्यकर्त्यांचें चांगलें लक्ष होतें. कारागीर व मजूर हे दोन भिन्न वर्ग होते. कारागिरांतहि प्रत्येक जातीचा व्यवसाय करणारांचा वर्ग निराळा होता आणि त्या प्रत्येक वर्गाचा एकेक नायक किंवा पुढारी होता. उदाहरणार्थ, स्थलयान (रथ, गाड्या वगैरे) करणारे व जलयान (नावा, जहाजें वगैरें) बांधणारे सुतार, लोखंडाचीं यंत्रें वगैरे तयार करणारे, आणि शस्त्रास्त्रें तयार करणारे लोहार, खाणींतून चांदी, सोनें काढून त्या धातूचें संशोधन करणारे व पुढें त्यांचे स्त्रीपुरुषोपयोगी नानाविध अलंकार घडविणारे सोनार, यांचे निरनिराळे वर्ग होते. हीच व्यवस्था कुंभार, चांभार, कोष्टी, कोळी, न्हावी, माळी, शिंपी, व्याध, नट, नर्तक, नावाडी वगैरे हरएक प्रकारचा व्यवसाय करणारांमध्यें होती. कारागिरांना त्या काळीं चांगला राजाश्रय मिळत असे. यामुळें व लोकहि सधन असत या कारणानें त्यांना कामाची व द्रव्याची वाण भासत नसे. कारागिरांच्या जिवावर मजुरांचेंहि जीवन चांगल्या प्रकारें चाले. या प्रत्येक व्यवसायांतले कारागीर व त्याचप्रमाणें मजूरवर्ग यांच्यामधले आपापसांतले तंटे ते आपापल्या वर्गाच्या नायकामार्फत तोडून घेत. या सर्व व्यवसायी लोकांच्या स्वतंत्र कारभारांत हात न घालतां त्यांच्यावर नुसती देखरेख ठेवणारा व वेळप्रसंगीं सल्लामसलत देऊन मार्ग दाखविणारा असा एक मोठा सरकारी अधिकारी असे. विशेष महत्त्वाच्या प्रसंगीं या सर्व कारागिरांची व मजुरांची एक प्रचंड सभा भरवून त्यांना तो एखादा अडचणीचा प्रश्न चांगल्या प्रकारें समजावून देई. शेतीपासून उत्पन्न

होणारा व त्याचप्रमाणें कारागिरांनीं हस्तकौशल्यानें तयार केलेला माल देशांतल्या इतर प्रांतांतून गाड्यांमधून किंवा जलमार्गानें जहाजांतून, दूरदूरच्या बंदरांना पाठविण्यांत येई.[१] भडोच, सिंहलद्वीप वगैरेंशीं जलमार्गानें दळणवळण असल्याचें प्रमाण तत्कालीन ग्रंथांतून मिळतें.

चंद्रगुप्ताच्या वेळीं प्रजेच्या मालमत्तेच्या रक्षणाची तजवीज फार चांगली होती. अपराध्यांना कडक शिक्षा करण्यांत येई. त्यामुळें अपराध्यांना सरकारचा दरारा वाटत असे. मेगॅस्थनीस यानें म्हटलें आहे कीं, मी चंद्रगुप्ताच्या राजधानींत पुष्कळ दिवस राहिलों. पण त्या अवधींत २०० रुपयांपेक्षां अधिक रकमेची चोरी कधीं झाल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. पाटलीपुत्र ही अतिशय समृद्ध व वैभवशाली नगरी होती व तेथें चार लक्ष माणसांची वस्ती होती, ही गोष्ट लक्षांत घेतां वरच्यासारख्या स्वल्प रकमेपेक्षां मोठी चोरी कधीं होत नसे व याच प्रमाणानें इतर अपराधहि क्वचित् घडत असत ही गोष्ट त्या काळच्या रक्षकांना खरोखर भूषणावह म्हटली पाहिजे.

चंद्रगुप्ताचा मंत्री चाणक्य यानें वरील राज्यपद्धति मोठ्या चातुर्यानें व दूरदृष्टीनें घालून दिली होती. ती कशी प्रजेच्या हिताची व सुखदात्री होती तें आजकालच्या राज्यपद्धतीशीं व हिंदुस्थानावर घडलेल्या तिच्या परिणामाशीं जो कोणी तोडून पाहील त्याला सहज कळेल.

मौर्यांच्या काळच्या राज्यपद्धतीसंबंधानें पाश्चात्त्य ग्रंथकारांनीं प्रशंसापर उद्गार काढले आहेत,[२] आणि ही पद्धति घालून देण्याचें आणि तें व्यवहारांत

---

१. Rhys David's Buddhist India व जातककथा पाहा.

2. " The development during the ninety years of Maurya rule of a system of civil, military and church government so complex and highly organised is matter for legitimate astonishment. "—V. Smith's Ashoka, P. 104.

आणून दाखविण्याचें काम चंद्रगुप्तानें केलें म्हणून त्याच्या कर्तृत्वाची तारीफ करणें योग्य आहे. मगधाचें राज्य नंदांच्या कारकीर्दींत फारसें मोठें नव्हतें. चंद्रगुप्तानें तें चारी दिशांना वाढवून त्याच्या मर्यादा समुद्रकिनाऱ्यापर्यंत वाढविल्या आणि भरतखंडांतल्या सर्व बारीकसारीक राजांवर आपलें प्रभुत्व स्थापिलें. तेव्हां आपल्या संस्कृत ग्रंथांतून 'आसमुद्रक्षितीश' असें जें चक्रवर्ती राजाचें वर्णन दिलें आहे तें वस्तुतः चंद्रगुप्ताला चांगलें लागू पडतें आणि तो अशोकाच्या अगोदर झाल्यामुळें त्यालाच भरतखंडांतला पहिला चक्रवर्ती राजा म्हटलें पाहिजे. पण चंद्रगुप्ताचा नातू अशोक यानें आपल्या आजावरहि ताण करून पूर्व किनाऱ्यावरचें कलिंग राज्यासारखें मोठें राज्य पादाक्रांत केलें आणि साम्राज्य अधिक फैलावलें म्हणून पहिल्या चक्रवर्तित्वाचा मान पहिल्या प्रकरणांत अशोकाला देण्यांत आला आहे. कारण, चक्रवर्ती राजापेक्षांहि मोठा अशा अर्थाचा शब्द आपल्या भाषेंत मला आढळला नाहीं.

चंद्रगुप्ताचें ऐश्वर्य, त्याची राहणी, स्वभाव, कामाची पद्धति, दिनचर्या, इ. गोष्टींच्या संबंधानें फार गमतीची माहिती देतां येण्यासारखी आहे. पण अशोकाच्या चरित्रांत या गोष्टी अस्थानीं होतील म्हणून अगदीं थोडक्यांत त्या पुढें देतों—

चंद्रगुप्ताचें ऐश्वर्य पाहणाराचे डोळे दिपवून टाकणारें होतें. त्या ऐश्वर्याची थोडीशी बरोबरी पुढें ऐषआरामांत लोळणाऱ्या शहाजहान बादशहानें केली होती. चांदीसोन्याचीं भांडीं, भरजरीचे कपडे, हिरे, माणकें इ. रत्नाचे अलंकार या वस्तु तर त्याच्या खिसगणतींत नव्हत्या. त्याच्या बाहेर जाण्याच्या वेळीं बसण्याची पालखी सोन्याची असून रेशमी गोंड्यांच्या जागीं तिला टपोऱ्या मोत्यांचे घोस लावलेले होते. हत्ती, घोडे, स्वारींतले उंट वगैरे जनावरांच्या अंगावरसुद्धां हिरे–मोत्यांच्या झालरी लाविलेल्या झुली होत्या. राण्यामहाराण्यांना हेवा वाटावा असे बहुमोल दागिने व उंची कपडे चंद्रगुप्ताच्या अंतःपुरांतल्या दासींच्या अंगावर होते !

चंद्रगुप्ताला जनावरांच्या लढाया पाहण्याचा व शिकारीचा फार षोक असे. घोड्याच्या शर्यतींचाहि नाद असे. या शर्यतीच्या वेळीं हल्लींप्रमाणें जुगारहि चालत असे. शिकार करीत असतांना त्याच्या शरीररक्षणाचें काम शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेल्या स्त्रियांकडे होतें. या स्त्रिया परदेशांहून गुलाम म्हणून खरीद करून आणिलेल्या असत. तसेंच त्याच्या निजण्याच्या जागीं या स्त्रियांचा पहारा असे. चंद्रगुप्त राज्यकारभाराच्या कामासाठीं किंवा शिकारीसाठीं तेवढा महालाच्या बाहेर पडे. लोकांचे अर्ज स्वतः ऐके व निकाल देई. त्यामुळें प्रजा त्याच्यावर संतुष्ट असे. तरी पण त्याला आपल्या जिवाला अपाय होण्याचें भय नेहमीं वाटे. त्याला मल्लयुद्धांत भाग घेण्यांत फार आनंद वाटे. रोज नेमानें व्यायाम करून त्यानें आपलें शरीर गुटगुटीत बनविलें होतें. मालिश करून घेण्याची त्याला संवय होती. दरबारांत बसला तरी चार संवाहक त्याची अंगचेपी सारखी करीत असत.

## युद्धनीति

महाभारतांत वर्णिलेली युद्धनीति चंद्रगुप्ताच्या काळापर्यंत अबाधितपणें चालत आली होती असें दिसतें. जखमी झालेल्या व निःशस्त्र योद्ध्यावर शस्त्र चालविणें, किंवा शरण आलेल्याला मारणें, किंवा त्रासवून सोडणें, शत्रूच्या मुलखांतल्या शेतांच्या पिकांची नासाडी करणें, त्या मुलखांतल्या विहिरी, तलाव इ. जलसंचयांत विष कालवून ठेवणें इ. गोष्टींची गणना युद्धसमयींसुद्धां पापकृत्यांत होत असे. शत्रूंशीं समोरासमोर युद्ध करून सरळपणें त्यांच्यावर विजय मिळविण्यांतच खरें शौर्य आहे अशी त्या काळीं सर्वत्र समजूत होती.

## परराष्ट्रीय संबंध व राजनीति

देशांतल्या इतर स्वतंत्र राज्यांशीं मगधाचा स्नेहसंबंध होता. परस्परांच्या दरबारीं परस्परांचे वकील असत व त्यांना सन्मानपूर्वक वागविण्यांत येत असे.

हिंदुस्थानाबाहेरच्या परराष्ट्रांशींहि मगध राज्याचा संबंध स्नेहभावाचा होता. त्या राष्ट्रांचे वकील मगधाच्या दरबारांत असत, तसे मगधाचेहि वकील त्यांच्या दरबारांत होते. शिवाय इतर राज्यांतली गुप्त बातमी आणणारे विश्वसनीय दूतहि चंद्रगुप्तापाशीं होते. त्या काळच्या हिंदूंचें राजनीतिकौशल्य हल्लींच्या युरोपियन डिप्लोमसीपेक्षां कोणत्याहि तऱ्हेनें कमी नव्हतें. कौटल्य ऊर्फ चाणक्य हा निरिच्छ ब्राह्मण चंद्रगुप्ताचा प्रधानमंत्री होता. कौटल्य या नांवावरून चाणक्याच्या राजनीतींत विशेष कुटिलता होती—किंबहुना चाणक्याच्या कुटिल नीतीवरून त्याचें कौटल्य नांव पडलें—असें कित्येक म्हणतात. पण तें खोटें आहे. त्याचें खरें नांव कौटिल्य असें नसून कौटल्य होतें. राजनीति म्हटली म्हणजे थोडी-बहुत तरी कुटिलता तिच्यांत असावयाचीच. तिच्याशिवाय मुत्सद्द्यांचें चाला-वयाचें नाहीं. तसा चाणक्याच्या नीतींतहि कुटिलतेचा थोडासा भाग आहे. पण हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्रांच्या राजनीतीची कुटिलता पाहिली तर तिच्यापुढें चाणक्याची नीति म्हणजे पुष्कळ अंशानें साधुत्वाची ठरेल यांत शंका नाहीं. कोणत्याहि देशाची राजनीति तेथील राजकीय, सामाजिक, नैतिक व धार्मिक परंपरेनें ठरत असते. मॅक्व्हेली हा युरोपखडांत कुटिलनीतीचा आचार्य समजला जातो. पण त्याच्या नीतीचेंहि समर्थन याच मुद्द्यावर मि. वॅलेस यानें आपल्या Political Ideals या ग्रंथांत केलें आहे, आणि मुत्सद्दी हे परिस्थितीनें निर्माण केलेले असतात असें म्हणून मॅक्व्हेलीला दोष देणारांची चूक दाखविली आहे. चंद्रगुप्ताच्या वेळची हिंदुस्थानची आचारविचारांची एकंदर परंपरा पाहिली, तर चाणक्यनीतींत दुष्टपणाची शंका घेण्याला कांहीं कारण नाहीं व मॅक्व्हेलीशीं जें त्याचें साम्य दाखविण्यांत येतें तें साफ चुकीचें आहे असें म्हणावें लागतें. पुष्कळशा वाईट, लबाडीच्या व दुष्टपणाच्या गोष्टी चाणक्याच्या नांवावर खुशाल दडपणारांनीं त्याचें नांव उगाच बद्दू करून ठेविलें आहे. त्याचें 'कौटिलीय अर्थशास्त्र' ज्यांनीं मार्मिक दृष्टीनें वाचलें आहे त्यांना हें सांगावयाला नकोच.

## चंद्रगुप्ताचा राज्यत्याग व मृत्यु

चंद्रगुप्तानें चोवीस वर्षेपर्यंत मोठ्या हुशारीनें व आपला दबदबा सर्वांवर ठेवून राज्य केलें व येथें त्याची कारकीर्द संपली. जैनग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, चंद्रगुप्तानें आपल्या कारकीर्दीच्या अखेरी अखेरीस एका जैन साधूच्या उपदेशानें विरक्त होऊन व आपला मुलगा बिंदुसार याच्या स्वाधीन राज्यसूत्रें करून आपण त्या साधूच्या संगतींत दक्षिणेकडे निघून गेला आणि तिकडे बारा वर्षें राहिल्यानंतर प्रायोपवेशन करून त्यानें देहत्याग केला. ही जैनग्रंथांतली कथा विश्वसनीय असण्याचा संभव फार कमी दिसतो. कारण, जैनांना हिंसेचें अतिशय वावडें आहे. ते हिंसा हें महत्पाप समजतात. पण चंद्रगुप्ताला तर शिकार अत्यंत प्रिय होती. तो मोठ्या थाटामाटानें मोठ्या परिवारासह शिकारीला जात असे, असें तत्कालीन परदेशी प्रवाश्यांनीं लिहून ठेविलेलें आहे. त्याच्या आहारासाठीं पाकशाळेंत रोज अनेक प्राण्यांचा संहार होत असे व तो अपराध्यांना ज्या शिक्षा करी त्याहि अत्यंत क्रूरपणाच्या होत्या. या गोष्टी वरील कथेच्या विरुद्ध पुरावा म्हणून देतां येतात. तथापि असा प्रकार असूनहि पुढें त्याला पश्चात्ताप व वैराग्य प्राप्त होणें संभवनीय आहे. पण असें असेल तर त्याबद्दलचा जैनपुराणांहून अन्य कांहीं सबळ पुरावा उपलब्ध झाल्याशिवाय ही गोष्ट खरी मानतां येत नाहीं. अशोकाला कलिंगविजयानंतर पश्चात्ताप झाल्याबद्दल जसा खुद्द त्याच्या हातचा लेख पुरावा म्हणून मिळाला, तसा चंद्रगुप्तानें जैनधर्माचा स्वीकार केल्याबद्दलचा पुरावा मिळेपर्यंत या प्रश्नाचा निकाल लागावयाचा नाहीं.

☆ ☆ ☆

# प्रकरण चौथें

# बिंदुसार

## अमित्रघात का बिंदुसार

चंद्रगुप्ताच्या मागून त्याचा पुत्र बिंदुसार हा मगधाच्या सिंहासनावर बसला. ग्रीक इतिहासांत बिंदुसाराच्या नांवाचासुद्धां उल्लेख आढळत नाहीं ! चंद्रगुप्ताच्या मागून त्याचा पुत्र अमित्रघात हा गादीवर आला असें ते इतिहासकार लिहितात. पण हिंदूंचें विष्णुपुराण, बौद्धाचा महावंश ग्रंथ आणि जैनांचा परिशिष्टपर्व ग्रंथ या तिन्ही ग्रंथांतून चंद्रगुप्ताच्या पुत्राचें बिंदुसार हेंच नांव आढळतें. इतका जवळचा सबळ पुरावा असल्यावर ग्रीक इतिहासकारा-सारख्या परकीय लेखकाच्या माहितीवर कोण विश्वास ठेवील ? 'अमित्रघात' म्हणजे शत्रूंचा घात करणारा ही सन्मान्य पदवी बिंदुसाराच्या नांवाला जोडण्यांत येत असेल आणि तेंच त्याचें खरें नांव अशी समजूत ग्रीक लेखकांची कदाचित् झाली असेल.

चंद्रगुप्तासारख्या अतिशय प्रभावशाली व बुद्धिमान् पित्याच्या मागून गादीवर आल्यामुळें बिंदुसाराची बुद्धिमत्ता व कर्तृत्वशक्ति पित्याच्या तेजापुढें दिपून गेली ही गोष्ट खरी. तथापि तो अगदींच सामान्य प्रतीचा राजा होता असा जो समज आहे तो मात्र खरा नाहीं. चंद्रगुप्तानें आपल्या उग्र तेजस्विते-मुळें आणि प्रखर विक्रमशालित्वामुळें बरेचसे शत्रु करून ठेविले होते. याचा उल्लेख मागच्या प्रकरणांत आलाच आहे. चंद्रगुप्ताच्या मरणानंतर आपलें नष्टवैभव परत मिळविण्याची कांहीं खटपट न करतां ते स्वस्थ बसले असतील असें संभवनीय दिसत नाहीं. त्यांनीं बिंदुसाराविरुद्ध कारस्थानें उभीं केलीं असावीं, पण बिंदुसारापुढें त्यांचें कांहीं चाललें नसावें हीच गोष्ट अधिक संभवनीय दिसते. चंद्रगुप्ताच्या वेळचें राज्यकारभाराचें धोरण त्यानें पूर्णपणें संभाळून

देशांत शांतता कायम राखिली ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं. चंद्रगुप्तानें ग्रीसदेशच्या राजाशीं स्नेहसंबंध जोडला होता, तोहि बिंदुसारानें तसाच पुढें चालविला. चंद्रगुप्ताच्या दरबारीं जसा मेगॅस्थनीस हा ग्रीक राजाचा वकील होता, तसा बिंदुसाराच्याहि दरबारीं डाइमेक्स नांवाचा सीरियाच्या राजाचा एक वकील होता.[1] मेगॅस्थनीसप्रमाणें यानेंहि स्वतः पाहिलेल्या गोष्टी आपल्या प्रवासवृत्तान्तांत लिहून ठेविल्या होत्या असें म्हणतात. पण हा प्रवासवृत्तान्त सध्या उपलब्ध नाहीं. भारत-इतिहासाची ही निःसंशय मोठी हानि झाली आहे.

बिंदुसाराच्या कारकीर्दीचा इतिहास उपलब्ध नाहीं. त्यानें दक्षिणेकडे आपलें राज्य वाढविलें असें दर्शविणारा एक उल्लेख तारानाथ यानें आपल्या ग्रंथांत केला आहे असें मि. एस. के. आयंगार आपल्या The Gleanings of Indian History नामक ग्रंथांत म्हणतात. तारानाथांची हकीकत खरी असेलसें वाटतें. कारण, चंद्रगुप्ताच्या वेळीं दक्षिणप्रांत जिंकला गेला नव्हता. पुढें अशोकानेंहि फक्त कलिंगराज्यच जिंकलें. तेव्हा दक्षिण प्रांत बिंदुसारानेंच जिंकला असला पाहिजे.

## परदेशी राजांशीं स्नेहसंबंध

बाबिलोनचा राजा सेल्यूकस निकेटॉर याच्या मृत्यूनंतर आंटिओकस हा त्याच्या गादीवर बसला. त्याच्याशीं बिंदुसाराचा स्नेहसंबंध चांगला होता असें दिसतें. त्यांच्यामध्यें पत्रव्यवहारहि चालत असे. पैकीं एका पत्रांत बिंदुसारानें अंजीर व द्राक्षें यांपासून काढलेलें मद्य व ग्रीक भाषेचा एक उत्तम शिक्षक विकत घेऊन पाठवून देण्याविषयीं आंटिओकसला विनंती केली होती. या

१. ईजिप्तचा राजा टॉलेमी फिलाडेल्फॉस यानेंहि डायोनिसीऑस नांवाचा आपला एक वकील मगधराजाच्या दरबारीं ठेविला होता. [ Vide V. Smith's Ashoka, P. 19 ]

पत्राचे उत्तरीं बाबिलोनच्या त्या राजानें लिहिलें कीं, आपण मागविलेलें मद्य पाठविण्यास मला फार आनंद वाटतो. पण मला खेदानें लिहावें लागतें कीं, ग्रीक भाषेचा कोणी पंडित मला पाठवितां येत नाहीं. कारण कीं, आमच्या लोकांत विद्वानांना विकणें हें फार गैर समजलें जात असल्यामुळें पंडिताला पाठवितां येत नाहीं.

ही गोष्ट असंभवनीय दिसते. हिंदु लोकांतसुद्धां विद्येचा विक्रय करणें हें पूर्वीच्या काळीं पातक समजलें जात असे. विद्वान् पंडिताला गुलाम म्हणून विकत घेऊन पाठवा असें म्हणण्याइतका मूर्ख बिंदुसार खास नव्हता.

वरील गोष्ट खरी असली तर तिच्यावरून असा एक विचार मनांत येतो कीं, प्राचीन काळीं राजे लोकांच्या ठायीं विद्याभिरुचि विशेष असली पाहिजे. इतकेंच नाहीं तर 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह दृश्यते' या वचनावर त्यांची पूर्ण श्रद्धा असल्यामुळें म्हणा किंवा कांहीं राजकारणी हेतूमुळें म्हणा, पण आपणाशीं ज्यांचा वरचेवर संबंध येतो अशा परकीयांच्याहि भाषेचें ज्ञान मिळविण्याची तीव्र लालसा त्यांचे ठायीं असली पाहिजे. एरव्हीं इतक्या लांबून व बरेंच द्रव्य खर्च करून ग्रीक भाषेचा अध्यापक बोलावण्यावांचून बिंदुसाराचें काय येवढें अडलें होतें.

## मृत्यु

पंचवीस वर्षें[१] राज्य केल्यावर इ. स. पू. २७३ व्या वर्षी राजा बिंदुसार याचें प्राणोत्क्रमण झालें. त्याला सुसीम व अशोकवर्धन अथवा अशोक असे दोन[२] पुत्र होते. पैकीं अशोक हा बिंदुसाराच्या मागून गादीवर बसला. गादीवर

१. फ्लीटच्या मतें हा काल २८ वर्षांचा होता.

२. हें व्हिन्सेंट स्मिथचें म्हणणें आहे. पण अशोकाला पुष्कळ भाऊबहिणी होत्या असें स्वतः अशोकाच्याच एका आदेशांत म्हटलें आहे तें कसें खोटें म्हणतां येईल ? यासंबंधाचें विवेचन पुढच्या प्रकरणांत येणार आहे.

बसण्यापूर्वी हा कित्येक वर्षेपर्यंत तक्षशिला व उज्जयिनी या दोन्ही ठिकाणीं राजाचा प्रतिनिधि म्हणून होता. या दोन्ही राजपुत्रांच्या संबंधानें बौद्धग्रंथांतून विचित्र दंतकथा आहेत. त्यांचा उल्लेख पुढें करण्यांत येईलच. बिंदुसाराच्या पदरीं खल्लातक व राधागुप्त हे दोघे हुषार मंत्री होते. त्यांचा अशोकाला राज्यारोहणाच्या कामीं फार उपयोग झाला असावा असें दंतकथांवरून दिसतें.

याप्रमाणें शिशुनागवंशाच्या आरंभापासून तों आपल्या चरित्रनायकाच्या म्हणजे अशोकाच्या राज्यारोहणापर्यंतच्या काळाचा मगध देशाचा इतिहास आतांपर्यंत थोडक्यांत वर्णन केला. यापुढें अशोकाचें चरित्र सांगण्यास सुरुवात करण्यापूर्वी शिशुनाग, नंद व मौर्य या तिन्ही वंशांतल्या पुरुषांच्या नाममालिका महावंश व दिव्यावदान हे दोन प्रमुख बौद्धग्रंथ, विष्णुपुराण हा हिंदुग्रंथ आणि स्थविरावलिचरित हा जैन ग्रंथ यांतून कसकशा दिल्या आहेत तें एकदम डोळ्यांपुढें यावें म्हणून कोष्टकरूपानें त्या समोरासमोर मांडतों, म्हणजे त्या ताडून पाहतां येतील.

**महावंश**

- बिंबिसार
- अजातशत्रु
- उदायिभद्र
- अनुरुद्धक
- मुंड
- नागदासक
- शिशुनाग
- कालाशोक
- नवनंद
- चंद्रगुप्त
- बिंदुसार
- अशोक

**दिव्यावदान**

- बिंबिसार
- अजातशत्रु
- उदायिभद्र
- मुंड
- काकवर्णी
- सहली
- तुलकुची
- महामंडल
- प्रसेनजित्
- नंद
- बिंदुसार
- सुषीम, अशोक व विगताशोक

**विष्णुपुराण**

- शिशुनाग
- काकवर्ण
- क्षेमधर्मन्
- क्षेत्रोजस्
- बिंबिसार
- अजातशत्रु
- दर्शक (हर्षक)
- उदयाश्व
- नंदिवर्धन
- महानंदी
- नंदवंश
- =
- महापद्मनंद
- त्याचे ८ पुत्र
- =
- मौर्यवंश
- =
- चंद्रगुप्त
- बिंदुसार
- अशोक

**स्थविरावलि**

- श्रोणिक
- कुणिक
- उदायी
- =
- नंद
- =
- चंद्रगुप्त
- अशोक

☆ ☆ ☆

# प्रकरण पांचवें

# अशोकाचें राज्यारोहण व राज्याभिषेक

## अशोकाच्या पूर्ववयासंबंधाच्या दंतकथा

अशोकाचा जन्म कधीं झाला, त्याच्या आईचें नांव[१] काय होतें, त्याला कशा प्रकारें शिक्षण देण्यांत आलें होतें वगैरेसंबंधाची व त्याचप्रमाणें त्याच्या बाल-पणांतल्या इतर गोष्टींबद्दलची विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. बौद्ध ग्रंथांतून जी माहिती लिहिलेली आढळते, तिच्यावरून तो प्रथम वयांत अत्यंत कुरूप व स्वभावानें अत्यंत दुष्ट व क्रूर होता असें दिसतें. त्यानें राज्यलोभानें आपल्या ९९ भावांस ठार मारलें व अगदीं क्षुद्र कारणांवरून स्वतःच्या राण्यांचाहि शिरच्छेद केला अशा प्रकारच्या दंतकथा त्या ग्रंथांतून आढळतात.[२] पण त्या गोष्टींना अन्य कांहीं सबळ पुरावा मिळत नाहीं; उलट, अशोक मगधाच्या गादीवर बसल्यानंतर पुष्कळ वर्षांनीं त्यानें खोदविलेल्या एका आदेशांत आपले भाऊ पाटलीपुत्र नगरांत व अन्यत्रहि आहेत असें स्पष्ट म्हटलेलें आहे. या गोष्टीचा वरील दंतकथेशीं मुळींच मेळ बसत नसल्यामुळें सदर दंतकथा खऱ्या

---

१. अशोकाच्या आईचें नांव सुभद्रांगी होतें असें अशोकावदानमाला या बौद्ध ग्रंथांत म्हटलें आहे. सिंहली दंतकथा दीपवंश व महावंश या दोन ग्रंथां-तून दिलेल्या आहेत त्या पाहतां बिंदुसाराला १६ राण्या व १०१ पुत्र होते. त्यांपैकीं सर्वांत वडील तिष्य, मधला अशोकवर्धन व धाकटा सुमन अशीं तीनच नांवें त्यांत दिलेलीं आढळतात.

२. तारानाथ लिहितो कीं, अशोकानें फक्त ६ भावांना मारलें. महाबोधिवंश ग्रंथांत म्हटलें आहे कीं, बिंदुसाराच्या मृत्यूनंतर मगधाच्या गादीसाठीं भावा-भावांत कलह लागून युद्ध झालें. त्यांत अशोकाखेरीज बाकीचे सगळे राजपुत्र मारले गेले

मानतां येत नाहींत, असें व्हिन्सेंट स्मिथ व दुसरेहि कित्येक लेखक म्हणतात. पण हें म्हणणें मला पटत नाहीं. अप्रिय असलेले भाऊ अशोकानें कदाचित् मारले असतील व त्याच्या वाटेस न जाणाऱ्या निरुपद्रवी भावांना मारलें नसेल व या दुसऱ्या भावांचाच उल्लेख अशोकाच्या आदेशांत करण्यांत आला असेल हें संभवनीय आहे. अशोकाच्या पूर्ववयासंबंधाच्या अशा खोट्या व त्याची बदनामी करणाऱ्या गोष्टी लिहून ठेवण्यांत बौद्ध लेखकांचा कोणता हेतु होता? अशोकाची अशी निंदा करून त्यांना काय मिळावयाचें होतें? असे प्रश्न कोणी विचारल्यास त्याला व्हिन्सेंट स्मिथ असें उत्तर देतो कीं, अशोकानें बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर त्याचें जें साधुत्वाचें वर्तन त्याच्या चरित्रांत दिसून येतें तें बौद्ध धर्माच्या प्रभावामुळें घडलेलें परिवर्तन होय आणि असें परिवर्तन घडवून आणण्याची अलौकिक शक्ति त्या धर्माच्या ठायीं आहे, हें लोकांच्या डोळ्यांत चांगलें भरावें म्हणून अशोकाच्या पूर्ववयांतल्या चरित्राला बौद्ध लेखकांनीं मुद्दाम काजळ फासलें असावें. दुसऱ्याहि पुष्कळ पाश्चात्त्य लेखकांचें मत असेंच आहे. हें त्यांचें मत बौद्ध दंतकथा येथून तेथून सगळ्या अविश्वसनीय असा जो त्यांचा ठाम ग्रह होऊन बसला आहे त्याचा परिणाम दिसतो. बौद्ध दंतकथांतून अतिशयोक्ति असेल. तशी अतिशयोक्ति अशोकाच्या लेखांतहि आहे हें पुढें एका प्रकरणांत दाखविलेंहि आहे. पण त्यावरून अन्य पुराव्याच्या अभावीं त्यांना साफ खोटें म्हणणें व त्याच्या बुडाशीं मतलबाचा हेतु होता असा आरोप करणें हें धाष्टर्याचें आहे असें मला वाटतें.

## अशोकाची आई

अशोकाची आई कोण होती यासंबंधाची जी एक दंतकथा आहे तीहि विद्यमान लेखकांकडून अविश्वसनीय मानण्यांत येते. प्रस्तुत चरित्राच्या शेवटीं ज्या अनेक दंतकथा जोडल्या आहेत त्यांत ती वाचण्यास सांपडेल. यापेक्षां यासंबंधानें जास्त कांहीं लिहिण्याची अवश्यकता दिसत नाहीं.

## शिक्षण

अशोकाच्या कुरूपतेमुळें व दुष्ट स्वभावामुळें बालपणापासूनच तो बापाचा नावडता होता आणि म्हणून त्याला इतर राजकुमारांबरोबर बोलूं व खेळूं देण्यांत येत नसे असें दंतकथा सांगतात; पण तें खरें दिसत नाहीं. माणसाच्या स्वभावांत आमूल परिवर्तन घडूं शकत नाहीं असें नाहीं. पण तसें घडलें असल्याविषयीं तसाच भक्कम पुरावा कारणांसह पुढें आल्याशिवाय त्या गोष्टीवर विश्वास ठेवतां येत नाहीं. सामान्यतः मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात हीच म्हण अनुभवास येते. म्हणून विरुद्ध पुराव्याच्या अभावीं असें धरून चालण्यास हरकत नाहीं कीं, अशोक हा त्याच्या बालपणापासूनच धर्मशील, नम्र, सात्त्विक वृत्तीचा, कोमल मनाचा आणि भावनाप्रधान होता. इतर राजकुमारांप्रमाणेंच त्याचें शिक्षण झालेलें होतें. त्याच्या दर्जाला व इभ्रतीला अनुरूप असें नोकराचाकरांशीं व इतर जनांशीं त्याचें नेहमीं वर्तन होतें. लहानपणापासूनच त्याला शिकारीचा नाद होता आणि ही गोष्ट त्याच्या दोन लेखांतहि[१] स्पष्टपणें सांगितली आहे. पूर्वीच्या काळीं मृगया हा क्षत्रियांचा एक प्रिय व्यवसाय होता ही गोष्ट संस्कृत शाकुंतल, विक्रमोर्वशीय प्रभृति नाटकांवरून दिसते. मौर्यवंशी क्षत्रियांच्या ठायीं मृगयाप्रियता विशेषच होती असें ग्रीक इतिहासकारांनीं लिहून ठेविलें आहे आणि मुद्राराक्षस नाटकावरूनहि तें खरें दिसतें. यापलीकडे अशोकाच्या बालपणासंबंधानें अधिक माहिती उपलब्ध नाहीं.

## तक्षशिला येथें नेमणूक

अशोक तरुण वयांत मोठा धाडसी व संकटाचे वेळीं न डगमगतां त्याला धैर्यानें तोंड देणारा असावा असें दिसतें. कारण, राज्यांत कोठें बंड वगैरे झालें

१. गिरिलेख ( आदेश ) १ व ८ पाहा.

तर तें मोडून तेथें शांतता पुनः स्थापित करण्याचें काम एकदोन वेळां या तरुण राजपुत्राकडे आलें होतें. मगध राजाचें प्रभुत्व चंद्रगुप्ताच्या वेळेपासून इतर राजांना असह्य वाटत होतें आणि त्याची सार्वभौम सत्ता उलथून पाडण्यासाठीं उपद्व्यापी लोकांचीं कारस्थानें व खटपटी सारख्या सुरू होत्या. पण चंद्रगुप्तापुढें कोणाचें कांहीं चाललें नाहीं. बिंदुसारानें चंद्रगुप्ताच्याच वेळची राज्यव्यवस्था व शिस्त कायम ठेविली होती. तथापि चंद्रगुप्ताची तेजस्विता त्याच्या पुत्राच्या ठायीं नसल्यामुळें आपला डाव साधण्याचे प्रयत्न मगधसत्तेच्या विरुद्ध कट करणाऱ्या मंडळींकडून मधून मधून करण्यांत येत. असा एक कट बिंदुसाराच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात तक्षशिला[१] येथें झाला होता व त्या कटाला बंडाचें व्यक्त स्वरूप आलें होतें. तें बंड मोडण्याचें काम राजपुत्र अशोक याच्याकडे आलें होतें. अशोकानें पित्याच्या आज्ञेवरून तें बंड मोडलें. तथापि तेथें शांतता स्थापित करण्यासाठीं त्याला आणखी कांहीं काळ राहणें अवश्य होतें. म्हणून राजा बिंदुसार यानें तेथील राजप्रतिनिधि कुमार तिष्य याला परत बोलावून अशोकाची तेथें नेमणूक केली, व त्याप्रमाणें तो तेथें तीन वर्षे राहिला अशी एक कथा प्रसिद्ध आहे.

## अशोकाची कामगिरी

तक्षशिला येथील बंड युद्ध व रक्तपात केल्यावांचून अशोकानें मोडलें. असें सांगण्यांत येतें कीं, अशोक तक्षशिला येथें गेल्यावर तेथील प्रजेनें त्याचें उत्तम प्रकारें स्वागत केलें आणि अधिकाऱ्यांचे अत्याचार हे बंडाला खरोखर कारण आहेत, प्रजेच्या मनांत राजद्रोहाची यत्किंचित्‌हि भावना नाहीं, अशी

---

१. सिंधुनदीपासून तीन दिवसांच्या मजलेवर हें सुप्रसिद्ध स्थान होतें. बौद्ध ग्रंथांत याचें नांव तक्षशिर असेंहि लिहिलेलें आढळतें. हें दुसरें नांव पडण्याचें कारण भगवान् गौतमबुद्ध यानें लोककल्याणार्थ आपलें शिर तेथें अर्पण केलें होतें अशी दंतकथा आहे.

राजपुत्राची खात्री करून दिली. तेव्हां अशोकानें गोड बोलून व खऱ्या अपराध्यांना शासन करण्यांत येईल असें सांगून त्यांचीं क्षुब्ध मनें शांत केलीं. राजपुत्राच्या या आश्वासनानें लोक संतुष्ट झाले आणि गडबड मोडली. ही कथा विश्वसनीय दिसते. कारण, येथें जर त्याच्या हातून खरोखर रक्तपात झाला असता, तर कलिंगविजयाच्या वेळीं त्याच्या हातून घडलेल्या असंख्य प्राणांच्या संहाराबद्दल जसे पश्चात्तापोद्गार त्यानें आपल्या एका आदेशांत नमूद करून[१] ठेविले, तसें या वेळच्या रक्तपातासंबंधानेंहि बहुधा केलें असतें.

## उज्जयिनी येथें नेमणूक

तक्षशिला येथील कामगिरी संपवून परत आल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्याची नेमणूक उज्जयिनी येथील राजप्रतिनिधि म्हणून करण्यांत आली. या नेमणुकीसंबंधानेंहि लोकप्रवाद गमतीचा आहे. तो निराळ्याच एका दंतकथेंत सांपडतो. वास्तविक पाहतां ही नेमणूक करण्यांत अशोकाचा मगध राज्याच्या एका मोठ्या व महत्त्वाच्या भागाशीं प्रत्यक्ष परिचय व्हावा व राज्यकारभाराच्या कामाची जोखीमदारी शिरावर घेऊन ती पार पाडण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं यावें असा उच्च हेतु राजाच्या मनांत असणें स्वाभाविक आहे. पण लोकप्रवादानें त्याला विकृत स्वरूप देऊन अशोक कुरूप व नावडता असल्यामुळें राजाला आपल्या दृष्टीसमोर नकोसा झाला होता व त्यांत अशोकाची सावत्र आई तिष्य-रक्षिता हिच्या अशोकाविषयींच्या द्वेषाचीहि भर पडली, म्हणून उज्जयिनी-सारख्या पाटलीपुत्रापासून दूरच्या प्रांतांत त्याला पाठविण्यांत आलें असा खऱ्या हेतूचा विपर्यास करण्यांत आला असावा. उज्जयिनी प्रांत फार समृद्ध आणि विद्या, शिल्प आणि व्यापार या तिन्ही बाबतींत इतर प्रांतांहून फार पुढारलेला

१. गिरिलेख किंवा आदेश १३ व लघु लेख १ पाहा.

असल्यामुळें त्या प्रांतावर अंमल करण्यास आपल्या पुत्राहून अधिक विश्वासुक व स्वतःवरची जबाबदारी ओळखून शहाणपणानें वागणारा मनुष्य राजाला न आढळल्यामुळें अशोकावर त्यानें ती कामगिरी सोंपविली असा त्या नेमणुकीचा स्वाभाविक अर्थ असूं शकेल.

अशोक उज्जयिनीला असतां मागें राजा बिंदुसार पाटलीपुत्र येथें आजारी पडला. हें वर्तमान ऐकून अशोक घाईघाईनें पित्याच्या भेटीसाठीं पाटलीपुत्राला आला. पण त्याची व बिंदुसाराची भेट झाली नाहीं. अशोक पाटलीपुत्रास येऊन पोंचण्यापूर्वींच राजा मरण पावला.

## बिंदुसाराचा मृत्यु

बिंदुसार मरण पावल्यावर अशोक त्याच्या गादीवर बसला (इ. स. पू. २७३ व्या वर्षी ) व त्यानंतर चार वर्षांनीं म्हणजे इ. स. पू. २६९ व्या वर्षी त्याला रीतसर राज्याभिषेक झाला.[१] बिंदुसाराला सुसीम हा वडील पुत्र होता. तो पाटलीपुत्राच्या गादीवर न बसतां धाकटा पुत्र अशोक याला राजपद मिळालें आणि राजपद मिळाल्याबरोबर राज्याभिषेक न होतां तो मागून चार वर्षांनीं झाला या दोन्ही गोष्टी विचित्र आणि म्हणून कोणाच्याहि मनांत शंका उत्पन्न करण्यासारख्या निःसंशय होत्या. या दोन्ही विचित्र गोष्टींचा योग्य खुलासा अशोकाच्या शिलालेखांत किंवा अन्यत्र मिळत नसल्यामुळें त्यासंबंधाच्या ज्या अनेक दंतकथा आहेत त्यांच्यावर विश्वास ठेवण्याकडे माणसाच्या मनाची साहजिकच प्रवृत्ति होते.

---

१. प्रो. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांना हें विधान संमत नाहीं. ते म्हणतात — " There is no good reason to think that any long interval such as that of four years elapsed between Ashok's coronation and his assumption of the reins of Government " ( D. R. Bhandarkar's Ashoka, P. 10. )

### दंतकथा

सुसीमाला राजपद न मिळतां त्याचा धाकटा भाऊ अशोक याला तें कसें मिळालें याविषयीं अशी एक दंतकथा आहे कीं, सुसीमाचें व बिंदुसाराचे दोघे मंत्री राधागुप्त व खल्लातक यांचें चांगलें नव्हतें. याला कारण असें झालें होतें कीं, सुसीमानें आपल्या खोडकर स्वभावाप्रमाणें खल्लातक याची एकदा खोडी करून अपमान केला होता. त्यामुळें खल्लातकाचें मन सुसीमाविषयीं शुद्ध नव्हतें. तो अपमानाचा सूड घेण्याच्या विचारांत होता. इतक्यांत तक्षशिला येथें पुनः बंड उद्भवल्याची बातमी आली. तेव्हां मंत्र्यांच्या सल्ल्यानें तें बंड मोडण्यासाठीं राजानें सुसीमाला तक्षशिला येथें पाठविलें. पण सोंपविलेली कामगिरी सुसीमाला पार पाडतां आली नाहीं, आणि तो गेला तसा परत आला. मध्यंतरीं राजा बिंदुसार आजारी पडून मरण पावला. सुसीम तेव्हां तक्षशिला येथें होता. ही संधि साधून खल्लातकानें राधागुप्त व इतर मंत्री यांच्या साह्यानें अशोकाला गादीचा वारस म्हणून पुढें केलें, आणि त्यालाच राजपद दिलें. बिंदुसार मेल्याचें वर्तमान सुसीमाला वाटेंतच कळलें. तेव्हां तो तांतडीनें पाटलीपुत्राला आला. पण त्याला वेशीच्या आंत पाऊल ठेवतां येऊं नये, असा कडेकोट बंदोबस्त मंत्र्यांनीं अगोदरच करून ठेविला होता. किल्ल्याच्या वेशीवर प्रबळ सैनिक उभे केले होते आणि किल्ल्याभोंवतालच्या खंदकांत पुष्कळ लाकडें वगैरे भरून तीं पेटवून दिलीं होतीं. सुसीमानें उडी मारून खंदक पार होण्याचा प्रयत्न केला, पण बिचारा मधल्यामध्यें खंदकांतल्या ज्वालेंत पडून जळून मेला.

### तिची विश्वसनीयता

सुसीमास राजपद न मिळतां तें अशोकास मिळालें या विचित्र घटनेच्या दुसऱ्या जास्त सयुक्तिक खुलाशाच्या अभावीं वरील कथा सयुक्तिक म्हणून ग्राह्य मानण्यास हरकत दिसत नाहीं. कारण, सुसीमाला मारण्यांत अशोकाचें अंग होतें असें या

कथेंत म्हटलेलें नाहीं. त्याच्या मंत्र्यांचें हें कारस्थान होतें असें स्पष्ट दिसत आहे. अर्थात् अशोकाच्या शिलालेखांतल्या त्याच्या भावाविषयींच्या उल्लेखाला या कथेच्या योगानें जर बाध येत नाहीं, तर ती विश्वसनीय मानून चालण्यास कोणता प्रत्यवाय आहे तें कळत नाहीं.

## राज्याभिषेक लांबणीवर कां पडला ?

राजपदप्राप्तीनंतर चार वर्षांनीं त्याला राज्याभिषेक झाला याबद्दलहि इतिहासकारांना सयुक्तिक खुलासा देतां येत नाहीं. राज्यारोहण व राज्याभिषेक यांच्यामध्यें चार वर्षांचा काळ गेलाच नाहीं, कालगणनेच्या चुकीमुळें या दोन गोष्टी चार वर्षांच्या अंतरामुळें घडलेल्या दिसतात असें प्रो. देवदत्त रामकृष्ण भांडारकर हे म्हणतात, तर व्हिन्सेंट स्मिथसारखे पाश्चात्त्य इतिहासकार म्हणतात कीं, या चार वर्षांत गादीच्या वारसाहक्कासंबंधानें भानगडी उपस्थित होऊन त्यांची मजल पुष्कळशा रक्तपातापर्यंत गेल्याकारणानें राज्याभिषेक लांबणीवर पडणें संभवनीय आहे. पण हे दुसरे वारसदार कोण होते व रक्तपात कोणाकोणाचा झाला यासंबंधानें ते अवाक्षरहि लिहीत नाहींत. सुसीमासंबंधानें वर दिलेल्या गोष्टीनें किंवा अशोकानें आपल्या ९९ भावांना मारून टाकून फक्त एकाला काय तें दयाळूपणानें जिवंत ठेविलें ही अत्युक्तपूर्ण पण रक्तपाताशीं सुसंबद्ध दंतकथा अविश्वसनीय म्हणून व्हिन्सेंट स्मिथनें त्याज्य ठरविली; पण तिच्या जागीं कोणतीहि सुसंबद्ध व सयुक्तिक कथा न देतां रक्तपाताचा प्रश्न अनिर्णीतच ठेवून दिला आहे. अशा स्थितींत सुसीमाची वरील दंतकथाच खरी मानिली पाहिजे किंवा प्रो. भांडारकरांचें म्हणणें तरी कबूल केलें पाहिजे, याशिवाय अन्य मार्ग दिसत नाहीं.

## राज्याभिषेककालासंबंधानें भिन्न मतें

अशोकाच्या राज्याभिषेककालासंबंधानेंहि पाश्चात्त्य पंडितांत एकमत दिसत नाहीं. कनिंगहॅमच्या मतें तो काळ इ. स. पू. २६० वर्षें, मॅक्समुल्लरच्या मतें

२५९, फ्लीटच्या मताप्रमाणें २६५ व व्हिन्सेंट स्मिथच्या मतें २६९ वर्षें असा आहे. आमच्या मतें हा काल खि. पू. २६९ वर्षेंच असला पाहिजे.

अशोकाला राज्यप्राप्ति झाल्यानंतर पहिलीं चार वर्षें (राज्याभिषेक होई-पर्यंत) त्याचें मन थोडेंसें अस्वस्थ असणें स्वाभाविक आहे. पुढच्या नऊ वर्षांतहि कांहीं विशेष महत्त्वाची घटना झालेली दिसत नाहीं. या काळांत केव्हां तरी (राज्याभिषिक्त होतांच) त्यानें आपल्या नांवामागें 'देवानां प्रिय प्रियदर्शी राजा[१]' ही पदवी लावून घेतली. कांहीं कांहीं ठिकाणीं ही संबंध पदवी लाविलेली आढळते, तर कांहीं ठिकाणीं या पदवींतलें एखाद दुसरें पद गाळून नुसतें 'देवानां प्रिय प्रियदर्शी,' 'प्रियदर्शी राजा' किंवा 'देवानां प्रिय' असे संक्षेप केलेले पाहण्यांत येतात. मगधाच्या साम्राज्याच्या अधि-पतीनें स्वतःला राजाधिराज किंवा निदान महाराज तरी म्हणवून घ्यावें; पण अशोकानें स्वतःला नुसतें राजा म्हणवून घेतलें याबद्दल पुष्कळांना आश्चर्य वाटेल. पण यावरून त्याची नम्रशीलता चांगली व्यक्त होते. याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यानें 'देवानां प्रिय' ही पदवी स्वतः धारण केली, दुसऱ्या कोणी चेष्टेनें ती त्याच्या नांवामागें जोडली नाहीं, ही होय. कारण कीं सिद्धान्तकौमुदीचा कर्ता भट्टोजी दीक्षित व अभिधानचिंतामणि नांवाच्या कोशाचा कर्ता हेमचंद्र या दोघा महान् पंडितांनीं 'देवानां प्रिय' या पदाचा अर्थ 'मूर्ख' असा दिलेला आहे. कितीहि विनयशील मनुष्य झाला तरी 'मूर्ख' ही पदवी तो आपल्या नांवामागें लावण्यांत भूषण मानील हें संभवत नाहीं. तेव्हां 'देवानां प्रिय' हें सामासिक पद न समजतां वियुक्त शब्द आहेत असें धरून त्यांचा अर्थ 'देवांचा लाडका' असाच घेणें योग्य आहे. पतंजलीनें या पदाचा अर्थ चिरंजीव, आयुष्मान् किंवा श्रीमान् असा गौरवपर केला

१. हें संस्कृत रूप आहे. अशोकाच्या लेखांतलें मूळ रूप 'देवानां प्रिय प्रियदस्सी लाजा' असें आहे.

आहे. हाच अर्थ येथें घेतला पाहिजे. सिंहलद्वीपचा राजा तिष्य याच्या नांवाचा उल्लेख करतांना तेथल्या दीपवंश नामक ग्रंथांत याच अर्थानें ' देवानां प्रिय ' हें उपपद त्या राजाच्या नांवामागें लाविलें आहे. हा राजा अशोकाचा समकालीन होता. तेव्हां एकाचें पाहून दुसऱ्यानेंहि तसेंच केलें असणें अगदीं संभवनीय आहे. अशोकाच्या नंतरच्या काळांतहि मौर्य वंशांतल्या राजांनीं ही पदवी आपल्या नांवामागें लावण्याचा क्रम चालू ठेविला होता असें दिसतें. कारण, अशोकाचा नातू दशरथ याच्याहि नांवाला तें जोडलेलें आढळतें. इतकेंच नाहीं, तर वंकनासिक तिष्य, गजबाहुक गामिनी व महल्लक नाग या सिंहली राजांच्याहि नांवाला तें जोडलेलें आढळतें असें विद्वान् संशोधक प्रो. देवदत्त भांडारकर लिहितात.[1]

अशोकानें स्वतःला घेतलेल्या पदवीपैकीं ' राजा ' व ' देवानां पिय ' या दोन पदांविषयींचें विवेचन आतांपर्यंत झालें. आतां राहिलेल्या ' प्रियदर्शी ' या पदाच्या अर्थाचा विचार करूं. या शब्दाचे, सुंदर स्वरूपाचा आणि सर्वत्र चांगल्या दृष्टीनें अर्थात् ममतेनें पाहणारा असे दोन अर्थ होऊं शकतात. यांपैकीं पहिल्या अर्थानें अशोकानें तें पद स्वतःकडे लाविलें असेल असें वाटत नाहीं. कारण कीं सौंदर्य हें स्त्रियांचें भूषण समजलें जातें; पराक्रमशाली राजाचें नाहीं. दुसरा अर्थ सर्वत्र चांगल्या दृष्टीनें पाहणारा म्हणजे ' ममताळू ' हा घेतला पाहिजे; आणि ज्यानें अपार द्रव्य खर्चून लोककल्याणाचीं अनेक कृत्यें केलीं असा प्रजावत्सल राजा ' ममताळू ' असला पाहिजे हें योग्यच आहे.

### मस्कीच्या लेखाचं महत्त्व

वर अशोकाच्या पदवीसंबंधानें लिहितांना ही पदवी अशोक आपल्या

1. Asoka, P. 7

नांवामागें लिहीत असे असें म्हटलें आहे. पण तें मर्यादित अर्थानेंच घेतलें पाहिजे. कारण, अशोकाच्या लेखांतून बहुधा सर्वत्र 'देवानां प्रिय प्रियदर्शी राजा' अशी पदवीच तेवढी लिहिलेली आढळते. त्या पदवीपुढें त्याचें स्वतःचें नांव दिलेलें कोठें आढळलें नव्हतें. त्यामुळें हे लेख अशोकाचेच कशावरून? दुसऱ्या एखाद्या राजानें कोरविलेले नसतील कशावरून? अशी एक शंका घेण्याला जागा होती, आणि या शंकेचें निवारण लेखांतल्या एकंदर मजकुरावरून होतें असें म्हणण्यापलीकडे हे अशोकाचेच लेख होत असें ठासून सांगण्यासारखा जोरदार प्रत्यक्ष पुरावा मिळालेला नव्हता. तो १९१५ सालीं निजामाच्या राज्यांत मस्की येथें सांपडलेल्या लेखामुळें मिळाला. म्हणून तो लेख अपूर्व समजला जातो. येथें 'देवानां प्रियस्य अशोकस्य' असे स्पष्ट शब्द आहेत. त्यावरून हे लेख अशोकाचेच अशी आतां पूर्ण खात्री झाली आहे. हा मस्कीचा लेख पुढें एका प्रकरणांत दिला आहे.

अशोकाच्या पदवीसंबंधानें इतकें सांगितल्यानंतर आतां आपण त्याच्या कारकीर्दीत घडलेल्या एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीकडे वळूं.

☆ ☆ ☆

# प्रकरण सहावें

# कलिंगविजय आणि बौद्धधर्माचा स्वीकार

## कलिंग देश

कलिंग राज्य हें हिंदुस्थानच्या पूर्व भागांत ओरिसा प्रांताच्या दक्षिणेस होतें. पूर्वेस बंगालचा उपसागर, पश्चिमेस पूर्वघाट, दक्षिणेस गोदावरी नदी व उत्तरेस महानदी अशा त्याच्या सीमा होत्या. याला त्रि-कलिंगहि म्हणत. हें राज्य फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध होतें. ऋग्वेदांत त्याचा अप्रत्यक्ष उल्लेख आहे. महाभारताच्या आदिपर्वांत व वनपर्वांत, कालिदासाच्या रघुवंशांत, हरिवंशांत व इतरहि अनेक ग्रंथांतून कलिंग राज्याचे उल्लेख आढळतात. त्या राज्याची प्राचीन राजधानी राजपूर (यालाच बौद्धग्रंथांतून सिंहपुर म्हटलेलें आहे) ही होती. लोकांची धर्मनिष्ठा, शौर्य, शिल्प आणि वाणिज्य यांबद्दल त्या राज्याची ख्याति होती. कलिंग देशचा एक राजा ब्रह्मदत्त याची गोतम बुद्धासंबंधानें फार पूज्यबुद्धि होती. त्यानें बुद्धाच्या परिनिर्वाणानंतर त्याचा एक दांत आणून त्यावर एक मोठा स्तंभ उभारल्यापासून राजपुराला 'दंतपुर' असें नांव पडलें होतें. या राज्यांत पुष्कळ ठिकाणीं संघाराम (बौद्ध भिक्षूंसाठीं बांधलेले मठ) होते व त्यांतून पांचपांचशें भिक्षु राहात होते असें वर्णन आढळतें.[1]

## विजय

कलिंगविजय ही अशोकाच्या चरित्राचा सारा ओघ फिरविणारी व म्हणून अत्यंत महत्त्वाची घटना होती. हें प्रचंड राज्य काबीज केलें म्हणजे आपल्या पूर्वजांनीं आरंभिलेला भारतदिग्विजय पूर्ण होऊन आपल्या आजाच्या

---

1. Beal's Records of the Western World, Vol. II

( चंद्रगुप्ताच्या ) हातून जें कार्य व्हावयाचें राहिलें तें करून टाकिल्यासारखें होईल असें वाटून अशोकानें प्रचंड सेना बरोबर घेऊन त्या राज्यावर स्वारी केली. विजयलक्ष्मीहि त्याच्यावर प्रसन्न होऊन तिनें त्याला माळ घातली. कलिंग राज्य काबीज होऊन मगधसाम्राज्यांत अंतर्भुत झालें. ही गोष्ट अशोकाच्या राज्यारोहणापासून १३ व्या वर्षी म्हणजे इ. स. पू. २६१ व्या वर्षी घडली.

## भयंकर प्राणहानि व परिवर्तन

अशोकानें आपल्या साऱ्या आयुष्यक्रमांत एकच युद्ध केलें आणि तें हें कलिंगविजयाचें. या विजयाच्या वेळीं घडलेल्या गोष्टींचा त्याच्या मनावर विलक्षण परिणाम घडला, त्यामुळें त्याच्याच चरित्रांत नव्हे, तर हिंदुस्थानच्या किंबहुना साऱ्या प्राच्य जगाच्या इतिहासांत परिवर्तन घडून आलें, असें पाश्चात्त्य ग्रंथकार लिहितात.[1] अशोकानें स्वतःच या प्रसंगाचा उल्लेख आपल्या १३ व्या गिरि-लेखांत विस्तारानें केला आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा यानें राज्याभिषेकाला आठ वर्षें होऊन गेल्यावर कलिंग देश जिंकला, तेव्हां दीड लक्ष लोक कैद करण्यांत आले, एक लक्ष लोकांना मारण्यांत आलें, आणि या संख्येच्या अनेक पट लोक प्राणास मुकले.[2] हे प्राणास मुकलेले लोक म्हणजे बहुधा महायुद्धाच्या नंतरचे त्याचे परिणाम ( म्हणजे दुष्काळ, महामारी किंवा त्यासारखे दुसरे सांथीचे रोग ) यांना बळी पडलेले असावे. इतकी प्राणहानि आपली विजयप्राप्तीची आकांक्षा व साम्राज्यविस्ताराची हांव यांच्यामुळें घडून

1. Macphail's Ashoka P. 27 ; Vincent Smith's Ashoka P. 24

२. सेनार्ट म्हणतो कीं, या युद्धांत जी भयंकर प्राणहानि झाली तीच बौद्ध दंतकथांतून अशोकाच्या क्रूरतेचें जें वर्णन केलेलें आढळतें त्याच्या मुळाशीं असावी.

आली हें पाहून अशोकाच्या मनला घोर पश्चात्ताप झाला आणि तेव्हांपासून त्यानें मनाचा निर्धार केला कीं, पुनः म्हणून केव्हांहि युद्धाचा प्रसंग आणणार नाहीं. कलिंगविजयानंतर चार वर्षांनीं कोरविलेल्या आपल्या लेखांत अशोकानें म्हटलें आहे कीं, कलिंगविजयाच्या युद्धांत जी प्राणहानि झाली, तिच्या शतांशानें किंवा सहस्रांशानें जरी आतां झाली तरी ती माझ्या अतिशय शोकाला कारण होईल. या पश्चत्तापाच्या भरांत त्यानें जो मनाचा निश्चय केला, तो वाऱ्यावर उडून जाऊं न देतां त्यानें अक्षरशः पाळला. ही गोष्ट त्याच्या मनाच्या दृढतेची साक्ष देणारी आहे. या पश्चात्तापाचा प्रत्यक्ष परिणाम हा झाला कीं, त्यानें बाकीच्या आपल्या आयुष्यांत युद्धाचें तर नांव काढलेंच नाहीं, पण प्रजेला भोगाव्या लागणाऱ्या दुःखांचा चरका त्याच्या मनाला इतका तीव्रतेनें बसला व त्यामुळें त्याचें मन इतकें हलकें झालें कीं, सरकारी अधिकाऱ्यांपासून प्रजेला जे अत्याचार, पीडा व जुलूम पुष्कळ वेळां भोगावे लागतात तेसुद्धां बंद झाले पाहिजेत असें त्याला वाटायला लागलें व त्यानें तसे सक्तीचे हुकूम सोडले. त्यामुळें त्याच्या प्रजेला अतिशय सुख झालें. पण या प्रत्यक्ष परिणामापेक्षांहि फार मोठा व अत्यंत महत्त्वाचा असा अप्रत्यक्ष परिणाम हा झाला कीं, राजाचें लक्ष आतां धर्माकडे विशेष लागलें, आणि प्रजेमध्यें धर्मतत्त्वांचा प्रसार करण्याची आवश्यकता त्याला वाटूं लागली. वाइटांतूनहि चांगलें केव्हां केव्हां निघतें तें असें.

इतर इतिहासकारांच्या नजरेंतून सुटलेली पण अशोकाच्या या कलिंगविजयानंतरच्या मनःस्थितीवर लख्ख प्रकाश पाडणारी अशी एक गोष्ट प्रो. भांडारकर यांनीं आपल्या ग्रंथांत नमूद केली आहे.[१] ती अशी कीं, या कलिंगविजयाच्या वेळीं झालेली अमानुष निर्दयता आणि युद्धाचें अन्याय्य स्वरूप यांची अशोकाच्या मनाला इतकी लाज वाटली कीं, या प्रसंगाची हकीकत

1. Bhandarkar's Ashoka p. 24

लिहिलेले शिलालेख इतर सर्व प्रांतांतून आढळतात; पण कलिंग राज्यांत दोन ठिकाणीं जेथें इतर शिलालेख कोरलेले आहेत तेथें नेमकें या प्रसंगाचा शिलालेख कोरून ठेवण्याचें टाळलें आहे. ही टाळाटाळी हेतुपूर्वक केलेली असली पाहिजे यांत शंका नाहीं.

कलिंग राज्य खालसा केल्यानंतर आपल्या हातून त्या राज्यांतल्या प्रजाजनांविषयीं घोर अन्याय घडला अशी टोंचणी अशोकाच्या मनाला लागून राहिल्यामुळें यापुढें तरी आपल्या अमलाखालीं त्या प्रजेला सुख लागावें व अधिकारीवर्गाकडून त्यांच्यावर अत्याचार होऊं नयेत म्हणून त्यानें मुद्दाम कलिंग प्रांतासाठीं जास्त सवलतीची अशी शासनपद्धति योजून तिच्या संबंधाचे हुकूमवजा दोन गिरिलेख त्यानें जाहीर केले. ते जौगाड व धौली येथें सांपडलेले लेख होत. त्या आदेशांची अंमलबजावणी करण्याचें काम तोसली येथील राजप्रतिनिधि बरोबर करतात कीं नाहीं हें तो काळजीपूर्वक पाहात असे, आणि एखाद्या अंमलदाराकडून त्यांत कसूर झाल्यास त्याला कडक शिक्षा करीत असे.

## बौद्धधर्माचा स्वीकार

अशोकाच्या वेळीं बौद्धधर्म त्याच्या शुद्ध स्वरूपांत होता आणि निरनिराळ्या धर्मप्रचारकांकडून तो उपदेशिला जात होता. मगधराज्यांत असा कोणताहि प्रदेश नव्हता कीं, जेथें बौद्ध भिक्षूंचा व धर्मप्रचारकांचा प्रवेश झाला नव्हता. अर्थात् बौद्धधर्म हें काय प्रकरण आहे आणि त्याचीं मूलभूत तत्त्वें कोणतीं आहेत यांविषयीं अशोकासारख्या चौकसबुद्धीच्या व सात्त्विक वृत्तीच्या राजाच्या ठायीं अज्ञान असणें संभवनीय नव्हतें. कलिंगविजयाच्या वेळीं झालेल्या भयंकर प्राणहानीमुळें अनुतप्त झालेल्या अंतःकरणाला शांति देण्यास भूतदयाप्रधान बौद्धधर्मासारखा धर्मच अत्यंत योग्य असल्यामुळें अशोकाच्या भूतदयाप्रवण मनावर त्या धर्माची पुरी: छाप पडली

आणि त्यानें अनुतापाच्या उसळीसरशीं त्या धर्माचा स्वीकार केला असल्यास नवल नाहीं. यापुढें त्याच्या साम्राज्यविस्ताराचा मद अजिबात जिरून त्याची जागा बौद्धधर्माविषयींची आस्था आणि प्रजावात्सल्य यांनीं घेतली. त्यानें स्वतः बौद्धधर्माची दीक्षा घेतली[१] आणि त्याबरोबर प्रजाजनांमध्यें शुद्ध धर्म व नीति यांचा प्रसार करण्याचें कार्य आरंभिलें.

**आचार्य उपगुप्त** १८।२२८ कि. ३

अशोकानें बौद्धधर्माची दीक्षा घेण्याच्या पूर्वी त्याच्या वृत्तींत जें हें मोठें परिवर्तन झालें, त्याला कारण मुख्यतः कलिंगविजयानंतर झालेला घोर पश्चात्ताप हें होतें. तथापि बौद्धग्रंथांत या परिवर्तनाचें कारण देणाऱ्या ज्या अद्‌भुत दंतकथा सांगितलेल्या आहेत, त्या सध्याच्या विचारप्रधान काळांत कोणीहि जाणता माणूस कधींहि विश्वसनीय मानणार नाहीं. त्यांतला तथ्यांश येवढाच आहे कीं, बौद्ध गुरु आचार्य उप गुप्त यांच्या उपदेशामुळें अशोकाचें मन बौद्धधर्माची दीक्षा घेण्याकडे वळलें.[२] आचार्य उपगुप्त

१. कलिंग युद्ध ख्रि. पू. २६२ या वर्षी झालें आणि त्यापूर्वी अडीच वर्षें म्हणजे ख्रि. पू. २६५ या वर्षी अशोकानें बौद्धधर्माची दीक्षा घेतली होती. मात्र ती दीक्षा उपासकत्वाची (गृहस्थाश्रमी बौद्धाची) होती. त्या वेळीं बौद्धधर्माविषयींची अशोकाची आस्था विशेष तीव्र नव्हती. यामुळें त्याच्या हातून कलिंगविजयाच्या वेळीं प्राणहानि झाली असें डॉ. राधाकुमुद मुकर्जी आपल्या अशोकचरित्रांत (पृ. १८) लिहितात. पण अहिंसा हें बौद्धधर्माचें एक मुख्य तत्त्व असल्यामुळें त्यालाच बाधक होण्यासारखें युद्धासारखें कार्य अशोक बौद्ध असतांहि त्यानें केलें असेल ही गोष्ट संभवत नाहीं. कलिंगविजयानंतरच त्यानें बौद्ध दीक्षा घेतली असली पाहिजे असें म्हणणें जास्त सयुक्तिक दिसतें.

२. सीलोनच्या महावंश नामक बौद्ध ग्रंथांत अशोकाला श्रमण निग्रोध नांवाच्या एका महान् अधिकारी बौद्ध भिक्षूनें बौद्धधर्माची दीक्षा दिल्याची

यांच्याविषयींची ऐतिहासिक माहिती आज उपलब्ध नाहीं. पण दंतकथेंतल्या नरकस्थापनेच्या गोष्टीसारखी उपगुप्ताच्या उपदेशाची गोष्ट काल्पनिक किंवा बनावट नसावीसें वाटतें. मथुरा येथें व सिंध प्रांतांतहि उपगुप्ताच्या नांवानें बांधलेले कांहीं मठ वगैरे होते.[1] यावरून त्या नांवाची कोणी थोर व्यक्ति खरोखरी होऊन गेली याविषयीं शंका राहात नाहीं. असें सांगतात कीं, उपगुप्त मूळचा वैश्यपुत्र व मथुरेचा रहिवासी होता. सतरा वर्षांच्या वयांतच त्याचें मन संसारापासून विरक्त झालें व तो बौद्ध भिक्षू झाला आणि अध्यात्ममार्गांत त्यानें

( पृष्ठ ५० वरून पुढें चालू )

कथा सांगितली आहे. त्या कथेंत पुष्कळ अद्भुत प्रकार वर्णिले आहेत. पण अद्भुतपणाचा भाग सोडून देऊन बाकीचा मुद्द्याचा भाग तेवढा घेतला, तर श्रमण निग्रोधानें अशोकाला दीक्षा दिली असल्याची गोष्ट बरीच संभवनीय दिसते. आचार्य उपगुप्ताची व अशोकाची पहिली गांठ अशोकानें निग्रोधाच्या हातून दीक्षा घेतल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं देशांतल्या साठ हजार बौद्ध भिक्षूंची सभा पाटलीपुत्र येथें अशोकारामांत भरवून महान् महान् बौद्धाचार्यांच्या तोंडून बौद्धधर्मावर व्याख्यानें ऐकल्यानंतर एका अद्भुत् प्रसंगीं पडल्याचा उल्लेख महावंशांत आहे. त्याच्या आधींच निग्रोधाकडून त्यानें बौद्ध धर्माची दीक्षा घेतली असावी असें म्हणण्यास हा महावंशाचा तरी आधार आहे. उपगुप्ताच्या हातून दीक्षा दिली असें म्हणण्यास इतकाहि आधार दिसत नाहीं. तथापि महावंश ग्रंथाला सीलोनमधले बौद्धधर्मी लोक महाभारतासारखा अत्यंत पूज्य ऐतिहासिक ग्रंथ मानीत असतांहि त्यांत पुष्कळ अद्भुत गोष्टी आहेत येवढ्या कारणावरून पाश्चात्त्य संशोधक पंडितांनीं त्या ग्रंथाला अविश्वसनीय ठरविलें आहे आणि उपगुप्तानें दीक्षा दिल्याबद्दल सबळ पुरावा नसतांहि तीच गोष्ट ऐतिहासिक सत्य म्हणून ते मानीत आले आहेत. पूर्वग्रहांचा पगडा विद्वानांच्याहि मनावर कसा बसलेला असतो व तो त्यांच्यानें कसा ढिला करवत नाहीं त्याचें हें उदाहरण आहे.

1. Growse-Mathura, P. 122; V. Smith's Asoka, P. 41

इतकी झपाट्यानें प्रगति केली कीं, तीन वर्षांतच तो सर्वोच्च अशा अर्हत्पदाला जाऊन पोंचला. हा बहुधा गिरिकंदरांत राहून फलमूलांवर उपजीविका करी आणि ध्यान, धारणा, समाधि इ. गोष्टींत आपला काळ घालवी. चिनी प्रवासी ह्युएन–त्सांग यानें उपगुप्ताच्या राहण्याच्या म्हणून जेवढ्या गुहा लोकांनीं दाखविल्या तेवढ्या सगळ्या प्रत्यक्ष पाहिल्या होत्या असें त्याच्या प्रवासवृत्तान्तांत लिहिलें आहे.[१] पुढें अशोक राजाची व उपगुप्ताची गांठ पडल्यावर प्रसंगोपात जीं त्यांचीं संभाषणें झालीं त्यांवरून अशोकाच्या मनांत उपगुप्ताविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली आणि अशा सत्पुरुषाचा नित्य सहवास घडावा म्हणून आपल्या-बरोबर आपल्या राजधानीस येऊन आपल्या राजवाड्यांतच वास करावा असा राजानें त्याला आग्रह केला. तथापि 'आमची आपली गुहा उत्तम आहे' असें उत्तर देऊन राजवाड्यांत राहण्याचें त्यानें नाकारलें. तेव्हां राजानें आपल्या राजधानींतच त्याच्यासाठीं नैसर्गिक गुहेसारखी एक गुहा मुद्दाम निर्माण करून तेथें त्याला राहण्यास आणिलें.[२] येथें नित्यनेमानें तो उपगुप्ताच्या दर्शनास जाऊन त्याचा उपदेश श्रवण करी. उपगुप्त हा मोठा जितेंद्रिय व महान् अधिकारी साधुपुरुष होता. याच्या संबंधाची एक अपूर्व व अत्यंत चित्ताकर्षक आणि बोधपर कथा बौद्ध ग्रंथांतून दिलेली आहे. ती खरी असल्याचा फार संभव असल्यामुळें येथें देतों. ती अशी—

## वासवदत्तेची हृदयद्रावक कथा

मथुरा नगरींत वासवदत्ता नांवाची एक श्रीमंत गणिका होती. एके दिवशीं तिची एक दासी उपगुप्ताच्या दुकानीं (बौद्ध भिक्षु होण्यापूर्वी उपगुप्त हा वैश्यपुत्र

1. Si-Yu-Ki, Vol. II, P. 93.

२. Si-Yu-Ki, Vol. II, P. 181. या गुंफेचें नांव वेणुवन असावें. वेणुवनाचा उल्लेख अशोक–अवदान ग्रंथांत आलेला आहे.

होता व त्याच्या बापाचें एक दुकान होतें.) कांहीं सुगंधि पदार्थ विकत घेण्यासाठीं आली व ते पदार्थ घेऊन गेली. तिच्याकडून गणिकेला उपगुप्ताची सुंदर व बळकट देहयष्टि आणि मोहक स्वरूप यांच्याविषयींची माहिती होऊन त्याला पाहण्यासाठीं ती फार आतुर झाली. तेव्हां वासवदत्तेनें आपल्या दासीबरोबर प्रेमपत्रिका पाठवून त्याला कळविलें कीं, आपला परिचय व सहवास व्हावा अशी या दासीची फार इच्छा आहे. यावर उपगुप्तानें उत्तर पाठविलें कीं, मी गरीब मनुष्य आहें. माझ्या भेटीपासून आपणास कोणता लाभ होणार आहे ? मला पाहण्याचे दिवस पुढें येतीलच. त्यावर तिनें परत निरोप पाठविला कीं, आपणाजवळ एक कपर्दिकहि मला मागावयाची नाहीं. केवळ दर्शनसुख व संगतिसुख यांचीच अपेक्षा मी करीत आहें. यावरहि उपगुप्तानें पूर्वीच्याच सारखा नकाराचा जबाब पाठविला. पुढें कांहीं दिवसांनीं कांहीं अकल्पित प्रकार घडून आला. वासवदत्तेचा कोणी श्रीमंत तरुण यजमान तिच्या महालांत निद्रावश असतांना त्याच्या कोणी वैऱ्यानें गुप्तपणें तेथें जाऊन त्याचा खून केला. दुसरे दिवशीं राजदूत चौकशीला गेले आणि त्यांनीं चौकशीअंतीं ठरविलें कीं, वासवदत्तेनेंच द्रव्यलोभानें यजमानाचा खून केला किंवा करविला. अर्थात् त्यांनीं वासवदत्तेला कैद करून राजाकडे नेलें. राजानेंहि चौकशी करून तसाच निकाल दिला, आणि तिचे हातपाय, नाक व कान तोडून स्मशानांत तिला कुत्र्या-मांजरांनीं खाण्यासाठीं टाकून द्यावें अशी शिक्षा फर्माविली. लागलीच ती अमलांतहि आणिली गेली. त्या गणिकेची पूर्वोक्त दासी आपल्या धनिणीचे उपकार स्मरून स्मशानांत रात्रंदिवस तिची शुश्रूषा करीत राहिली होती. गणिकेला अशी भयंकर शिक्षा झाल्याची बातमी जातां जातां उपगुप्ताच्या कानीं गेली. तेव्हां तो बौद्ध भिक्षु झालेला होता. स्मशानांत वासवदत्ता असहाय स्थितींत पडली होती तेथें तो आपण होऊन गेला. दासीनें त्याला त्या भिक्षूच्या वेषांतहि ओळखलें आणि अमके अमके गृहस्थ आले आहेत असें यजमानिणीला कळविलें. अशा छिन्नविच्छिन्न देहाच्या व विटंबनामय स्थितींत आपण त्याच्या दृष्टीस पडत आहों

हें पाहून ती अतिशय लज्जित व दुःखी झाली. उपगुप्त तिच्या जवळ जाऊन बसला. तेव्हां ती म्हणाली, 'महाराज! जेव्हां हा देह नवविकसित कुसुमाप्रमाणें मुसमुसणाऱ्या तारुण्यानें फुलून राहिला होता, आणि मोलवान् अलंकार व बहुमूल्य वस्त्रें यांनीं भूषित होऊन कामी जनांचीं मनें मोहून टाकीत होता, तेव्हां मी होऊन विनंती केली असतांहि आपण मला दर्शन दिलें नाहीं, आणि आतां हाय ! हाय !! ही अशी माझी विटंबना आणि मरणापेक्षांहि कष्टप्रद दशा झाली असतां, आणि आनंद, सुख, सौंदर्य, लौकिक आणि जीवितस्वारस्य या सर्वांना मी मुकल्यें असतां हा छिन्नविच्छिन्न झालेला तिरस्करणीय देह पाहण्यासाठीं येण्याची तसदी कशाला घेतली ?' हें तिचें मर्मभेदक व करुणरसयुक्त भाषण श्रवण करून त्यानें उत्तर केलें, 'वासवदत्ते ! तुला भेटण्याची खरी योग्य वेळ हीच होती, म्हणून मी आतां न बोलावतां आलों. मनुष्याचें ऐहिक ऐश्वर्य व सुख कसें नाशवंत असतें तें आतां तुला कळलें. या सुखापेक्षां श्रेष्ठ प्रतीचें व अविनाशी सुख कशांत आहे तें तुला सांगण्यासाठीं मी आलों आहें.' असें म्हणून त्यानें त्या मरणोन्मुख होऊन पडलेल्या गणिकेला धर्मोपदेश केला. त्याच्या योगानें दुःखविव्हल अशा तिच्या मनाला शांति प्राप्त होऊन सुखांत तिचें प्रणोत्क्रमण झालें.[१]

---

१. उपगुप्ताच्या या महत्त्वाच्या उपदेशाचा भावार्थ पॉल कॅरस यांनीं आपल्या Gospel of Buddha या ग्रंथांत दिला आहे तो असा—

"I have seen with my eyes the Tathagata walking upon earth and teaching men his wonderful doctrine. But you would not have listened to the words of righteousness while surrounded with temptations, while under the spell of passion and yearning for worldly pleasures. You would not have listened to the words of the Tathagata; for, your heart was wayward and you set your trust on the charm of transient forms. The charms of a lovely form are treacherous and quickly lead into temptations which have proved too strong

## अशोकाची धर्मयात्रा

बौद्धधर्माची दीक्षा घेतलेल्यांचे उपासक [ गृहस्थ म्हणजे प्रापंचिक ] आणि भिक्षु अथवा संन्यासी असे दोन वर्ग आहेत, आणि प्रत्येक वर्गाची दीक्षा निरनिराळी आहे. तेव्हां अशोकानें कोणत्या वर्गाची दीक्षा घेतली ? असा प्रश्न साहजिकच कोणालाहि विचारावासा वाटेल. या प्रश्नाचें उत्तर अशोकानें स्वतःच रूपनाथ येथील आपल्या पहिल्या लघु शिलालेखांत स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर पहिलीं अडीच वर्षें आपण केवळ उपासक होतों आणि नंतर संघांत म्हणजे बौद्ध भिक्षूंच्या वर्गांत सामील झालों; व तेव्हांपासून धर्मप्रचाराचा उद्योग झटून करूं लागलों. त्यानें प्रथम आपल्या राज्यांतली शिकार बंद करून टाकली, आणि चैनीसाठीं राजा दौरे काढीत असे त्याच्याऐवजीं तो आतां बौद्ध तिर्थांच्या यात्रा करूं लागला. तो प्रथम नेपाळांत तराई प्रांतांत बुद्धाचें जन्मस्थान आहे त्याच्या दर्शनासाठीं गेला. अशोकाचा गुरु आचार्य उपगुप्त हाहि या वेळीं त्याच्याबरोबर होता. नंतर क्रमाक्रमानें कपिलवस्तु[1] ( बुद्धाचें बालपण जेथें गेलें तें स्थान ), बोधि-वृक्ष असलेलें गया[2], ऋषिपट्टण अथवा सारनाथ[3] (हें काशी क्षेत्राजवळ आहे),

( पृष्ठ ५४ वरून पुढें चालू )

for you. But there is a beauty which will not fade, and if you but listen to the doctrine of our Lord Buddha, you will find that peace which you would never have found in the restless world of sinful pleasures. "

१. हेंहि स्थान नेपाळच्या तराईत आहे. याला हल्लीं ' तिलौरा कोट ' म्हणतात. ( Antiquities in the Terai हा ग्रंथ पाहा. )

२. बुद्धगया—हें स्थान हिंदु गया क्षेत्रापासून दक्षिणेस सहा मैलांवर आहे.

३. येथें १९०४ सालीं पुराणवस्तुसंशोधन खात्याकडून खोदकाम चाललें असतां अशोकाचा एक आदेश सांपडला.

बुद्धाचें मृत्युस्थान कुशीनगर[४], गौतमबुद्ध ज्या ठिकाणीं दीर्घ काळपर्यंत राहिला होता तो श्रावस्ती[५] येथील जेतवनांतला मठ वक्कुल [ बकुल ] नांवाच्या साधूचा आणि त्याचप्रमाणें बुद्धाचा पट्टशिष्य आनंद याचा स्तूप, अशा तीर्थस्थानांचीं दर्शनें घेत घेत अशोक पुष्कळ हिंडला. पण सर्वांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकांत धर्मप्रचार करण्यासाठीं त्यानें अत्यंत जंगली लोकांत व मगध राज्यांतल्या अत्यंत दूरदूरच्या प्रांतांत आणि आपल्या राज्याबाहेरच्या एशिया, पूर्व युरोप व उत्तर अमेरिका वगैरे देशांतून धर्मप्रचारक पाठविले. या परकीय देशांत सीरिया, ईजिप्त, मॅसिडोनिया व एपिरस ह्यांचीं नांवेंहि आढळतात. हे धर्मप्रचारक पाठविण्याचें काम त्यानें इ. स. पू. २५८ या सालीं केलें.

## धर्मप्रचारक

दीपवंश ग्रंथाच्या आठव्या आणि महावंश ग्रंथाच्या बाराव्या अध्यायांत अशोकानें पाठविलेल्या कांहीं धर्मप्रचारकांचीं नांवें दिलीं आहेत. तीं अशीं—

| देश | | धर्मप्रचारकाचें नांव |
|---|---|---|
| काश्मीर आणि गांधार... | ... | मज्झन्तिक |
| महीशमंडल ( म्हैसूर )... | ... | महादेव |
| वनवासी ( उत्तर कानडा ) | ... | रक्षित |
| अपरान्तक ( उत्तर कोंकण ) | ... | योन धर्मरक्षित<br>( हा बॅक्ट्रिया येथील रहिवासी होता. ) |

४. याचा अद्याप नक्की पत्ता लागला नाहीं.

५. श्रावस्ती हें स्थान औध प्रांतांत राप्ती नदीचे कांठचें सहात–महात हें असावें असें व्हि. स्मिथ लिहितात.

| देश | धर्मप्रचारकाचें नांव |
|---|---|
| महाराष्ट्र ... ... ... | महाधर्मरक्षित |
| योन ( सरहद्दीवरील प्रांत ) ... | महारक्षित |
| हिमवंत (हिमालयाजवळचा प्रदेश)... | मज्झिम, काश्यप, दुरभिसार, सहदेव इ० |
| सुवर्णभूमि ( पेगू आणि मूलमेन )... | सोन आणि उत्तर |
| सिंहलद्वीप... ... ... | महिन्द ( महेंन्द्र ) इ० |

धर्मोपदेशक पाठवून प्रांतोप्रांतीं धर्मप्रचार करण्याची कल्पना मूळची बौद्धांची होती असें यावरून दिसतें, आणि जनरल कनिंगहॅम या ख्रिस्तधर्मी विद्वान् ग्रंथकारानेंहि ही गोष्ट निरभिमानतेनें कबूल केली आहे. तो म्हणतो—

" The proselytising zeal of Ashoka is more worthy of record as it anticipated by nearly three centuries one of the most characteristic institutions of the Early Christian Church. "[1]

सनातन हिंदुधर्माहून बौद्धधर्माचें भिन्नत्व येथेंच आहे. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें हिंदुधर्माचीं गूढ तत्त्वें कांहीं विशिष्ट अधिकारी पुरुषांनीं व तींहि शक्य तोंवर गुरुमुखांतून श्रवण करावयाचीं असतात. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांनाच वेदाध्ययनाचा अधिकार, शूद्रांना व अतिशूद्रांना तो नाहीं. पण बौद्धशास्त्राप्रमाणें धर्म ही सर्वसाधारण संपत्ति आहे. धर्मज्ञानावर सर्वांचा सारखा हक्क आहे. धर्मतत्त्वाचा प्रसार जनतेंत जितका जास्त होईल तितकें समाजस्वास्थ्यास व उन्नतीस इष्ट आहे आणि धर्मप्रसारासारखें पवित्र पुण्यकर्म दुसरें नाहीं. गौतमबुद्धानें धर्मप्रचारासाठीं उरुवेला येथून आपले साठ शिष्य पाठविले, तेव्हां त्यांना त्यांच्या गुरूंची आज्ञा अशी होती—

1. Bhilsa Topes, P. 123

## धर्मप्रचारासंबंधानें बुद्धाची आज्ञा

" चरथ भिक्खवे चारिकम्, बहुजनहिताय, बहुजनसुखाय, लोकानुकंपाय, अथ्थाय, हिताय, सुखाय देवमनुस्सानम्, देसेथ भिक्खवे धम्मं, परिशुद्धम् ब्रह्मचरियम् [१]पकासेथ । "

**अर्थ**—अहो भिक्षू हो ! तुम्ही माणसांच्या हितासाठीं, मंगलासाठीं, सुखासाठीं, जगाविषयीं, देवाविषयीं, मनुष्यांविषयीं अनुकंपा ( दया ) ठेवून देशांत चोहोंकडे हिंडा, माझ्या धर्माचा प्रसार करा, व सर्वत्र शुद्ध ब्रह्मचर्याचा उपदेश करा.

बुद्धाचा हा उपदेश इतका सुंदर व मंगलकारक आहे कीं, पृथ्वीतलावर जोंपर्यंत धर्म म्हणून कांहीं वस्तु कायम राहील तोंपर्यंत धर्माच्या इतिहासांत हा उपदेश सुवर्णांकित अक्षरांनीं कोरलेला राहील.

अशोकानें प्रांतोप्रांतीं पाठविलेल्या मुख्य मुख्य धर्मप्रचारकांची जी यादी वर दिली आहे, तिच्यांतलीं नांवें काल्पनिक नसून त्या धर्मप्रचारकांविषयींची माहिती बौद्ध ग्रंथांतून दिलेली आढळते. उदा०—' दुल्भाय ' नामक तिबेटी ग्रंथांत स्थविर मज्झन्तिकाची माहिती दिलेली आहे. सांची येथील स्तूपांत जें भस्मपात्र सांपडलें, त्यावर मज्झिम व काश्यप यांचीं नावें होतीं. महेन्द्राचें नांव सिंहलद्वीपाच्या बौद्धग्रंथांतच आहे असें नाहीं, तर त्याचा कीर्तिदुंदुभि आज दोन सव्वादोन हजार वर्षें त्या देशांत दुमदुमत आहे.

## महेंद्र व संघमित्रा

अशोकानें देशोदेशीं पाठविलेल्या धर्मप्रचारकांच्या यादींत महेंद्र ( अथवा महिंद ) याचें नांव आढळतें. हा महेंद्र कोण यासंबंधानें थोडासा वाद आहे. महावंश ग्रंथांत याला अशोकाचा पुत्र म्हटलें आहे. व्हिन्सेंट स्मिथ व दुसरे

१. महावग्ग व त्याचप्रमाणें समस्तकूटवर्णना नामक पालीग्रंथ पाहा.

पाश्चात्त्य लेखक दीपवंश ग्रंथाच्या व ह्युएन्-त्संग व फा-हयान यांच्या प्रवास-वृत्तान्तांच्या आधारावर त्याला अशोकाचा कनिष्ठ भ्राता समजतात. बौद्धग्रंथांत सांगितलें आहे कीं, महेंद्र व त्याची बहीण संघमित्रा या दोघांनीं सिंहलद्वीपांत बोधिवृक्षाची शाखा नेऊन लाविली व बौद्धधर्माचा तिकडे प्रसार केला. पाश्चात्त्य ग्रंथकार संघमित्रा ही महेंद्राची बहीण होती ही गोष्ट नाकबूल करतात. पण सिंहलद्वीपांतल्या इतिहासग्रंथांतून महेंद्राचा जन्म, त्याची आई व बहीण संघ-मित्रा यांच्याविषयीं माहिती मिळते. ती केवळ काल्पनिक म्हणतां येत नाहीं.

## अशोकानें बांधलेल्या इमारती

अशोकानें पुष्कळ मठ, स्तंभ, स्तूप वगैरे बांधले. लोकप्रवाद आहे कीं, त्यानें एकंदर तीन वर्षांच्या अवधींत ८४ हजार स्तूप निर्माण केले ! पण ही उघड उघड अतिशयोक्ति दिसते. फा-हयानच्या प्रवासवृत्तान्तावरून असें दिसतें कीं, सदर प्रवासी हिंदुस्थानांत आला होता तोंपर्यंत म्हणजे इ. स. च्या पांचव्या शतकापर्यंत पाटलीपुत्र येथील अशोकाचा राजवाडा उभा होता. त्याची भव्यता व मजबूत बांधणी यावरून भाविक बौद्धांची अशी समजत होती कीं, तो देव-दानवांनीं अशोकाला बांधून दिला होता. आतां त्याचा व इतर बऱ्याचशा इमारतींचा मागमूसहि राहिलेला नाहीं. कांहीं इमारतींचे भग्नावशेष गंगा व शोणभद्र यांच्या पूर्वीच्या प्रवाहाखालीं दडपले गेलेले सांपडतात. अशोकाच्या वेळचे कांहीं स्तूप भोपाळ संस्थानांत सांची येथें व आसपास सांपडतात. उज्जयिनी जवळहि कांहीं प्राचीन इमारतींचे अवशेष आहेत. अशोक राजकुमार असत उज्जयिनीस होता तेव्हां तेथेंहि त्यानें कांहीं इमारती बांधल्या असतील. सांचीचा स्तूप अद्याप सुरक्षित आहे. सांचीच्या स्तूपाचे भोंवतीं जें प्रस्तरमय आवरण आहे तें व त्या स्तूपाचें सुंदर व भव्य तोरण ( प्रवेशद्वार ) हीं दोन्ही अशोकाच्या वेळीं किंवा त्या सुमारास बांधलीं गेलीं असें पाश्चात्त्य संशोधक म्हणतात. त्याचप्रमाणें गयाक्षेत्राजवळच्या बाराबर नांवाच्या टेकडींत आजीवकां-

साठीं त्यानें गुंफा निर्माण केल्या होत्या. त्यांच्या गुळगुळीत व चिकण्या भिंती अद्याप आहेत.

याशिवाय त्यानें अनेक भव्य विहार, मठ, आश्रम वगैरे इमारती बांधिल्या होत्या. ह्युएन्–त्सांगनें अशोकानें बांधिलेल्या स्तूपांची व मठांची संख्या ऐशीं दिली आहे. पाटलीपुत्र नगराजवळ अशोकाराम व कुक्कुटाराम नांवाचे दोन भव्य मठ होते. त्यांत एक हजार भिक्षु राहात होते. हे भव्य मठ कालाच्या उदरांत केव्हांच गडप झाले ! त्यांचा आतां पत्ताहि लागत नाहीं. बौद्ध इतिहासकार तारानाथ लिहितो कीं, इतिहासप्रसिद्ध असें जें नालंद विद्यापीठ तें अशोकानेंच बांधिलें होतें. या विद्यापीठाचे अवशेष १९१५–१६ सालीं डॉ० स्पूनर नांवाच्या संशोधकास सांपडले. त्याचीं जीं वर्णनें देण्यांत आलीं आहेत, त्यांवरून या विद्यापीठाच्या इमारतींच्या विशालतेची कांहीं थोडी कल्पना करतां येते.

☆ ☆ ☆

# प्रकरण सातवें

# अशोकाच्या लेखांविषयीं प्रास्ताविक माहिती

मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें अशोकानें अनेक भव्य स्तूप, गुंफा, वाडे, विहार, मठ, विद्यापीठें इ. च्या रूपानें आपलीं स्मृतिचिन्हें मागें ठेविलीं असलीं तरी त्याच्या संबंधानें जी इतिहाससामग्री उपलब्ध झाली आहे ती मुख्यतः त्याचे गिरिलेख ऊर्फ आदेश (पर्वतांवर कोरून ठेविलेले लहानमोठे शिलालेख), स्तंभलेख म्हणजे दगडी स्तंभ उभारून त्यांवर कोरलेले लेख, गुहालेख व इतर स्फुटलेख यांच्यापासूनच मिळालेली आहे, आणि म्हणून इतिहासकारांच्या दृष्टीनें तींच त्याचीं स्मारकें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. त्या लेखांतून त्याच्या कारकीर्दीत घडलेल्या घटनांविषयींची जरी विशेष कांहीं माहिती मिळाली नाहीं, तरी तत्कालीन भाषा, लिपि, समाजस्थिति, धर्म, व्यवहार व संस्कृति यांसंबंधानें विश्वसनीय माहिती मिळते. असे कोरलेले लेख एकंदर पस्तीस आतांपर्यंत मिळाले आहेत.[1] हे लेख हिंदुस्थानांतल्या बहुतेक सगळ्या प्रांतांतून विखुरलेले आढळतात.

## स्तंभाचें वर्णन

अशोकाच्या लेखांचे पांच वर्ग पाडतां येतात. ते असे—१ स्तंभलेख; २ लघुस्तंभलेख; ३ मोठे गिरि-लेख; ४ लघु गिरी-लेख व ५ स्फुटलेख. ह्युएन्-त्सांगच्या प्रवासवृत्तान्तांत अशोकनिर्मित सोळा स्तंभलेखांचा उल्लेख आहे. [ Beal's Record of Western World, Vol II. ] प्रत्येक स्तंभ सबंध

१. नुकता गेल्या जुलै महिन्यांत बुद्धाच्या जन्मस्थानासंबंधाचा आणखी एक लेख ओरिसा प्रांतांत सांपडला आहे.

एका दगडाचा केलेला होता. त्यांत कोठें जोड नव्हता. त्यावर कारागिरीचें सुंदर कामहि केलेलें होतें. या सोळा स्तंभांपैकीं या घटकेपर्यंत अकरा स्तंभांचा शोध लागला आहे. पैकीं बखिरा व लडियागड येथील दोन स्तंभ अगदीं शाबूत आहेत. उपलब्ध झालेल्या स्तंभांचें स्वल्प वर्णन येथें देणें आवश्यक आहे.

[ १ ] **बखिरास्तंभ**—हल्लींच्या मुजःफरपूर जिल्ह्यांत बेसार [ प्राचीन वैशाली ] गांवाजवळ आहे. या स्तंभावर लेख होतेसें दिसत नाहीं. पायथ्याशीं याचा व्यास पन्नास इंच असून मध्यभागापासून वर निमूळता होत होत शिखराचा व्यास ३८·७ इंच झाला आहे. शिखरावर दोन फूट १० इंच घेराचें एक मंडल असून त्यावरच्या एक फूट उंचीच्या वेदीवर ४॥ फूट उंचीची एक सिंहमूर्ति बसविण्यांत आली आहे. स्तंभाचें वजन सुमारें पन्नास टन भरेल असें कनिंगहॅम म्हणतो.

[ २ ] **लडिया-नंदगडस्तंभ**—चंपारण्य जिल्ह्यांत वेथियापासून नेपाळकडे जाणाऱ्या रस्त्यावर लडिया गांवाजवळ हा स्तंभ आहे. याची उंची ४० फूट, मध्यभाग ३२ फूट ८॥ इंच, पायथ्याचा व्यास ३५॥ इंच व शिखराचा व्यास २२·४ इंच असून त्यावर हंसांचीं सुंदर चित्रें कोरलेलीं आहेत. शिखराच्या वर ल्हानशा वेदीवर पूर्वाभिमुख सिंहाची मूर्ति आहे. ती आतां भग्न झाली आहे. औरंगजेबाच्या कारकीर्दीत तोफेच्या गोळ्यानें सिंहाची मूर्ति छिन्नविच्छिन्न झाली असें सांगतात. या स्तंभावर चार लेख आहेत.[१]

[ ३ ] **प्रयाग येथील स्तंभ**—हा यमुनातीरावरच्या प्रयाग [अलाहाबाद]च्या किल्ल्यांत आहे. यावर सिंहाचें किंवा हंसाचें चित्र नसून कमलपुष्प व

---

१. चंपारण्य जिल्ह्यांत आणखी दोन स्तंभ सांपडले आहेत. पण ते भग्न स्थितींत आहेत.

लता यांच्या चित्रांनीं हा सुशोभित केलेला आहे. यावर राणीचा आदेश कोरलेला आहे.[१]

[ ४ ] **रामपूरस्तंभ**—हे दोन स्तंभ चंपारण्य जिल्ह्यांत पिपारिया गांवापासून सुमारें एक कोसावर आहेत. दोन्ही स्तंभ ध्वंसप्राय स्थितींत आहे. एकावर सहा निरनिराळ्या स्तंभावरचे लेख कोरलेले आहेत. एका स्तंभावर एक अतिशय सुंदर सिंहमूर्ति बसविलेली होती, व दुसऱ्यावर बैलाची मूर्ति खोदलेली होती.

[ ५ ] ( अ ) **दिल्ली-तोप्रास्तंभ**—हा दिल्लीजवळ फिरोजाबादेच्या अंतर्गत असलेल्या कोथील नांवाच्या पहाडाच्या माथ्यावर आहे. हा फिरोज तघलख बादशहानें तोपऱ्याहून आणून दिल्ली येथें बसविला. यावर सात स्तंभलेख स्पष्ट आहेत. यालाच हल्लीं ‘ शिवालिक ’ किंवा ‘ फिरोजशहाची लाट ’ म्हणतात.

( आ ) **दिल्ली मीरतस्तंभ**—हाहि दिल्लीजवळच एका उंच जागीं आहे. तो मूळ मीरत येथें होता. पुढें फिरोज तघलखानें मोठ्या परिश्रमानें दिल्लीस आणून बसविला. यावर पहिले चार अपूर्ण स्तंभलेख आहेत.

[ ६ ] **लडिया–अरराजस्तंभ**—चंपारण्यांत अरराज नांवाचें एक शिवमंदिर आहे. तेथून एक मैलावर हा स्तंभ आहे. यावर सहा स्तंभलेख कोरलेले असून स्तंभावर गरुडमूर्ति बसविली आहे.

[ ७ ] **सांचीस्तंभ**—भोपाळ संस्थानांत भेलशाजवळ एका टेकडीवर एक मोठा भव्य स्तूप आहे. त्याच्या दक्षिणद्वारापाशीं हा स्तंभ आहे. याच्या शिखरावर चार सिंहमूर्ति आहेत.

---

१. या आदेशाला राणीचा आदेश म्हणण्याचें कारण अशोकाची राणी कारुवाकी हिनें आम्रवन, प्रमोदोद्यान व सदावर्ताश्रम इत्यादिकांच्या स्थापनेसाठीं पुष्कळ द्रव्यदान केलें होतें. या गोष्टीचें स्मरण करून देणारा हा लेख आहे.

[ ८ ] **सारनाथस्तंभ**—काशीक्षेत्राच्या उत्तरेस दोन कोसांवर एक मोठा स्तूप आहे. यावर धर्मचक्राचें व चार सिंहांचीं चार अशीं पांच चित्रें कोरलेलीं आहेत. ह्या स्तंभांचा शोध अलीकडेच म्हणजे १९०५ सालीं लागला.

[ ९ ] **रुम्मिनदेवीस्तंभ**—संयुक्त-प्रांतांत बस्ती जिल्ह्यांत दुल्हार नांवाच्या गांवापासून उत्तरेस सहा मैलांवर रुम्मिनीदेवीचें मंदिर आहे. त्याच्या समोर हा स्तंभ आहे. यावरहि एक लेख आहे.

[ १० ] **निग्लीवास्तंभ**—बस्ती जिल्ह्यांतल्या नेपाळ-तराईत निग्लीवा गांवापाशीं हा स्तंभ आहे. यावरहि एक लेख आहे.

इ. स. च्या पांचव्या शतकांत ह्युएन-त्सांगनें लिहिलेल्या आपल्या प्रवास-वृत्तान्तांत ८ व ९ या दोन्ही स्तंभांचा उल्लेख आहे.

यांशिवाय श्रावस्तीनगराजवळच्या जेतवन विहाराजवळ दोन स्तंभ आहेत. तसेंच नेपाळ-तराईच्या जंगलांत आणखी पुष्कळ लहान मोठे स्तंभ अज्ञात राहिले असले पाहिजेत असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे.

## गिरिलेख ऊर्फ आदेश

अशोकाच्या गिरिलेखांपैकीं चौदांचा शोध आतांपर्यंत लागला आहे, आणि त्यांतले बहुतेक त्याच्या कारकीर्दीच्या तेराव्या-चौदाव्या वर्षांतले आहेत असें तज्ज्ञांचें अनुमान आहे. या लेखांतून दिलेली वर्षसंख्या ही अशोकाच्या राज्याभिषेकाच्या काळापासून गणना करून आलेली संख्या आहे. हे लेख ख्रि. पू. २५७ आणि २५६ यांच्या मधल्या काळांतले असावेत. मगधराज्यापासून बऱ्याच दूरच्या अशा बारा निरनिराळ्या प्रांतांतून ते सांपडले आहेत.

शहाबाजगढी येथील गिरिलेखाचा शोध प्रथम लागला. हें ठिकाण पेशावरच्या पलीकडे युसफझाई प्रांतांत आहे. तेथें डोंगराच्या खडकावर अशोकाचा बारावा आदेश कोरलेला आहे. दुसरा एक गिरिलेख सरहद्दीवरील प्रांतांत हजरा

जिल्ह्यांत मानसेरा येथें आहे. हे दोन्ही खरोष्ठी लिपींत आहेत. तिसरा एक आदेश डेहराडून जिल्ह्यांत कालसी गांवापाशीं आहे. तो चौदावा आहे. ठाणें जिल्ह्यांत सोपारा येथें एक आदेश आहे. काठेवाड प्रांतांत जुनागड संस्थानांत गिरनार पर्वतांत आणखी एक आदेश आहे. ओरिसा प्रांतांत बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यापाशीं एकाच आदेशाच्या दोन नकला मिळाल्या आहेत. एक भुवनेश्वरापासून तीन कोसांवर धौली येथें व दुसरी गंजम जिल्ह्यांत जौगड येथें. या दोन्ही ठिकाणीं चौदावा आदेशलेख असून त्याला परिशिष्ट म्हणून दोन कलिंगलेख जोडले आहेत.

या चौदा आदेशांवरून अशोकाचा धर्म व त्याची राज्यपद्धति यांच्या संबंधाची बरीच माहिती मिळते.

वर जे दोन कलिंगलेख म्हणून सांगितले आहेत ते अशोकाच्या कारकीर्दीच्या १४ व्या किंवा १५ व्या वर्षी म्हणजे कलिंगविजयानंतर लवकरच कोरले गेले असावेत असें अनुमान आहे. कारण दोन्ही लेखांत नुकत्याच जिंकलेल्या या प्रांताचा बंदोबस्त कसा ठेवावा व राज्यकारभार कसा करावा याविषयींच्या हुकुमवजा सूचना आहेत.

नगर वाचनालय सातारा

## गुहालेख

स्तंभलेख आणि गिरिलेख [ किंवा आदेश ] यांच्याशिवाय अशोकाचे तीन गुहालेख आहेत. हे गयेजवळ बाराबर नांवाच्या पहाडांत आहेत. यांत या गुहा किंवा गुंफा आजीवकांना दिल्याबद्दलचा उल्लेख आहे. मोठे गुहालेख भारतांपर्यंत तीन सांपडले आहेत. हे तिन्ही म्हैसूर संस्थानांत चितळदुर्ग जिल्ह्यांत सिद्धपूर, जटिंग–रामेश्वर व ब्रह्मगिरि या तीन ठिकाणीं आहेत.

अशोकाच्या कांहीं आदेशांच्या नकला बैराट, सासाराम व रूपनाथ येथेंहि सांपडल्या आहेत. बैराट हें स्थान राजपुतान्यांत जयपूर संस्थानांत, सासाराम हें बिहार प्रांताच्या दक्षिण भागांत, आणि रूपनाथ हें ठिकाण मध्यप्रांतांत जबल-

पूर जिल्ह्यांत आहे. याशिवाय निजामच्या राज्यांत मस्की येथेंहि एक लघु गिरिलेख सन १९१५ सालीं सांपडला. राजपुतान्यांत बैराटच्या जवळच भाब्रु येथेंहि एक लघु गिरिलेख होता. हल्लीं तो तेथून काढून कलकत्त्यास नेण्यांत आला आहे. हा लेख फार महत्त्वाचा आहे. कारण अशोकानें बौद्धधर्म स्वीकारल्याचा यांत पुरावा आहे. यांत त्रिरत्नांचा [ बौद्ध, धर्म व संघ हीं तीं तीन रत्नें होत ] व कित्येक बौद्ध ग्रंथांविषयींचा स्पष्ट उल्लेख आहे.

अशोकाच्या एकंदर सगळ्या लेखांची यादी एके ठिकाणीं पाहण्यास मिळावी म्हणून ती येथें देतों—

| लेखाचें वर्णन | संख्या | काळ | अभिषेकानंतरचें वर्ष |
|---|---|---|---|
| लघु गिरिलेख | ३ | ख्रि. पू. २५७ | १३ |
| भाब्रूलेख | १ | ,, ,, | ,, |
| आदेश | १४ | २५७–२५६ | १३ व १४ |
| स्तंभलेख | ७ | २४३–२४२ | २७ व २८ |
| लघु स्तंभलेख | ४ | २४१–२३२ | २९ व ३८ |
| स्मारकलेख | २ | २४९ | २१ |
| गुहालेख | १ | २५७–२५० | १३ |
| कलिंगलेख | १ | २५६–२५५ | ,, |
| प्रादेशिकलेख | १ | २५६–२५५ | ,, |
| एकूण | ३४ | | |

## लेखांची भाषा

हे सगळे लेख रस्त्यानें येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना कळावे म्हणून मुद्दाम-तीर्थयात्रेच्या वाटेवर अलंकार–विरहित सोप्या भाषेंत व प्रादेशिक लिपींत कोरून ठेविलेले आहेत. हे सगळे लेख प्राचीन मागधी भाषेंत असून मानसेरा व शहाबाजगढी या ठिकाणचे लेख खेरीज करून बाकीचे बहुतेक सगळे लेख ब्राह्मी

लिपींत लिहिलेले आहेत. ही लिपि आपल्या बाळबोध किंवा मोडी लिपीप्रमाणें डावीकडून उजवीकडे लिहिलेली आहे. पण मानसेरा व शहाबाजगढी येथील लेख खरोष्ट्री लिपींत फारशीप्रमाणें उजवीकडून डावीकडे लिहिलेली आहेत. अशोकाच्या वेळीं व त्यानंतरहि दीर्घकाळपर्यंत हिंदुस्थानांतल्या बहुतेक सगळ्या भागांतून ब्राह्मी लिपींतच लिहिण्याचा प्रघात होता. प्राचीन गांधारदेशांत [ पेशावर, रावळपिंडी, काबूल वगैरे प्रदेश ] जे प्राचीन काळचे भग्नावशेष सांपडले आहेत, यांत कांहीं शिक्के आहेत. त्यांवरचीं अक्षरें ब्राह्मी लिपींतच आहेत. कांहीं शिक्यांवर मात्र ब्राह्मी व खरोष्ट्री या दोन्ही लिपींतलीं अक्षरें आहेत.

## ब्राह्मी लिपि

ब्राह्मी लिपि अस्सल भारतीय आहे कीं विदेशी आहे यासंबंधानें अनेक हिंदी व पाश्चात्त्य पंडितांत पुष्कळ मतभेद आहे. डॉ. टॉमस, गोल्डस्टकर, राजेंद्रलाल मित्र, लासेन प्रभृति पंडित ब्राह्मी लिपि अस्सल स्वदेशी म्हणणारे आहेत. उलटपक्षीं वेबर, टायलर, बेन्फी, सर विल्यम जोन्स, बूलर प्रभृति पंडित म्हणतात कीं, ब्राह्मी लिपि विदेशियांकडून हिंदुस्थानांत आली. या दुसऱ्या पक्षांत पुनः उत्तर सेमिटिक किंवा फिनिशियन लिपीपासून ब्राह्मी लिपि निघाली असें म्हणणारा एक उपपक्ष, व ती दक्षिण सेमिटिक म्हणजे अरबी वगैरे लिपीपासून निघाली असें म्हणणारा दुसरा उपपक्ष असे दोन उपपक्ष आहेत. या लिपि-उत्पत्तीच्या वादांत शिरण्याचें आपणांस कारण नाहीं, म्हणून हा विषय येथेंच सोडून देऊं.

## खरोष्ट्री लिपि

ब्राह्मी लिपि मूळ ब्रह्मदेशापासून आली म्हणून तिला 'ब्राह्मी' हें नांव पडलें अशी एक दंतकथा आहे. त्याप्रमाणें खरोष्ट्री किंवा खरोष्टी हें नांव दुसऱ्या लिपीला मिळण्याचें कारण तिच्यांतल्या अक्षरांचें खर म्हणजे गर्दभ आणि उष्ट्र

म्हणजे उंट यांच्या आकारांशीं साम्य आहे असेंहि म्हणणारे आहेत. पण हें केवळ वरवर पाहणारांचें मत आहे हें उघड आहे. चिनी ग्रंथांतून अशी हकीकत दिलेली आहे कीं, खरोष्ट नांवाच्या एका विद्वान् माणसाच्या नांवावरून त्यानें शोधून काढलेल्या या लिपीला हें नांव मिळालें.[1]

अशोक यानें सर्वसाधारण जनतेमध्यें आपल्या धर्ममतांचा प्रचार करण्यासाठीं त्या वेळच्या लोकांच्या बोलींत आपले लेख खोदून ठेविले हें वर सांगितलेंच आहे. अशोकाच्या पूर्वीच्या काळांत असे लेख कोरून ठेविल्याचें उदाहरण आढळत नाहीं, यावरून अशोकानेंच हा प्रघात प्रथम घातला असला पाहिजे असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं. अशोकाच्या काळाच्या पुष्कळ अगोदरपासून लिहिण्याची कला हिंदुस्थानच्या लोकांना अवगत होती ही गोष्ट निर्विवाद आहे. तथापि त्या काळीं विद्येचा प्रसार उच्च वर्गापुरताच झालेला होता. ज्ञानाचा प्रसार विशिष्ट वर्गामध्येंच मर्यादित होऊन न राहतां तो यच्चयावत् प्रजेमध्यें व्हावयास पाहिजे अशी स्पृहणीय आकांक्षा अशोकपूर्वकालीन कोणाहि राजानें धरल्याविषयींचें प्रमाण आढळत नाहीं. या दृष्टीनें पाहतां अशोक हा एका नव्या युगाचा प्रवर्तक होता असें म्हटलें पाहिजे. अशोकाच्या या लेखांचें महत्त्व दुसऱ्याहि अनेक दृष्टींनीं आहे. त्याचें विवेचन अन्यत्र केलें आहे.

## अशोकाच्या कल्पनेचें अपूर्वत्व

अशोकानें प्रजेच्या हिताचीं अनेक कृत्यें केलीं. पण दोन हजार वर्षांपूर्वीचे त्याचे लेख जर आज उपलब्ध न होते, किंवा उपलब्ध होऊनहि ते वाचण्याची व त्यांचा अर्थ लावण्याची किल्ली सांपडली नसती, तर अशोकासारख्या उज्ज्वल कीर्तीच्या राजाच्या कारकीर्दीचें दालन बंदच राहून हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची फार मोठी हानि झाली असती. पण तो दुर्दैवाचा

1. Indian Antiquary, Vol. 84, P. 21.

प्रसंग परमेश्वरकृपेनें टळला आणि एका विलक्षण उद्योगी पाश्चात्त्य गृहस्थाच्या परिश्रमानें तें दालन उघडलें जाऊन त्या दालनांत प्रविष्ट होऊन तत्कालीन इतिहासाचें यथेच्छ अवलोकन सकौतुक करण्याचा सुयोग आपणांस प्राप्त झाला, याबद्दल त्या गृहस्थाला व त्याच्या मागून जे संशोधक झाले त्या सर्वांना धन्यवाद देणें अगदीं योग्य आहे. अशोकाच्या इतिहासाचा उद्धार कशा रीतीनें झाला त्याविषयींची कथा फार गमतीची व बोधप्रद आहे. म्हणून ती येथें थोडक्यांत देतों.

## अशोकाचे लेख कसे वाचले गेले. ?

चार्ल्स् टर्नर नांवाच्या एका इंग्रज अधिकाऱ्यानें प्रथम सिंहली पंडितांच्या साह्यानें पाली भाषेचा अभ्यास करून सिंहलद्वीपांतले महावंश व दीपवंश हे दोन ग्रंथ वाचले. ह्यांत अशोक हा बौद्ध धर्माचा मोठा पुरस्कर्ता राजा मगध देशांत होऊन गेला व त्यानें अनेक गिरिलेख व शिलालेख वगैरे मागें ठेविले आहेत असा उल्लेख त्याला आढळला. सदर राजाचा काळ व त्याच्या पूर्वजांचीं वगैरे नांवेंहि त्या ग्रंथांत दिलीं होतीं. तेव्हां हा कोणी पौराणिक काळांतला राजा किंवा काल्पनिक व्यक्ति नसून ऐतिहासिक पुरुष असला पाहिजे अशी त्याच्या मनाची खात्री झाली व या राजाविषयीं अधिक माहिती मिळविण्याच्या हेतूनें त्यानें सिंहलद्वीपांतले दुसरेहि बौद्ध ग्रंथ चाळले व मिळालेल्या माहितीच्या आधारानें त्यानें बौद्ध धर्माचा संगतवार इतिहास लिहिला.

इकडे हिंदुस्थानांत मि. जेम्स प्रिन्सेप नांवाचे एक मोठे इंग्रज अधिकारी होते. ह्यांना प्राचीन इतिहासाच्या अभ्यासाचा नाद होता. त्यांनीं अशोक-लेखांतलीं अक्षरें प्रथम वाचलीं. त्यांच्या पूर्वी एक-दोघां विद्वानांनीं तीं वाचण्याचा प्रयत्न केला होता, पण तो निष्फळ झाला होता. इ. स. १७९५ या सालीं लेफ्. विल्फोर्ड व इ. स. १८३४ सालीं

मि. स्टार्लिंग यांनीं असे प्रयत्न केले होते. पण त्या कामीं यश मिळण्याचें त्यांच्या भाग्यांत नव्हतें. तें श्रेय अखेर प्रिन्सेप याला मिळालें. प्रिन्सेपसाहेबानें पुष्कळ प्राचीन नाणीं, शिक्के व शिलालेख यांच्या नकला घेतलेल्या होत्या. त्याच-प्रमाणें सांची येथील स्तूपावरच्या लेखांच्याहि त्यानें नकला केल्या आणि त्या वाचण्याचा प्रयत्न करीत असतां त्या प्रत्येक लेखांतलीं शेवटचीं दोन अक्षरें त्यानें परस्परांशीं ताडून पाहिलीं व त्यावरून असा तर्क केला कीं, हें कोणीतरी राजानें केलेलें दानपत्र असावें, व 'दा न' हीं किंवा या अर्थाचीं दुसरीं कांहीं तरी तीं अक्षरें असावीं; 'दा न' हीं तीं अक्षरें असलीं तर त्यांच्या मागचा शब्द अर्थात् तें दान करणाराचें नांव असलें पाहिजें; अशी तर्कसरणी चालवितां चालवितां त्याला अखेर 'पियदस्सि' हा शब्द ओळखतां आला. अशा रीतीनें एकेक महत्प्रयासानें एकेक शब्द लावीत लावीत त्यानें त्या काळीं उपलब्ध असलेले सगळे लेख वाचून काढले, व जगाला आपला शोध कळविला. या शोधानें प्राचीन इतिहासाच्या संशोधकांना एक नवी दृष्टि प्राप्त झाली, किंबहुना इतिहाससंशोधनाचें नवें युग उजाडलें.

## पियदस्सि

पुष्कळ—बहुतेक सगळ्या—लेखांतून 'पियदस्सि' हें नांव वाचण्यांत आलें, तेव्हां हे सगळे लेख 'पियदस्सि' नांवाच्या कोणा तरी राजाचे असावेत हें ठरलें. पण हा पियदस्सि कोण, कुठला, केव्हां होऊन गेला वगैरेची माहिती नव्हती. ती टर्नर यानें सिंहलद्वीपांतल्या बौद्ध धर्माचा जो इतिहास लिहिला होता त्यावरून मिळाली, आणि अशा रीतीनें पियदस्सि व अशोक या दोन नांवांची सांगड घातली गेली. इतर प्रमाणांवरूनहि प्रियदर्शी व अशोक ही एकच व्यक्ति ही गोष्ट निर्विवाद ठरली. याबद्दलचें विवेचन मागें एका प्रकरणांत करण्यांत आलेंच आहे.

प्रो. राधाकुमुद मुकर्जी यांनीं अशोकासंबंधाच्या इतिहास-संशोधनांत कसकशी

प्रगति होत गेली आहे त्याची एक जंत्री आपल्या Asoka [ Gaekwad Lectures ] या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत दिली आहे, ती अशी—

## जंत्री

इ. स. १७५० मध्यें पाद्री टीफेनथेलर [ Padre Tieffenthaler ] यांच्या नजरेस दिल्ली–मीरत स्तंभाचे कांहीं भग्नावशेष पडले.

१७८५ मध्यें मि. हॅरिंग्टन याला बाराबर व नागार्जुनी येथील गुहांचा शोध लागला. याच सुमारास कॅप्टन मॉलिएर यास दिल्ली–तोप्रा स्तंभाचा शोध लागून त्याने त्यावरील लेखाची नक्कल करून सर विल्यम जोन्स या पंडिताला दिली.

१८०१ मध्यें 'एशिआटिक रिसर्चेस' नांवाच्या मासिकांत अशोकाच्या कांहीं लेखांच्या नकला प्रसिद्ध झाल्या.

१८२२ त कॅ. टॉड यांना गिरनार पर्वतावरला लेख सांपडला.

१८३४ त अलाहाबादच्या स्तंभलेखाची नक्कल व प्रिन्सेपसाहेबानें ओळखलेल्या अशोककालीन लिपींतल्या कांहीं अक्षरांची माहिती प्रसिद्ध झाली.

१८३६ त पंजाबच्या रणजितसिंगाच्या नोकरींत असलेल्या एका फ्रेंच ऑफिसरला शहाबाजगढींतल्या गिरिलेखाचा शोध लागला.

१८३७ मध्यें प्रिन्सेपसाहेबाच्या अविश्रांत परिश्रमामुळें अशोकाचा दिल्ली-तोप्रा स्तंभलेख त्याला प्रथमच वाचतां आला. याच वेळीं लैडिय-अरराज, लैडिय–नंदनगड व धौली येथील लेखांचा शोध लागला.

१८३८ मध्यें प्रिन्सेपनें गिरनार व धौली येथील लेखांची तुलना करून ते दोन्ही एकच आहेत असें दाखविलें.

१८३९ मध्यें सहसारामच्या लेखाचा शोध लागला.

१८४० मध्यें अशोकाच्या लेखांच्या नकला युरोपखंडांत जाऊन पाश्चात्त्य पंडितांचें लक्ष त्यांच्याकडे वेधिलें गेलें.

१८५० मध्यें जौगडचा लेख मिळाला व तो गिरनार, धौली व शहाबाजगढी येथील लेखासारखाच आहे असें आढळून आलें.

१८६० त कालसी लेख सांपडला.

१८७२ त बैराटचा लघु लेख दृष्टोत्पत्तीस आला. याच वेळीं रूपनाथ व रामपूर्वा येथील लेखांचाहि शोध लागला.

१८७९ मध्यें जनरल कनिंगहॅम यांचा Corpus Inscriptionum Indicarum नांवाचा प्राचीन लेखासंबंधाचा अपूर्व ग्रंथ इंग्रजींत प्रसिद्ध झाला.

१८८२ पासून १९०५ पर्यंत आणखी कित्येक लहान मोठे लेख सांपडले.

१९१५ मध्यें निजाम सरकारच्या राज्यांत मस्की येथें एका इंजिनिअरला एक लेख सांपडला. यांत अशोकाचें प्रत्यक्ष नांव आलेलें आहे म्हणून या लेखाचें महत्त्व विशेष आहे.

प्रो. मुकर्जी यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर याच वर्षी (१९२८ मध्यें) ओरिसा प्रांतांत अशोकाचा आणखी एक लेख गौतमबुद्धाच्या जन्मस्थानासंबंधाचा सांपडला आहे.

✣ ✣ ✣

# प्रकरण आठवें

# अशोकाचे लघु गिरिलेख व मोठे गिरिलेख

अशोकाच्या लेखांसंबंधानें जें प्रास्ताविक विवेचन करावयास पाहिजे होतें तें मागच्या प्रकरणांत केल्यानंतर आतां या प्रकरणांत वाचकांची प्रत्यक्ष त्या लेखांशीं गांठ घालून देऊन त्यांचा अर्थ व सदर लेखांत जें कांहीं विशेष असेल तेवढें थोडक्यांत या प्रकरणांत सांगण्याचें योजिलें आहे. लेखांचें भाषांतर बहुधा अक्षरश: केलेलें आहे. क्वचित् स्थळीं भाषांतर सुबोध करण्यासाठीं कांहीं कमजास्त शब्द घातले आहेत.

प्रथम आपण लघुलेख घेऊं. हे रूपनाथ, सहसाराम व बैराट या तीन ठिकाणीं आहेत. त्यांच्यांत कांहीं पाठभेद आहेत. पण हें पुस्तक सामान्य वाचकांसाठीं असल्यामुळें या तिन्ही लेखांत सामान्य असलेला अर्थ घेऊन भाषांतर करण्यांत आलें आहे.

त्या काळची भाषा कशी होती याची कांहीं कल्पना वाचकांना व्हावी म्हणून फक्त लघुलेखाचें पाली मूळ व त्याखालीं त्याचें मराठी भाषांतर दिलें आहे. बाकीच्या लेखांचीं नुसतीं भाषांतरेंच दिलीं आहेत. विस्तारभयास्तव मूळ पालीलेख दिले नाहींत.

## रूपनाथ येथील पहिला लघु गिरिलेख

**मूळ पाली—**

(१) देवानां पिये हेवं आहा सातिलेकानि अढतियानि वय सुमि पाका सवके नो चु बाढि पकते सातिलके चु छवछरे य सुमि हकं संघ उपेते

(२) बाढि चु पकते यि इमाय कालाय जंबुदिपसि अमिसा देवा हुसु ते

दानि मिसा क्टा पक्रमसि हि एस फले नो च ऐसा महतता पापोतवे खुदकेन हि क

( ३ ) पि परुमिनेन सकिये पिपुले पि स्वगे आरोधवे एतिय अठायच सावने कटे खुदका च उडाला च पकमंतु ति अता पिच जानंतु इयं पकरव

( ४ ) किति (?) चिरठितिके सियां इय हि अठे वढि वढिसिति विपुल च वढिसिति अपलधियेना दियढिय वढिसत इय च अठे पवतिसु लेखापेत वालत हघ च अथि

( ५ ) सिलाठुभे सिलाठंभसि लाखापतवयत एतिना च वयजनेना यावतक तुपक अहाले सवर विवसेतवायुति व्युठेना सावने कटे २५६ स—

( ६ ) तविवासा त.

## मराठी भाषांतर—

देवतांचा प्रिय असें सांगतो कीं— मला उपासक होऊन अडीचापेक्षां जास्त वर्षें झालीं. पण मीं फारसा उद्योग केला नाहीं. पण मी संघांत आल्याला एक वर्षाहून अधिक काळ गेला आणि तेव्हांपासून मीं चांगला उद्योग केला आहे. मधल्या काळांत जंबुद्वीपांत[१] ज्या देवता खऱ्या मानिल्या जात होत्या त्या आता खोट्या असें सिद्ध करण्यांत आलें आहे.[२] हें उद्योगाचें फळ आहे. हें केवळ मोठ्या लोकांनाच प्राप्त होतें असें नाहीं. कारण, हलके लोक उद्योग करतील

१. हा शब्द येथें पौराणिक अर्थानें न वापरतां भारतवर्ष या आधुनिक अर्थानें वापरलेला दिसतो.

२. सिल्वे लेव्ही साहेब या वाक्याचा अर्थ असा करतात—' दरम्यान जे राजे इतके दिवस इतर माणसांमध्यें मिसळत नव्हते ते आतां मिसळूं लागले आहेत. ' हुल्श साहेबांच्या व लेव्हीच्या अर्थांत फार थोडा फरक आहे. ' राजे ' याबद्दल ते ' देवता ' हाच शब्द ठेवतात.

तर त्यांनाहि स्वर्गसुख मिळूं शकेल. यासाठीं हें लिहिण्यांत येत आहे कीं, लहान मोठ्यांनीं ( सर्वांनीं ) उद्योग करावा. माझ्या शेजारच्या राजांनाहि हें अनुशासन कळावें व माझा उद्योग चिरकाळ टिकून राहावा. या गोष्टीचा प्रसार होईल. चांगला प्रसार होईल, विपुल प्रसार होईल, कमींत कमी दीडपट प्रसार होईल. ही गोष्ट येथें व दूरच्याहि प्रांतांतून पर्वतांच्या शिलांवर लिहिली गेली पाहिजे. जेथें जेथें पाषाण स्तंभ असेल तेथें तेथें त्या स्तंभावरहि लिहिली गेली पाहिजे. या आज्ञेनुसार जेथपर्यंत आपला अधिकार पोंचत असेल तेथपर्यंत लोकांनीं या गोष्टीचा प्रसार केला पाहिजे. मी जेव्हां प्रवास करीत होतों तेव्हां हा लेख मीं लिहिला. अर्थात् प्रवासाच्या २५६ व्या मुक्कामीं.[1]

## मस्कीचा लघु शिलालेख

या लेखाचें विशेषत्व आणि महत्त्व यांत आहे कीं, यांत अशोकाचें नांव स्पष्टपणें आलेलें आहे. तेव्हां त्याच्या कर्तृत्वाविषयींच्या वादाला जागाच राहिलेली नाहीं. याच्या पूर्वींच्या लेखांत अशोकाचें प्रत्यक्ष नांव न देतां ' देवानां पिय ' किंवा ' पियदस्सि ' अशा पदव्या तेवढ्या लेखांत दिलेल्या होत्या. मस्कीच्या या लेखावरून अशोकाच्याच त्या पदव्या होत्या याविषयीं शंका राहिली नाहीं.

( दा. नं....
( दे. नं...

१. शेवटच्या ' मुक्कामीं ' याचे जागीं ' दिवशीं ' असा अर्थ कित्येक विद्वानांनीं केला आहे ( Indian Antiquary 1908, P. 20–23 ). कोणी म्हणतात कीं, बुद्धाचें निर्वाण अशोकाच्या अगोदर २५६ वर्षें झालें होतें. तोच हा दिवस म्हणून त्याच्या पुण्यस्मरणार्थ मुद्दाम २५६ ही संख्या या लेखांत घातली आहे ( J R A S 1910, P. 130–8). फ्लीट म्हणतो कीं, हें शेवटचें संबंध वाक्यच अशोकाच्या हातचें नसून मागाहून कोणीं घुसडलें आहे. ( –Do–1909, P. 730, 994 ).

## मूळ पाली लेख—

( १ ) देयानां पियस असोकस......ढत
( २ ) नि वसानि यं अं सुमि बुं पा शके...... तिरेके
( ३ )...मि संघं उपगते व्रा...मि उपगते पुरे जंबु
( ४ )...सि [ देवा हुसु ] ते दानि मिसिभूता इय अठे खुद
( ५ ) के न हि धमयु तेन सके अधिगतवे न हेवं दखितवियेे उडा
( ६ ) लके व इम अधिगद्देया ति खुदके च उडालकेक च वत
( ७ ) विया हेव वे कलतं भदके ठेति...तक च वधि
( ८ ) सिति चा दिय ढिय हेसति

## मराठी भाषांतर—

देवांचा प्रिय अशोक याचें असें सांगणें आहे— [ यापुढील सगळा मजकूर रूपनाथ येथील लेखासारखाच आहे. फरक इतकाच कीं, या लेखांत वरील लेखांतलें शेवटचें वादग्रस्त वाक्य व २५६ चा आंकडा नाहीं. ]

## ब्रह्मगिरि येथील पहिला लघुलेख

म्हैसूर संस्थानांत सिद्दपूर, जतिंग, रामेश्वर व ब्रह्मगिरि या तीन ठिकाणीं जे तीन लघुलेख आहेत त्यांपैकीं ब्रह्मगिरीचा लेख चांगला शाबूत आहे. तो असा—

## मूळ पाली लेख—

[ १ ] सुवंणागराते अयपुतस महामाताणं च वचनेन इसिलसि महामात्रा आरोगियं वतविया हेवं च वतविया देवाणं पिये आणपयति

[ २ ] अधिकानि अढातियानि वसानि य हकं...नो तु खो बाढं पकंते हुसं एकं सवछरं सतिरेके तु खो संवछरं

[ ३ ] यं मया संघे उपयीते बाढं च मे पकंते इमिना चु कालेन अमिसा समाना मुनिसा जंबुदीपसि

[ ४ ] मिसा देवहि पकमसहि इयं फले नो हीयं सक्ये महात्पेनेव पापोतवे कामं तु खो खुदकेनपि–

[ ५ ] पकममिणेण विपुले स्वगे सक्ये आराधेतवे एतायठाय इयं सावणे सावापिते

[ ६ ]...महात्पा च इमं पकमेयुति अंता च मेजानेयु चिरठितीके च इयं.

[ ७ ] प [ कमे होतु ] इयं च अठे वढिसिति विपुलं पि च वढिसिति अवराधिया दियढियं

[ ८ ] वढिसिति इयं च सावणे सावपते व्यूथेन २५६

## मराठी भाषांतर–

सुवर्णगिरीहून आर्यपुत्र ( कुमार ) व महामात्र ( महामात्य ) यांच्या तर्फे इसिलाच्या महामात्यांचें कुशल विचारावें व सूचित करावें कीं, देवांचा प्रिय याची अशी आज्ञा आहे कीं ( यापुढील मजकुर रूपनाथप्रमाणें )

## ब्रह्मगिरीचा दुसरा लघुलेख

### मूळ पाली–

( ८ ) से हेवं देवानं पिये

( ९ ) आह मातापितिसु सुसूसितविये हेमेव गुरुत्वं प्राणेसु द्रह्यितव्यं सचं

(१०) वतवियं से इमे धंमगुण पवतितविया हेमेव अंतेवासिना,

(११) आचरिये अपचायितविये आतिकेसु च कु यथारहं पवतितविये

(१२) एसा पोराणा पकीती दिघावुसे च एस हेवं एस कटिबिये

(१३) च पडेन लिखितं लिपिकरेण

## मराठी भाषांतर–

" देवांचा प्रिय असें सांगतो कीं, मातापित्यांची सेवा केली पाहिजे. प्राण्यांच्या जीवाचा आदर दृढतेनें करावा (अर्थात् हिंसा करूं नये); खरें बोलावें; धर्माच्या या गुणांचा प्रसार करावा; तसेंच शिष्यांनीं गुरूची सेवा करावी, आणि आपल्या ज्ञातिबांधवांशीं योग्य वर्तन करावें. हीच जुनी रीत आहे. हिनें आयुष्य वाढतें. याच रीतीनें माणसांनीं चालावें. पड नांवाच्या लेखकानें हा लेख लिहिला आहे. "

वरील लेखांत ' लिपिकरेण ' येवढाच शब्द खरोष्ठी लिपींत कोरलेला आहे. पड हा सहरद्दीवरच्या प्रांतांतला रहिवासी व ब्राह्मी आणि खरोष्ठी या दोन्ही लिप्या जाणणारा असावा.

या लेखांतल्या उपदेशाचें तैत्तिरीयोपनिषदांतल्या ' सत्यं वद, धर्मं चर, मातृदेवो भव, पितृदेवो भव ' इ. उपदेशाशीं बरेंच साम्य आहे.

## भाब्रूचा लेख

### मूळ पाली--

( १ ) पियदसि लाजा मागधं संघं अभिवादनं आहा अपावाधतं च फासु विहालतं चा

( २ ) विदित वे भंते आवतके हमा बुधसि धंमसि संघसीति गलवे च पसादे च ए केचि भंते

( ३ ) भगवता बुधेन भासिते सवे से सुभासिते वा ए चु खो भंते हमियाये दिसेया हेवं सधंमे

( ४ ) चिलठितीके होसतीति अलहामि हकं तं वतवे इमानि भंते धंमपलियायानि विनयसमुकसे–

( ५ ) अलियवसानि अनागतभयानि मुनिगाथा मोनेयसूते उपतिसपसिने ए चा लाघुलो

( ६ ) वादे मुसावादं अधिगिच्य भगवता बुधेन भासिते एतान भंते धंमपलियायानि इच्छामि

( ७ ) किंति ( ? ) बहुके भिखुपाये च भिखुनिये चा अभिखिन सुन यु चा उपधालेयेयु चा

( ८ ) हेवं हेवा उपासका चा उपासिकाचा एतिनि भंते इमं लिखापयामि अभिहेतं म जानंतति

## मराठी भाषांतर—

" प्रियदर्शी राजा मगधाच्या संघाला अभिवादन ( करून ) म्हणतो कीं, ( त्यानें म्हणजे संघानें ) निर्विघ्नपणें व सुखानें राहावें. अहो भदंत[1] हो ! आपण जाणतां कीं बुद्ध धर्म, व संघ यांचेविषयीं माझी केवढी भक्ति व आदर आहे. अहो भदंत हो ! भगवान् बुद्धानें जें सांगितलें[2] आहे तें सगळें चांगलें आहे. पण भदंत हो ! मी आपल्याकडून ( अशा कांहीं ग्रंथांचीं नांवें लिहितों कीं जे माझ्या मतें अवश्य वाचले जाण्यास योग्य आहेत. ) हे भदंतगण ! ( अशा बुद्धीनें कीं ) सद्धर्म चिरस्थायी होईल अशा धर्मग्रंथांचीं ( नांवें लिहितों ) जसें–विनयसमुत्कर्ष, आर्यवंश, अनागतभय, मुनिगाथा, मौनेयसूत्र, उपतिष्यप्रश्न, व राहुलवाद ज्यांत भगवान् बुद्धानें असत्य भाषणा- संबंधानें सांगितलें आहे. हे भदंत हो ! मी इच्छितों कीं, भिक्षु व भिक्षुणी यांनीं ते वारंवार श्रवण करावे, लक्षांत ठेवावे व तसेंच उपासक व उपासिका

१. पूज्य लोक

२. अंगुत्तरनिकाय नामक पालीग्रंथांत.

यांनींहि ( करावें. ) भदंत हो ! माझी ही इच्छा लोकांना कळावी म्हणून मी हा लेख लिहवीत आहें. "

ह्या लेखांत अशोकानें बौद्धधर्म स्वीकारला होता इतकेंच नाहीं, तर संघावर त्याचा अधिकार चालत होता याबद्दलचा उत्कृष्ट पुरावा आहे. म्हणून हा लेख फार महत्त्वाचा समजला पाहिजे. जे सात बौद्ध धर्मग्रंथ अशोकाचे प्रिय होते त्यांचीं नांवें यांत दिलीं आहेत. या सात ग्रंथांचा पत्ताहि लावण्यांत आला आहे. तो असा—विनयसमुत्कर्ष हा पातिमोख्खाच्या अंतर्गत आहे. आर्यवंश हा अंगुत्तरनिकायाचा दुसरा व अनागतभयानि हा तिसरा भाग आहे. मुनि-गाथा हें प्रकरण सुत्तनिपात ग्रंथांत मुनिसुत्त या नांवानें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें मौनेयसूत्र हें त्याच ग्रंथांत नाल्कसुत्त या नांवानें दिलेलें आढळतें. उपतिष्यप्रश्न हा सुत्तनिपाताचा चौथा भाग आहे, आणि राहुल्वाद हा मज्झिमनिकाय ग्रंथांत राहुलोवादसुत्त या नांवाखालीं पहिल्या भागांत आहे.

हा लेख प्रत्यक्ष संघाला उद्देशिलेला आहे. दुसरे बरेचसे लेख अशोकानें महामात्रादि अधिकाऱ्यांना उद्देशिलेले आहेत, तसा हा नाहीं.

## सुप्रसिद्ध चौदा गिरिलेख ऊर्फ आदेश

मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं, अशोकाच्या सर्व लेखांत त्याच्या चौदा आदेशांचें विशेष महत्त्व आहे. हे चौदा आदेश गिरनार, कालसी, धौली, जौगढ, शहाबाजगढी, मानसेरा इ. निरनिराळ्या ठिकाणीं विखुरलेले आहेत. प्रत्येक लेखांत कांहीं ना कांहीं महत्त्वाचा विषय आहे व त्यावरून अशोकाचा स्वभाव, त्याचीं धर्ममतें, राज्यव्यवस्था, तत्कालीन समाजस्थिति इ. गोष्टींवर महत्त्वाचा प्रकाश पडला आहे. या आदेशामुळेंच अशोकाचें चरित्र लिहिण्यास अवश्य अशी विश्वसनीय माहितीची सामग्री मिळाली. एरवी तें कार्य दुष्कर होतें असेंहि म्हणतां येईल. भिन्न भिन्न प्रांतांतून भिन्न भिन्न स्थळीं हे आदेश कोरवितांना त्या त्या प्रदेशांतल्या भाषेंतल्या शब्दांचा व

लेखकांच्या ज्ञानाचा किंवा अज्ञानाचा प्रभाव लेखांवर पडल्यामुळें अनेक पाठभेद झालेले दृष्टीस पडतात, ते सगळे दिल्यास ग्रंथविस्तार फार होईल. शिवाय, तसें करण्याची विशेषशी आवश्यकताहि दिसत नाहीं. कारण, हें चरित्र प्राचीन इतिहासाचें संशोधन करूं इच्छिणाऱ्या पंडितांसाठीं नसून सामान्य महाराष्ट्र-जनतेच्यापुढें सम्राट् अशोकाच्या काळाचा अत्यंत उज्ज्वल, गौरवमय व अभिमानास्पद इतिहास ठेवावा या उद्देशानें लिहिलेलें असल्यामुळें निरनिराळ्या पाठभेदांसंबंधानें पंडितांमध्यें झालेल्या वादविवादाच्या घोटाळ्यांत न शिरतां प्रत्येक आदेशाचें नुसतें मराठी भाषांतरच देऊन सामान्य वाचकांची जिज्ञासा तृप्त करावी हा मार्ग अधिक श्रेयस्कर वाटतो. अशोकाच्या लेखांची भाषा कशा स्वरूपाची होती हें कळण्यास वर दिलेल्या तीन-चार लेखांतलें मूळचें पाली स्वरूप पुरेसें होईल. म्हणून यापुढें लेखांचें पाली भाषेंतलें मूळ न देतां नुसतें मराठी भाषांतरच देण्यांत येईल.

## पहिला आदेश ( मराठी भाषांतर )

"हा धर्मलेख[१] देवांचा प्रिय प्रियदर्शी यानें लिहविला आहे. येथें [ या राज्यांत ] कोणत्याहि जीवाला मारून त्याचा बळी देण्यांत येऊं नये, किंवा समाज करण्यांत येऊं नये. कारण, देवांच्या प्रिय प्रियदर्शी राजाला समाजांत पुष्कळसे दोष दिसतात. तथापि कांहीं प्रकारचे समाज देवतांच्या प्रिय प्रियदर्शी राजाला पसंत आहेत. पूर्वी देवांच्या प्रिय प्रियदर्शी राजाच्या पाकशाळेंत रोज

---

१. या व पुढील कित्येक लेखांना 'धर्मलेख' अशी संज्ञा अशोकानें स्वतःच दिली आहे. कारण, त्यांत 'धर्म' शब्द वारंवार आला आहे. हा धर्म शब्द सर्व ठिकाणीं आत्मोन्नति या अर्थानेंच आलेला आहे असें नाहीं. समाजाची सुस्थिति, राज्यकारभाराची सुव्यवस्था, किंवा नीतिपर आचरण इ. अर्थानेंहि 'धर्म' शब्द कित्येक ठिकाणीं वापरण्यांत आला आहे.

लाखों जीव सूप[१] [ मांसाची कढी ] बनविण्यासाठीं मारले जात असत. पण हा धर्मलेख लिहिला गेला तेव्हांपासून दोन मोर व एक मृग असे तीनच प्राणी मारले जात आहेत. मृग मारण्याचाहि नेम नाहीं. यापुढें हे तीन प्राणीहि मारले जाणार नाहींत. "

या लेखाचा विषय अहिंसा हा आहे. याशिवाय यांत जातां जातां आत्मचरित्रांतलाहि थोडासा भाग सांगितला आहे. अशोकाच्या पाकशाळेंत पूर्वी प्राणि-हिंसा पुष्कळ होत असे; पण ती हळूहळू कमी करीत त्यानें पुढें ती अजिबात बंद केली ही माहिती या लेखावरून मिळते. या लेखांत समाज हा शब्द पहिल्या एकदोन ओळींत आला आहे. त्याच्या अर्थासंबंधानें थोडासा वाद आहे. ब्यूलर म्हणतो कीं समाज म्हणजे मेळा किंवा जत्रा. प्रो. भांडारकरांना उत्सव हा अर्थ मान्य आहे. ते म्हणतात कीं, प्राचीन काळीं दोन प्रकारचे उत्सव होत. एकांत नुसतें गाणेंबजावणें व खेळ, कुस्त्या वगैरे गोष्टी होत. दुसऱ्यांत हे प्रकार असून शिवाय आमिषभोजनहि होत असे. पैकीं अशोकानें ज्या समाजाला मनाई केली तो हा दुसऱ्या प्रकारचा उत्सव असावा. कारण, त्यांत हिंसा होत असे. टॉमस याच्या मतें समाज म्हणजे एक जंगी क्रीडास्थान किंवा आखाडा असे. येथें माणसामाणसांत किंवा मनुष्य आणि पशु यांच्यांत द्वंद्व-युद्धें चालत. हीं युद्धें क्रूरपणाचीं म्हणून अशोकानें मना केलीं असावींत [ J. R. A. S. 1914, P. 392 ]. श्रीयुत मुजुमदार यांच्या मतें समाज म्हणजे नाटक. जातकग्रंथांत याच अर्थानें 'समाज' शब्दाचा उपयोग केलेला आहे.

---

१. अशोकाच्या पाकशाळेंत **रोज लाखों** जीव मारले जात असत ही सकृद्दर्शनीं अतिशयोक्ति दिसते. पण असेंहि असण्याचा संभव आहे कीं, ज्याप्रमाणें कांहीं वर्षांपूर्वी बडोदें सरकारकडून रोज शेंकडों माणसांना खिचडी वांटण्यांत येत असे, त्याप्रमाणें शिजविलेलें मांसान्न अशोकाच्या राजवाड्यांतून हजारों गोरगरिबांना व नोकरांना वांटण्यांत येत असेल.

व्हिन्सेंट स्मिथ यांनीं प्रथम समाज म्हणजे उत्सव असा अर्थ केला होता, पण मागाहून ते श्री. मुजुमदार यांच्या मताचे झाले ( Indian Antiquary 1910, P. 235).

## दुसरा आदेश (गिरनारचा)

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा याच्या राज्यांत सर्वत्र व त्याचप्रमाणें त्याच्या शेजारच्या म्हणजे चोल, पांड्य, [१]सत्यपुत्र, केरलपुत्र,[२] [३]ताम्रपर्णी या राज्यांतून आणि अंतियोक नांवाचा यवनराजा व जे त्याच्या शेजारचे राजे आहेत त्या सर्वांच्या देशांतून, देवांचा प्रिय प्रियदर्शी यानें मनुष्याची चिकित्सा व पशूंची चिकित्सा अशा दोन्ही प्रकारच्या चिकित्सांची व्यवस्था केली [४]आहे. माणसांच्या व पशूंच्या उपयोगाच्या औषधि वनस्पति जेथें नव्हत्या तेथें तेथें त्या आणून लाविल्या आहेत. तसेंच मुळें व फळें जेथें जेथें नव्हतीं तेथें तेथें तीं आणून लाविलीं आहेत.[५] रस्त्यानें पशु व मनुष्यें यांच्या विश्रांतिसुखासाठीं झाडें लाविलीं आहेत व विहिरी खोदिल्या आहेत."

या लेखांतल्या चिकित्सा शब्दाचा अर्थ ब्यूलरनें रुग्णालय असा केला आहे, पण वस्तुतः त्या शब्दाचा अर्थ केवळ रुग्णालयें असा नसून औषधपाण्याची सर्व प्रकारची तजवीज असा आहे. अर्थात् त्यांत रुग्णालयाचाहि अंतर्भाव

---

१. या राज्याचा उल्लेख अशोकाच्या लेखाबाहेर अन्यत्र कोठें केलेला आढळत नाहीं. यामुळें हा देश कोणता तें नक्की कळत नाहीं.

२. पूर्वींचें चेरराज्य अथवा मल्बार.

३. पालीग्रंथांतून हें नांव सिंहलद्वीपाला दिलेलें आढळतें.

४. अशी दंतकथा आहे कीं, एकदा एक भिक्षु व्याधीनें ग्रस्त झाला असतां कोठें औषध मिळालें नाहीं म्हणून मेला. तें ऐकून अशोकाचें मन कळवळलें आणि तेव्हांपासून त्यानें औषधें मिळण्याची ही व्यवस्था केली.

५. कौटल्याचें अर्थशास्त्र [ २-२१ ] पहा.

होतो. ( Indian Antiquary 1906, P. 245 ) यासंबंधाची विशेष माहिती सातव्या स्तंभलेखांत दिली आहे.

## तिसरा आदेश ( गिरनारचा )

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं— राज्याभिषेकानंतरच्या बाराव्या वर्षी मीं ही आज्ञा जाहीर केली आहे कीं, माझ्या राज्यांत सर्व युक्त,[१] लाजुक,[२] व पोदोसिक[३] (प्रादेशिक) यांनीं पांच पांच वर्षांनी धर्मानुशासनासाठीं व त्याचप्रमाणें इतर कामांसाठीं दौरा[४] करावा व असें सांगत फिरावें कीं, आईबापांची सेवा करीत जा[५]; तसेंच मित्र, परिचित, स्वजातीय ब्राह्मण व श्रमण यांना दानें देणें चांगलें आहे.[६] जीवहिंसा न

---

१. खालच्या दर्जाचे अधिकारी.

२. राजुक म्हणजे गव्हर्नरासारखे मोठे अधिकारी.

३. प्रादेशिक म्हणजे प्रांताचा वसूल करणारे व बंदोवस्त राखणारे अधिकारी असा अर्थ टॉमस यानें केला आहे.

४. मूळ पाली लेखांत 'अनुसंथान' असा शब्द आहे. याचा अर्थ श्रीयुत जायस्वाल 'बदली' असा करतात. तो शुक्रनीतींतलें वचन व सामान्य व्यवहार यांना धरून आहे. कारण, एकच अधिकारी पुष्कळ वर्षे एका ठिकाणीं कामावर राहिल्यास तो न्यायभ्रष्ट होण्याचा संभव असतो.

५. मातापित्यांची सेवा कशी करावी तें सिगालवादसुत्त या पालीग्रंथांत खुलासेवार सांगितलें आहे. तेथें सेवेचे ५ प्रकार सांगितले आहेत. ते असे— [ १ ] त्यांचें अन्नवस्त्रादिकांनीं पालनपोषण करणें; [ २ ] त्यांचीं कामें आपण करून त्यांना विश्रांति देणें; [ ३ ] कुळाची प्रतिष्ठा राखणें; [ ४ ] दानधर्म करणें; [ ५ ] मालमत्तेचें रक्षण करणें.

६. त्याच ग्रंथांत ब्राह्मण, श्रमण, इ. ची सेवा करण्याचे पुढील प्रकार

करणें चांगलें. थोडा व्यय व थोडा सञ्चय करणें ही चांगली गोष्ट आहे.[१] परिषद ( बौद्धसंघ ) हि युक्त नांवाच्या अधिकाऱ्याला खजिना व हिशेब तपासण्याविषयीं आज्ञा देईल. ''

या लेखांतल्या शेवटच्या वाक्यांत जो 'युक्त' शब्द आला आहे, त्याच्या अर्थासंबंधानें पंडितांत वाद आहे. तथापि या लेखावरून सुधारणेच्या काळांतल्या राज्यपद्धतींतल्या बऱ्याचशा चांगल्या गोष्टी दोन हजार वर्षांपूर्वीच्या अशोकाच्या राज्यव्यवस्थेंत कशा दृष्टीस पडतात तें स्पष्ट दिसतें.

## चौथा आदेश [ गिरनारचा ]

" शेंकडों वर्षांपासून प्राण्यांचा वध, जीवांची हिंसा, जातबंधूंचा अनादर, आणि श्रमण व ब्राह्मण यांचा अनादर वाढत आला आहे. पण आज देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा याच्या धर्माचरणामुळें नगाऱ्याचा शब्द—नव्हे धर्माचा घोष ( ऐकूं येत आहे ) आणि विमानें व हत्ती दिसूं लागले आहेत. अग्निज्वाला ( होळ्या ? ) पेटल्या ( आहेत ) आणि दुसरीं ( देवांचीं ) दिव्यरूपें लोकांना दिसत आहेत. पूर्वी शेंकडों वर्षांत कधीं झाल्या नव्हत्या अशा गोष्टी म्हणजे प्राण्यांची अहिंसा, जीवांचें रक्षण, बंधूचा आदर, ब्राह्मणांचा व

पान ८४ वरून पुढे चालू

सांगितले आहेत—( १ ) त्यांच्याशीं गोड बोलून मैत्री संपादणें; ( २ ) त्यांना केव्हांहि आपल्या घरांत येण्यास मोकळीक ठेवणें; ( ३ ) त्यांना देणग्या देणें.

१. माणसानें कोणत्या कामीं किती खर्च करावा व उत्पन्नाचा कितवा अंश शिलकेस टाकावा यासंबंधानें सिगालवादसुत्तांत पुढील नियम घालून दिलेला आढळतो—माणसानें उत्पन्नाचा चौथा भाग अन्नवस्त्रादि घरखर्चाकडे लावावा. निम्में उत्पन्न आपल्या उद्योगधंद्यांत ( भांडवल म्हणून ) घ्यावें; आणि उरलेला एक भाग शिलकेंत टाकावा.

श्रमणांचा सन्मान, मातापितरांची सेवा व वृद्धांची सेवा या गोष्टी देवांचा प्रिय प्रियदर्शी राजाच्या धर्मानुशासनामुळें वाढल्या आहेत. हें व दुसरें पुष्कळ प्रकारचें धर्माचरण वाढलें आहे, व देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा या धर्माचरणाला आणखीहि वाढवील. देवांचा प्रिय प्रियदर्शी राजाचे पुत्र, नातू, पणतू, या धर्माचरणाला कल्पान्तापर्यंत वाढवितील व धर्म आणि शील यांचें आचरण करीत धर्माचा प्रचार करतील. धर्माचा प्रचार हेंच श्रेष्ठ कार्य आहे. जो दुःशील असतो त्याचे हातून धर्माचरण घडत नाहीं. यासाठीं याची ( धर्माचरणाची ) वाढ होणें व हानि न होणें चांगलें. लोकांनीं याच्या वृद्धीच्या मागें लागावें व याची हानि होऊं देऊं नये या उद्देशानें हा लेख लिहिला गेला आहे. हा लेख देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा यानें राज्याभिषेकानंतर बाराव्या वर्षी लिहविला. ”

वरील लेखाच्या आरंभीं ज्या नगाऱ्यांचा उल्लेख करण्यांत आला आहे ते नगारे म्हणजे धार्मिक उत्सवांच्या वेळीं मंदिरें वगैरेंतून वाजविण्यांत येणारे नगारे होत. विमान = रथ. हत्तींचा उल्लेख करण्याचें कारण रथाच्या मिरवणुकीपुढें हत्ती चालत असत हें असेल. बौद्धधर्मांत हत्तीला विशेष महत्त्व आहे. सयाम देशांत पांढरा हत्ती हा बुद्धाचा अवतार समजून त्याची पूजा-अर्चा करण्यांत येत असते. लोकांना बुद्धाचें स्मरण करून द्यावें या हेतूनें हत्तींचा उल्लेख येथें कदाचित् केला असेल. अग्निज्वाळा याबद्दल मूळ लेखांत ‘ अग्निस्कंधाः ’ असा शब्द आहे. या शब्दाचा अर्थ अग्नीचे मोठाले ज़ाळ असा आहे. इंग्रज लोकांत आनंदोत्सवप्रसंगीं मोठाल्या होळ्या [ Bonfires ] पेटविण्याचा प्रघात आहे. असाच प्रघात अशोकाच्या वेळीं आपल्या इकडेहि असेल हें संभवनीय आहे. [1]

‘दिव्यरूपें ’ असा शब्द या लेखांत आला आहे. ह्याचा अर्थ रथांतून मिरविलेल्या देवांच्या मूर्तीचीं उत्तम रीतीनें शृंगारलेलीं रूपें असा आहे.

1. Indian Antiquary 1916, P. 203 येथें प्रो. कृष्णस्वामी अय्यंगार

देवांचे हे उत्सव वगैरे पाहून लोकांची धर्मनिष्ठा व नीतिमत्ता सुधारेल अशी अशोकाची अपेक्षा असावीसें दिसतें.

## पांचवा आदेश [ मानसेरा येथील ]

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—चांगलें कृत्य करणें कठीण असतें. जो कोणी सत्कृत्य करतो तो कठीण काम करतो. मी पुष्कळ सत्कृत्यें केलीं आहेत, यासाठीं माझे मुलगे, नातू, पणतू व त्यांच्या पुढें जी संतति होईल ते कल्पान्तापर्यंत तसेंच करीत राहतील तर पुण्यकृत्य करतील. पण जे कोणी ( या कर्तव्यांत ) थोडेसेहि चुकतील ते पाप करतील. कारण, पाप करणें सोपें आहे. पुष्कळ दिवसपर्यंत धर्ममहामात्रांची नेमणूक झालेली नव्हती. पण मी माझ्या राज्याभिषेकाच्या १३ व्या वर्षानंतर ते नेमिले. धर्माचें रक्षण करण्यासाठीं, धर्माची वृद्धि करण्यासाठीं, धर्मयुतांच्या हितासाठीं व सुखासाठीं त्याचप्रमाणें यवन, कांबोज,गांधार, राष्ट्रिक, प्रतिष्ठानिक, त्याचप्रमाणें अपरांतक यांच्याहि हितासाठीं व सुखासाठीं पाषंडी लोकांत हे नेमिले आहेत. हे यजमान व सेवक, ब्राह्मण,श्रीमंत, अनाथ, वृद्ध यांच्या हितासाठीं व सुखासाठीं धर्मनिष्ठांच्या रक्षणार्थ नेमिले आहेत. हे ( अन्यायानें केले जाणारे ) वध व बंधन थांबविण्यासाठीं, दंड कमी करण्यासाठीं व ( अपराध्याच्या हेतूकडे लक्ष देऊन त्यांना ) सोडण्यासाठीं, आणि कुटुंबवत्सल, विपद्ग्रस्त व अतिशय वृद्ध यांच्यासाठीं ( यांच्यावर नजर ठेवण्यासाठीं मुद्दाम नेमिले आहेत ) हें येथें ( पाटलीपुत्रांत ) व बाहेरच्या सर्व शहरांत सर्वत्र आमच्या भाऊबहिणी व नातेवाईक व इतर जातीचे लोक यांच्या अंतःपुरांत नेमिले आहेत. हे धर्ममहामात्र माझ्या राज्यांत सर्व ठिकाणीं

पान ८६ वरून पुढें चालू

हे ' अग्निस्कंध ' या विषयावरील आपल्या लेखांत लिहितात कीं, दक्षिणेकडे कार्तिक शु० १५ ला कित्येक मंदिरांतून दीपोत्सव होत असतो, तेव्हां होळ्या पेटविण्याची चाल अद्यापहि आहे. अशीच चाल अशोकाच्याहि वेळेस कदाचित् असेल.

धर्म व दान यासंबंधाच्या कामांची ( देखरेख करण्यासाठीं ) नेमिले आहेत. हा धर्मलेख लिहिण्याचा हेतु हा आहे कीं, ही ( व्यवस्था ) चिरकाल कायम राहावी व माझ्या प्रजेनें तदनुसार वागावें. ”

या आदेशांत धर्ममहामात्र नांवाचे अधिकाऱ्यांची नेमणूक कोणत्या उद्देशानें कोठें कोठें केली व त्या अधिकाऱ्यांनीं कोणतीं कामें करावयाचीं इ. गोष्टींचे तपशीलावर विवेचन आहे. या आदेशाचा अर्थ पूर्णपणें लक्षांत येण्यासाठीं पुढील कित्येक गोष्टींकडे लक्ष देणें अवश्य आहे—

या आदेशाच्या आरंभीं अशोकानें स्वतः पुष्कळ सत्कृत्यें केलीं असल्याविषयींचा उल्लेख केला आहे. हीं सत्कृत्यें स्तंभावरील लेखांपैकीं सातव्या लेखांत सांगितलीं आहेत. तीं अशीं—धर्मप्रचारक प्रांतोप्रांतीं पाठविणें, धर्माचा प्रसार करणें, रस्त्यांच्या बाजूंनीं छायेसाठीं झाडें लावणें, अन्नदान करणें, मातापिता, वृद्ध माणसें, ब्राह्मण, यति, यांना—फार काय, पण नोकरचाकर व दास यांनाहि—आदरानें वागविण्याचा, व अहिंसा धर्म पाळण्याचा उपदेश करणें इ.

या लेखांत कांहीं लोकांचीं नांवें आलीं आहेत, त्यांच्याविषयींचाहि थोडासा खुलासा येथें करणें अवश्य आहे. यवन म्हणजे ग्रीक लोक. हे लोक युरोपखंडांतल्या ग्रीस देशांतले येथें उद्दिष्ट नाहींत. अशोकाच्या राज्याच्या सीमेबाहेर जवळच कांहीं मुलूख ग्रीक राज्याच्या प्रभुत्वाखालीं होता. तेथचे हे ग्रीक समजावयाचे. त्याचप्रमाणें कांबोज म्हणजे काश्मीरच्या दक्षिणेस हिमालयाच्या पश्चिम भागांत योन व गांधार यांच्या प्रदेशाला लागून असणाऱ्या मुलखांतले लोक. या लोकांचा उल्लेख महाभारताच्या द्रोणपर्वांत आला असून त्यांच्या देशाची राजधानी राजपुर [ हल्लींची राजवाडी ] ही होती असें प्रो. भांडारकर लिहितात (Asoka, P. 31). गांधार हा प्रदेश सुप्रसिद्धच आहे. हल्लीं याला कंदाहार हें नांव आहे. येथचे लोक आम्हां भारतीयांच्या फार दिवसांच्या परिचयाचे आहेत. राष्ट्रिक हें नांव पूर्वी महाराष्ट्रियांना लावीत असत. प्रतिष्ठानिक ( मूळ पालींतला शब्द पितिनिक ) हे पैठणचे लोक असें कित्येक पंडित

म्हणतात. प्रो. भांडारकरांचें म्हणणें आहे कीं, पितिनिक हें लोकांचें नांव नसून 'पितृपरंपरागत' या अर्थाचें विशेषण आहे. पितिनिक राष्ट्रिक म्हणजे महाराष्ट्रांत पूर्वी अधिकारी म्हणून गेलेले पण पुढें राज्य वळकावून बसलेले असे महाराष्ट्रीय, असा अर्थ प्रोफेसरसाहेब[1] करतात, पण तो युक्त दिसत नाहीं.

अपरांतक हें नांव पश्चिम किनाऱ्याच्या उत्तर भागाला होतें.

याच्यापुढें पाषंड हा एक महत्त्वाचा शब्द आला आहे. हाच शब्द पुढें १२ व्या गिरिलेखांत ( आदेशांत ) हि आला आहे. या शब्दाचा अर्थ प्रचलित मताच्या विरुद्ध मताचा असा हल्लीं होतो. कौटल्याच्या अर्थशास्त्रांतहि याच अर्थानें तो शब्द वापरला आहे. मनुस्मृतींत पाषंडांना जुगारी, नट, कलाल वगैरे हलक्या लोकांच्या पंक्तीला बसविलें आहे. कुल्लूक भट्टानें मनुस्मृतीवरच्या आपल्या टीकेंत 'पाषंड' शब्दाचा अर्थ 'श्रुतिस्मृति-बाह्य मताचा' इतकाच दिला आहे. येवढी गोष्ट खरी कीं, अशोकानें हा शब्द स्वतःच्या संघासंबंधानें दुसरीकडे योजिला आहे असें ज्याअर्थी प्रो. भांडारकर म्हणतात,[2] त्याअर्थी अशोकानें तो शब्द येथें वाईट अर्थानें योजिला नसेल. त्याचा उद्दिष्ट अर्थ अर्थात् निराळा असला पाहिजे. तो अर्थ म्हणजे संप्रदाय हा होय असें पुष्कळ पंडितांचें म्हणणें आहे.

धर्ममहामात्र व धर्मयुक्त हीं दोन्हीं नांवें धमखात्यांतल्या अधिकाऱ्यांचीं होतीं. पैकीं धर्ममहामात्र हा वरच्या दर्जाचा व धर्मयुक्त हा त्याच्या हाताखालचा अधिकारी होता. धर्ममहामात्राकडे सोपविलेले अधिकार पूर्वी स्वतः राजाकडे होते. हे अधिकार कोणते तें या लेखांत सांगितलें आहे.

अंतःपुरांत काम करण्यासाठीं स्त्रियांची महामात्रांच्या पदावर नेमणूक करण्यांत आली आहे असें या लेखांत म्हटलें आहे. यावरून दोन हजार

1 Asoka, P. 33.
2. Asoka, P. 172.

वर्षीपूर्वी स्त्रियांची स्थिति अशा उच्च पदावर नेमण्याइतकी व त्यांच्यावर जबाबदारीचीं कामें सोंपविण्यासारखी चांगली असली पाहिजे हें उघड आहे.

या लेखांतल्या भाऊ, बहिणी व दुसरे नातेवाईक यांच्या विषयींच्या उल्लेखावरून अशोकानें आपल्या सगळ्या भावांना मारून मगधाची गादी बळकाविली होती ही दंतकथा आपोआपच खोटी ठरते.

## सहावा आदेश [ गिरनारचा ]

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—फार दिवसांपासून राज्य-कारभाराचीं कामें वेळेवर होत नाहींत, व हेराकडून बातम्याहि येत नाहींत. यासाठीं मीं अशी व्यवस्था केली आहे कीं केव्हांहि, मग मी त्या वेळीं खातपीत असलों, अंतःपुरांत असलों, शय्यागृहांत असलों, अश्वशाळेंत असलों, प्रवासांत[1] असलों, किंवा बागेंत असलों, तरी सर्व टिकाणीं हेरांनीं येऊन मला खबर सांगावी. मी प्रजेचें काम सर्व ठिकाणीं करीत राहीन. अमकें दान मीं दिलें आहे किंवा अमुक काम केलें जावें असें मीं स्वतः जरी तोंडानें सांगितलेलें असलें तरी, किंवा महामात्रांना एखादा जरुरी हुकूम दिला असला, आणि त्यावर त्यांच्यांत कांहीं वाद उपस्थित झाला, किंवा मंत्रिसभेनें तो अमान्य केला तर, तावडतोब मी कोठेंहि असलों तरी त्याबद्दल मला कळविण्यांत यावें अशी मीं आज्ञा देऊन ठेविली आहे. कारण, मीं कितीहि परिश्रम केले व राज्य-कारभाराचें काम केलें तरी माझा पूर्ण संतोष होत नाहीं. सर्व लोकांचें हित

१. येथें मुळांत ' विनितम्हि ' असा पाली शब्द आहे. त्याचें भाषांतर प्रो. विधुशेखर भट्टाचार्य हे ' प्रवासांत ' असा करतात. या अर्थाला रथविनीतसुत्तांत आधार आहे. पण प्रो. राधाकुमुद मुकर्जी हे ' स्वाध्याय किंवा चिंतन ' असा करतात. आधार काय ? तर स्वाध्याय हें राजाचें एक कर्तव्य आहे असें कौटल्याचें अर्थशास्त्र सांगतें !

करणें हें मी आपलें मोठें कर्तव्य समजतों; आणि सर्व लोकांचें हित, परिश्रम व राज्यकारभाराचें काम केल्यावांचून होऊं शकत नाहीं.[1] सर्व लोकांच्या हित-साधनाहून श्रेष्ठ दुसरें कार्य नाहीं. मी जो कांहीं प्रयास करतों तो यासाठीं कीं, प्राण्यांचें मी ऋण[2] लागतों तें माझ्या हातून फिटावें व येथें कांहीं लोकांना तरी सुखी करावें, आणि परलोकींहि त्यांना स्वर्गाची प्राप्ति करून द्यावी. हा धर्मलेख यासाठीं लिहविला गेला आहे कीं, तो चिरकाल टिकावा आणि माझी स्त्री, पुत्र, पौत्र व प्रपौत्र यांनीं सर्व लोकांच्या हितासाठीं प्रयास करावा. ( कारण ) हें काम फार मोठ्या प्रयासावांचून घडून येणें कठीण आहे. ''

या लेखाचा विषय राज्यकारभाराचीं कामें विलंब न लावतां झटपटीनें उरकतां यावीं यासाठीं केलेली नवी तजवीज हा आहे. या लेखावरून अशोकाच्या मनाला प्रजेच्या हिताची कशी तळमळ लागली होती आणि त्याच्यासाठीं स्वतःच्या सुखाचा केवढा त्याग करण्याची त्याची तयारी आपखुषीनें त्यानें दाखविली होती तें चांगलें व्यक्त होतें. इतका प्रजाहिततत्पर आणि स्वसुख-निरभिलाष राजा म्हणजे आदर्शभूतच म्हटला पाहिजे. हिंदुस्थानच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत असें उदाहरण दुसरें क्वचित्च आढळेल. कौटल्यानें अर्थशास्त्रांत आदर्श राजाचें जें वर्णन केलें आहे त्याबरहुकूम अशोकाचें वर्तन दिसतें.[3]

---

१. हीं वाक्यें कौटल्याच्या अर्थशास्त्रांतल्या ( १।१९ ) कित्येक वाक्यांचा जणू काय प्रतिध्वनीच आहेत !

२. इतर माणसांना देव–ऋण, पितृ–ऋण व ऋषि-ऋण अशीं तीनच ऋणें फेडावयाचीं असतात. पण राजाला चवथें एक प्रजेचें ऋण फेडावें लागतें असें अशोक समजत असे.

३. कौटल्याचें अर्थशास्त्र १।१९ पाहा.

या लेखांत 'हेर' असा जो शब्द मराठी भाषांतरांत वापरला आहे त्याबद्दल मुळांत 'पटिवेदका' सं. प्रतिवेदकाः असा शब्द आहे. यांच्या कामासंबंधानें मेगॅस्थनीसच्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, हे लोक राज्यांत सर्वत्र हिंडून गुप्त बातम्या मिळवून राजाला कळवीत. शहरांतून, सैन्यांतून, सर्वत्र हेर असत. बातम्यांचे कामीं वेश्यांचेंसुद्धां साह्य ते घेत. अत्यंत विश्वासूक माणसांचीच योजना हेरांच्या कामावर होत असे. [ McCrindle, P. 85]

वरील भाषांतरांत 'शय्यागृह' हा शब्द जेथें आहे, तेथें मुळांत 'गभागारंहि' असा पाली (सं. गर्भागारे) शब्द आहे. त्याचा अर्थ 'एकान्तांतली जागा' म्हणजे शय्यागृह असा होऊं शकेल किंवा ध्यानस्थ बसण्याची एकान्त जागा असाहि करतां येईल. शय्यागृह हा अर्थ मला अधिक योग्य दिसतो. कारण, अशोकासारखा धार्मिक वृत्तीचा राजा राज्यसंबंधाच्या क्षुद्र गोष्टींमुळें ध्यानभंग होऊं देण्याइतकें ऐहिक गोष्टीचें महत्त्व समजत असेल हें संभवनीय दिसत नाहीं. त्याच्याच पुढच्या 'वचसि' याचा अर्थ शौचकुपांत असा कित्येकांनीं केला आहे, तो मला बरा दिसत नाहीं. मीं अश्वशालेंत असा अर्थ घेतला आहे. श्री. जायस्वाल ह्या शब्दाचा अर्थ अश्वशाला असाच करतात (Ind. Ant. 1918, p. 53). पंडित विधुशेखर भट्टाचार्य 'रस्त्यावर म्हणजे प्रवासांत' असा करतात (Ind Antiq. 1920, P. 53). संस्कृतांत 'वर्चस्' म्हणजे 'पुरीष' असा अर्थ आहे. पण शौचकूप असा अर्थ कोणी कोशकार देत नाहींत. तसेंच पुढचा शब्द मुळांत 'विनीतम्हि' (सं. विनीते) असा आहे. याचें भाषांतर 'गाडींत' असें मीं केलें आहे. पण अर्थशास्त्रांत विनीत याचा अर्थ कवायत असा दिला आहे, आणि कांहीं लोक व्यायामशाळा असाहि त्याचा अर्थ करतात. सारांश, या लेखांतल्या शब्दांच्या अर्थासंबंधानें बराच घोटाळा आहे.

## सातवा आदेश (शहाबाजगढीचा)

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा याची इच्छा आहे कीं, सर्व [1]संप्रदायांच्या लोकांनीं एकत्र राहावें. कारण कीं, सर्व संप्रदायांतल्या लोकांना संयम व चित्तशुद्धि पाहिजे आहे. पण भिन्न भिन्न माणसांची इच्छा व आवड भिन्न भिन्न असते. ते धर्माचें पालन पूर्णांशानें किंवा अंशतः करतील. जो पुष्कळ दान करूं शकत नाहीं त्यालाहि संयम, चित्तशुद्धि, कृतज्ञता व दृढ भक्ति यांची अत्यंत आवश्यकता असतेच. "

प्रत्येक संप्रदायानें आपलें निवासस्थान अलग अलग राखण्यापेक्षां सर्वांनीं एकत्र राहण्यांत सर्वांचाच फायदा आहे; कारण, परस्परांच्या सहवासाचा फायदा असें करण्यापासून परस्परांना मिळतो. अशा बुद्धीनें अशोकानें दूरदृष्टीनें हा आदेश लिहविला असावा. शेवटच्या वाक्याचा उद्दिष्ट अर्थ हा दिसतो कीं, दान करणें हें प्रत्येकाचें धार्मिक कर्तव्य आहेच. पण निर्धन माणसाला तें करतां आलें नाहीं, तरी संयम, चित्तशुद्धि इ. गोष्टी ज्या त्याला शक्य आहेत त्या तरी त्यानें अवश्य कराव्या.

## आठवा आदेश ( शहाबाजगढीचा )

" फार दिवसांपूर्वी राजे लोक विहार[2] यात्रेसाठीं निघत असत. या यात्रेच्या वेळीं मृगया व दुसरे मौजेचे खेळ होत असत. देवांचा प्रिय प्रियदर्शी यानें राज्याभिषेकानंतर १० वर्षांनीं संबोधीचें अनुसरण केलें. अशा प्रकारें धर्मयात्रा सुरू झाल्या. या धर्मयात्रांत पुढील गोष्टी घडतात. श्रमण व ब्राह्मण यांचें

---

१. येथें मुळांत ' पासंड ' ( सं. पाषंड ) असा शब्द आहे. कौटल्याच्या वेळीं पाषंड शब्दाचा अर्थ प्रचलित मताला विरुद्ध जाणारा असा होता. पण तसा अर्थ येथें उद्दिष्ट दिसत नाहीं. संप्रदाय हाच अर्थ येथें सयुक्तिक दिसतो.

२ सहल--यांत शिकार, श्वापदांच्या लढाया वगैरेंचांहि समावेश होतो.

दर्शनं व त्यांना दान, वृद्धांचें दर्शन व त्यांना सुवर्णदान, गांवांतल्या रहिवाश्यांजवळ जाऊन त्यांना उपदेश करणें, व धर्मविषयक चर्चा करणें. त्या वेळेपासून देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा याची आवड निराळ्याच गोष्टीवर बसली आहे. ”

या लेखांत धर्मयात्रेचे उद्देश सांगितले आहेत; ‘ देवानां पिय ’ ही संज्ञा येथें अशोकानें आपल्या पूर्वी होऊन गेलेले राजे या व्यापक अर्थानें योजिली आहे.

‘ संबोधि ’ म्हणजे ज्ञानप्राप्तीचा मार्ग. याच मार्गानें जातां जातां पुढें मनुष्य अर्हत्‌पदाला पोंचतो. हा मार्ग म्हणजे बुद्धाचा अष्टांग मार्ग होय. प्रो. भांडारकर ‘ संबोधि ’ शब्दानें बुद्धगया हें तीर्थस्थान विवक्षित आहे असें समजतात. म्हणजे त्यांच्या मतें तीर्थयात्रेचा प्रारंभ गयेपासून झाला होता. [ Ind. Antiq. 1913, P. 159 ].

## नववा आदेश ( कालसीचा )

“ देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा सांगतो कीं विपत्तिकाळीं, पुत्राच्या विवाहसमयीं, कन्येच्या विवाहसमयीं, मूल होते वेळीं, दूरदेशगमनप्रसंगीं व अशाच दुसऱ्या प्रसंगीं स्त्रिया अनेक प्रकारचीं मंगलकृत्यें करीत असतात. मंगलकृत्यें अवश्य केलीं पाहिजेत. पण अशा प्रकारचीं कृत्यें अल्पफलदायी असतात. धर्माचीं मंगलकृत्यें महत्फलें देणारीं आहेत. यांत दास व सेवक यांच्याशीं उचित व्यवहार, गुरुजनांविषयीं आदर, प्राण्यांची अहिंसा व श्रमण आणि ब्राह्मण यांना दान, हीं सर्व करावीं लागतात. या गोष्टी व त्याचप्रमाणें अशा प्रकारचीं धर्मकृत्यें यांनाच मंगलकृत्यें म्हणतात. म्हणून पिता, पुत्र, भाऊ, यजमान, मित्र, सोबती, फार काय पण शेजारीपाजारीहि, यांना असें सांगावयास पाहिजे कीं, हीं मंगलकृत्यें चांगलीं आहेत. जोंपर्यंत अभीष्ट कार्य सिद्ध होत नाहीं तोंपर्यंत हीं करावयास पाहिजेत. हें कसें ? [ म्हणजे मंगलकृत्यें केल्यानें अभीष्टसिद्धि कशी होते ? तर ] या जगांत मंगलकृत्यें म्हणून जीं आहेत तीं संदिग्ध आहेत; म्हणजे

त्यांच्यामुळें अभीष्ट सिद्ध होईल वा न होईल. पण धर्माचीं मंगलकृत्यें जीं आहेत तीं कालावच्छिन्न नाहींत ( म्हणजे त्यांच्यापासून नेहमीं कार्यसिद्धि व्हावयाचीच). जरी या लोकीं कार्यसिद्धि न झाली तरी परलोकीं त्यापासून अनंत पुण्य लाभतें. या लोकीं इष्टकार्य सिद्ध झालें तर दोन्ही लाभ घडले म्हणावयाचे. अर्थात् येथेंहि कार्य सिद्ध झालें आणि परलोकींहि पुण्याचा लाभ घडला. "

या आदेशाचा अर्थ स्पष्ट आहे. विशेष विवेचनाची जरुरी नाहीं.

## दहावा आदेश ( कालसीचा )

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा यश किंवा कीर्ति यांना मोठीशी किंमत देत नाहीं. यश किंवा कीर्ति याची तो इच्छा करतो ती येवढ्याचसाठीं कीं वर्तमान-काळांत व पुढें प्रजेनें धर्माची सेवा करावी व धर्माच्या व्रताचें पालन करावें. केवळ यासाठीं देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा यश व कीर्ति यांची इच्छा करतो तो जी कांहीं खटपट करतो ती सगळीं परलोकासाठीं. ( हेतु हा कीं ) सर्व लोक विपत्तींतून मुक्त व्हावे. पाप हीच एक विपत्ति आहे. सर्वांचा परित्याग केल्यावांचून मोठे परिश्रम न करतां लहान असो कीं मोठा असो, कोणालाहि पुण्य जोडतां येत नाहीं. हें ( पुण्य जोडणें ) मोठ्या लोकांनासुद्धां दुष्कर आहे. "

खरें यश किंवा कीर्ति म्हणजे काय याविषयीं अशोकानें आपले विचार या आदेशांत प्रकट केले आहेत.

## अकरावा आदेश ( शाहाबाजगढीचा )

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—धर्माच्या दानासारखें दुसरें कोणतेंहि दान नाहीं; धर्माच्या मैत्रीसारखी दुसरी मैत्री नाहीं; धर्माच्य उदारतेसारखी दुसरी उदारता नाहीं; धर्माच्या संबंधासारखा दुसरा संबंध नाहीं. धर्म म्हणजे हा कीं, दास व सेवक यांच्याशीं उचित वागणूक ठेवावी;

मातापितरांची सेवा करावी; मित्र, परिचयाचे, नातेवाईक, श्रमण व ब्राह्मण यांना दानें द्यावीं व प्राण्यांची हिंसा करूं नये. यासाठीं पिता, पुत्र, भाऊ, यजमान, मित्र, परिचित—फार काय, पण शेजारीपाजारीहि—यांना असें सांगावें कीं, हें पुण्यकृत्य आहे. हें केलें पाहिजे. जो असें आचरण करतो तो या लोकीं सिद्धि मिळवितो आणि परलोकांतहि पुण्याचा वांटेकरी होतो. ''

या लेखांत खरें धर्मदान[1] कोणतें तें व त्याचें फळ यांचें थोडक्यांत विवेचन केलें आहे; पहिल्या वाक्यांतल्या अर्थाचेंच एक वाक्य धम्मपदांत आहे. तें असें 'सब्बदानं धम्मदानं जिनाति.'

## बारावा आदेश (गिरनारचा)

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा नानाप्रकारचीं दानें व पूजा यांनीं सर्व संप्रदायांतले गृहस्थ व संन्यासी यांचा आदरसत्कार करीत असतो. पण सर्व संप्रदायांच्या तत्त्वांची वृद्धि व्हावी या गोष्टीची त्याला जितकी किंमत वाटते, तितकी दान किंवा पूजा यांची वाटत नाहीं. संप्रदायांच्या तत्त्वांची वृद्धि अनेक प्रकारांनीं होते, पण तिच्या मुळाशीं वाक्संयम हा आहे. अर्थात् माणसानें केवळ स्वतःच्याच संप्रदायाचा आदर व दुसऱ्याच्या संप्रदायाची निष्कारण निंदा करूं नये. केवळ विशेष कारणासाठींच निंदा केली पाहिजे. कारण सर्व संप्रदायांचा आदर करणें माणसांचें कर्तव्य आहे. असें केल्यानें स्वतःच्या संप्रदायाची उन्नति व दुसऱ्या संप्रदायाचें हित होतें. याच्या उलट जो वागतो तो स्वतःच्या संप्रदायाचीहि हानि करतो आणि दुसऱ्यांच्या संप्रदायालाहि अपकार

---

१. असेच विचार सिंहलद्वीपचा राजा निःशंकमल्ल (इ. स. ११८७-११९६) याचेहि होते असें त्याच्या एका लेखावरून दिसतें. क्रॉम्वेल याच्या ता. ११।१।१६३५ च्या एका पत्राशींहि विचाराच्या बाबतींत असेंच साद्दश्य दिसून येतें असें व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो ( Page 142 ). या संबंधानें पुढें लिहिण्यांत येणारच आहे.

करतो. कारण कीं, आपल्या संप्रदायाची प्रतिष्ठा वाढावी 'अशा विचारानें स्वतःच्या संप्रदायाविषयींच्या प्रेमाच्या भरांत येऊन आपल्या संप्रदायाची प्रशंसा व इतर संप्रदायांची निंदा करतो तो वस्तुतः स्वतःच्याच संप्रदायाची पूर्ण हानि करतो.

[ दुसऱ्यांशीं ] मिलाफानें राहणें ही फार चांगली गोष्ट आहे. अर्थात् माणसांनीं दुसऱ्याच्या धर्माची माहिती लक्ष देऊन ऐकावी. कारण देवांचा प्रिय राजा याची अशी इच्छा आहे कीं, सगळ्या संप्रदायांतल्या लोकांनीं विद्वान् आणि कल्याणाचीं कार्यें करणारे व्हावें. यासाठीं जेथें जेथें जे जे म्हणून संप्रदाय असतील त्यांना सांगितलें पाहिजे कीं, संप्रदायाच्या तत्त्वांची वृद्धि व्हावी ही गोष्ट जितकी महत्त्वाची समजली जाते, तितकी देवांना दान व पूजा अर्पण करणें ही गोष्ट महत्त्वाची समजली जात नाहीं. या कामासाठीं धर्ममहामात्र, स्त्रीधर्ममहामात्र, व्रजभूमिक व आणखी कांहीं अधिकारी नेमण्यांत आले आहेत. याचा परिणाम हा झाला आहे कीं, आपला संप्रदाय वाढत आहे व धर्मांचा विकास होत आहे. ''

या आदेशाचा विषय निरनिराळ्या संप्रदायांच्या लोकांनीं परस्परांशीं कसें मित्रत्वानें राहावें तें सांगणें हा आहे. परमतसहिष्णुता हा अमोलिक गुण आपल्याप्रमाणें आपल्या प्रजेच्याहि ठायीं बाणावा अशा सदिच्छेनें प्रेरित होऊन हा लेख अशोकानें लिहविला आहे यांत शंका नाहीं.

पांचव्या आदेशांत उल्लेखिलेल्या धर्ममहामात्र व स्त्री-धर्ममहामात्र या अधिकाऱ्यांचा या आदेशांत पुनः उल्लेख करण्यांत आला असून शिवाय व्रजभूमिक या एका नव्या अधिकाऱ्याचा प्रथमच नामनिर्देश येथें करण्यांत आला आहे. 'व्रजभूमिक' या शब्दाच्या अर्थासंबंधानें आजपर्यंत कोणालाच निश्चितपणें कांहीं सांगतां आलें नाहीं. श्रीयुत जायस्वाल हे त्याचा अर्थ राज्याच्या सीमेवरचा एक अधिकारी असा करतात (Ind. Intiq. 1914, P.54–55). पण परमतसहिष्णुतेच्या प्रश्नाशीं त्याचा काय संबंध येतो तें या अर्थावरून

स्पष्ट होत नाहीं. व्हिन्सेंट स्मिथच्या मतें व्रजभूमि म्हणजे गुरचराईची जागा. तिच्यावर देखरेख करणारा हा कामदार असावा. पण याहि अर्थावर वरील आक्षेप घेता येतो. व्रजभूमि म्हणजे श्रीकृष्णाच्या लीलेचें स्थान ( गोकुळ ) हा अर्थ तर येथें अगदींच गैरलागू आहे.

निरनिराळ्या संप्रदायांच्या लोकांनीं परस्परांच्या संप्रदायांचीं तत्त्वें समजून घ्यावीं, परस्परांना आदरानें वागवावें ही गोष्ट अशोकाला इतकी महत्त्वाची वाटली कीं, लोकांच्या मनांत ही शिकवण बिंबविण्यासाठीं त्यानें मुद्दाम हा आदेश जाहीर केला. यावरून प्रो. भांडारकर असें अनुमान काढतात कीं, अशोकाच्या काळीं निरनिराळ्या धर्मपंथांत व संप्रदायांत तीव्र कलह माजले असले पाहिजेत आणि हे धर्मविषयक कलह स्वैपाकघरांत बायकांपर्यंतहि पोंचले असावेत ! (Asoka, P. 112). या अनुमानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं कांहीं ऐतिहासिक प्रमाण द्यावयास पाहिजे होतें, पण तें त्यांनीं दिलें नाहीं. असे कलह भविष्यकाळीं उद्भवूं नयेत म्हणून अशोकानें दूरदृष्टीनें ही योजना केली असावी असें कां म्हणूं नये ?

प्रो. भांडारकर यांच्या अगदीं उलट व्हिन्सेंट स्मिथ यांचें मत आहे. ते म्हणतात कीं, धार्मिक सहिष्णुता हा गुण हिंदु लोकांच्या अंगीं फार प्राचीन काळापासून दिसून येतो. अशोकानंतरच्या काळांत झालेल्या हर्षादि राजांचें वर्तन अशोकानें या आदेशांत घालून दिलेल्या तत्त्वाबरहुकूम होतें (Asoka, P.62). हल्लींच्या काळींसुद्धां डॉ० मिसेस् बिझांट, प. वा. मिस् नोबल ( सिस्टर निवेदिता) प्रभृति पाश्चात्त्य लेखक व लेखिका हिंदूंच्या सहिष्णुतेची प्रशंसाच करीत असतात (The Web of Indian Life, P. 224. 281). असें असतां प्रो. भांडारकर यांनाच निराळें कां वाटावें तें कळत नाहीं.

संप्रदायांच्या तत्त्वांची वृद्धि कशानें होते ? राजाश्रयानें किंवा लोकांकडून मिळणाऱ्या मानसन्मानानें ती होत नाहीं, किंवा शिष्यसंख्या वाढल्यानेंहि ती होत नाहीं; तर संप्रदायांच्या मूलभूत तत्त्वांच्या शुद्धतेनें होते, व हीं मूलभूत शुद्ध तत्त्वें सर्व संप्रदायांतून एकच असतात ही गोष्ट न कळल्यामुळें संप्रदाया-

संप्रदायांतून निष्कारण वाद माजतात. ते न माजण्याला उपाय म्हणजे सहिष्णुता हा होय. ही बहुमोल गोष्ट या लेखांत अशोकानें सांगितली आहे.

## तेरावा आदेश ( शहाबाजगडीचा )

" राज्याभिषेकानंतरच्या आठ वर्षांनीं देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा यानें कलिंग देश जिंकला. तेथें दीड लक्ष लोक कैद केले गेले, एक लाख माणसें मारलीं गेलीं व त्याच्या कित्येकपट माणसें ( रोगानें ) मेलीं. यानंतर कलिंग-विजय झाल्यावर देवांच्या प्रिया ( राजा ) कडून धर्मपालन, धर्मकार्य व धर्मानुशासन चांगल्या प्रकारें झालें आहे. कलिंगविजयानंतर देवांच्या प्रियाला पश्चात्ताप झाला. कारण, जो देश पूर्वी जिंकला गेला नव्हता, तो जिंकतांना हत्या ही व्हावयाचीच व किती माणसें कैद केलीं जातात त्याची गणती करतां येत नाहीं. देवांच्या प्रियाला त्यापासून फार दुःख व खेद वाटला. त्याला आणखी दुःख यामुळें झालें कीं, त्या ठिकाणीं असे ब्राह्मण, श्रमण व इतर कांहीं संप्रदायांचे लोक राहात आहेत कीं, त्यांच्यांत ब्राह्मणांची सेवा, मातापितरांची सेवा, गुरूंची सेवा, मित्र, परिचित, जाति, दास व सेवक यांच्याशीं उत्तम आचरण ठेवण्यांत येत असतें. जे दृढशक्तीनें युक्त आहेत, अशा लोकांचा नाश व वध किंवा प्रियजनांचा वियोग तेथें करण्यांत आला आहे; किंवा जे स्वतः सुरक्षित आहेत; पण त्यांचे मित्र, परिचित, साह्यकर्ते व संबंधित विपत्तींत पडल्याकारणानें त्यांनाहि फार पीडा होत आहे. अशी सर्व प्रकारची विपत्ति तेथें प्रायः हरएक माणसाच्या वांट्याला आली आहे. यामुळें देवांच्या प्रियाला विशेष दुःख वाटत आहे. कारण असा कोणताहि देश नाहीं कीं, जेथें असंख्य संप्रदायांत ब्राह्मण व श्रमण नाहींत. आणखी असा कोणताहि देश नाहीं, कीं जेथें मनुष्य कोणत्या ना कोणत्या तरी संप्रदायाला मानीत नाहीं. कलिंग देशांत विजयाचे वेळीं जितकीं माणसें मारलीं गेलीं, मेलीं किंवा कैद झालीं, त्याच्या शतांश किंवा सहस्रांश हानिसुद्धां आतां देवांच्या

प्रियाच्या मोठ्या दुःखाला कारण होईल. याशिवाय, या वेळीं देवांच्या प्रिय प्रियदर्शी राजाला जर कोणी अपकार करील तर तो क्षमेला पात्र असल्यास राजा त्याला क्षमा करील. देवांच्या प्रिय प्रियदर्शीच्या राज्यांत जितके वनवासी लोक आहेत त्यांच्यावर तो सदैव दया-दृष्टि ठेवीत आहे व त्यांना धर्माकडें ओढून आणण्याचा यत्न करीत आहे. कारण कीं, ( जर तो असें करणार नाहीं तर ) त्याला पश्चात्ताप होईल. देवांच्या प्रियाचा असा प्रभाव आहे व त्या लोकांना तो असें सांगतो कीं, वाईट मार्गापासून दूर राहा म्हणजे शिक्षेपासून बचावाल. देवांचा प्रिय अशी इच्छा करतो कीं, सर्व प्राणी निरापद, संयमी, शांत व प्रसन्न राहावे. देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा धर्मविजयालाच मुख्य विजय मानीत आहे. हा धर्मविजय त्यानें येथें ( स्वतःचे राज्यांत ) व त्याचप्रमाणें अशा शेंकडों योजनें दूरच्या शेजारच्या राज्यांत मिळविला आहे कीं, जेथें अंतियोक नांवाचा यवन राजा राज्य करीत आहे व त्या अंतियोकच्या मागून तुरमय, आंतकिनी, मक व अलिकसुंदर नांवाचे चार राजे राज्य करीत आहेत व त्यानें आपल्या राज्याच्या खालीं ( दक्षिणेंत ) चोल, पांड्य व ताम्रपर्णी येथेंहि धर्मविजय मिळविला आहे. त्याचप्रकारें हिंद राजांच्या राज्यांत व विषवज्रि लोकांत आणि यवन, कांबोज, नाभक, नाभपंक्ति, भोज, पितिनिक, आंध्र व पुलिंद यांच्यांत सर्व ठिकाणीं जे झे म्हणून देवांच्या प्रियाच्या आदेशाप्रमाणें वागतात व करतात आणि जेथें देवांच्या प्रियाचे दूत जाऊन पोहोंचूं शकत नाहींत, तेथेंहि देवांच्या प्रियाचें धर्माचरण, धर्मविधान आणि धर्मानुशासन ऐकून लोक धर्माचरण करीत आहेत व पुढेंहि करतील. अशा प्रकारें जो सर्वत्र विजय होत आहे, हाच विजय खरोखर आनंद देणारा आहे. धर्मविजयापासून जो आनंद मिळतो तो फार गाढ असतो. पण तो आनंद म्हणजे क्षुद्र गोष्ट आहे. देवांचा प्रिय पारलौकिक कल्याणालाच मोठें मानतो. म्हणून हा लेख लिहिला गेला. अशासाठीं कीं, माझे पुत्र व पौत्र पुढें होतील त्यांनीं नवीन देश जिंकणें हें आपलें कर्तव्य

समजूं नये. जर नवीन देश जिंकण्याकडे त्यांची प्रवृत्ति झालीच, तर शांतीनें व नम्रतेनें त्यांनीं आपलें काम साधावें व धर्मविजयालाच[1] त्यांनी खरा विजय मानावा. त्यानें इहलोकीं व परलोकीं दोन्ही ठिकाणीं सुखाचा लाभ होतो. उद्योग हाच त्यांच्या आनंदाला कारण व्हावा. कारण कीं त्यांनीं इहलोक व परलोक दोन्ही साधतात. ”

निरनिराळ्या धर्मांच्या व संप्रदायाच्या मध्यें ऐक्य व बंधुभाव स्थापन करण्याच्या दृष्टीनें हा लेख अत्यंत महत्त्वाचा आहे यांत शंका नाहीं. दोन हजार वर्षांपूर्वीचा हा लेख आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. महाराष्ट्रांतल्या संत-कवींच्या वचनांतून गोंविलेल्या विचारांशीं या विचारांचें पूर्ण सादृश्य दिसतें. धर्मांतला मुख्य आणि आवश्यक भाग कोणता ? धर्मतत्त्व कीं धर्मविधि ? या प्रश्नाचें उत्तर अशोकानें या लेखांत दिलें आहे. निरनिराळ्या धर्मांच्या तत्त्वांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास त्यांच्यामध्यें विरोध क्वचित् आढळतो, आणि सादृश्यच विशेषतः आढळतें. ज्या मुद्द्यासंबंधानें सर्वांचें मतैक्य आहे, तेवढ्यांकडेच लोकांनीं लक्ष द्यावें आणि बाकीच्या क्षुद्र गोष्टींकडे दुर्लक्ष करावें, म्हणजे सगळ्या संप्रदायांविषयीं एक प्रकारची ममत्वाची भावना माणसाच्या ठायीं उत्पन्न होते. ती उत्पन्न झाली कीं, सहकार्याचा मार्ग सुगम होतो, आणि त्या मार्गानें सगळे धर्मसाधक जाऊं लागले असतां लोककल्याणाचें साधन हें जें सर्वांचें एक ध्येय असतें, तें साधण्यास सर्वांच्याकडून साह्य मिळतें हाच खरा धर्मविजय, व त्याचें महत्त्व कोणत्याहि ऐहिक विजयाहून अधिक आहे, हें

---

१. धर्मविजय हा शब्द अशोकानें नवीन घडविलेला नाहीं. कौटल्याच्या अर्थशास्त्रांत ( १२।१ ) तो आलेला आहे. तेथें १ धर्मविजयी, २ लोभविजयी आणि ३ असुरविजयी असे त्यांचे तीन वर्ग सांगितले आहेत. महाभारतांत शांतिपर्वांत नेमकें हेंच वर्गीकरण केलेलें आढळतें.

अशोकानें अत्यंत कळकळीच्या शब्दांनीं ह्या लेखांत सुगम करून सांगितलें आहे. या उपायाचें अवलंबन केल्यानें माणसाला बहुश्रुतपणा तर प्राप्त होतोच, पण त्याबरोबर आत्मनिरीक्षणाचीहि संवय लागून त्याला आत्मोन्नतिहि करून घेता येते. सारांश, धर्माच्या बाबतींत माणसानें मधुमक्षिकेचें व्रत आचरावें असें अशोकाचें सांगणें आहे. हा अशोकाचा उपदेश खरोखर त्याच्या मनाच्या औदार्याचा, थोर बुद्धीचा आणि अंतःकरणाच्या सात्त्विक माधुर्याचा जसा निदर्शक आहे, तसाच तो खऱ्या कळकळीच्या व दृढ निश्चयाच्या माणसाचे व्यवहारांत आणण्यासहि सोपा आहे असें विचारांतीं कोणालाहि दिसून येईल. अशोकाच्या ठायीं केवढें अप्रतिम धर्मौदार्य होतें त्याची बरीचशी कल्पना या लेखावरून करतां येते.

या आदेशांत कांहीं राजांचीं नांवें आलीं आहेत. अंतियोक हा सीरिया देशचा राजा होता. याचा उल्लेख मागें दुसऱ्या आदेशांत आला आहे. तुरमय हा ईजिप्तचा राजा टॉलोमी फिलाडेल्फस होय. याचा राज्यकाल ख्रि. पू. २८५ ते २४७ हा होता. किनि किंवा अन्तिकिनी हें मॅसिडोनियाचा राजा (राज्यकाल ख्रि. पू. २७८ ते २३९) आंटिगोनस गोनाटास या नांवाचें अपभ्रष्ट संक्षिप्त रूप आहे. मक म्हणजे सायरीनचा राजा मागस (टॉलेमी फिलाडेल्फसचा सावत्र भाऊ). याचा राज्यकाल ख्रि. पू. ३०० ते २५०. अलिकसुंदर हें अलेक्झांडर या नांवाचें अपभ्रष्ट रूप आहे. हा अलेक्झांडर हुल्श साहेबाच्या मतें कॉरिंथ येथील राजा होता. राज्यकाल ख्रि. पू. २५२ ते २४४ (T. R. A. S. 1914, Page 950). ताम्रपर्णी म्हणजे सिंहलद्वीप. पण येथें तो शब्द तिनेवेल्ली जिल्ह्याभोंवतालचा प्रांत अशा अर्थानें वापरला आहे असें व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो. हिंदराज म्हणजे कोण त्याचा पत्ता अजून लागला नाहीं. विषवज्रि या शब्दाचीहि स्थिति तीच. बूलरचें असें मत आहे कीं, विष म्हणजे वैश्य राजपूत व वज्रि म्हणजे मागें सांगितलेले वृज्जि लोक होत. बुद्धाच्या वेळेस या वृज्जि किंवा व्रज्जी लोकांचें एक लहानसें प्रजासत्ताक राज्य होतें. यवन व कांबोज

यांच्या संबंधानें मागें सांगितलेंच आहे. नाभक[1] व नाभपंक्ति हे कोण तें अद्याप अनिर्णीत आहे. प्रो. भांडारकर म्हणतात कीं, हल्लींच्या सरहद्दीवरील प्रांत आणि पश्चिम किनारा यांच्या दरम्यान कोठें तरी या लोकांची वस्ती असावी. भोज हे वऱ्हाड प्रांतचे लोक असावे. पितिनिक म्हणजे पैठणाकडचे लोक. यांचा उल्लेख मागें आला आहे. आंध्र देश म्हणजे गोदावरी व कृष्णा यांच्यामधील देश. अजूनहि त्या प्रदेशाला लोकांत हेंच नांव आहे. सरकारी दप्तरांत मात्र याचें गोदावरी डिस्ट्रिक्ट असें नांव सध्यां आढळतें. पुलिंद म्हणजे मध्यभारतांतल्या विंध्याद्रि पर्वतांत राहणारे भिल्ल वगैरे डोंगरी लोक.

## चौदावा आदेश

"हा धर्मलेख देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा यानें लिहविला आहे. (याचा) कांहीं भाग संक्षेपरूपांत, कांहीं मध्यम स्वरूपांत व कांहीं विस्तृत स्वरूपांत आहे. कारण, सर्व जागीं सगळ्या गोष्टी दिलेल्या नाहींत. माझें राज्य फार विस्तृत आहे, पुष्कळ लिहिलें आहे व पुष्कळसें लिहिण्यांत येईल. कांहीं कांहीं गोष्टींच्या माधुर्यामुळें अशी पुनरुक्ति करावी लागते, कीं, लोकांनीं त्यासारखें आचरण ठेवावें. या लेखांत कांहीं अपूर्णता राहिली असली तर तिचें कारण स्थानाचा अभाव, लेखाचा संक्षेप किंवा लेखकाचा प्रमाद हें होय."

हा शेवटचा आदेश उपसंहाराच्या स्वरूपाचा आहे. यांत नवीन कांहीं सांगितलेलें नाहीं. पण मागच्या तेरा लेखांतून वरचेवर झालेल्या पुनरुक्ती-बद्दल व कांहीं जागीं संक्षेप तर कांहीं जागीं विस्तार केल्यामुळें लेखाचें सर्वत्र सारखें स्वरूप नाहीं या दोषाबद्दल कारणें देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे.

☆ ☆ ☆

---

१. बूलरनें वैवर्तपुराणांतला एक उतारा दिला आहे. त्यांत नाभिकपूर नामक शहराचा उल्लेख आहे. हें शहर उत्तर-कुरु देशांत होतें. अर्थात् हिमालयाच्या वायव्य भागांत राहणारे नाभक लोक असावे.

# प्रकरण नववें

# कलिंगलेख, स्तंभलेख व स्फुटलेख

सातव्या प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं, नुकत्याच जिंकून घेतलेल्या कलिंग राज्यांतल्या प्रजेशीं कसें वागावें यासंबंधानें अशोक राजानें आपल्या अधिकाऱ्यांना विशेष सूचना दोन लेखांच्या द्वारें केल्या होत्या. ते दोन लेख कलिंगलेख या नांवानें प्रसिद्ध आहेत. ते लेख असे—

## पहिला कलिंगलेख

" देवांच्या प्रियाच्या आज्ञेनें तोसली नगरांत असलेल्या महामात्रांस सांगावें कीं—माझ्या मताप्रमाणें काम व्हावें आणि अनेक उपायांनीं कार्याला आरंभ करण्यांत यावा अशी माझी इच्छा आहे. माझ्या मतें हें कार्य सिद्ध करण्याचा मुख्य उपाय म्हणजे तुम्हां लोकांना माझ्याकडून शिक्षण देण्यांत यावें हा आहे. आम्हीं चांगल्या चांगल्या लोकांच्या स्नेहास पात्र व्हावें यासाठीं तुम्हांला हजारों लोकांमध्यें ( मिसळण्याकरितां ) नेमण्यांत आलें आहे. सगळीं माणसें माझी प्रजा आहे आणि माझ्या पुत्रांना सर्व तऱ्हेचें कल्याण व सुख प्राप्त व्हावें ही जशी माझी इच्छा आहे त्याचप्रमाणें सर्व माणसांनीं ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा व सुखाचा लाभ करून घ्यावा असें मी चाहतों. पण तुम्हां लोकांना हें तत्त्व पूर्णपणें समजलेलें नाहीं. क्वचित् एखाद्या व्यक्तीला तें कळत असेल. पण तेंदेखील अंशतःच; पूर्णपणें नाहीं. तुम्हीं लोकांनीं इकडे लक्ष द्यावें. कारण कीं, ही नीति चांगली आहे. असेंहि होऊं शकतें कीं, एखाद्या माणसाला कैदेंत टाकण्यांत येतें किंवा त्याला क्लेश होतात, आणि जेव्हां एखाद्याला विनाकारण कैद भोगावी लागते, तेव्हां ( त्याच्याबरोबर ) दुसऱ्याहि पुष्कळ लोकांना फार दुःख होतें. अशा स्थितींत तुम्हीं लोकांनीं ( अत्यंत निष्ठुरता व अत्यंत दयार्द्रता या दोन्ही गोष्टी सोडून ) मधला मार्ग ( न्यायाचा मार्ग ) स्वीकार-

ण्याचा यत्न केला पाहिजे. पण खालीं दिल्याप्रमाणें अशा पुष्कळ दोषप्रवृत्ति असतात कीं, त्यामुळें (यत्न) सफळ होत नाहींत. जसें—ईर्षा, श्रमाचा अभाव, निष्ठुरता, उतावळेपणा, अकर्मण्यता, आळस व सुस्ती. तुम्हीं लोकांनीं असे दोष आपणांस जडूं नयेत म्हणून जपलें पाहिजे. याप्रमाणें वागण्याला श्रम व धीरता या गोष्टी मुळांत लागतात. असे राहा व उद्योग करा. (प्रत्येक माण-सानें असें) चालावें व पुढें होऊन प्रयत्न करावा. अशा रीतीनें जें आपलें कर्तव्य म्हणून तुम्ही समजतां त्याच्या अनुसारें तुम्हीं असें सांगावयाला पाहिजे कीं, देवांच्या प्रियांची ही आज्ञा आहे. या आज्ञेप्रमाणें केल्यानें मोठें फळ मिळतें; आणि न केल्यास फार विपत्ति प्राप्त होते. जे या कामांत चुकतात त्यांना स्वर्गप्राप्तिहि होत नाहीं आणि राजालाहि प्रसन्न राखतां येत नाहीं. या बाबतींत खऱ्या उत्साहानें काम केल्यानें दोन फळें मिळतात. म्हणजे तुम्ही माझी आज्ञा पूर्णपणें पाळल्यास तुम्हांला स्वर्ग मिळेल आणि माझें जें ऋण तुम्ही लागतां तेंहि फेडाल. हा लेख प्रत्येक पुष्य नक्षत्राचे दिवशीं तुम्हीं ऐकावा आणि मधून मधून सवडीप्रमाणें एकट्यानेंहि हा पुष्यनक्षत्राचे दिवशीं ऐकावा. अशा रीतीनें करून तुम्हीं माझी इच्छा पूर्ण करण्याचा यत्न करावा. हा लेख अशासाठीं लिहविला आहे कीं, नगर–व्यावहारिक यांनीं नेहमीं अशी खबरदारी घ्यावी कीं, नागरिकांना निष्कारण बंधन किंवा दंड होऊं नये. यासाठीं मी पांच पांच वर्षांनीं जे सौम्य, क्रोधरहित व दयाळू असतील व जे हें कार्य लक्षांत घेऊन माझ्या आज्ञेप्रमाणें वागतील अशा अधिकाऱ्यांना बाहेर (दौऱ्यावर) पाठवीन. उज्जयिनींतहि कुमार या कार्यासाठीं अशाप्रकारें अधिकाऱ्यांना तीन तीन वर्षांच्या आंत (दौऱ्यावर) पाठवितील. पण ही दरम्यानची मुदत तीन वर्षांच्या पलीकडे जाऊं देणार नाहींत. तक्षशिलेसंबंधानेंहि हीच आज्ञा आहे. जेव्हां वर सांगितलेले महामात्र दौऱ्यावर निघतील तेव्हां आपलें नेहमींचें काम करतां करतां याहि गोष्टीकडे लक्ष देतील व राजाच्या हुकुमाप्रमाणें काम करतील."

हा पहिला कलिंगलेख तोसली[१] व समापा[२] या दोन्ही ठिकाणच्या अधि-कार्‍यांस उद्देशून लिहिलेला आहे, आणि नागरिकांना न्यायानें वागवावें, त्यांच्यावर जोरजुलूम करूं नये, याविषयीं बजाविलें आहे.

वर दर पांच पांच वर्षांनीं किंवा तीन तीन वर्षांनीं अधिकार्‍यांना बाहेर काढण्याविषयीं जो सक्त नियम सांगितला आहे त्याचा अर्थ काय बाहेर काढा-वयाचें म्हणजे दौर्‍यावर पाठवावयाचें कीं त्यांच्या बदल्या करावयाच्या तें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. पण शेवटच्या तीन चार ओळींवर ' दौरा ' हाच अर्थ विवक्षित दिसतो. व्हिन्सेंट स्मिथ ' बदल्या ' असा अर्थ करतो.

या लेखाला कित्येकांनीं ' प्रांतिक अधिकार्‍यांसाठीं लेख ' अशी संज्ञा दिली आहे.

## दुसरा कलिंगलेख

या दुसर्‍या लेखांत सरहद्दीवरील लोकांशीं अधिकार्‍यांनीं कशा प्रकारें वर्तन ठेवावें हें सांगितलेलें असल्यामुळें याला ' सीमान्त लेख ' अशी संज्ञा आहे. वर दिलेला पहिला कलिंग व हा दुसरा लेख हे दोन्ही ओरिसा प्रांतांत धौली येथें व मद्रास इलाख्यांत गंजम जिल्ह्यांत जौगड येथें उपलब्ध झाले. पण या दोन्ही ठिकाणीं चौदा गिरि-लेखांपैकीं ११।१२।१३ हे तीन लेख नाहींत. त्यांच्याऐवजीं हे दोन कलिंगलेख आहेत, ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. या दोन लेखांत नवीन जिंकलेल्या प्रांतांत जित जेत्यानें लोकांचीं मनें स्वतःकडे आकर्षिलीं जातील व लोकांचीं क्षुब्ध मनें शांत होतील अशाप्रकारची उच्च

---

१. हा व पुढील असे दोन शिलालेख धौली व जौगड या ठिकाणीं सांपडले. पैकीं धौलीजवळ तोसली हें शहर होतें असें पंडितांचें अनुमान आहे.

२. समापा हें नगर जौगडच्या आसपास कोठें तरी असावें. हीं दोन्हीं स्थळें कलिंग राज्याचीं केंद्रस्थानें होतीं.

प्रतीची राजनीति अधिकाऱ्यांना शिकविली आहे. प्रजेला स्वतःच्या पुत्राप्रमाणें मानून राजानें तिच्या ऐहिक व पारलौकिक कल्याणाची चिंता वहावी यापेक्षां प्रजावत्सलतेचा श्रेष्ठ आदर्श दुसरा कोणता असणार ?

" देवांचा प्रिय असें सांगतो कीं—समापा व तोसली येथें कुमार व महामात्र यांना राजाकडून सांगण्यांत येतें कीं—माझ्या मताप्रमाणें माझी इच्छा आहे आणि माझ्या इच्छेप्रमाणें कार्य व्हावें व अनेक उपायांनीं कार्याला आरंभ केला जावा. माझ्या मतें हें कार्य सिद्ध करण्याचा मुख्य उपाय म्हणजे तुम्हांला द्यावयाचें शिक्षण होय. सर्व माणसें माझी प्रजा आहेत. माझ्या मुलांना सर्व तऱ्हेचें कल्याण व सुख यांचा लाभ व्हावा ही जशी माझी इच्छा आहे, त्याप्रमाणेंच माझी इच्छा आहे कीं, सर्व माणसांनीं आपापलें ऐहिक व पारलौकिक कल्याण व सुख यांचा लाभ करून घ्यावा. कदाचित् ( तुम्ही विचा-राल कीं ) सरहद्दीवरील लोक अद्याप जिंकले गेले नाहींत. त्यांच्यासंबंधानें राजाची काय आज्ञा आहे ? यावर माझें असें उत्तर आहे कीं, राजाची अशी इच्छा आहे—त्यांनीं ( सीमेवरील लोकांनीं ) माझें भय बाळगूं नये; माझ्यावर विश्वास ठेवावा; माझ्याकडून ( त्यांना ) सुखच लागेल; केव्हांहि त्रास पोचणार नाहीं. असाहि विश्वास बाळगावा कीं, जोंपर्यंत क्षमेनें काम साधण्यासारखें असेल तोंपर्यंत राजा आमच्याशीं क्षमावृत्तीनेंच वागेल. माझ्याशीं त्यांनीं धर्माप्रमाणें वर्तन ठेवावें. त्यानें त्यांना इहलोक व परलोक दोन्ही साधतील. यासाठीं मी तुम्हांला ( राज्याच्या अधिकाऱ्यांना ) अशी शिकवण देतों. यानें मी तुमच्या ऋणांतून सुटलों आहें. तुम्हांला शिक्षण देण्याचा आणि माझी आज्ञा जाहीर करण्याचा माझा दृढ निश्चय व दृढ प्रतिज्ञा आहे. आतां या शिक्षणाप्रमाणें चालणारे जे तुम्ही त्यांनीं असें काम करावें कीं, सीमेवरील लोक माझ्यावर भरंवसा ठेवतील व ' पिता ज्याप्रमाणें पुत्रांवर प्रेम करतो त्याप्रमाणें राजा आमचेवर प्रेम करतो, आणि पित्याला जसे त्याचे पुत्र, त्याप्रमाणेंच राजाला प्रजा वाटते ' असें ते लोक समजतील. तुम्हांला शिक्षण देण्याच्या संबंधांत व माझी आज्ञा जाहीर कर-

ण्यांत माझा निश्चय दृढ आहे आणि माझी प्रतिज्ञाहि दृढ आहे. मी कामासाठीं स्थानिक अधिकाऱ्यांना तयार करीन. कारण, तुम्ही माझ्यावर लोकांचा विश्वास बसेल असें करूं शकतां व इहलोकीं व परलोकीं त्यांचें हित व कल्याण होईल असें तुम्ही करूं शकतां. अशा रीतीनें केल्यानें तुम्हांला स्वर्गलाभ करून घेतां येईल व माझेंहि ऋण तुम्हांला फेडतां येईल. हा लेख या उद्देशानें लिहिला गेला आहे कीं, महामात्रांनीं सीमेवरच्या लोकांच्या मनांत विश्वास उत्पन्न करण्याचा व त्यांना धर्ममार्गानें चालण्यास लावण्याचा निरंतर यत्न करावा. हा लेख प्रत्येक चातुर्मास्याच्या (अर्थात् चार चार महिन्यांचा जो एकेक [1]ऋतु त्याच्या) आरंभीं व मध्यंतरीं पुष्य नक्षत्राच्या दिवशींहि ऐकावा व सवडीप्रमाणें प्रत्येकानें एकान्तांत ऐकावा. असें करीत करीत तुम्ही माझ्या आज्ञेचें पालन करण्याचा यत्न करावा."

## पहिला स्तंभलेख

अशोकाचे स्तंभलेख दिल्ली–तोपरा, दिल्ली, मीरत, अलाहाबाद, लौडिया-अराराज, लौडिया-नंदनगड व रामपूर्वा या ठिकाणीं मिळून एकंदर सात आहेत. हे लेख नुसत्या अधिकाऱ्यांनाच उद्देशून लिहिलेले नसून एकंदर प्रजेला उद्देशून आहेत; व त्यांत राज्यशासनाचीं तत्त्वें, धर्माचरण, आत्मपरीक्षण, हिंसेसंबंधाचे नियम, धर्मानुराग, धर्मप्रचारार्थ योजना इ. भिन्नभिन्न विषय आलेले आहेत. ते सगळे महत्त्वाचेच आहेत. त्यांपैकीं पहिला लेख प्रास्ताविक आहे तो असा—

---

१. हल्लीं दोन दोन महिन्यांचा एकेक ऋतु याप्रमाणें एका वर्षांत वसंत-ग्रीष्मादि सहा ऋतु मानण्यांत येतात. पण अशोकाच्या वेळीं चार चार महिन्यांचा एकेक ऋतु याप्रमाणें वर्षांत तीनच ऋतु मानण्याचा प्रघात होता असें दिसतें. हा प्रघात बदलून सहा ऋतु केव्हांपासून मानूं लागले व असा बदल करण्यास कोणतीं कारणें झालीं याचा शोध लावणें अवश्य आहे.

"देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा सांगतो कीं—राज्याभिषेकानंतर सव्वीस वर्षांनीं मीं हा लेख लिहविला. धर्माविषयीं गाढ अनुराग, तीव्र आत्मपरीक्षण, ऊडक शुश्रूषा, मोठें भय आणि महान् उत्साह यांच्यावांचून इहलोक व परलोकसंबंधाचें उद्दिष्ट दुष्प्राप्य आहे. पण माझ्या शिक्षणानें लोकांचा धर्माविषयीं आदर व धर्मानुराग दिवसेंदिवस वाढत जाईल. माझे पुरुष (अधिकारी), मग ते उच्च, मध्यम किंवा नीच पदावर असोत, माझ्या शिकवणीप्रमाणें कार्य करीत आहेत व असे वागत आहेत कीं, चंचल बुद्धीचे लोकहि धर्ममार्गानें चालतील. त्याचप्रमाणें अंतमहामात्र ( सीमेवरील अधिकारी ) यांचेंहि आचरण आहे. कारण, असा नियम आहे कीं, धर्मानुसार पालन करावें, धर्मानुसार वागावें, धर्मानुसार सुख द्यावें आणि धर्मानुसार रक्षण करावें."

या लेखांत 'चंचलबुद्धीचे' याला मुळांत 'चपलं' असा पाली शब्द आहे. याचा अर्थ कित्येक पंडितांनीं पापी किंवा दुराचरणी असा केला आहे.

'अंतमहामात्र' या अधिकाऱ्याचा या स्तंभलेखांत प्रथमच उल्लेख आलेला आहे. दुसऱ्या कोणत्याहि आदेशांत याचा उल्लेख आलेला नाहीं. यावरून हा अधिकारी मागाहून नेमला गेला असावा असें दिसतें.

## दुसरा स्तंभलेख

"देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—धर्म हा उत्तम आहे. पण धर्म म्हणजे काय ? धर्म हाच कीं, पापापासून दूर राहावें; पुष्कळ चांगलीं कृत्यें करावीं; दया, दान, सत्य व शौच ( पावित्र्य ) यांचें पालन करावें; मीं अनेक प्रकारें चक्षुदान केलें आहे. द्विपाद, चतुष्पाद, पक्षी व जलचर प्राण्यांवर मीं अनेक प्रकारें कृपा केली आहे. इतकी कीं मी त्यांना प्राणदानहि दिलें आहे. आणखीहि पुष्कळ चांगलीं कामें मीं केलीं आहेत. हा लेख मीं अशासाठीं लिहविला आहे, कीं लोकांनीं या उदाहरणाप्रमाणें वागावें व तें चिरकाल राहावें. जो याप्रमाणें वागेल तो पुण्यकृत्य करील."

या लेखांत ‘ चक्षुदान ’ म्हणजे पारमार्थिक दृष्टि असा अर्थ बूलरनें केला आहे आणि तोच योग्य दिसतो. तसेंच आणखीहि कांहीं चांगलीं कृत्यें केलीं आहेत असें वर म्हटलें आहे. हीं चांगलीं कामें कोणतीं तें पांचव्या आदेशांत व सातव्या स्तंभलेखांत सांगितलें आहे.

## तिसरा स्तंभलेख

“ देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—मनुष्य आपल्या चांगल्या कृत्यांकडेच पाहतो ( आणि म्हणतो कीं ) मीं हें चांगलें काम केलें. पण तो आपल्या पापकृत्याकडे पाहात नाहीं आणि मीं हें पाप केलें, दोष केला, असें म्हणत नाहीं. अशा प्रकारचें आत्मपरीक्षण फार कठीण आहे. तथापि माणसानें हें समजलें पाहिजे कीं, क्रूरता, निष्ठुरता, राग, गर्व व मत्सर हीं सर्व पापांना कारण असतात. ( आणि त्यानें म्हटलें पाहिजे कीं ) या गोष्टीमुळें माझें पतन न होवो. या गोष्टीकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे कीं, या ( पहिल्या ) मार्गानें मला इहलोकीं सुख लागेल व या ( दुसऱ्या ) मार्गानें मला परलोकाची प्राप्ति होईल. ”

या लेखाचें विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं इतका तो सुबोध आहे.

## चौथा स्तंभलेख

“ देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—राज्याभिषेकानंतर २६ वर्षांनीं मीं हा लेख लिहविला. माझे रज्जुक नामक अधिकारी लाखों मनुष्यांवर नेमिलेले आहेत. त्यांनीं निश्चितपणें व निर्भयतेनें आपलें कर्तव्य करावें, लोकांचें हित व सुख यांवर लक्ष ठेवावें आणि लोकांवर मेहेरबानगी करावी, म्हणून लोकांना इनामें किंवा शिक्षण देण्याचा अधिकार मीं त्यांना दिला आहे. ते सुखदुःखांचीं कारणें समजून घेण्याचा प्रयत्न करतील व धर्मयुक्त नामक हाताखालच्या अधिकाऱ्यांच्या द्वारें लोकांना असा उपदेश करतील कीं, त्याच्या

योगानें लोक ऐहिक व पारलौकिक अशीं दोन्ही प्रकारचीं सुखें प्राप्त करून घेण्याचा यत्न करतील. रज्जुक अधिकारी माझी आज्ञा पाळण्याची भरपूर खटपट करीत आहेत, व माझे 'पुरुष' नामक अधिकारीहि माझ्या इच्छेच्या व आज्ञेच्या अनुरोधानें काम करतील व तेहि केव्हां केव्हां असा उपदेश करतील कीं, त्यों करून रज्जुक मला प्रसन्न करण्याचा यत्न करतील. ज्याप्रमाणें एखादा मनुष्य आपल्या मुलाला ( आपल्या कामांत ) निपुण अशा दाईच्या स्वाधीन केल्यावर निश्चिंत होतो (आणि मनांत ) समजतो कीं, ही दाई माझ्या मुलाला सुख लागावें म्हणून अतिशय झटेल, त्याचप्रमाणें लोकांचें कल्याण व सुख व्हावें म्हणून मीं रज्जुक नांवाचे अधिकारी नेमिले आहेत. त्यांनीं निर्भयपणें व निश्चिंतपणानें व शांतपणानें काम करावें म्हणून इनामें व शिक्षा देण्याचा अधिकार मीं त्यांना दिला आहे. मुकद्दमे चालविण्यांत व शिक्षा देण्यांत पक्षपात होतां कामाचें नाहीं. म्हणून माझी अशी आज्ञा आजपासून आहे कीं, तुरुंगांत पडलेल्या ज्या माणसांना मृत्यूची शिक्षा सांगण्यांत आली असेल त्यांना तीन दिवसांची सवलत देण्यांत येईल. ( या मुदतींत ) ज्यांना मृत्यूची शिक्षा सांगण्यांत आली असेल त्यांच्या नातेवाइकांनीं त्यांच्या जीवनासाठीं ( परमेश्वराची ) प्रार्थना करावी आणि अखेरपर्यंत चिंतन करीत परलोकप्राप्तीसाठीं दानें द्यावींत व उपास करावे. कारण कीं माझी अशी इच्छा आहे कीं, तुरुंगवासांतहि शिक्षा झालेल्या लोकांनीं परलोकाचें चिंतन करावें व लोकांत अनेक प्रकारें धर्माचरण, संयम व दान करण्याची इच्छा वृद्धिंगत व्हावी."

या स्तंभलेखांतल्या कित्येक शब्दांच्या अर्थासंबंधानें वाद असला तरी दोन गोष्टी यांत स्पष्टपणें सांगितलेल्या सर्वांना मान्य आहेत. त्या दोन गोष्टी म्हणजे रज्जुक नामक अधिकाऱ्यांची नेमणूक आणि प्राणदंड सांगितलेल्या अपराध्यांना दिलेली तीन दिवसांची मुदत.

रज्जुकांच्या संबंधानें मागें तिसऱ्या आदेशांत उल्लेख आलाच आहे, तो पाहावा.

तीन दिवसांची मुदत देण्याचा उद्देश काय असावा याविषयीं वाद आहे. वस्तुतः हा वाद उपस्थित होण्याला कांहीं कारण नाहीं. कारण, तीन दिवसांत अपराध्यानें व त्याच्या नातलगांनीं त्याच्या पारलौकिक जीवनासाठीं प्रार्थना वगैरे कराव्या असें पुढच्याच वाक्यांत सांगितलें आहे. तथापि जुन्या काळच्या या लेखांतून हल्लींच्या काळाचें प्रतिबिंब पडलेलें पाहणारे टॉमस व व्हिन्सेंट स्मिथसारखे पाश्चात्त्य पंडित म्हणतात कीं, ही मुदत देण्याचा उद्देश अपराध्याच्या नातेवाइकांना वाटल्यास त्यांनीं राजाकडे फेरतपासणीचा अर्ज करावा हा आहे. मुळांत 'अपराध्याच्या जीवनासाठीं' असे मोघम शब्द आहेत. हें जीवन ऐहिक कीं पारलौकिक याविषयीं स्पष्ट खुलासा केलेला नाहीं. या संदिग्धतेमुळें वरील तर्काला जागा राहिली आहे. तथापि पुढील वाक्याचा संदर्भ लक्षांत घेतां ही प्रार्थना ऐहिक जीवनासाठीं राजाला करण्याची नसून पारलौकिक जीवनासाठीं ईश्वराला करावयाची असावी असें अनुमान अधिक युक्त दिसतें.

सर्व प्रकारच्या लोकांविषयीं समदृष्टि ठेवून एकच कायदा सर्वांना सारखा लागू करण्याचें अशोकाचें धोरण या लेखांत उत्तम दिसत आहे.

## पांचवा स्तंभलेख

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं, राज्याभिषेकानंतर सव्वीस वर्षांनीं मीं पुढील प्राण्यांचा वध करण्याला मनाई केली आहे—पोपट, मैना, अरुण, चकोर, हंस, नांदीमुख, गेलाट, जतुका, अंबाकपीलिका, दुडी, बिनहाडाची मासळी, वेदवेयक, गंगापुपुटक, संकुजमत्स्य, कासव, शल्य, पर्णशश, सांबर, सांड, वानर, गेंडा, श्वेतकपोत, ग्रामकपोत व इतर सर्व तऱ्हेचे चतुष्पाद प्राणी जे कोणत्याहि उपयोगी पडत नाहींत व खाण्याच्याहि उपयोगी नाहींत. गाभण किंवा दुभती बकरी, मेंढी किंवा डुकरी व त्याचप्रमाणें त्यांचीं सहा महिन्यांतलीं पिलें मारूं नयेत. कोंबड्याला खच्ची करूं नये व कोंबड्याबरोबर

जिवंत प्राणी जाळूं नयेत. अनर्थ करण्यासाठीं किंवा प्राण्यांची हिंसा करण्यासाठीं जंगलाला आग लावूं नये. एक जीव मारून दुसऱ्याला खाऊं घालूं नये. दर चातुर्मास्याच्या तीन ऋतूंच्या पौर्णिमा, पौष पौर्णिमा, चतुर्दशी, अमावास्या व प्रतिपदा आणि त्याचप्रमाणें उपासाचे दिवस या वेळीं मासे मारूं नयेत व विकूं नयेत. या सर्व दिवशीं हत्तींच्या वनांतून व तलावांतून कोणतेहि दुसऱ्या जातीचे प्राणी मारले जाऊं नयेत. प्रत्येक पक्षाची अष्टमी, चतुर्दशी, अमावास्या किंवा पौर्णिमा, या दिवशीं तसेंच पुष्य, पुनर्वसु[1] नक्षत्र असलेल्या दिवशीं, व चातुर्मास्यांतल्या प्रत्येक सणाच्या दिवशीं बैलाला डागण्या देऊं नयेत व बकरा, मेंढा, डुकर आणि या जातीचे दुसरे प्राणी ज्यांना डागण्यांत येत असतें त्यांना डागण्यांत येऊं नये. पुष्य व पुनर्वसु नक्षत्रांच्या दिवशीं, चातुर्मास्यांतल्या प्रत्येक पौर्णिमेच्या दिवशीं व प्रत्येक चातुर्मास्याच्या शुद्ध पक्षांत घोडे व बैल यांना डागण्या देऊं नयेत. राज्याभिषेकानंतर २६ वर्षांच्या आंत मीं २५ वेळां तुरुंगांतून कैदी सोडले आहेत. ”

हा सबंध लेख कोणकोणत्या प्राण्यांची हिंसा करूं नये याविषयींचा आहे. पहिल्या आदेशांत व या स्तंभलेखांत हा मोठा फरक आहे कीं, तो आदेश फक्त राजाच्या पाकशाळेपुरताच होता. हा लेख अशोकाच्या सगळ्या राज्याला लागू आहे. अर्थात् अशोकानें मांसाहारी लोकांच्या सोईसाठीं कांहीं प्राण्यांच्या हिंसेला मोकळीक ठेविली होती असें दिसतें. अशोकाच्या फार पूर्वीपासून यज्ञयागाच्या वेळीं पशुहिंसा होत असे. ती अशोकाला जशी अजीबात बंद करवली नाहीं, तसाच मांसाहारी लोकांचा मांसाहारहि त्याला फर्मान काढून अजिबात बंद करतां आला नाहीं. तथापि मांसाहाराला

१. पुष्य नक्षत्र हा पुण्यकाल म्हणून आणि पुनर्वसु हें अशोकाचें जन्मनक्षत्र म्हणून या दोन दिवशीं हिंसा बंद ठेवण्यांत आली असावी.

त्यानें बराच आळा घातला हें कबूल केलें पाहिजे. यज्ञयागासाठीं व आहारासाठीं जी बेछूट हिंसा होत असे त्याला अशोकानें नियंत्रण घातलें. वर्षाच्या ३६५ दिवसांपैकीं फक्त ५६ दिवस त्याच्या नियमानें हिंसेला मोकळीक ठेविली होती.

वैदिक काळापासून गाय ही अत्यंत पवित्र मानली जात असून तिच्या वधाचा निषेध वरील नियमांत कसा केला नाहीं ही आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे, असें व्हिन्सेंट[1] स्मिथ म्हणतो.

वरील यादीपैकीं कांहीं पशुपक्ष्यांचीं प्रचलित नांवें ओळखतां आलीं नाहींत. म्हणून मूळच्या पाली नांवांचीं संस्कृत नांवेंच मराठी भाषांतरांत कायम ठेविलीं आहेत.

या लेखांत हिंसेसाठीं निषिद्ध अशा महिन्यांचीं व तिथींचीं नांवें आलीं आहेत, तशीं वारांचीं नांवें देण्यांत आलीं असतीं म्हणजे सध्याचीं वारांचीं नांवें किती प्राचीन किंवा अर्वाचीन आहेत तें कळलें असतें.

या लेखाच्या शेवटच्या परिच्छेदावरून अशोक आपल्या राज्यारोहणाच्या वाढदिवशीं दरसाल उत्सव करीत असे व त्या उत्सवानिमित्त कांहीं कैद्यांची तुरुंगांतून सुटकाहि करीत असे असें दिसतें.

---

१ व्हिन्सेंट स्मिथ याची ही समजूत उघड उघड चुकीची आहे. कारण, अशोकाच्या काळाच्या पुष्कळ अगोदरपासून हिंदु लोक गाईला पूज्य मानीत आले आहेत व गोमांसभक्षण हें पाप आहे अशी त्यांची समजूत बद्धमूल झाली असल्याकारणानें अनायासेंच तिचें रक्षण झालें होतें. त्यासाठीं राजाज्ञेची जरुरीच नव्हती. म्हणून अशोकानें गाईचा उल्लेख केला नसावा हें सयुक्तिक दिसतें. शिवाय, अशोकानें खाण्यांत येणारे व न येणारे असे प्राण्यांचे दोन वर्ग केले आहेत. त्यांपैकीं दुसऱ्या वर्गांत गाय ही येत असल्याकारणानें तिचा मुद्दाम उल्लेख करण्याचें कारणच उरलें नव्हतें ही गोष्ट साहेबानें लक्षांत घ्यावयास पाहिजे होती.

## सहावा स्तंभलेख

" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—राज्याभिषेकानंतर बारा वर्षांनीं मीं लोकांच्या हितार्थ व सुखार्थ धर्मलेख लिहविले. उद्देश हा कीं, त्यांनीं आपला (पापाचा मार्ग) सोडून कोणत्या ना कोणत्या प्रकारें धर्माचा उत्कर्ष करावा. त्याप्रमाणें मी लोकांच्या कल्याणासाठीं व सुखासाठीं झटत असतां माझ्या नात्याचे लोक, दूरचे लोक व जवळचे लोक हे कशाप्रकारें सुखी होतील इकडेहि माझें लक्ष असतें. या उद्देशानुसार मी कामहि करतों. अशा रीतीनें सगळ्या समाजाचें (कल्याण व सुख) यांच्याकडे माझें लक्ष असतें. मीं सर्व संप्रदायांचाहि निरनिराळ्या प्रकारें सत्कार केला आहे. तथापि स्वतःच्या धर्माविषयीं अनुराग ही माझ्या मतें मुख्य बाब आहे. राज्याभिषेकानंतर २६ वर्षांनीं मीं हा लेख लिहविला. "

या लेखांत ' सगळ्या समाजाचें ' या ठिकाणीं मुळांत ' समाजा ' बद्दल पाली ' निकाय ' हा शब्द आहे. या शब्दाचा अर्थ अभिदानप्रदीपिका नामक कोषांत समानधर्मीयांचा समाज असा दिला आहे. दुसरा अर्थ भाग असाहि आहे. जसें—सूत्रपितक ग्रंथाच्या निरनिराळ्या भागांना अंगुत्तर निकाय इ. निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत.

## सातवा स्तंभलेख

हा शेवटचा स्तंभलेख उपसंहाररूप आहे. तो असा—

१. " देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें म्हणतो—पुष्कळ काळांपूर्वी जे राजे होऊन गेले त्यांची इच्छा होती कीं, धर्मवृद्धि व्हावी. पण त्यांच्या अपेक्षेप्रमाणें ती झाली नाहीं.

२. यासाठीं देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—हा विचार माझ्या मनांत आला आहे कीं, पूर्वीच्या काळीं राजे लोक इच्छित होते कीं, कोणत्याहि

प्रकारें योग्यरूपानें धर्मवृद्धि व्हावी. पण ती झाली नाहीं. तर मग आतां लोकांची प्रवृत्ति तिकडे कशी करतां येईल? योग्य रूपानें त्यांची धर्मवृद्धि कशी होईल? व कमींत कमी कांहीं थोड्या लोकांना तरी मी धर्मपर कसा करूं शकेन?

३. म्हणून देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—माझ्या मनांत असा विचार आला कीं, लोकांना धर्म ऐकवावा व त्यांना धर्माचा उपदेश करावा म्हणजे लोक तो ऐकून त्याप्रमाणें आचरण करतील, उन्नति करतील व विशेष रूपानें धर्मवृद्धि करतील. या उद्देशानें (त्यांच्याकडून) धर्मश्रवण करविलें गेलें व निरनिराळ्या प्रकारें धर्मोपदेश करविला गेला. माझे 'पुरुष' नांवाचे अधिकारी जे पुष्कळशा लोकांचे वर नेमिले गेले आहेत ते माझ्या उपदेशाचा प्रचार करतील. लाखों माणसांवर जे 'रज्जुक' नांवाचे अधिकारी नेमलेले आहेत, त्यांना आज्ञा देण्यांत आली आहे कीं, त्यांनीं 'धर्मयुक्त' नांवाच्या अधिकाऱ्यांना असा उपदेश करावा.

४. देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—याच उद्देशानें मीं धर्मस्तंभ उभारले; धर्ममहामात्रांची नेमणूक केली व धर्माची घोषणा केली.

५. देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—सडकांवरून मनुष्यें व पशु यांना छाया देण्यासाठीं आंब्यांचीं झाडें लाविलीं, अर्ध्या अर्ध्या कोसाच्या अंतरावर विहिरी खोदविल्या, धर्मशाळा बांधल्या व जागजागीं पशूंसाठीं आणि माणसांसाठीं पाणपोया घातल्या. पण या सुखसोयी म्हणजे क्षुद्र गोष्टी होत. पूर्वीच्या राजांनीं व मींहि विविध प्रकारांनीं लोकांना सुखी केलें आहे. पण मीं ही (सुखसोय) अशाकरितां केली आहे कीं, लोकांनीं धर्माचरण करावें.

६. देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—माझे धर्ममहामात्रहि अशा पुष्कळ प्रकारच्या उपयुक्त कार्यांत गुंतले आहेत कीं, ज्यांचा संबंध संन्यासी व गृहस्थ या दोहोंशीं येतो. त्याचप्रमाणें सर्व संप्रदायाकरितांहि ते नेमिलें

गेले आहेत. संघ, ब्राह्मण, आजीवक व निर्ग्रंथ यांच्यांत व त्याचप्रमाणें निरनिराळ्या संप्रदायांत ते आहेत. निरनिराळे महामात्र निरनिराळ्या कामांना लागले आहेत. पण धर्ममहामात्र आपापलें काम करून शिवाय सर्व संप्रदायांवर देखरेखहि करतात.

७. देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा सांगतो कीं—हे व तसेच दुसरे मुख्य अधिकारी माझ्या व माझ्या राण्यांच्या दानधर्माच्या कामावर नेमिलेले आहेत. येथें ( पाटलीपुत्र शहरांत ) त्याचप्रमाणें प्रांतांतून ते सगळ्या अंतःपुरवासियांना कोणकोणत्या प्रसंगीं कोणकोणत्या प्रकारचें दान करावें तें दाखवितात. धर्माची उन्नति व धर्माचें आचरण व्हावें म्हणून माझे पुत्र व दुसरे राजकुमार यांच्या दानधर्मावर देखरेख करण्यासाठीं ते नेमलेले आहेत. दया, दान, सत्य, शौच, मृदुता व साधुता लोकांत वाढावी यांतच धर्माची उन्नति व धर्माचरण आहे.

८. देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—मीं जें सत्कृत्य केलें आहे तें लोकांनीं स्वीकारलें व त्याचें अनुकरण केलें आहे. ( त्याचा परिणाम हा झाला आहे कीं ) मातापित्यांची सेवा, गुरूची सेवा, वृद्धांचा आदर, व ब्राह्मण, श्रमण, दीन, हीन, दुःखी, दास व नोकरचाकर यांच्याशीं योग्य वागणूक, हे गुण उत्कर्ष पावले आहेत व आणखीहि पावतील.

९. देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—माणसांत जी ही धर्मवृद्धि झाली आहे ती दोन प्रकारांनीं झाली आहे. एक धर्मनियमांनीं व दुसरी ध्यानाच्या द्वारें. पैकीं धर्मनियम ही कांहीं मोठीशी महत्त्वाची बाब नाहीं. पण ध्यान ही मोठी महत्त्वाची बाब आहे. तथापि धर्माचे नियम मीं अशासाठीं बनविले आहेत कीं, अमुक अमुक प्राणी मारले जाऊं नयेत. मीं आणखीहि पुष्कळ नियम केले आहेत. पण ध्यानामुळेंच धर्माची वृद्धि, प्राण्यांची अहिंसा आणि यज्ञांत जीवांचा अनालंभ ( अवध ) या गोष्टी वाढत्या प्रमाणावर घडून आल्या आहेत. हा लेख अशासाठीं लिहिला गेला आहे कीं, सूर्यचंद्र आहेत

तोंपर्यंत माझ्या पुत्रपौत्रांनीं याप्रमाणें आचरण करावें. कारण कीं याप्रमाणें आचरण करण्यापासून इहलोक व परलोक दोन्ही साधतील. राज्याभिषेकानंतर २७ वर्षांनीं हा लेख लिहविला आहे.

१०. देवांचा प्रिय असें सांगतो कीं—जेथें जेथें दगडाचा स्तंभ किंवा शिला असेल तेथें तेथें हा लेख चिरकाळ टिकण्यासाठीं खोदविला जावा. ”

जसा भगवद्गीतेंतला १८ वा अध्याय, तसा हा सातवा स्तंभलेख सर्वांत मोठा पण अशोकानें धर्मप्रचारार्थ योजिलेल्या सर्व उपायांची समालोचना करणारा असल्यामुळें सर्वांत महत्त्वाचा आहे. याचे दहा निरनिराळे भाग केलेले असून प्रत्येकाच्या आरंभीं ‘ देवांना प्रिय० ’ इ. पालुपद आहे. एका शब्दाबद्दल मात्र थोडासा वाद आहे. चौथ्या भागांत ‘ अढकोसिक्यानि ’ असा पाली भाषेंतला शब्द आहे. त्याचा अर्थ अर्ध्या कोसावर असा वरील भाषांतरांत करण्यांत आला आहे. पण कित्येक पंडितांचें म्हणणें आहे कीं, आठ आठ कोसांवर असा त्याचा अर्थ करावयास पाहिजे. अशोक केवढाहि श्रीमान् राजा झाला तरी अर्ध्या अर्ध्या कोसावर वाटसरांकरितां विहिरी खोदणें व धर्मशाळा बांधणें त्यालाहि अशक्य होतें. म्हणून आठ कोसांवर असाच अर्थ घेणें योग्य असें आक्षेपकांचें म्हणणें, पण त्या काळीं सडका वगैरेंची सोय चांगलीशी नसल्यामुळें पायीं चालणारांची मजल एका दिवसांत आठ कोसांहून जास्त नसे. आणि या सबंध मजलींत वाटसरांना मध्यंतरीं तहान लागल्यास पाणी पिण्याची सोय कोठेंहि केलेली नसणें हीहि गोष्ट तितकीच असंभवनीय दिसते. म्हणून ‘ अर्ध्या अर्ध्या कोसावर ’ हाच अर्थ कायम केला आहे.

या लेखाच्या ( ६ ) मध्यें नुसता ‘संघ’ शब्द आला आहे. त्याचा अर्थ बौद्ध भिक्षूंचा संघ अथवा संप्रदाय असा घ्यावयाचा.

‘ आजीवक ’ हा शब्द त्याच भागांत आला आहे. हा अशोकाच्या काळीं एक महत्त्वाचा संप्रदाय होता असें या व मागें एका लेखांत आलेल्या त्याच्याविषयींच्या उल्लेखावरून दिसतें. पण या पंथाविषयींची निश्चित माहिती

अद्याप मिळाली नाहीं. कोणी या पंथाला जैनमताची एक शाखा समजतात; कोणी ते बौद्ध तापसी होते असें म्हणतात; तर प्रो. देवदत्त भांडारकर हे त्या शब्दाच्या मागें Brahmanical असें विशेषण लावून तो ब्राह्मण धर्मांचाच एक विशिष्ट पंथ होता असें सुचवितात.

निर्ग्रंथि अथवा निग्रंथि हे जैनधर्मी परिव्राजक ( संन्यासी ) होते.

या लेखांत अशोकाच्या राण्यांचा ( देवीनाम् ) व कुमारांचा मोघम उल्लेख आलेला आहे. पण त्याला किती राण्या होत्या, त्यांचीं नांवें, व कोणापासून कोण कोण पुत्र झाले, त्याचा कोठें एका जागीं उल्लेख आढळत नाहीं. अशोकाच्या राण्या व त्याचे पुत्र याच्या संबंधाची उपलब्ध माहिती व दंतकथा पुढें देण्यांत येणार आहेत.

हिंसा व आलंभ हे दोन्ही शब्द निरनिराळ्या अर्थानें या लेखांत आले आहेत. त्यांवरून त्यांच्या अर्थांतला भेद स्पष्टपणें कळतो. यज्ञाच्या वेळीं प्राण्यांचा जो वध करतात तो आलंभ व दुसऱ्या एखाद्या कार्यासाठीं केलेला वध म्हणजे हिंसा होय.

शेवटच्या म्हणजे १० व्या परिच्छेदांत जागोजागीं हा लेख लिहिण्याचा आपला मानस अशोकानें प्रकट केला आहे. पण तो तडीला गेलेला दिसत नाहीं. कारण, हा लेख फक्त दिल्ली–तोप्रा स्तंभावरच आहे. अन्यत्र अद्याप उपलब्ध झालेला नाहीं. अजूनहि पृथ्वीच्या उदरांतून वर येणार नाहीं कशावरून ?

लघु शिलालेख, गिरिलेख ( आदेश ) व स्तंभलेख यांशिवाय आणखी कित्येक स्फुट लेख आहेत. तेहि येथें देणें अवश्य आहे. कारण, या सर्व लेखांतून अशोकाचें चरित्र, त्याचा परिवार, धर्म, राज्यव्यवस्था इ. महत्त्वाच्या गोष्टींवर प्रकाश पाडणारें बरेंचसें विश्वसनीय साहित्य विखुरलेलें आहे. हे स्फुट लेख म्हणजे तराईचे दोन स्तंभलेख, निग्लीव, सारनाथ, कौशांबी आणि सांची येथील स्तंभलेख, त्याचप्रमाणें राणीचा लेख, तीन गुहालेख, बराबर

येथील गुहालेख व दशरथाचा नागार्जुनी पहाडावरील लेख हे होत. हे आतां अनुक्रमानें देतों.

## तराईचे दोन स्तंभलेख

**पहिला लेख**—( रुम्मिनीदीईचा )—" देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा यानें राज्याभिषेकानंतर वीस वर्षांनीं स्वतः येऊन ( या स्थानाची ) पूजा केली. येथें शाक्यमुनि बुद्ध याचा जन्म झाला होता. म्हणून येथें दगडांचा एक तट बांधण्यांत आला व एक स्तंभहि उभारण्यांत आला. येथें भगवान् ( बुद्ध ) यांचा जन्म झाला, म्हणून लुम्मिनि गांवावरचा कर उठविण्यांत आला व उत्पन्नाचा अष्टमांशहि ( जो राजाच्या हक्काचा होता तो ) त्या गांवाला देण्यांत आला. "

या लेखाचा शोध इ. स. १८९६ मध्यें लागला. हा लेख नेपाळ राज्याजवळच्या तराई मुलखांत लुम्मिनि या गांवाजवळ सांपडला. या गांवाला हल्लीं रुम्मिनीदीई असें नांव आहे. येथें रुम्मिनि देवीचें एक देऊळ[1] आहे. त्यावरून हें नांव पडलें असावें. या मंदिराच्या जवळच हा स्तंभ असल्यामुळें हीच बुद्धाची जन्मभूमि असें निश्चितपणें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. हा स्तंभ ख्रि. पू. २४९ या वर्षी उभारला गेला असा तर्क आहे.

लुम्मिनि गांवच्या उत्पन्नाचा आठवा हिस्सा या गांवाला दिला. राजानें

१. अशोकाच्या स्तंभापासून थोड्याच अंतरावर बुद्धाची माता महामाया हिची मूर्ति आहे. तिलाच हल्लीं तेथील लोक रुम्मिनीदीई ( रूपिणी देवी ) समजून तिची पूजा करतात असें ती जागा प्रत्यक्ष पाहून आलेले प्रो. राधाकुमुद मुकर्जी लिहितात ( Asoka, P. 202 ). हें देऊळ अशोकानें बांधिलें असा उल्लेख अशोकावदान या बौद्ध ग्रंथांत आहे.

प्रजेजवळून उत्पन्नाचा अष्टमांश हक्कानें घ्यावा अशी धर्मशास्त्राची आज्ञा आहे, हा प्रघात अशोकाच्या वेळींहि होता असें यावरून दिसतें.

## निग्लीवचा स्तंभलेख

**दुसरा लेख**—“ देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा यानें राज्याभिषेकानंतर चौदा वर्षांनीं कनकमुनि बुद्ध यांच्या स्तूपाची दुसऱ्यांदा डागडुजी केली व राज्याभिषेकानंतर वीस वर्षांनीं स्वतः येऊन पूजा केली व स्तंभ उभारला. ”

या लेखांत कनकमुनि बुद्ध याच्या स्तूपाचा उल्लेख आहे. हा कनकमुनि कोण ? व हा स्तूप कोठें आहे ? याचा अद्याप पत्ता लागलेला [1]नाहीं. हा स्तूप हल्लीं उपलब्ध नाहीं. पण अशोकानें त्याची दोनदा डागडुजी केली होती असें या लेखांत म्हटलें आहे. यावरून अशोकाच्या पुष्कळ अगोदर कनकमुनि नांवाचे कोणी अत्यंत पूज्य साधु होऊन गेले असले पाहिजेत आणि त्यांचें स्मारक म्हणून एक स्तूप कोणीं तरी बांधिला असला पाहिजे यांत शंका नाहीं. दोन हजार वर्षांपूर्वीच तो जीर्ण झालेला होता, यावरून आज तो नामशेष झाला याचें कोणालाहि नवल वाटणार नाहीं. कनकमुनीला बुद्ध म्हटलें आहे, यावरून शाक्य गोतम हा पहिला बुद्ध नव्हे, त्याच्याहि अगोदर अनेक बुद्ध होऊन गेले होते, ही बौद्धांची समजूत निराधार म्हणतां येत नाहीं.

## लघु स्तंभलेख

### ( १ ) सारनाथचा स्तंभलेख

“ देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं—पाटलीपुत्र येथें व प्रांतांत कोणीं संघांत फूट पाडूं नये. भिक्षु असो किंवा भिक्षुणी असो, जो कोणी फूट

१. गौतमबुद्धाच्या अगोदरचा हा तिसरा बुद्ध होय असें प्रो. मुकर्जी म्हणतात. आधार दिला नाहीं.

पाडील त्याला पांढरें वस्त्र वापरण्यास देऊन भिक्षु व भिक्षुणी यांना उचित नाहीं अशा स्थानीं ठेवण्यांत येईल. त्याचप्रमाणें ही आमची आज्ञा भिक्षुसंघ व भिक्षुणी-संघ यांना कळविण्यांत यावी. देवांचा प्रिय असें सांगतो कीं, या प्रकारचा एक लेख तुम्हां लोकांकडे पाठविण्यांत आला आहे. त्याचें तुम्हीं स्मरण राखावें. असाच एक लेख तुम्हीं उपासकांनाहि द्यावा म्हणजे ते उपासाच्या दिवशीं येऊन या आज्ञेचें मर्म समजतील. वर्षातल्या प्रत्येक उपासाच्या दिवशीं उपासाच्या व्रताच्या पालनार्थ, या आज्ञेचें मर्म समजावून देण्यासाठीं, व या आज्ञेचा प्रचार करण्या-करितां प्रत्येक महामात्र जाईल. जेथें जेथें तुमचा अधिकार असेल तेथें तेथें तुम्हीं या आज्ञेनुसार प्रचार करावा. अशा प्रकारें तुम्हीं लोकांनीं कोट व प्रांत या सर्व ठिकाणीं ही आज्ञा पाठवावी. ”

हा सारनाथचा स्तंभलेख आणि पुढें दिलेले कौशांबी व सांची येथील लघु स्तंभलेख हे एकच आहेत. सारनाथच्या लेखाचा कांहीं भाग फुटलेला असल्यामुळें वाचतां येत नाहीं. अर्थात् तो कौशांबी व सांची येथील लेखांच्य साह्यानें वाचून त्याचा अर्थ लावावा लागला.

हा लेख लिहिण्यास असें कारण झालें कीं, खोडसाळ माणसांनीं बौद्ध भिक्षु-संघांत व त्याचप्रमाणें भिक्षुणीसंघांत फूट पाडण्याची खटपट चालविली होती अशोकाच्या शिरावर राजा म्हणून व बौद्धसंघाचा अधिपति म्हणून ही खटपट बंद पाडून त्यांच्यांत पूर्ववत् एकी प्रस्थापित करण्याची जबाबदारी असल्यामुळें त्याला त्यासाठीं कडक उपाय योजणें भाग होतें. अशा खोडसाळ माणसाला पांढरीं वस्त्रें पांघरण्यास देण्याचें प्रयोजन हें कीं, बौद्ध भिक्षु पिवळीं वस्त्रें वापर-तात, आणि पांढरीं वस्त्रें गृहस्थधर्मी बौद्ध वापरतात. पांढरीं वस्त्रें दिल्यानें हे भिक्षु नव्हेत, गृहस्थधर्मी आहेत, हें लोकांस कळावें. म्हणजे भिक्षुसंघानें त्याच्या-वर घातलेला हा अप्रत्यक्ष बहिष्कारच होय. याशिवाय भिक्षु-भिक्षुणींना उचित नाहीं अशा जागीं पाठविण्याची शिक्षा—निराळ्या शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे संघांतून त्याला अर्धचंद्र मिळणें—हा प्रत्यक्ष बहिष्कारच होता.

या लेखाच्या शेवटच्या वाक्याच्या भाषांतरांत कोट व प्रांत असे दोन शब्द आले आहेत. मूळ पाली लेखांत 'कोट विसवेसु' असा शब्द आहे. 'विसवेसु' याचें संस्कृतांत 'विषयेषु' असें रूप होतें. पण कोट व विषय यांच्यांत काय भेद आहे ? कोट म्हणजे किल्ला. हा सेनापतीच्या ताब्यांत असे, व विषय म्हणजे प्रांत हे मुलकी अधिकाऱ्यांच्या ताब्यांत असत. हा त्यांच्यांतला भेद समजावा.

अशोकाच्याहि अगोदरच्या काळापासून कुल, जाति, जनपद किंवा संघ वगैरे स्थानिक संस्थांचा कारभार त्या त्या संस्था स्वतंत्रपणें करीत असत. त्यांच्यांत एकी राहिल्यानें राज्यालाहि त्यापासून बळकटी येत असे. म्हणून त्यांच्यांत फूट पाडणें हा अपराध समजून राजानें तो अपराध करणारास शिक्षा करण्याची चाल अशोकाच्या अगोदरच्या काळींहि होती. (Mukerjee's Local Govt. in Ancient India पाहा ). यावरून हा अधिकार अशोकानें नव्यानेंच आपल्या हातीं घेतला असें दिसत नाहीं.

## ( २ ) कौशांबीचा स्तंभलेख[१]

" देवांचा प्रिय प्रियदर्शी कौशांबीच्या महामात्रांना अशी आज्ञा देतो कीं— संघाच्या नियमांचें उल्लंघन होऊं नये; जो संघांत फूट पाडील त्याला पांढरीं वस्त्रें वापरण्यास देऊन भिक्षु व भिक्षुणी यांच्या राहण्याच्या स्थानापासून घालवून दिलें जाईल. "

## ( ३ ) सांचीचा स्तंभलेख

" .........भिक्षु व भिक्षुणी दोहोंसाठी ( संघाचा ) मार्ग ठरविला गेला आहे......जो कोणी भिक्षु संघांत किंवा भिक्षुणीसंघांत फूट पाडील, त्याला भिक्षु

१. हा स्तंभ पूर्वी कोसंबी येथें होता. तो फरोज तघलखानें तेथून अलाहाबादला आणिला ही हकीकत मागें एका प्रकरणांत दिलीच आहे.

व भिक्षुणी यांनीं राहण्यास उचित नाहीं अशा जागीं घालवून देण्यांत येईल. संघाचा मार्ग चिरस्थायी राहावा अशी माझी इच्छा आहे."

## राणीचा लेख

हा लेख अलाहाबाद येथील स्तंभावरच कोरलेला असून त्याचा विषय अशोकाची दुसरी राणी हिच्या प्रीत्यर्थ केलेल्या दानाची घोषणा हा आहे. तो लेख असा—

"देवांचा प्रिय प्रियदर्शी सर्व महामात्रांना आज्ञापितो कीं—दुसऱ्या राणीनें जें कांहीं दान दिलें असेल, मग तें आंबराई असो, उद्यान असो, दानशाला (सदावर्त) असो, किंवा कोणतीहि वस्तु असो, तें सगळें त्या राणीचें दान समजलें पाहिजे. हें सगळें दुसरी राणी व तीवरची माता कारुवाकी[1] हिच्या (प्रीत्यर्थ) करण्यांत आलें आहे."

## तीन गुहालेख

पहिला गुहालेख गयेजवळ बाराबर नांवाच्या गिरिकंदरांत आहे. आजीवकांना गुहादान केल्याचा यांत उल्लेख आहे. तो लेख असा—

**पहिला लेख**—"राजा प्रियदर्शी यानें राज्याभिषेकानंतर बारा वर्षांनीं ही न्यग्रोध गुहा आजीवकांना दिली."

**दुसरा लेख**—"राजा प्रियदर्शी यानें राज्याभिषेकानंतर बारा वर्षांनीं खलतिक पर्वतांतली ही गुहा आजीवकांना दिली."

---

१. कारुवाक हें एका वंशाचें नांव होतें. त्या वंशांतली म्हणून या राणीचें नांव कारुवाकी असें पडलें. पतीनें स्त्रीचें नांव उच्चारावयाचें नाहीं अशी परंपरागत प्राचीन रीत आहे. तिला अनुसरून अशोकानें राणीचें नांव न सांगतां तीवरची आई या संज्ञेनें तिचा उल्लेख केला असावा.

**तिसरा लेख**—"राजा प्रियदर्शी यानें राज्याभिषेकानंतर अठरा वर्षांनीं खलतिक पर्वतावरची 'सुप्रिय' गुहा आजीवकांना दिली."

आजीवकासंबंधाची थोडीशी माहिती मागें देण्यांत आलीच आहे. केर्न साहेब म्हणतात कीं, आजीवक हे वैष्णव होते.

## दशरथाचे तीन गुहालेख

दशरथ हा अशोकाचा नातू होता. अशोकाच्या मृत्यूनंतर त्याच्या राज्याच्या वांटण्या होऊन एक भाग ( पश्चिमेकडचा ) संप्रति ( हाहि अशोकाचा नातूच होता ) याच्या वांटणीला गेला, आणि दुसरा म्हणजे पूर्वेकडचा भाग दशरथाला मिळाला. पुढें दिलेले तीन गुहालेख या दशरथाचे आहेत व ते गयेजवळ नागार्जुनी डोंगरांत आहेत.

**पहिला लेख**—"देवांचा प्रिय दशरथ यानें राज्याभिषेकानंतर 'वहीयका' गुहा भदन्त आजीवकांना आचंद्रार्क ( चंद्रसूर्य आहेत तोंवर ) राहण्यासाठीं दिली आहे."

**दुसरा लेख**—"देवांचा प्रिय दशरथ यानें राज्याभिषेकानंतर 'गोपिका' गुहा भदन्त आजीवकांना आचंद्रार्क राहण्यासाठीं दिली आहे."

**तिसरा लेख**—"देवांचा प्रिय दशरथ यानें राज्याभिषेकातंतर 'वडथिका' गुहा भदन्त आजीवकांना आचंद्रार्क राहण्यासाठीं दिली आहे."

या तिन्ही लेखांतून 'देवांचा प्रिय' ( मूळ पाली 'देवानां पिय' ) ही पदवी अशोकाप्रमाणें दशरथाच्या नांवाला जोडलेली आढळते. फरक एतकाच कीं, अशोक ती आपल्या नांवाच्या मागें लावीत असे ( अशोकानें फक्त एका लेखांत आपलें नांव दिलें आहे. ) बाकीच्या साऱ्या लेखांतून तो स्वतःचा उल्लेख 'देवांचा प्रिय प्रियदर्शी' किंवा 'देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा' असा करीत असे. दशरथानें प्रियदर्शी हें उपपद अजिबात

गाळून टाकिलें आणि 'देवांचा प्रिय' ही पदवी आपल्या नांवाचा निर्देश करून त्याच्यापुढें लाविली असें स्पष्ट दिसतें.

वरील तिन्ही लेखांतून आजीवकांचा उल्लेख जेथें जेथें आला आहे तेथें तेथें 'भदन्त' हें उपपद त्यांच्या मागें लाविलेलें आहे. भदन्त या शब्दाचा अर्थ काय ? व तें आजीवकांना कां लाविलें आहे ? भदन्त हें उपपद बौद्ध ग्रंथांतून पूज्य व्यक्तींच्या नांवाच्या मागें लाविलेलें आढळतें. हें उपपद ब्राह्मणधर्मी व्यक्तीच्या नांवामागें लावीत नाहींत. अर्थात् तें आजीवकांच्या मागें ज्या अर्थी लाविलेलें आहे त्या अर्थी आजीवक हे बौद्ध असले पाहिजेत. मग प्रो. भांडारकरांनीं आजीवकांना Brahmanical Ajivakas कसें[1] म्हटलें तें कळत नाहीं.

## प्रकरण ८ व ९ यांचें परिशिष्ट

अशोकाच्या गिरि-लेखांतून व स्तंभ-लेखांतून त्यानें केलेल्या कृत्यांचे व तजविजींचे उल्लेख इतस्ततः आलेले आहेत. ते वाचकांच्या दृष्टीपुढें एकदम उभे राहावे म्हणून त्यांचें संकलन करून त्यांची यादी प्रो. राधाकुमुद मुकर्जी यांनीं आपल्या अशोकग्रंथांत क्रमवार दिली आहे, ती अशी—

गिरि-लेखांच्या प्रसिद्धीपूर्वींची अर्थात् ख्रि. पू. २६०–२५८ यांच्या दरम्यानच्या काळांतलीं कृत्यें—

(१) राजधानींत यज्ञासाठीं होणाऱ्या हिंसेची बंदी.
(२) समाज (म्हणजे चैनीखातर केलेले मेळे व उत्सव) यांची बंदी.
(३) राजाच्या भोजनासाठीं रोज दोन मोर व एक हरिण यांपेक्षा जास्त प्राण्यांच्या हत्येची बंदी (गिरि० १).
(४) शिकार व दुसरे चैनीचे प्रकार असलेल्या सहली (गिरि० ८).
(५) युद्धाची (गिरि० ४) व विजयाची (गिरि० १३) बंदी.

1. Bhandarkar's Ashoka, Page 112 & 131.

सार्वजनिक उपयोगाचीं कामें—

( १ ) माणसें व पशु यांच्यासाठीं रुग्णालयें.

( २ ) औषधांच्या उपयोगी पडणाऱ्या देशी व विदेशी वनस्पतींचे बगीचे लावणें

( ३ ) पांथस्थांच्या सुखार्थ रस्त्यांच्या बाजूंनीं छायेसाठीं झाडें लावणें व विहिरी खोदणें ( गिरि० २ ).

( ४ ) परदेशांतून व सीमेवरील प्रांतांतून माणसें व पशु यांना औषधें पुरविणें ( २ )

( ५ ) धर्मविजयासाठीं ( राजकीय किंवा लष्करी विजयासाठीं नव्हेत ) परदेशांतून दूत ( मिशनरी ) पाठविणें ( १३ ).

( ६ ) धर्मोपदेशासाठीं किंवा राज्यकारभाराच्या कामासाठीं दर पांच वर्षांनीं अधिकाऱ्यांनीं दौरे काढणें ( ३ ).

( ७ ) धर्ममहामात्र नांवाच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं धर्मप्रचारक खात्याची योजना ( ५ ).

( ८ ) स्त्रियांत धर्मप्रचार करण्यासाठीं स्त्री–अध्यक्ष–महामात्रांची नेमणूक ( १२ ).

( ९ ) धार्मिक हेतूनें राजानें दौरे काढणें, दानधर्म करणें व धर्मचर्चेसाठीं धर्मपरिषदा वगैरे भरविणें.

( १० ) धार्मिक उत्सव व मिरवणुकी काढणें. ( ४ )

स्तंभ–लेखांतून ( ख्रि. पू. २४३–२४२ ) उल्लेखिलेलीं कृत्यें—

( १ ) लेखांत निर्दिष्ट असलेल्या खेरीज इतर पशूंच्या व पक्ष्यांच्या हत्येला व हिंसेला मनाई ( स्तंभ० ५ ).

( २ ) न्यायाची व्यवस्था चोख रीतीनें व्हावी म्हणून रज्जुकासारख्यांना दिलेले स्वतंत्र अधिकार ( ४ ).

( ३ ) प्राणदंडाची शिक्षा दिलेल्या अपराध्यांना दिलेली तीन दिवसांची मुदत. ( ४ ).

( ४ ) राज्याभिषेकाच्या संस्मरणार्थ केलेल्या वार्षिक उत्सवाचे दिवशीं कैदी सोडणें ( ५ ).

( ५ ) रस्त्याच्या बाजूंनीं छायादार वृक्ष व आंब्याचीं झाडें लावणें, रस्त्यांवर अर्ध्या अर्ध्या कोसाच्या अंतरावर विहिरी खोदणें; विश्रांतीसाठीं धर्मशाळा बांधणें, आणि माणसें व पशु यांच्यासाठीं पाण्याच्या सोयी करणें ( ८ ).

☆ ☆ ☆

# प्रकरण दहावें

## अशोकाच्या लेखांचा थोडासा विचार

मागच्या प्रकरणांत वर्णिलेले अशोक राजाचे निरनिराळे गिरिलेख, स्तंभ-लेख, गुहालेख वगैरे जोंपर्यंत उपलब्ध झाले नव्हते तोंपर्यंत बौद्ध ग्रंथांतल्या दंतकथावजा माहितीवरच इतिहासलेखकांना व चरित्रकारांना अवलंबून राहावें लागत असे, आणि या दंतकथांतून इतकी अद्भुतता, असंभवनीयता, संदिग्धता परस्पर-विरोध व अतिशयोक्ति भरलेली आहे कीं,त्यांतला सत्यांश हुडकून काढण्याचें काम अतिशय दुष्कर वाटतें. एकाच गोष्टीसंबंधानें निरनिराळ्या ग्रंथांतून निर-निराळ्या दंतकथा दिलेल्या असल्या, आणि त्यांतल्या सत्यासत्याचा निर्णय करण्यास दुसरें कांहीं साधन उपलब्ध नसलें, म्हणजे पंडितांना केवळ स्वतःच्या सारासार-विवेचक बुद्धीवरच अवलंबून त्यांची ग्राह्याग्राह्यता निश्चित करावी लागते; आणि सर्वांची विवेचक बुद्धि सारखी प्रखर नसल्यामुळें एकाच गोष्टी-संबंधानें भिन्न पंडितांचीं भिन्न मतें पाहण्यांत येतात. अशोकाविषयींच्या दंतकथांसंबंधानें असाच प्रकार झालेला दिसतो. त्याच्या लेखांचा शोध लागल्या-नंतरसुद्धां कांहीं कालपर्यंत विचित्र मतें प्रचलित होतीं. कांहीं पंडित तर उघड उघड म्हणत कीं, अशोक ही ऐतिहासिक व्यक्तिच नव्हे;. कांहींतरी पौराणिक कल्पना आहे. भाविक बौद्धग्रंथकारांनीं स्वतःच्या धर्माचें स्तोम माजविण्याच्या हेतूनें कांहीं तरी भाकडकथा रचून कल्पित कादंबरींतल्या एखाद्या पात्रा-प्रमाणें अशोक हें अद्भुतरम्य पात्र निर्माण केलें आहे ! पण अशोकाचे लेख सांपडले, त्यांच्या भाषेची गुरुकिल्ली हातीं आली, आणि शेंकडों कोस अंतरावरच्या निरनिराळ्या लेखांच्या मजकुरांतून एकच गोष्ट पद्धतशीर-पणानें व निश्चित रीतीनें सांगितलेली आढळून येऊं लागली, तेव्हां हे लेख म्हणजे उगाच एखाद्या वेड्या पिरानें वेडाच्या लहरींत कोरलेलीं चित्रें नसून

त्यांत गूढ अर्थ किंवा ऐतिहासिक सत्य भरलेलें आहे अशी विचारी संशोधकांची खात्री होऊन दीर्घशंकी लोकांचीं तोंडें बंद झालीं. उपलब्ध झालेल्या लेखांचें ऐतिहासिकत्व सिद्ध झाल्यावरहि कित्येक पंडित म्हणत कीं, हे लेख ' देवानां पिय पियदस्सि लाजा ' याचे होत हें कबूल. पण हा राजा म्हणजे अशोकच याला काय प्रमाण ? ' पियदस्सि ' राजा व अशोक या कदाचित् भिन्न भिन्न व्यक्ति असतील. पुढें अशोकाच्या लेखांच्या अंतःप्रमाणावरून आणि अशोकासंबंधानें बौद्धग्रंथांत दिलेल्या गोष्टींपैकीं कित्येक गोष्टींचें सदर लेखांतल्या माहितीशीं सादृश्य आढळल्यावरून अशोक राजाचें ऐतिहासिकत्व एकदाचें सिद्ध झालें व ' पियदस्सि ' राजा व अशोक हा एकच असावेत अशी विद्वानांची खात्री झाली. उरलीसुरली शंका निजाम सरकारच्या राज्यांत नुकत्याच सांपडलेल्या मस्की येथील लेखानें पूर्णपणें दूर केली आणि अशोक व पियदस्सि राजा यांच्या अनन्यत्वाविषयींचें संशयपिशाच्च पुनः वर डोकें काढणार नाहीं अशा पक्कया बंदोबस्तानें आतां जमिनींत गाडलें गेलें आहे. अशोकाच्या चरित्रांतल्या इतरहि कित्येक गोष्टींसंबंधानें व त्याच्या धर्म-मतासंबंधानें या लेखांनीं बऱ्याचशा गोष्टी प्रकाशांत आणिल्या आहेत, आणि त्यावरून बरींचशीं सयुक्तिक अनुमानें काढण्यास साधन झालें आहे. बाह्य-प्रमाणापेक्षां अंतःप्रमाण केव्हांहि श्रेष्ठच समजलें जातें. तेव्हां अशोकाच्या जीवन-चरित्रासंबंधानें आजपर्यंत ज्या समजुती प्रचलित होत्या व अजूनहि ज्या कित्येक शंका किंवा आक्षेप घेण्यांत येतात, त्यांविषयीं खुद्द हे लेख काय सांगतात तें आपण पाहूं.

## दंतकथांचा उपयोग

- कित्येक बौद्धग्रंथांतून अशोकाच्या पूर्ववयांतल्या घटनांसंबंधानें व त्याच्या स्वभावाविषयीं जें सांगण्यांत आलें आहे त्यावरून त्या राजाचें कल्पनाचित्र जर कोणीं काढलें तर आपले प्रत्यक्ष बंधु, राण्या, वगैरे परिवारांतलीं माणसें यांच्या

रक्तानें ज्याचे हात माखले आहेत, आणि निरपराधी नागरिक व पांथस्थ यांच्या रुंडमाळा गळ्यांत घालून लोकांच्या मनांत थरकांप उत्पन्न होईल अशा रीतीनें थैमान घालणाऱ्या नरपिशाचाचें चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें उभें राहील. अशोकानें आपल्या भाऊबंदांना मारून मगधाचें राज्य बळकाविलें अशा कथा बौद्धग्रंथांतून आहेत. पण त्यासंबंधानें खुद्द अशोकाच्या लेखांत कांहीं एक प्रमाण मिळत नाहीं. उलट आपले पुष्कळ भाऊबंद पाटलीपुत्र नगरांत व अन्यत्र आहेत असा मोघम उल्लेख त्याच्या लेखांत आहे व त्यारून बौद्धग्रंथांतून दिलेल्या गोष्टी साफ खोट्या असल्या पाहिजेत असें जें अनुमान काढण्यांत येतें तें कसें शंकास्पद आहे तें मागें पांचव्या प्रकरणांत (पृ. ३५) वर सांगितलेंच आहे. अशोकाच्या कोणत्याहि लेखांतून त्याच्या पूर्ववयासंबंधाचा उल्लेख केलेला नाहीं, यावरून आणि अशोकाला कलिंगविजयानंतर जी उपरति झाली तिच्यामुळें त्याच्या जीवनक्रमास निराळेंच वळण लागलें असतां आपल्या जीवनांत अविचारानें घडलेल्या निंद्य व लज्जास्पद वर्तनावर विस्मृतीचा पडदा टाकण्याचीच बुद्धि कोणाहि विचारी माणसाला होणें स्वाभाविक आहे, हें लक्षांत घेतलें तर अशोकाच्या लेखांनीं बौद्धग्रंथांतली माहिती साफ खोडून काढली असें जें म्हणणें आहे त्याचें वैयर्थत्व मात्र सिद्ध होतें. बौद्धग्रंथांतलीं वर्णनें अतिरंजित असतील हें संभवनीय आहे. पण अशोक हा कलिंगविजयाच्या पूर्वी दुष्ट किंवा क्रूर वृत्तीचा मुळींच नव्हता व कलिंगयुद्धांत झालेल्या भयंकर कत्तलीच्या वेळीं पाहिलेले रक्ताचे पाट आणि नरमुंडांच्या घातलेल्या राशि पाहिल्यानें त्याच्या सात्त्विक वृत्तीला भरतें येऊन तो धर्ममार्गाला लागला असें म्हणण्याकडे लेखकांची जी प्रवृत्ति अलीकडे दिसत आहे तिला अशोकाच्या लेखांतून कसलाच पुरावा नाहीं. उलट पक्षीं अशोकाचा स्वभाव पूर्ववयांत राक्षसांप्रमाणें क्रूर व निर्दय नसला तरी बराच उग्र व लोकांना दहशत बसविण्यासारखा असला पाहिजे, आणि जितकी जोराची क्रिया असते, तितक्याच जोराची प्रतिक्रिया होत असते हा सृष्टिनियम ध्यानांत घेतला तर अशोकाच्या उत्तर वयांतल्या

साधुवृत्तीला खुलवून दाखविण्यासारखी कृष्णवर्ण पार्श्वभूमिका त्याच्या चरित्रांत असणें हेंच अधिक संभवनीय दिसतें. दंतकथांनीं ती पार्श्वभूमि अतिरंजित केली असेल; पण दंतकथा साफ खोट्या असल्या पाहिजेत असें म्हणण्या-सारखा भक्कम पुरावा अद्याप उपलब्ध झालेला नाहीं.

## अशोकाचा परिवार

अशोकाच्या परिवारासंबंधानेंहि त्याच्या लेखांत निश्चित अशी फार थोडी माहिती मिळते. अशोकाच्या लेखांचा उद्देशच मुळीं लोकांत धर्मोपदेशाचा प्रचार करणें हा होता. अर्थात् लोकांनीं कोणत्या धर्मभावना उराशीं बाळगाव्या, व कसें वागावें म्हणजे त्यांचें ऐहिक व पारत्रिक कल्याण होईल, याची आणि लोकांमध्यें धर्म व नीति यांच्याविषयीं सत्य कल्पना व विचार प्रसृत करण्या-साठीं आपण झटत आहों व त्यासाठीं कोणकोणते उपाय आपण योजिले आहेत याविषयींची माहिती त्या लेखांतून दिली आहे आणि ती देतांना प्रसंगोपात स्वतःविषयीं अशोकानें ओझरते उल्लेख केले आहेत. यावरून हें दिसून येईल कीं, सदर लेखांतून स्वतः राजा, किंवा त्याच्या राण्या, पुत्र, कन्या व इतर परिवार यांच्यासंबंधानें या लेखांतून आढळणारी माहिती पूर्ण आहे किंवा तिच्या पलीकडे दुसरीकडे कोठें आढळणारी माहिती झूट असली पाहिजे असें म्हणतां यावयाचें नाहीं. मात्र अन्यत्र मिळणारी माहिती सूक्ष्म रीतीनें चिकित्सा करूनच स्वीकारली पाहिजे. अशोकाच्या एका लेखांत त्याची 'दुसरी राणी' कारुवाकी व तिचा पुत्र तीवर यांचा उल्लेख आलेला आहे, आणि आणखी एका लेखांत 'अवरोधन' (म्हणजे अंतःपुर अथवा जनानखाना) असा शब्द आहे. यावरून अशोकराजाला दोन किंवा त्याहून जास्त राण्या असाव्या असें अनुमान काढतां येतें. त्यांची नक्की संख्या किती असेल हें कोणीं सांगावें? अशोकाचा पिता बिंदुसार याला १६ राण्या व १०१ (पुत्र व कन्या मिळून) संतति होती असें दीपवंश व महावंश या ग्रंथांत सांगितलें

आहे. तशा अशोकाला अ॰॰ राण्या असण्याचा संभव आहे. या राण्यां-शिवाय तो कुमारावस्थेंत उज्जयिनी येथें असतांना श्रेष्ठी जातीच्या एका सुंदर स्त्रीशीं त्याचा प्रेमव्यवहार होऊन तिच्यापासून त्याला संततीहि झाली होती असें बौद्धग्रंथांवरून दिसतें. या गोष्टीचा त्याच्या लेखांत उल्लेख होणें संभवनीय नाहीं; तथापि क्षत्रियांचे तत्कालीन रीतिरिवाज आणि अशोकाचें तारुण्य, अधिकार, वैभव इ. गोष्टींचा विचार करतां बौद्धग्रंथांतली यासंबंधाची कथा अविश्वसनीय म्हणतां येत नाहीं. अशोकाला अनेक भाऊ व बहिणी होत्या. त्यांचा स्पष्ट उल्लेख त्याच्या एका लेखांत आहे. त्याला चार पुत्र होते असें प्रो. देवदत्त भांडारकर लिहितात ( Asoka, p. 14 ). तक्षशिला, उज्जयिनी, सुवर्ण-गिरि व तोसली या चार मोठाल्या प्रांतांवर राजप्रतिनिधि म्हणून राजपुत्रांची नेमणूक करण्याची वहिवाट चंद्रगुप्ताच्या वेळेपासून होती व प्रांतांची संख्या चार म्हणून अशोकाच्या पुत्रांचीहि संख्या चार असावी असें अनुमान कदाचित् वरील विधानाच्या मुळाशीं असेल किंवा येवढ्यापुरत्या दंतकथा त्यांनीं प्रमाण मानिल्या असतील. पण ही विचारसरणी तर्कशुद्ध दिसत नाहीं.

अशोकाला चारुमती नांवाची एक मुलगी होती व ती देवपाल नांवाच्या एका क्षत्रियाला दिलेली होती. नेपाळांत पशुपति नांवाचें जें विख्यात देवस्थान आहे तेथें हें दांपत्य राहात होतें. या दांपत्यानें बरींच वर्षे संसारसुख भोगिल्या-नंतर वृद्धवयांत चारुमती एका मठांत जाऊन राहिली व तेथेंच तिचा अंत झाला. हा मठ नेपाळांत देवपाटणच्या जवळ अद्याप आहे आणि त्याच्या-जवळच अशोकाच्या वेळच्या कांहीं इमारतींचे अवशेषहि अद्याप आहेत असें व्हिन्सेंट लिहितो. चारुमतीशिवाय अशोकाला आणखी कांहीं मुली होत्या कीं काय याविषयीं नक्की माहिती मिळत नाहीं. संघमित्रा ही एक अशोकाची मुलगी होती व तिनें इकडून बोधिवृक्षाची शाखा सिंहलद्वीपांत नेऊन तिकडे बौद्धधर्माचा प्रसार केला अशी एक कथा सिंहली बौद्ध-ग्रंथांतून दिलेली आढळते. ‘ संघमित्रा ’ या शब्दाचा अर्थ बौद्धसंघाची

किंवा समाजाची मैत्रीण–साह्यकर्त्री–कल्याण करणारी–असाहि होऊं शकतो. यावरून ती खरोखर कोणी व्यक्ति नसून बौद्धग्रंथकारांची मानसकन्या–कल्पित व्यक्ति–असावी असें अनुमान प्रो. ओल्डेनबर्ग यांनीं विनयपितक ग्रंथाच्या प्रस्तावनेंत लिहून ठेविलें आहे, आणि व्हिन्सेंट स्मिथ यानेंहि तें मान्य केलें आहे. पण केवळ ‘ संघमित्रा ’ या नांवाच्या अर्थावरून वरील तर्क स्थापित करूं पाहणें आणि ज्या व्यक्तीसंबंधानें बौद्धग्रंथांतून अनेक उल्लेख आहेत व ज्या उल्लेखांना सिंहलद्वीपांतल्या प्रचलित दंतकथांकडून पुष्टि मिळत आली आहे, त्या व्यक्तीचें अस्तित्वच साफ नाकबूल करणें हा मार्ग कोणत्याहि प्रकारें प्रशस्त म्हणतां येत नाहीं. संघमित्रेबरोबर तिचा भाऊ महींद्र किंवा महिंद हाहि सिंहलद्वीपांत बौद्धधर्माच्या प्रचारार्थ गेला होता. त्याचें ऐतिहासिक अस्तित्व पाश्चात्य पंडितांना मान्य आहे. मात्र तो महिंद्र हा अशोकाचा पुत्र नसून त्याचा भाऊ होता असें व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो. याशिवाय तिष्य नांवाचा एक भाऊ, अग्निब्रह्म नांवाचा पुतण्या, आणि सुमन हा एक नातू इतकीं माणसें अशोकाच्या परिवारांत होतीं असें सिंहली दंतकथांवरून कळतें.

अशोकाच्या लेखांतून व बौद्धग्रंथ आणि दंतकथा यांच्यावरून अशोकाच्या एकंदर कुटुंबियांची जर एक यादी तयार केली तर ती येणेंप्रमाणें होईल—

**अशोकाचा पिता**–बिंदुसार ( याला १६ राण्या होत्या. )

” **माता**–सुभद्रांगी ( हिलाच धर्मा असेंहि नांव होतें. )

**बंधु** १ सुमन किंवा सुसीम ( सर्वांत वडील ). सापत्न बंधु. ( २ ) तिष्य–धाकटा बंधु. यालाच वीताशोक किंवा विगताशोक असें नांव होतें. ( ३ ) महींद्र किंवा महिंद.

[ थेरगाथाटीका या बौद्धग्रंथांत वीताशोक हा तिष्याहून निराळा दाखविला आहे. ]

## परिवाराची जंत्री

**राण्या**–१ देवी किंवा विदिशा–महादेवी शाक्यकुमारी ( अशोक उज्जयिनीस असतांना एका श्रेष्ठिकन्येशीं त्यानें लग्न केल्याचें वर सांगितलें आहे ती.) २ असंधिमित्रा (अग्रमहिषी अथवा पट्टराणी); ३ 'द्वितीया देवी तीवरमाता' (तीवराची आई या संज्ञेनें जिचा उल्लेख लेखांत केलेला आहे ती ); हिचें नांव कारुवाकी असें होतें; ४ पद्मावती ( कुणालाची आई ); ५ तिष्यरक्षिता ( अशोकाची शेवटची अग्रमहिषी. हिनें कुणालाचे डोळे कपटानें काढविले अशी दंतकथा आहे. )

**पुत्र**–१ महींद्र किंवा महिंद ( देवीचा पुत्र.) ( हा अशोकाचा भाऊ होता असें व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो ); २ तीवर (कारुवाकी राणीचा पुत्र ); ३ कुणाल ( पद्मावती राणीचा पुत्र. याला दिव्यावदान ग्रंथांत 'धर्मविवर्धन' म्हटलें आहे. कुणाल हें नांव त्याचे डोळे कुणाल जातीच्या मृगाच्या डोळ्यांसारखे सुंदर होते त्यावरून पडलें होतें. ) ४ जलौक ( हें नांव काश्मीरच्या राजतरंगिणी नामक इतिहास–ग्रंथांत आढळतें. )

[ अशोकाच्या साम्राज्याच्या चार मोठाल्या प्रांतांवर चार 'कुमार' किंवा 'आर्यपुत्र' नेमिले होते असें प्रो. भांडारकर म्हणतात ते हेच चार राजपुत्र असावेत. ]

**कन्या**–१ संघमित्रा ( देवीची मुलगी. ) (हिनें बोधिवृक्षाची फांदी सिंहलद्वीपांत नेऊन तेथें आपला भाऊ महिंद याच्याबरोबर बौद्धधर्माचा प्रसार मोठ्या उत्साहानें केला. ) २ चारुमती ( ही देवपाल नांवाच्या एका क्षत्रिय कुमाराला दिली होती. पुढें उतारवयांत ती एका मठांत जाऊन राहिली व तेथेंच वारली. हिच्या स्मरणार्थ अशोकानें नेपाळांत देवपाटण हें शहर व चार स्तूप बांधले अशी कथा आहे. )

**जांवई**–१ अग्निब्रह्मा ( संघमित्रेचा पति. हा अशोकाचा संबंधी होता. याला एक मुलगा होता. त्याचें नांव सुमन. ) २ देवपाल ( चारुमतीचा पति. )

नातू–१ दशरथ ( अशोकाच्या मागून त्याच्या गादीवर बसला. ); २ संप्रति ( कुणालाचा पुत्र ); ३ सुमन ( संघमित्रेचा पुत्र )

## अशोकाच पूर्वींचा धर्म कोणता ? जैन ?

अशोकानें बौद्धधर्म स्वीकारला त्यापूर्वी तो कोणत्या धर्माचा होता ? असा एक प्रश्न कित्येक पंडितांनीं उपस्थित केला आहे. कलकत्त्याच्या संस्कृत कॉलेजचे प्रिन्सिपाल प. वा. महामहोपाध्याय सतीशचंद्र विद्याभूषण यांच्या व दुसऱ्या कित्येक पंडितांच्या[१] मतें चंद्रगुप्त हा जैनधर्मी होता, आणि उत्तरवयांत राज्यत्याग करून तो एका जैन साधूबरोबर दक्षिणेंत निघून गेला. तिकडे तो बारा वर्षे होता. या अवधींत आहार रोज थोडा थोडा कमी कमी करीत जाण्याचा क्रम त्यानें ठेविला होता. अखेर शरीरयात्रेला आवश्यक पोषकद्रव्यांच्या अभावीं त्याचा अंत झाला. त्याचाच नातू अशोक, तेव्हां तोहि अर्थात् जैनधर्मी असला पाहिजे. ही तर्कपद्धति अनेक प्रकारें दूषित आहे. पहिली गोष्ट ही कीं, चंद्रगुप्तानें जैनधर्म स्वीकारला होता या विधानाला जैन लेखकांच्या लेखांशिवाय अन्य कांहीं पुरावा मिळत नाहीं. दुसरी गोष्ट ही कीं, चंद्रगुप्त हा जैनधर्मी असता तर तो कधीं शिकारीला गेला नसता. कारण शिकार म्हणजे हिंसा, आणि ती जैन धर्ममताप्रमाणें अत्यंत निषिद्ध होय. चंद्रगुप्त शिकारीला जात असे या गोष्टीला प्रमाण तत्कालीन परदेशीय प्रवाश्यांनीं लिहून ठेविलेलीं चंद्रगुप्ताच्या थाटाच्या शिकारयात्रेचीं भपकेदार वर्णनें हा आहे. शिवाय चंद्रगुप्ताच्या पाकशाळेंत रोज शेंकडों प्राण्यांचा वध होत असे असा विश्वसनीय उल्लेख सांपडतो. चंद्रगुप्त जैनधर्मी असता तर ही गोष्ट शक्य नव्हती. तेव्हां तो जैनधर्मी नव्हता असेंच अनुमान बिनधोक काढतां येतें. तो जैनधर्मी नव्हता

१. Edward Thomas यांचा Journal of the R. A. Society, Vol. IX मधील लेख पाहा.

तर कोणत्या धर्मांत होता? या प्रश्नाचें उत्तर सनातन वैदिक धर्मी म्हणजे ब्राह्मणधर्मी हेंच होय. कलिंगविजयाच्या काळापूर्वीचीं अशोकाच्या चरित्राचीं विश्वसनीय साधनें उपलब्ध असतीं तर त्यांवरून या प्रश्नाचा निश्चयात्मक निर्णय करतां आला असता. त्यांच्या अभावीं खुद्द अशोकाच्या लेखांतल्या एक दोन उल्लेखांवरूनहि ही गोष्ट सिद्ध करतां येण्यासारखी आहे. अशोकाच्या लेखांत (गिरिलेख नं. १ व ८) यांत अशोकाच्या पाकशाळेंत अनेक पशूंचा वध रोज होत असल्याचा व शिकारीस जाण्यासंबंधाचा उल्लेख आहे. क्षत्रियांना मांस-भक्षण, मृगया, द्यूत इ. गोष्टींची मुभा सनातन वैदिक किंवा ब्राह्मणधर्मानें ठेविलेली आहे. कौटल्याच्या नीतिशास्त्रांतहि या गोष्टींना मनाई केलेली नाहीं. मात्र राजानें या गोष्टी अतिरिक्त प्रमाणांत करूं नये, केल्यास 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः।' या उक्तीप्रमाणें प्रजाहि तसें करूं लागेल व अधिकारी-वर्ग, शेटसावकर, व्यापारी, कारागीर इ. सर्वच लोक नाचरंग व ख्याली-खुशाली यांत रममाण होऊं लागल्यास देशाच्या उत्कर्षाची हानि होईल, अशी क्षत्रियांना सावधगिरीची सूचना देऊन ठेविली आहे. सारांश, बौद्धधर्म स्वीकारण्यापूर्वी अशोक सनातन ब्राह्मणधर्मी होता याविषयीं शंका घेण्यास तिळ-मात्र जागा दिसत नाहीं.

## एक नवा आक्षेप

अशोकाच्या धर्ममतासंबंधानें आणखी एक प्रश्न उपस्थित करण्यांत आला आहे. तो असा—कांहीं पंडितांचें[1] म्हणणें आहे कीं, कलिंगविजयानंतर अशोकानें बौद्धधर्म स्वीकारला असें जें इतिहासकार लिहितात त्याला अशोकाच्या लेखांत कोठें पुरावा नाहीं.चौदावा गिरिलेख व सातवा स्तंभलेख यांत बौद्धमताची

1. Rev. H. Heras' article on 'Asoka's Dharma and Religion' in the *Quarterly Journal of the Mythic Society* of Bengalore.

थोडीशी छाया पडलेली दिसते खरी; पण प्रत्यक्ष बौद्ध मतांचा, बौद्ध शास्त्रग्रंथांचा फार काय, पण खुद्द गौतमबुद्धाचाहि नामनिर्देश अशोकाच्या साऱ्या लेखांतून शोधतां कोठें सांपडत नाहीं. डॉ. फ्लीट यांचेंहि जवळ जवळ असेंच म्हणणें आहे.

## आक्षेपास उत्तर

वरील आक्षेप फुंकारानें उडवून देण्याइतक्याहि योग्यतेचा खरोखर नाहीं. अशोकाचे लेख नुसते वरवर वाचले तरी सुद्धां वरील आक्षेपाचा फोलपणा कोणालाहि दिसून येईल. अशोकाच्या लेखांच्या व इमारती वगैरेंच्या अंतर्बाह्य दोन्ही स्वरूपांत बौद्धधर्माचें लक्षण स्पष्टपणें प्रतीत झालेलें दिसून येतें. प्रथम आपण बाह्यस्वरूपाचा विचार करूं. हत्ती हें बौद्ध धर्माचें एक महत्त्वाचें बाह्य चिन्ह समजलें जातें. धौली येथील लेख कोरलेल्या जागीं हत्तीचें चित्र आहे. कालसी येथील लेखाच्या खालीं हत्तीचें चित्र असून त्याच्याखालीं 'गजतमे' अशीं अक्षरें आहेत. गिरनारच्या शिलालेखाखालीं 'श्वेतो हस्ती सर्व लोक सुखाहरो नम' असे शब्द आहेत. अशोकानें जे जे मठ, विहार, स्तूप, चैत्य इ. बांधकामें करविलीं तीं बौद्धाच्याच विशिष्ट शिल्पपद्धतीचीं आहेत. हें बाह्यस्वरूपा-संबंधानें झालें. अंतःस्वरूपाचा पुरावा तर याहूनहि बलवत्तर आहे. अशोकाच्या लेखांत बौद्धधर्मातले विशिष्ट पारिभाषिक शब्द त्या त्या विशिष्ट अर्थानें आले आहेत. नेपाळ–तराईतल्या निग्लीव येथील स्तंभलेखांत कनकमुनि नांवाच्या बौद्धसाधूच्या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा उल्लेख आहे. कांहीं लेखांतून बुद्धाच्या जन्मभूमीचें दर्शन घेऊन त्याची पूजा केल्याचा, आजीवकांना गुहादान केल्याचा, व अशोक स्वतः उपासक झाल्याचा, असे उल्लेख आहेत. भाब्र येथील लघुशिलालेखांत 'पियदसि लाजा मागधं संघं अभिवादनं आहा अपा-बाधतंच फासु विहालतं चा' असे शब्द आहेत. यांत 'संघ' व 'विहार' हे बौद्धधर्माचे विशिष्ट अर्थाचे शब्द आले आहेत. याच लेखांत पुढें बौद्धधर्मातले त्रिरत्न ( बुद्ध, धर्म व संघ ) व त्याचप्रमाणें विनयसमुत्कर्ष, मुनिगाथा,

मौनेयसूत्र, राहुलवाद इ. सात प्रमुख बौद्ध धर्मग्रंथांचा उल्लेख करून या ग्रंथांचें वरचेवर पठण करून उपासक व उपासिका यांनींहि त्यांचें श्रवण करावें असें अशोकानें बौद्धधर्मी लोकांना बजाविलें आहे. इतर कोणत्याहि धर्मांचा, धर्ममतांचा, शास्त्रग्रंथांचा, देवतांचा किंवा साधूंचा अशा तऱ्हेनें त्यानें लेखांतून उल्लेख केलेला नाहीं. यावरून अशोकाला बौद्धधर्माविषयीं आत्मीयता वाटत होती, याशिवाय अन्य कोणतें अनुमान तर्कशुद्ध रीतीनें काढतां येईल ? रूपनाथ येथील पहिल्या लघुशिलालेखांत तर आरंभींच 'सातिलेकानि अढतियानि वय सुमि पाका सवके नो चु बाढिपकते'। म्हणजे मला श्रावक ( उपासक ) होऊन अडीच वर्षें होऊन गेलीं, पण माझ्या हातून विशेष प्रयत्न झाला नाहीं, असें अशोकानें स्पष्ट म्हटलें आहे. अशोकानें बौद्धधर्माच्या उपासकत्वाची दीक्षा घेतली होती या गोष्टीविषयीं आतां कांहीं शंका राहिली आहे काय ?

## बौद्धधर्म कीं सामान्य नीतिधर्म ?

वरील आक्षेपकांचें आणखी असें म्हणणें आहे कीं, अशोकानें आपल्या लेखांच्या द्वारें ज्या धर्माचा उपदेश केला तो धर्म बौद्धधर्म नसून सामान्य धर्म अथवा नीतिधर्म हा होता. एखादा ब्राह्मणधर्मी राजा आपल्या प्रजेमध्यें नीतीचा प्रसार व्हावा या उद्देशानें उपदेश करण्यास निघाला असता तर त्यानेंहि अशोकासारखाच उपदेश केला असता.

या आक्षेपाच्या पूर्वार्धांत कांहीं तथ्य आहे. पण उत्तरार्धासंबंधानें तसें म्हणतां येईलसें वाटत नाहीं. ब्राह्मणधर्मात वर्णाश्रमव्यवस्थेला फारच महत्त्व देण्यांत आलेलें आहे आणि नीतिशास्त्र व धर्मशास्त्र यांची फारकत करतां येत नसल्यामुळें धर्मशास्त्रानुसार ठरलेल्या वर्णाश्रमव्यवस्थेची छाया त्या त्या वर्णांच्या व आश्रमाच्या नीतिनियमांवर पडलेली आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' ही गीतोक्ति सुप्रसिद्धच आहे. प्रत्येक वर्णाची व आश्रमाची नीति जेथें निराळी करण्यांत आली आहे, तेथें सर्वांस सामान्य असा नीत्युपदेश

अशोकाप्रमाणें कोणाहि ब्राह्मणधर्मी राजाला करतां आला असता या म्हणण्यांत काय तात्पर्य आहे ?

वरील आक्षेपाच्या पूर्वार्धांत तथ्य आहे असें जें वर म्हटलें आहे त्याचा येथें थोडासा खुलासा केला पाहिजे. अशोकाच्या उपदेशांचा किंवा लेखांचा कांहीं भाग केवळ बौद्धधर्मीयांसच उद्देशून लिहिलेला असला तरी पुष्कळसा भाग ( उदा० लघुशिलालेख नं. २ ) सर्व धर्ममतांच्या लोकांना समान असा आहे. प्रत्येक धर्माचीं दोन अंगें असतात—१ सिद्धान्तविषयक आणि २ नीतिविषयक. पहिल्या अंगांत धर्ममतें, विधि, संस्कार इत्यादिकांचा समावेश होतो; आणि दुसऱ्यांत माणसामाणसांचे परस्परसंबंध, व्यवहार, आणि कार्याकार्यनिर्णय वगैरे गोष्टींचा संबंध येतो. पहिलें अंग प्रत्येक धर्माचें निरनिराळें असूं शकतें, आणि त्यामुळें मतभेदाला पुष्कळ जागा राहते. जगांत जे धर्मकलह उत्पन्न होतात व प्रसंगविशेषीं रक्तपातालाहि कारण होतात, ते बहुधा या पहिल्या अंगाच्या संबंधानें निरनिराळ्या पक्षांतल्या दुरभिमानमूलक अभिनिवेशामुळें होत असतात. दुसऱ्या अंगांत सर्वांना समान असाच व्यवहार-नीतीचा व सदाचरणाचा सगळा भाग असतो. त्यामुळें भिन्न मतें होण्याला फारसा वावच नसतो. ही गोष्ट ध्यानांत घेतली व अशोकाच्या लेखांतला बराचसा भाग नीतिविषयक आहे हें लक्षांत घेऊन विचार केला, म्हणजे वरील आक्षेपाच्या पूर्वार्धांत कांहीं सत्यांश आहे असें जें वर म्हटलें आहे त्यांतला हेतु काय तें सहज दिसून येईल. अशोकानें जनतेला ज्याचा उपदेश आपल्या लेखांतून केला आहे तो धर्म म्हणजे सर्वजनोपयोगी व्यावहारिक नीतिधर्म होय. निरनिराळ्या धर्ममतांतून सर्वसाधारण असा महत्त्वाचा भाग कोणता तो अशोकानें निवडून काढला, म्हणजे धर्मांच्या अनेकत्वांतलें एकत्व शोधून काढलें, आणि ‘ हा घ्या मानवधर्म ’ असें म्हणून तें जनतेपुढें ठेविलें. हा जो सर्व धर्मांतला महत्तम सामान्य उपयुक्त भाग त्यालाच नीति हें दुसरें नांव आहे, यापलीकडे निराळें असें कांहीं नाहीं.

## अशोकाच्या धर्मकल्पनेचा विकास

अशोकाच्या जीवनक्रमांत धर्मकल्पनेचा कसा विकास होत गेला हें त्याच्याच लेखांवरून दिसून येतें. अशोक हा कलिंगविजयाच्या काळापर्यंत ब्राह्मणधर्मी होता हें वर दाखविलेंच आहे. कोणी म्हणतात कीं, तो शिवभक्त होता. त्या काळीं वैदिक यज्ञयागाचे प्रसंगीं पशुहनन करण्याची चाल जोरानें प्रचारांत होती. याशिवाय देवतांना पशूंचे बलि देण्याचाहि प्रघात होता. आपल्या पाकशाळेंत रोज सहस्रावधि प्राणी मारले जात असत असें जें अशोकानें आपल्या एका लेखांत म्हटलें आहे त्याचा संबंध देवाला नैवेद्यासाठीं रोज वन्याचशा पशूंचें मांस लागत असे या गोष्टीशीं असण्याचा बराच संभव आहे. पण जसजसा बौद्ध धर्माचा प्रसार होत गेला तसतसा पशुहिंसेला आळा बसत गेला. खुद्द अशोकाच्या पाकशाळेंत जेथें पूर्वी रोज सहस्रावधि प्राण्यांचें हनन होत असे, तेथें पुढें पुढें रोज दोन मोर व एक हरिण असे तीनच पशु मारले जाऊं लागले, असें वाक्य त्याच्या लेखांतच आहे.

पुढें पुढें अशोकानें शिकार बंद करून टाकिली याविषयींचा उल्लेख आठव्या गिरिलेखांत आहे. शिकारीचा निषेध करूनच तो स्वस्थ बसला नाहीं; तर मृगयेसाठीं बाहेर पडण्याच्या म्हणजे विहारयात्रेच्या ऐवजीं त्यानें धर्मयात्रेस निघण्याचा प्रचार पाडला. अशा धर्मयात्रेच्या प्रसंगानें ब्राह्मणधर्मी, बौद्धधर्मी व जैनधर्मी साधुसंतांचीं दर्शनें घडत. विद्वानांचा परामर्श घेण्याची व दीन, दरिद्री, अनाथ, पंगू इ. लोकांना साह्य करण्याची त्याचप्रमाणें गांवोगांवीं लोकांना धर्मोपदेश करण्याचीहि संधि मिळे. याप्रमाणें अशोकाच्या मनांत प्रथम हिंसेविषयीं घृणा उत्पन्न झाली, आणि जरी आपल्या राज्यांतून ती अजिबात नष्ट व्हावी अशी त्याची इच्छा असली, तरी एकंदर प्रजेची तितकी तयारी नसल्यामुळें त्याला लोकांना चुचकारूनच सुधारणा अमलांत आणावी लागली. पुढें त्यानें हिंसेसंबंधानें

बरेच कडक नियम केले व त्यामुळें हिंसेला चांगला आळा बसला. वर्षांतून ५६ दिवस तर हिंसा अजिबात बंद असे, ही गोष्ट पांचव्या स्तंभलेखांत स्पष्टपणें नमूद करण्यांत आली आहे. त्याच्या धर्मकल्पनेच्या विकासाच्या पुढच्या पायऱ्या म्हणजे सत्यप्रियता, मातापितरें आणि गुरुजन यांच्याविषयींचा आदरभाव, नोकरचाकर, दास व इतर माणसें आणि त्याचप्रमाणें मूक प्राणी यांच्याशीं दयाळूपणाचें वर्तन इ. होत. कौटलीय अर्थशास्त्रांत (अधिकरण ३ अध्याय १३ व १४) दास, भृत्य व सेवक यांच्याशीं निष्ठुरपणानें वर्तन करण्याची मनाई केलेली आहे. अशोक नुसती मनाई करूनच थांबला नाहीं. त्यानें क्रूरपणाचें वर्तन करणारास कडक शिक्षा सांगितली आहे. हे दिसण्यांत साधे पण आचरण्यास कठीण असे सर्वसामान्य व्यवहारांतले नीतिपर नियम योग्य रीतीनें पाळणाराची वृत्ति हळू हळू धर्माच्या उच्च अंगाकडे वळणें स्वाभाविक होतें. त्याप्रमाणें अशोकाचीहि वृत्ति तिकडे वळली. त्याच्या धर्मकल्पनेंतला संकुचितपणा पार निघून जाऊन ती विस्तृत व उदार बनली. तो ब्राह्मण, श्रमण, आजीवक इ. भिन्न भिन्न धर्मसंप्रदायी लोकांचा सारखा आदर करून त्यांना समान दृष्टीनें पाहूं लागला. त्यानें स्वतः बौद्धधर्म स्वीकारला होता, तरी सर्व धर्मपंथांच्या मंदिरांचा व साधुसंतांचा तो परामर्श घेई. धर्माच्या संबंधानें मनाचा संकुचितपणा किंवा दुरभिमान त्याच्या ठायीं काडी-मात्र नव्हता ही गोष्ट त्याचे लेख वरवर वाचणाराच्यासुद्धां सहज लक्षांत येण्याजोगी आहे. आपल्या प्रजेंत कोणत्या का होईना पण धर्माचा प्रसार अवश्य व्हावयास पाहिजे, म्हणून त्यानें सर्व धर्मांना पटणारीं अशीं सामान्य तत्त्वें म्हणजे अर्थात् नीतिपर आचरणाचे नियम व नीतीविरुद्ध गोष्टींचा निषेध यांचाच उपदेश आपल्या लेखांतून बहुधा केला. दोन चार लेखांत मात्र त्यानें बौद्ध धर्माचा उल्लेख केलेला आहे. अशोकाच्या पूर्वी झालेल्या कित्येक राजांनीं धर्मप्रचारासाठीं केलेले प्रयत्न व अशोकानें केलेले प्रयत्न यांच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा विरोध असण्याला कारण नव्हतें. मीं पूर्वीच्याच राजांचा

क्रम पुढें चालविला आहे असें अशोकानें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे.

## त्याची समदृष्टि व भूतदया

पूर्वीच्या हिंदुधर्मी राजांनीं लोकांमध्यें जो नीतिप्रसार केला त्यापेक्षां अशोकानें निराळें कांहीं केलें नाहीं. अशोकानें त्यांच्यापेक्षा जें कांहीं अधिक केलें तें येवढेंच कीं, आपल्याच प्रजेची नीतिमत्ता व धर्मश्रद्धा दृढ करण्याचा यत्न करून तो थांबला नाहीं; तर आपल्या शेजारपाजारच्या राज्यांतून, सिंहलद्वीपासारख्या दूरच्या देशांतून आणि म्लेंच्छ, यवन इ. च्या राज्यांतूनहि त्यानें त्या तऱ्हेचे प्रयत्न केले ही एक गोष्ट आणि दुसरी अशी कीं, त्यानें आपले आदेश दगडावर कोरून ठेवून त्या आदेशांना चिरस्थायित्व दिलें. ही दुसरी गोष्ट मात्र अपूर्व होती. यांशिवाय पशुपक्ष्यांच्या चिकित्सेसाठीं त्यानें ज्या सोयी करून ठेविल्या त्यांना तर पृथ्वीतलावर दुसरी तुलनाच नाहीं. प्राणिमात्राविषयीं त्याची समदृष्टि होती याचें हें उत्कृष्ट प्रमाण आहे. एका विशिष्ट धर्मपंथाविषयींच्या दुरभिमानानें ज्याची दृष्टि संकुचित झालेली आहे, अशा माणसाच्या हातून अशा तेऱ्हेचें भूतदयेचें महत्कार्य घडून येणें अशक्य आहे.

अशोकाच्या धर्मकल्पनेचें स्वरूप काय होतें तें त्याच्या एकंदर लेखांतल्या धर्माज्ञांवरून पाहिलें पाहिजे. या आज्ञा कांहीं विधिपर व कांहीं निषेधपर अशा दोन प्रकारच्या आहेत. त्यांपैकीं विधिपर आज्ञा येणेंप्रमाणें आहेत:—

## विधिपर धर्माज्ञा

सर्व प्राण्यांवर दया करा; नात्यागोत्याच्या व इतर सर्व माणसांशीं योग्य वर्तन ठेवा; मातापिता व वडील माणसें यांची शुश्रूषा करा; दानधर्म करा, तोच तुमच्या उपयोगी पडेल; ऐहिक कल्याण तर साधाच; पण पारमार्थिक

कल्याण हें श्रेष्ठ आहे, तें साधण्याचा प्रयत्न सतत चालू ठेवा. सत्य बोला. धर्माचरण करा इ०.

राजाच्या शिरावर स्वतःच्या ऐहिक व पारलौकिक कल्याणसाधनाची जबाबदारी असतेच. पण त्याशिवाय प्रजा ही त्याच्या लेंकरांसारखी असल्यामुळें तिच्याहि दोन्ही प्रकारच्या कल्याणासाठीं त्यानें जपलें पाहिजे. म्हणून राजांसाठीं कांहीं विशेष कर्तव्यें अशोकाच्या लेखांत सांगितलेलीं आहेत. तीं कर्तव्यें म्हणजे धर्मघोष, धर्मयात्रा, धर्मविजय, धर्मानुग्रह, धर्मदान व धर्ममंगल हीं होत. याशिवाय समान अनुशासन, न्यायदान, राजकर्मपरता, कर्तव्यबुद्धि, यशोलिप्सा, दयामिश्रित न्यायकठोरता, मूक प्राण्यांचें रक्षण इ.

## निषेधपर आज्ञा

( १ ) हिंसेचा निषेध ( आदेश नं. ३, ४, ११ व स्तंभलेख पाहा ).

( २ ) सजीव प्राण्याला न दुखविणें ( आदेश नं. ४, ९, १३ व स्तंभलेख ७ ).

( ३ ) उत्सवांत निंद्य गोष्टी न करणें ( आदेश नं. १ )

( ४ ) ज्यापासून फलनिष्पत्ति नाहीं अशा मूर्खपणाच्या सामाजिक किंवा धार्मिक गोष्टी न करणें ( आदेश नं. ९ ).

( ५ ) आत्मस्तुति व परनिंदा न करणें ( आदेश नं. १२ ).

## धर्माचें ध्येय

वरील विधि–निषेधात्मक आज्ञांवरून हें दिसून येईल कीं, अशोकाचा धर्म हा इंग्रज लेखक म्हणतात त्याप्रमाणें ( Law of Piety ) सात्त्विक वृत्तिपर तर होताच, पण तो केवळ ऐहिक गोष्टींतच गुरफटून राहिलेला नव्हता. त्याचें ध्येय ऐहिक व पारलौकिक कल्याण साधणें हें होतें. अहिंसा, सत्यनिष्ठा, निष्कामकर्म, परोपकार इ. गोष्टी पारलौकिक कल्याण साधणाऱ्या

आहेत अशी त्याचे ठायीं दृढ श्रद्धा होती. त्याचा धर्म केवळ तर्कप्रतिष्ठित नव्हता, तसा केवळ भावनाप्रधानहि नव्हता. माणसाच्या ऐहिक व पारलौकिक कल्याणासाठीं त्याच्या दृष्टीनें जीं कर्तव्यें अवश्य दिसलीं तीं इतरांशीं वाद व खंडनमंडन यांच्या भानगडींत न पडतां त्यानें कळकळीनें, सरळपणानें आणि सुबोध करून सांगितलीं आहेत. बौद्धग्रंथांतून एक गोष्ट पुनः पुनः सांगण्यांत येत असते ती ही कीं, ईश्वराच्या अस्तित्वासंबंधानें गौतमबुद्धानें पूर्ण मूकव्रत धारण केलें होतें आणि माणसाच्या कर्तव्याचरणावरच त्याच्या कल्याणाचा सर्व भार त्यानें टाकून दिला. अशोकानेंहि तेंच केलें आहे. त्यानेंहि कर्तव्याचरणावरच जोर दिला आहे. ईश्वराची कृपा किंवा अनुग्रह यांच्यासंबंधानें एक अक्षरसुद्धां चुकून काढलें नाहीं. अशोकाचा धर्म पूर्ण स्वावलंबनाच्या मजबूत पायावर बसविलेला होता.

## अंधश्रद्धेचा अभाव

अशोकाच्या धर्मकल्पनांसंबंधानें लिहितांना आणखी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगितली पाहिजे. ती ही कीं, त्याच्या धर्मोपदेशांत कोठेंहि अंधश्रद्धेला स्थान दिलेलें नाहीं. त्यानें ही सृष्टि कोणीं, केव्हां व कशाकरितां केली याचें कोठेंहि निरूपण केलेलें नाहीं; किंवा ईश्वर व सृष्टिप्रलय यांचेंहि वर्णन केलेलें नाहीं. धर्माचे अमके सिद्धान्त ऋषींनीं किंवा बुद्धानें घालून दिले आहेत आणि ते सत्य समजून पाळणें तुमचें कर्तव्य आहे असेंहि कोठें म्हटलें नाहीं. त्यानें धर्माचें व्यावहारिक अंग तेवढें लोकांपुढें मांडलें. उत्कृष्ट धार्मिक सिद्धान्तांना डोळे मिटून केवळ बौद्धिक मान्यता देण्यापेक्षां नित्याचरणाची महती पुष्कळ मोठी आहे; सत्यनिष्ठा आणि सत्कर्म याच गोष्टी माणसांना या मृत्युलोकीं आत्मोन्नति करून घेण्याचीं साधनें आहेत व आत्मशक्ति ही पृथ्वीवरल्या कोणत्या शस्त्रास्त्रांपेक्षां अधिक प्रभावशाली आहे अशी अशोकाच्या मनाची पूर्ण खात्री झाली होती, ही गोष्ट त्याच्या धर्मविचारांत प्रामुख्यानें दिसून येते. सर्व

धर्मपंथ सत्याकडे व आत्मोन्नतीकडे नेणारे असल्यामुळें त्यांच्याविषयीं योग्य आदर दाखविण्याचा उपदेश त्यानें केला आहे. धर्मसिद्धान्तांविषयीं वितंडवाद घालून शब्दच्छल करणें व आपल्या मताची श्रेष्ठता स्थापित करूं पाहणें हा केवळ बुद्धीचा विलास किंवा कसरत म्हणता येईल. पण अशा कसरतीनें मनुष्य खरा धर्मात्मा बनूं शकेल असें समजणें हा निवळ भ्रम आहे. आत्म्याची खरी उन्नति होण्यास चिंतनाबरोबर सत्यनिष्ठा, परोपकारबुद्धि, भूतदया इ. गोष्टी प्रत्यक्ष आचरिल्याच पाहिजेत. सर्व प्राण्यांविषयीं समदृष्टि ठेवून सर्वांना सारख्या तऱ्हेनें वागविणें हें महापुरुषाचें लक्षण आहे, आणि तें अशोकाच्या ठायीं मूर्तिमंत होतें. त्यानें कोणतेहि नवे धर्मसिद्धान्त लोकांना सांगितले नाहींत; तथापि आचरणानें ते लोकांना पटविले यांतच त्याची थोरवी आहे.

## अशोकाच्या लेखांतला एक विशेष

अशोकाच्या बहुतेक साऱ्या लेखांतून एक विशेष गोष्ट ही दिसते कीं, कोणतीहि आज्ञा जाहीर करतांना राजानें स्वतःचा अवगुण झाकून ठेवण्याचा प्रयत्न न करतां उलट तो मोकळ्या मनानें कबूल केला आहे. उदाहरणार्थ, हिंसानिषेधपर ( गिरिलेख पहिला ) राजाज्ञा घ्या. तींत यज्ञार्थ पशूचें हनन व बलिदान या गोष्टी करूं नयेत असें सांगितलें आहे; त्याचप्रमाणें मांसाहाराचाहि निषेध केला आहे. पण ह्या राजाज्ञेंतच या बाबतींत स्वतःच्या हातून घडत असलेला दोष कबूल करून, यापुढें तो न घडेल अशी प्रतिज्ञाहि शेवटच्या वाक्यांत स्पष्ट शब्दांनीं केली आहे.

## हिंसा आणि अहिंसा

सजीव प्राण्यांची हिंसा करूं नये अशा अर्थाच्या आज्ञा दुसऱ्याहि कित्येक लेखांतून देण्यांत आल्या आहेत. पण त्या फार सावधगिरीनें व आपल्या

स्वातंत्र्यांत राजानें हस्तक्षेप केला असें प्रजेला वाटणार नाहीं अशा युक्तीनें केल्या आहेत, हें विशेष लक्षांत घेण्याजोगें आहे. समाजांतल्या लोकांच्या अनुकूलतेशिवाय त्यांच्या चालीरीतींत कायद्याच्या जोरावर क्रांति घडवून आणूं पाहणें फार धोक्याचें असतें हें जाणून अशोकानें एकदम हिंसा बंद करणारे कायदे न करतां हिंसेचे दुष्परिणाम प्रजेच्या मनावर ठसवून त्यांचीं मनें इष्ट सुधारणेला अनुकूल करण्याचा प्रयत्न या लेखाच्या द्वारें केला, यावरून अशोकाची राजनीति उग्र किंवा अरेरावीची नसून दूरदृष्टीनें विचारपूर्वक ठरविलेली होती असें अनुमान काढतां येतें.

हिंसा म्हणजे केवळ प्राण्याची हत्या नव्हे; तर कोणाहि प्राण्याच्या शरीराला किंवा मनाला किंचित्सुद्धां दुःख देणें ही हिंसाच होय. इतका व्यापक अर्थ त्या शब्दांत आहे असें अशोकराजा समजत असे. त्याचप्रमाणें अहिंसा म्हणजे केवळ प्राण्याच्या हत्येपासून निवृत्ति इतकाच अर्थ नसून कोणाहि प्राण्याच्या शारीरिक किंवा मानसिक व्यथेच्या प्रतिकारार्थ झटणें हाहि अर्थ अहिंसा शब्दांत अंतर्भूत आहे अशी त्याची समजूत असल्यामुळें त्यानें आपल्या स्वतःच्या राज्यांत व त्याबाहेर शेजारच्या राज्यांतून माणसांप्रमाणें पशूंसाठींहि रुग्णालयें स्थापन केलीं, प्रवासीजनांच्या सोयीसाठीं रस्त्यांच्या दुतर्फा छायेसाठीं झाडें लाविलीं, विहिरी खोदल्या, तळीं बांधिलीं व धर्मशाळा वगैरे सत्कृत्यें केलीं (स्तंभलेख ७).

### धर्मयात्रा

गिरिलेख नं. ८ यांत धर्मयात्रेचा विषय आहे. पूर्वीच्या काळचे राजेलोक शिकारीसाठीं किंवा मनोविनोदार्थ देशभ्रमण करीत असत; पण प्रियदर्शी राजानें राज्याभिषेकानंतर १० व्या वर्षी ज्ञानप्राप्तीसाठीं धर्मयात्रा करण्याचा पायंडा घातला. अशा धर्मयात्रेंत ठिकठिकाणच्या देवस्थानांचें व साधुसंतांचें दर्शन घडतें; तीर्थें, देवळें, घाट इ. ची स्थिति प्रत्यक्ष अवलोकनांत येऊन यांचा जीर्णोद्धार

करतां येतो; लोकांत मिळून मिसळून राहण्याची व त्यांच्याशीं धर्मचर्चा करण्याची संधि मिळते; लोकांच्या धर्मकल्पना कशा प्रकारच्या आहेत त्याची माहिती होतें; त्या चुकलेल्या असल्यास त्यांना इष्ट वळण देतां येतें; स्वतःच्या कल्पना चुकलेल्या आहेत कीं काय तेंहि कळतें; असे अनेक लाभ धर्मयात्रेपासून घडण्यासारखे आहेत हें लक्षांत घेऊनच अशोकराजानें पूर्वीच्या राजांचें अनुकरण न करतां धर्मयात्रेची टूम काढली असावी असें दिसतें. हिंदुधर्मी लोकांत बदरीकेदार, जगन्नाथ, रामेश्वर आणि द्वारका हे जे चार दिशेला चार धाम आहेत त्यांच्या व तदन्तर्वर्ती अन्य तीर्थांच्या यात्रा करण्याची चाल अद्यापहि थोड्या फार अंशानें आहे. अशोकाच्या वेळीं ही चाल होती असें दिसत नाहीं. असती तर गिरिलेख ७ हा प्रवर्तित करण्याचें कारण नव्हतें. निदान राजेरजवाडे, सरदार व इतर लक्ष्मीपुत्र यांचें लक्ष तरी सुखविलासांतून क्षणभर काढून तें धर्मयात्रेकडे लावावें असा या लेखाचा उद्देश असेल. मनुष्यानें वर्षांतून एखाद दुसरा महिना तरी आपल्या नित्याच्या व्यवहारांतून काढून दूरदूरचें सृष्टिसौंदर्य अवलोकन करावें, परप्रांतीय देशबांधवांचा परिचय करून घ्यावा आणि विचारविनिमय करावा हें माणसाच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यास हितावह असतें. हा हेतु साधण्यासारखीं उत्कृष्ट स्थळें आपल्या देशांत परमेश्वराच्या कृपेनें हवीं तेवढीं असतां आमचे हल्लींचे राजेरजवाडे व धनिक लोक यांना पॅरिस, बर्लिन, न्यूयॉर्क वगैरे पाश्चात्त्य देशांच्या यात्रा करण्यांत व प्रजेपासून कराच्या किंवा अन्य रूपानें काढलेला पैसा परदेशांत उधळण्यांत धन्यता वाटते हें नवल आहे. अशा लोकांच्या डोळ्यांत दिव्यांजन घालणारा अशोकासारखा राजा हल्लींच्या काळांत नाहीं हें हिंदभूचें दुर्दैव म्हटलें पाहिजे.

## कीर्ति कशासाठीं हवी ?

गिरिलेख नं. १० यांत यश अथवा कीर्ति यासंबंधानें अशोक राजानें स्वतःचे जे विचार प्रकट केले आहेत ते मनन करण्यासारखे आहेत. तेहि

लाभाच्या दृष्टीनेंच केवळ कीर्तीला कांहीं किंमत देतां येईल; पण पारलौकिक लाभ तिच्यापासून तिळमात्र नाहीं हें त्यानें या लेखाच्या आरंभींच सांगून टाकिलें आहे. हा ऐहिक लाभ तरी कोणता साधण्याची अशोकाला इच्छा होती तेंहि त्यानें स्पष्ट शब्दांनीं सांगितलें आहे. तें असें—'लोकांनीं माझे धर्मोपदेश ऐकावे व त्याप्रमाणें चालावें.' यासाठीं कीर्ति संपादण्याची मी इच्छा करतों; मी जो पराक्रम ( प्रचंड उद्योग ) करतों तोहि लोकांनीं विपत्तिरहित व्हावें ( आणि पाप हीच एक मोठी व पारलौकिक शाश्वत कल्याणाला बाधा करणारी गोष्ट आहे ) यासाठीं होय असें तो म्हणतो. अशोकाचा हा विचार किती उच्च आहे तें सांगण्याची आवश्यकता नाहीं. सरळपणाचें वर्तन ठेवून व सत्कृत्यें करून कीर्ति संपादन करणें वाईट नाहीं; तें पाप नाहीं येवढें तरी खास म्हणतां येईल. पण कीर्तीचीसुद्धां इच्छा न धरतां केवळ कर्तव्याच्या जागृतीनें सत्कृत्य करणें हें खरें सत्कर्म होय असा भगवद्गीतेचा उपदेश आहे. अशोकाचे कीर्तिलाभाविषयींचे उद्गार व तदनुरूप त्याची कृति ही दोन्ही भगवान् श्रीकृष्णाच्या उपदेशाला किती धरून आहेत तें बारकाईनें पाहणाराला सहज दिसून येईल.

## खरें दान व त्याची फलश्रुति

खरें दान कशाला म्हणावें तें १२ व्या गिरिलेखांत सांगितलें आहे. धर्मदाना (धर्माचा उपदेश) सारखें दान नाहीं; धर्माच्या मित्रतेसारखी उदारतेसारखी उदारता नाहीं; आणि धर्मासारखा आप्त जगांत मिळावयाचा नाहीं असें धर्माच्या महतीचें वर्णन करून पुढें हें धर्मदान म्हणजे काय तें अशोकानें सांगितलें आहे. सेवक व दास यांच्याशीं योग्य वर्तन ठेवणें, मातापितरांची सेवा करणें, मित्र, परिचित व आप्त, श्रमण ( साधु ) व ब्राह्मण यांना दानें देणें; प्राण्यांची हिंसा न करणें; आणि हा उपदेश सर्वांना सर्व काळीं करणें याचें नांव धर्मदान. या ज्ञानाची फलश्रुति काय ? तर इहलोकीं संसारांत विजयप्राप्ति व परलोकीं अमृतत्वाचा लाभ.

## राजा निःशंकमल्ल

अशाप्रकारचा उपदेश अशोकाचे पूर्वी किंवा नंतर कोणत्याहि राजानें आपल्या प्रजेला केला नव्हता अशी चुकीची समजूत कोणाची होऊं नये म्हणून व्हिन्सेंट स्मिथसाहेबानें अशोकाच्या तोडीचें म्हणून प्राच्य देशांतलें ( इ. स.च्या १२ व्या शतकांत झालेल्या ) सीलोनच्या निःशंकमल्ल राजाचें व पाश्चात्त्य इतिहासांतलें ( इ. स. च्या १७ व्या शतकांत इंग्लंडांत होऊन गेलेल्या ) ऑलिव्हर क्रॉमवेलचें अशीं दोन उदाहरणें दिलीं आहेत. निःशंकमल्ल राजानें कोणताहि भेदाभेद न ठेवतां सर्व प्रकारच्या साधूंना अमूप द्रव्य वांटून दिलें अशी माहिती Archaeological Survey Report for Ceylon, 1907 या ग्रंथांत दिली आहे. त्यावरून तो राजा अशोकासारखाच थोर मनाचा होता ही गोष्ट पटते. क्रॉमवेलचें एक पत्र उपलब्ध झालें आहे त्यांत म्हटलें आहे—

"Building of hospitals provides for men's bodies: to build material temples is judged a work of piety: but they that procure spiritual food, they that build up spiritual temples, they are the men truly charitable, truly pious."

९६।२२८

## क्रॉमवेलचें उदाहरण नितांत त्याज्य

वि. ३।-

केवळ एखाद्या खाजगी पत्रांतल्या उदारांवरूनच माणसाच्या अंतःकरणाच्या थोरपणाचें माप ठरविणें योग्य होतें तर हें क्रॉमवेलचें उदाहरण योग्य म्हणतां आलें असतें; आणि मग क्रॉमवेलचें हें एकच काय, पण इंग्लंडच्या इतिहासांतल्या प्रसिद्ध व अप्रसिद्ध अशा सहस्रावधि मुत्सद्द्यांच्या, वीरांच्या, कवींच्या व धनिक लोकांच्या जाहीर भाषणांतल्या मुक्ताफळांची ओंवलेली माला पुढें करून हे सगळे अशोकाच्या इतकेच थोर योग्यतेचे होते असेंसुद्धां व्हिन्सेंटसाहेबाला सहज दाखवितां आलें असतें. पण ऑलिव्हर क्रॉमवेलच्या

खाजगी पत्रांतल्या वरील उद्गारानुरूप त्याचे हातून वर्तन घडलें काय ? हा मुख्य प्रश्न आहे. त्यानें भिन्न धर्ममताच्या रोमन कॅथॉलिक लोकांवर जे अत्याचार केले त्यांनीं इंग्लंडच्या इतिहासाचीं पृष्ठें रंगलीं आहेत ही गोष्ट व्हिन्सेंट स्मिथसाहेब विसरले असले तरी इतिहासाचे वाचक विसरले नाहींत, आणि आयर्लंडचे लोक तर यावच्चंद्रदिवाकरौ विसरणार नाहींत. ज्या पुरुषाला अशोकाच्या नखाचीहि बरोबरी कधीं करतां यावयाची नाहीं त्याचें नांव पुढें करण्यांत व्हिन्सेंटसाहेब साफ घसरले आहेत असें म्हणणें भाग आहे. धर्माच्या नांवानें रक्तपात करणें यासारखी दुसरी निंद्य गोष्ट नाहीं. निरपराधी व भोळ्या-भाबड्या लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेणें व त्यांना नागवणें हीं पापें जशीं इंग्लंडच्या अंगवळणीं पडलीं आहेत, तसेंच धर्माच्या नांवाखालीं रक्तपात व जाळपोळ करण्याचें पापहि १७ व्या शतकांत त्या देशाच्या अंगवळणीं पडलें होतें, म्हणून कदाचित् व्हिन्सेंट स्मिथसाहेबाला त्याचें महत्त्व वाटलें नसेल. पण इतरांना तें वाटतें.

## भिन्न भिन्न धर्मीयांतला प्रेमभाव

भिन्न भिन्न धर्मीयांमध्यें निरंतर अकृत्रिम प्रेमभाव वसत राहावा ही राजा अशोक याची अत्यंत उत्कट इच्छा होती. या इच्छेचेंच फळ त्याचा बारावा गिरिलेख हें आहे. धर्माधर्मांत व जातीजातींत परस्परांची निंदा करण्याच्या उद्योगाला ऊत आला आहे अशा या काळांत प्रत्येक वक्त्यानें व लेखकानें हा गिरिलेख सुवर्णाक्षरांनीं लिहून तो नेहमीं दृष्टीसमोर राहील अशा जागीं लावून ठेवावा अशी त्याची योग्यता आहे. या लेखाप्रमाणें माणसें वर्तन ठेवतील तर जगांतले पुष्कळसे तंटेबखेडे व कायिक, वाचिक आणि मानसिक अत्याचार आपोआप नाहींतसे होतील. वस्तुतः हे तंटेबखेडे व अत्याचार खऱ्या धर्म-तत्त्वाच्या पायीं निर्माण झालेले नसून त्यांच्या मुळाशीं स्वार्थबुद्धि असते असेंच बहुधा आढळून येतें. तें कांहींहि असो, पण धर्माच्या पांघरुणाखालीं अशा

गोष्टी घडाव्या हें अत्यंत अनुचित होय हें कोणीहि कबूल करील. हिंदुस्थानांत मुसलमानांचें पाऊल पडण्यापूर्वीं या ठिकाणीं एकाच हिंदुधर्माच्या बौद्ध, जैन इ. शाखा व शैव, वैष्णव, शाक्त, गाणपत्य इ. अनेक पंथ होते. त्यांच्यांत तीव्र मतभेदहि होते. तथापि युरोपांत ज्याप्रमाणें प्रॉटेस्टंट किंवा रोमन कॅथॉलिक या पंथांतून युद्धें माजून तीं रक्तपातासारख्या घोर अनर्थास कारण झालीं, किंवा ख्रिस्ती आणि इस्लामी धर्मांच्या अनुयायांमध्यें ' धर्मयुद्ध ' नांवाचीं धर्मांच्या नांवाला कलंक लावणारीं युद्धें अनेक वर्षें होत राहिलीं, तसा प्रकार आपल्या या हिंदुस्थान देशांत फारसा झाला नाहीं ही गोष्ट अनेक पाश्चात्त्य लेखकांनाहि कबूल करावी लागली आहे. व्हिन्सेंट स्मिथनें आपल्या अशोक-चरित्राच्या ६३ व्या पृष्ठावर एका स्त्रीलेखिकेच्या लेखांतलीं कांहीं वाक्यें उद्धृत केलीं आहेत. त्यांतलें एक वाक्य अतिशय मार्मिक आहे. त्या वाक्यावरून सदर लेखिकेनें हिंदु-हृदय पूर्णपणें जाणिलें होतें असें स्पष्ट दिसतें. तें वाक्य असें—

' " A man has a right to hold his own belief but never to force it upon another " is the dictum that has made of India a perfect university of religious culture, including every stage of thought and practice. '

परमतसहिष्णुता, सर्वधर्ममताविषयीं आदरबुद्धि आणि सर्व धर्मीयांविषयीं प्रेम व समानभाव हे गुण अशोकाच्या ठायीं किती उत्कटत्वानें वास करीत होते तें या बाराव्या गिरिलेखावरून दिसतें. तीच वृत्ति आपल्या एकंदर प्रजाजनांमध्यें दिसून यावी या सद्धेतूनें त्यानें हा गिरिलेख कोरविला असला पाहिजे यांत शंका नाहीं. चंद्रगुप्तगुरु महात्मा चाणक्य यानें आपल्या ' अर्थ-शास्त्र ' ग्रंथांत राजाचीं जीं कर्तव्यें सांगितलीं आहेत त्यांत भिन्न मतांच्या व पंथांच्या विषयीं राजानें आदरबुद्धि ठेवावी व कोणाच्याहि धर्माचरणांत बाध येईल असें कोणतेंहि कृत्य त्यानें करूं नये असें स्पष्टपणें बजाविलें आहे.

अशोकानें चाणक्याच्या ग्रंथांचा चांगला अभ्यास केला होता व त्याच्या उपदेशाचा अशोकाच्या मनावर बराच प्रभाव पडला होता असें अशोकाच्या राजकारणविषयक नीतीवरून आणि समाजशासन व धर्मशासन यांवरून दिसतें.

अशोकाची राजनीति व समाजशासन यांच्यासंबंधानें बरेंच सांगावयास पाहिजे आहे म्हणून पुढील प्रकरणांत त्याचा स्वतंत्रपणें विचार करूं.

☆ ☆ ☆

# प्रकरण अकरावें

# राज्यव्यवस्था व समाजस्थिति

## राज्यपद्धति

अशोकाचें लक्ष प्रजेंत धर्मशिक्षणाचा प्रसार करण्याकडे विशेष होतें, तरी राजाच्या इतर कर्तव्यांकडे त्यानें दुर्लक्ष केलें नव्हतें. चंद्रगुप्ताचा प्रधानमंत्री चाणक्य यानें घालून दिलेली राज्यपद्धति तत्कालीन समाजाच्या हिताच्या दृष्टीनें सर्वोत्कृष्ट होती. म्हणून चंद्रगुप्त, बिंदुसार व अशोक या तिघांनाहि त्या पद्धतींत ढवळाढवळ करण्याची आवश्यकता दिसली नाहीं. या पद्धतीची सविस्तर माहिती वाचण्याची उत्सुकता ज्यांना असेल त्यांनीं कौटल्याचें अर्थ-शास्त्र हा ग्रंथ पाहावा. अशोकानें राज्यकारभार करतांना चाणक्यानें घालून दिलेला कित्ता आपल्यापुढें ठेविला होता, असें सामान्यतः म्हणतां येतें. तथापि अशोकाच्या लेखांवरून त्याच्या राज्यपद्धतीचें जें चित्र आपल्या डोळ्यांपुढें उभें राहतें तें कशा प्रकारचें आहे तें मुख्यतः या प्रकरणांत पाहावयाचें आहे.

चंद्रगुप्ताच्या वेळीं मगधसाम्राज्याचा विस्तार केवढा होता व अशोकानें त्यांत किती भर घातली याविषयीं मागें सविस्तर विवेचन करण्यांत आलेंच आहे. अशोकानें कलिंगासारखें मोठें राज्य जिंकून मगधसाम्राज्याला जोडलें ही फार महत्त्वाची गोष्ट घडली. दक्षिणेंतलीं चोल, पांड्य, सातियपुत्र (सत्यपुत्र) व केरलपुत्र हीं किरकोळ राज्यें सोडलीं तर बाकीचा सारा हिंदुस्थान देश मगधसाम्राज्यांत अंतर्भूत झालेला होता. याशिवाय हल्लींच्या हिंदुस्थान देशाच्या मर्यादेच्या बाहेरचे कित्येक देश अशोकाच्या राज्यांत सामील झालेले

होतें.[1] मिळून त्याचें राज्य ब्रह्मदेश सोडून बाकीच्या ब्रिटिश हिंदी साम्राज्याहून अधिक विस्तृत होतें हें मागें सांगितलेंच आहे.

येवढ्या मोठ्या साम्राज्यांत शांतता व शिस्त राखण्याचें व लोकांच्या जीविताचें व मालमत्तेचें रक्षण करून त्यांच्या सर्व प्रकारच्या उन्नतीच्या तजविजी करावयाचें काम सध्यांच्या आगगाड्या, तारायंत्रें वगैरेंच्या युगातसुद्धां फार दुष्कर मानिलें जातें; मग दोन हजार वर्षांपूर्वी तें किती दुष्कर असेल याची कल्पनाच केली पाहिजे. पण चाणक्याच्या पद्धतीला शक्य तोंवर अनुसरल्यानें अशोकाला तें दुष्कर काम सुकर झालें. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं मगध राज्याचे पांच मोठाले प्रांत करण्यांत आले होते. पैकीं मगध प्रांताचा कारभार राजा स्वतः पाही आणि बाकीच्या चार प्रांतांवर चार सुभेदार अथवा गव्हर्नर नेमण्यांत येत. हे चार सुभेदार कुमार म्हणजे राजकुलीन पुरुषांपैकीं—बहुधा राजपुत्र-नेमण्याची वहिवाट चंद्रगुप्ताच्या वेळेपासून चालत आली होती. हे सुभेदारांचे चार प्रांत म्हणजे तक्षशिला, सुवर्णगिरि, उज्जयिनी आणि तोसली हे होत हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. कलिंग, धौली, ब्रह्मगिरि वगैरे ठिकाणच्या अशोकाच्या लेखांतूनहि त्याचा उल्लेख आहे. काश्मीर व पंजाब हे तक्षशिला प्रांतांत, गुजराथ—काठेवाड—माळवा हे उज्जयिनी प्रांतांत, सगळा दक्षिण प्रांत सुवर्णगिरीच्या इलाख्यांत, आणि पूर्वकिनाऱ्यावरील कलिंग व आस-

---

१ खिरी. श.पू. ३०५व्या वर्षी सेल्युकस निकेटॉर या ग्रीक राजानें चंद्रगुप्ताशीं केलेल्या तहानें आरिया, आराकोसिया वगैरे ग्रीक राज्यातले कित्येक प्रांत मगध राजाला मिळाले. यांतच अफगाणिस्थानाचाहि समावेश होतो. अफगाणिस्थानावर अशोकाच्या वेळीं मगधाचा अंमल होता याचें प्रत्यक्ष प्रमाण म्हणून तेथें अद्याप भग्न स्थितींत असलेल्या अनेक स्तंभ, स्तूप वगैरेंकडे बोट दाखवितां येतें. जलालाबादेजवळ नगरहार येथें ३०० फूट उंचीचा अशोककालीन शिलास्तंभ होता. गजनी शहरापाशीं १० पाषाणस्तूपांचा शोध लागला आहे. हे सगळे अशोककालीन आहेत.

पासचा प्रदेश तोसली प्रांतांत मोडत असे. अफगाणिस्थान, मक्राण, खोतान वगैरे सरहद्दीवरील प्रांतावर एक स्वतंत्र अधिकारी होता असें कित्येक पंडित म्हणतात; कित्येक या प्रांतांचा समावेश तक्षशिला प्रांतांतच करतात. याशिवाय सोमापा, इशिला वगैरे कित्येक दूरदूरच्या मोठाल्या नगरांवर स्वतंत्र अधिकारी होते.

मौर्यवंशी राजांच्या वेळच्या राज्यपद्धतीची माहिती जी कौटल्याच्या अर्थ-शास्त्रांत व ग्रीक इतिहासकारांच्या आणि प्रवाश्यांच्या लेखांत बरीचशी दिलेली आहे ती बहुतेक चंद्रगुप्ताच्या वेळच्या राज्यपद्धतीसंबंधाची आहे. चंद्रगुप्ताच्या मागून झालेल्या बिंदुसार व अशोक या राजांनीं तीच आदर्शवत् मानून पुढें चालू ठेविली होती. अशोकानें कांहीं थोडेसे फेरफार तींत केले; त्यांचा उल्लेख यथास्थानीं येईलच. हे फेरफार चंद्रगुप्त व अशोक यांच्या राज्यपद्धतींच्या मुळांतच जो फरक होता त्यामुळें करणें भाग पडलें असावें. चंद्रगुप्ताची राज्य-पद्धति राजशक्तीवर तर अशोकाची धर्मशक्ति अथवा नैतिकशक्ति यांच्यावर अधिष्ठित होती. एकाला साम्राज्य स्थापून त्याचें दृढीकरण करावयाचें होतें, तर दुसऱ्याला धर्मराज्याची स्थापना व त्याचें संघटन करावयाचें होतें. त्यांच्या उद्देशानुरूप त्यांच्या राज्यपद्धतींत थोडाफार फरक असणें अपरिहार्यच होतें.

कौटलीय अर्थशास्त्रावरून व अशोकाच्या लेखांवरून दिसतें कीं, राज्याच्या चार मोठाल्या भागांवर चार मोठाल्या अधिकाऱ्यांची नेमणूक राज्यकारभाराच्या सुव्यवस्थेसाठीं करण्यांत येत असे, तरी साम्राज्याचें एकंदर धोरण ठरविण्याचा अधिकार राजानें स्वतःच्या हातीं ठेविलेला असे. त्यानें ठरविलेल्या धोरणाच्या तंत्रानें सर्व कारभार चालत असे. तसेंच राज्याच्या सुव्यवस्थेसाठीं कायदेकानू करण्याचें कामहि राजा स्वतः मंत्र्यांच्या सल्ल्यानें करीत असे. राज्यांतल्या ठळक ठळक अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा अधिकार राजाकडेच होता, कीं तें काम वर सांगितलेल्या चार सुभेदारांच्या अधिकारांतलें होतें हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. पण जिल्हाधिकाऱ्यांच्या नेमणुका हे सुभेदार करीत असावेसें दिसतें.

हीं ठळक महत्त्वाचीं कामें करून शिवाय सगळ्या राज्यकारभारावर देखरेख ठेवण्याचें काम राजा करी. या कामीं त्याला साह्य करणारे राजाच्या विश्वासांतले अनेक अधिकारी होते. त्यांना वाटेल तेव्हां राजाला भेटण्याची मुभा होती. यांना ' प्रतिवेदक ' अशी संज्ञा[१] होती. याशिवाय राजाला सल्लामसलत देणारें ' परिषद् ' नांवाचें कॅबिनेटसारखें एक मंत्रिमंडळ होतें. बिंदुसाराच्या वेळीं ' परिषदे 'च्या सभासदांची संख्या ५०० होती ! अशोकाच्या वेळीं ही संख्या किती होती तें कळण्याला कांहीं साधन नाहीं.

राजाकडून जे हुकूम सुटत ते लेखी असत. त्यांना शासन, अनुशासन किंवा अनुशिष्ट अशी संज्ञा होती; आणि हे हुकूम लिहिणाऱ्या चिटणिसांना ' लिपीकर ' म्हणत. राजाच्या जाहीर हुकुमांना ' श्रावणम् ' असी संज्ञा असे. हे हुकूम सुभेदारांच्या मार्फत इतर अधिकाऱ्यांना कळविले जात असावे.

हें केंद्रवर्ती राजसत्तेसंबंधानें झालें. प्रांतिक राज्यव्यवस्थेचें स्थूल स्वरूप अशोकाच्या लेखांत आहे तें असें—

सर्वांत वरिष्ठ प्रांतिक अधिकारी म्हणजे चार प्रांतिक सुभेदार. त्याच्या खालोखाल ' राजुक ' नांवाचे अधिकारी होते. हे करग्रहण व राजशासन या दोन्ही कामांत निपुण होते. अपराध्यांना दंड करणें व शिष्टांचा सन्मान करणें हे दोन्ही अधिकार त्यांना असत. प्रजेच्या सुखदुःखाचा विचार करून

१. मेगॅस्थनीस लिहितो कीं, हे प्रतिवेदक अधिकारी राज्यांत चोहींकडे संचार करून राज्याची खरी स्थिति राजाला गुप्तपणें कळवीत. प्रतिवेदकांचे दोन वर्ग होते. एक वर्ग वारयोषितांसारख्या हलक्या व व्यसनी लोकांत छद्म-वेषानें मिसळून त्यांच्या मार्फत राज्यांतल्या गुप्त बातम्या काढी. दुसरा वर्ग लष्करी शिपायांत मिसळून कोण काय बोलतो व कोणाचीं कशीं कारस्थानें चाललीं आहेत याच्या बातम्या राजाला सांगत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हे अशोकाचे चीफ सी. आय. डी. ऑफिसर होते.

तिचें कल्याण करणाऱ्या गोष्टींचें चिंतन व अवलंबन साम्राज्याचें सामान्य धोरण संभाळून ते करीत असत. राजाच्या धर्माज्ञांची घोषणा करणें, त्यांचें परिपालन होईल अशी हरएक तजवीज करणें, सत्कार्याकडे प्रजेची प्रवृत्ति व्हावी म्हणून अशा कार्याला प्रोत्साहन देणें व साधु आणि पूज्य व्यक्तींचा योग्य सन्मान करणें या गोष्टींत ते सर्वदा व्यापृत असत. अशोकानें आपल्या चौथ्या स्तंभलेखांत म्हटलेंच आहे कीं, स्वकार्यकुशल अशा विश्वासुक दाईवर मुलांच्या संगोपनाचा भार सोपवून आईबाप जसे निश्चिंत राहतात, त्याप्रमाणें मीं आपल्या प्रजेच्या संवर्धनाचें कार्य विश्वासुक राजुक अधिकाऱ्यांवर सोपविलें आहे. अधिकारी अर्थात् राजाच्या पूर्ण खात्रीचे व त्याच्या विश्वासांतले असून त्यांना जवळ जवळ पूर्ण स्वातंत्र्य होतें. एका राजावांचून त्यांच्या व्यवस्थेंत व हुकुमांत दुसऱ्या कोणासाहि हात घालतां येत नसे.

राजुकाच्या खालीं 'आदेशिक' नांवाचे अधिकारी असत. हे हल्लींच्या डिव्हिजनल कमिशनरासारखे होते. ते राजुकांचे मदतनीस होते. त्यांच्या खालीं प्रत्येक निरनिराळ्या खात्यावर एकेक स्वतंत्र अधिकारी होता. त्याला 'महामात्र' म्हणत. ज्या खात्यावर त्याची नेमणूक झाली असे, त्या खात्याचे नांव त्याच्या हुद्द्याला जोडण्यांत येई. जसें—धर्ममहामात्र म्हणजे धर्मखात्यावरचा मुख्य अधिकारी; अंतमहामात्र म्हणजे सीमाविषयक अधिकारी (Boundary Commissioner); 'स्त्री अध्यक्ष महामात्र' म्हणजे स्त्रियांच्या संबंधाचीं कामें पाहणारा मुख्य अधिकारी; शहरावरच्या मुख्य अधिकाऱ्याला (Mayor) 'महामात्रनगरव्यवहारक' अशी संज्ञा होती. महामात्र हा परिषदेचा सभासद असे. या महामात्रांना स्पेशल ड्यूटीवर परराष्ट्रांच्या दरबारांत मगधसम्राटातर्फे वकील म्हणूनहि पाठविण्यांत येत असे. प्रत्येक खात्यावरच्या महामात्राला अनेक मदतनीस दिलेले असत. त्यांना 'युक्त', 'आयुक्त', किंवा 'विनियुक्त' असें निरनिराळ्या लेखांतून म्हटलेलें आढळतें.

राजुक, प्रादेशिक, युक्त, आयुक्त इ. अधिकाऱ्यांनीं दर पांच वर्षांनीं

' अनुसंययन ' करून (दौरे काढून) राज्याच्या बंदोबस्ताची तपासणी करावयाची, प्रजेचीं सुखदुःखें समजून घ्यावयाचीं, स्थानिक अधिकाऱ्यांना सूचना करावयाच्या आणि प्रजेला धर्मोपदेश करावयाचा अशी व्यवस्था असे.

याशिवाय अशोकानें आपल्या कारकीर्दीच्या चौदाव्या वर्षी ' धर्म-महामात्र ' नांवाचें एक नवें अधिकाऱ्याचें पद निर्माण केलें होतें. योन, गांधार, कांबोज, राष्ट्रीक, सीमांतस्थ इ. लोकांत धर्माचा प्रचार करण्याचें काम त्यांचेकडे देण्यांत आलें होतें. अशोकाच्या धर्माज्ञा लोकांना समजावून देण्याचें व त्या त्यांच्याकडून पाळल्या जात आहेत हें पाहण्याचें काम त्यांच्याकडे दिलेलें असे. न्यायाधीशाकडून एखाद्या वृद्धाला, निरपराधी माणसाला किंवा कुटुंब-वत्सल माणसाला अन्यायानें शिक्षा दिली गेल्याचें धर्ममहामात्राच्या दृष्टीस पडल्यास तत्काळ मध्यें पडून त्या माणसाची सुटका करण्याचा त्याला अधिकार असे. राजाच्या आज्ञा सरसकट सर्व वर्णांच्या व धर्मपंथांच्या माणसांस सारख्या पाळाव्या लागत. त्यांत कोणत्याहि वर्णाविषयीं व धर्माविषयीं पक्षपात करण्यांत येत नसे.

' पुरुष ' ही एकंदर सर्व मुलकी अंमलदारांची ' सिव्हिल सर्व्हंट ' या अर्थाची सामान्य संज्ञा होती. तथापि प्रसंगविशेषीं ' पुरुषां 'ना स्पेशल कामगिरीहि सांगण्यांत येई. कांहीं ' पुरुष ' गुप्त हेरांचेंहि काम करणारे होते.

## परदेशीय यवन अधिकारी

धर्माच्या बाबतींत अशोकाच्या मनाचें जसें औदार्य दिसतें तसें राज्यांतले अधिकारी नेमण्यांतहि तें दिसून येतें. जातिविशिष्ट नेमणुका करण्याचें संकुचित धोरण अशोकानें ठेविलें नव्हतें. याचें एक ठळक उदाहरण प्रो. भांडारकर यांनीं आपल्या पुस्तकांत पृ. ५०।५१ वर दिलें आहे तें नमूद करण्यासारखें आहे. प्रो. भांडारकर लिहितात: कीं, अशोक राज्य करीत असतां सुराष्ट्र (काठियावाड) प्रांतावर तुशास्प नांवाचा एक पारसिक (इराणी) अधिकारी

नेमण्यांत आला होता. अशोकाचा आजा चंद्रगुप्त याच्याहि वेळीं सुराष्ट्रावर पुष्यगुप्त नांवाचा एक वैश्य अधिकारी होता. पण तो हिंदु तरी होता. अशोकानें तर अगदीं परदेशीय माणसाला येवढी मोठी प्रांताधिकाऱ्याची जागा दिली होती! जी गोष्ट आजच्या काळीं इंग्रजांसारख्या सुधारलेल्या राज्यकर्त्यांनासुद्धां करण्याचें धैर्य होत नाहीं ती गोष्ट अशोकानें तेवीसशें वर्षांपूर्वीं करून दाखविली यावरून राज्यकर्ता म्हणून अशोकाची योग्यता किती थोर होती तें विरोधामुळें उत्तम प्रकारें व्यक्त होतें.

याशिवाय कांहीं विशिष्ट कार्यांसाठीं विशिष्ट अधिकारी नेमिलेले होते. उदा० 'गोध्यक्ष'=राज्यांतल्या गुरांढोरांची जोपासना नीट होत आहे कीं नाहीं, त्यांची संख्या शेतीच्या व वाणिज्याच्या कामास पुरेशी आहे कीं नाहीं, त्यांच्या संवर्धनासाठीं काय उपाय योजिले पाहिजेत वगैरे गोष्टींची चौकशी ठेवणारा अधिकारी. 'व्रजभूमिक' नांवाच्या अधिकाऱ्याकडे गायरानें, दुग्धशाला वगैरेंची व्यवस्था असे. याच्याकडे सरकारी व सार्वजनिक उद्यानें, आम्रवनें, कूप ( विहिरी ), तळीं, धर्मशाला यांच्यावरचीहि देखरेख सोपविलेली असे. वैद्यकखात्यावरच्या अधिकाऱ्याकडे मनुष्यांचें आरोग्य सांभाळणें व रोगग्रस्तांच्या औषधपाण्याची तजवीज करणें हीं कामें होतीं. माणसांप्रमाणें पशूंसाठींहि रुग्णालयें होतीं व त्यांवर पशुचिकित्सेंतल्या तज्ज्ञांना नेमण्यांत येई. हस्त्यध्यक्षाकडे जंगली हत्तींच्या रानांची व्यवस्था असे. जंगली हत्तींवर राजाची मालकी असे.

## लष्करी खातें

लष्कराचीं सहा निरनिराळीं खातीं होतीं. १ आरमार, २ रसद, ३ पायदळ, ४ घोडेस्वार, ५ रथ, व ६ हत्तीदळ. या प्रत्येक खात्यावर पांच पांच अंमलदार होते. राजधानीच्या संरक्षणाचें कामहि याच खात्याकडे होतें. लष्करी खात्याकडे राज्याच्या संरक्षणाचें काम असल्यामुळें या खात्याला हल्लींच्या

काळांत बेसुमार महत्त्व आलेलें आहे. पण अशोकाच्या वेळीं तसें नव्हतें. त्याच्या दृष्टीनें लष्करापेक्षां धर्मखातें (शिक्षणखातें) फार अधिक महत्त्वाचें होतें. अशोकानें आपल्या लेखांत कोठेंहि लष्करी खात्याचा उल्लेख केलेला दिसत नाहीं. याचें कारण त्याची भिस्त लोकांना शिक्षण देऊन त्यांना संतुष्ट ठेवण्यावरच विशेष असावी असें दिसतें.

## जमीनमहसूल व पाटबंधारे खातें

हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून जमिनीची मालकी सरकारची मानिली गेली आहे. शेतकरी म्हणजे सरकारचीं कुळें; त्यांना सरकाराला खंडाबद्दल शेतीच्या उत्पन्नाचा सहावा किंवा चौथा हिस्सा शास्त्रनियमानुसार द्यावा लागत असे. ही वहिवाट चंद्रगुप्ताच्या वेळीं होती, तशी अशोकाच्याहि काळांत होती. या जमीनमहसुलाशिवाय 'उदकभाग' अथवा पाणीपट्टी द्यावी लागे. अशा आणखीहि कांहीं पट्ट्या विशेष प्रसंगीं विशेष कारणासाठीं राजाज्ञेनें द्याव्या लागत असाव्या असें अनुमान करतां येतें; पण निश्चितपणें सांगतां येत नाहीं. इतकें खरें कीं, हल्लींच्या काळाप्रमाणें कर आणि पट्ट्या यांच्या यंत्रांतून रयत पिळून निघत नसे. याला प्रमाण मेगॅस्थनीससारख्या परदेशीय प्रवाश्यांची साक्ष आहे. तो लिहितो कीं, मौर्यवंशाच्या कारकीर्दीत रयत फार संतुष्ट, सुखी व संपन्न होती. अशोकाच्या सगळ्याच खात्यांचें काम फार सुव्यवस्थित रीतीनें चालत असलें पाहिजे. कारण मेगॅस्थनीसनें यांच्या कामाची फार तारीफ केली आहे. नुसत्या व्यवस्थितपणाबद्दलची प्रशंसा हल्लींच्या ब्रिटिश राज्यपद्धतीसंबंधानेंहि करतां येईल; पण प्रजेची संपन्नता व संतोष यांचा त्या लेखकानें जो उल्लेख केला आहे तो विशेष महत्त्वाचा आहे. विशेषतः पाटबंधाऱ्यांचें खातें रयतेला वेळेवर पाहिजे तितकें पाणी देत असे व त्यामुळें रयत आबाद व सुखी होती असें त्यानें म्हटलें आहे. या खात्याकडून शेतें, बगीचे वगैरेंना जें पाणी पुरविलें जाई त्याबद्दल 'उदकभाग' (पाणीपट्टी) द्यावी लागे. पण तिची

आकारणी अशा खुबीनें केली जात होती कीं, पाटबंधारे वगैरे कामें बांधण्यास व त्यांच्या बंदोबस्तासाठीं जो खर्च सरकारास करावा लागे तो सगळा पाणीपट्टीच्या वसुलांतून भरून निघे. इतकेंच नाहीं, तर सरकारला त्यापासून चांगला फायदा राही आणि रयतेलाहि त्याचें ओझें वाटत नसे.

वर तुशास्प नांवाचा एक पारसिक अधिकारी अशोकानें नेमिल्याचा उल्लेख आला आहे. याला नेमण्यांत अशोकाचा एक विशेष हेतु होता. चंद्रगुप्ताच्या वेळीं त्यानें काठेवाडांत गिरनार पर्वताच्या रांगेंत मोठा बांध घालून व पाणी अडवून एक मोठें सरोवर निर्माण केलें होतें. त्याचें पाणी स्वच्छ ठेवून तें काल्व्यानें तेथून दूरच्या निर्जल प्रदेशांना पुरविण्याची अशोकाची कल्पना प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्यासाठीं मुद्दाम या हुशार परदेशीय इंजिनिअराची नेमणूक करण्यांत आली होती. यावरून पाटलीपुत्र राजधानीपासून शेंकडों कोस दूर असलेल्या प्रांतांतल्या प्रजेच्या सुखसोयीसाठीं अशोक राजा कसा झटत असे आणि अशा कृत्रिम उपायांनीं दूरदूरच्या प्रांतांना पाणीपुरवठा करण्याची आजसुद्धां धाडसाची वाटणारी कल्पना २३०० वर्षांपूर्वीहि आमच्या हिंदी राजाच्या डोक्यांत कशी आली याचें खरोखर नवल वाटतें.

## न्याय

अशोक आपल्या प्रजेला पोटच्या लेकरांप्रमाणें वागवी. तिला यत्किंचित् त्रास झाल्याचें त्याला कळलें तर त्याचें अंतःकरण कळवळत असे. कलिंग देश जिंकल्यानंतर तेथल्या लोकांना आपण परकीयांच्या अंमलाखालीं आहों असें वाटूं नये म्हणून तेथील प्रजेला विशेष ममतेनें वागविण्याबद्दल तेथच्या अंमलदारांना त्याची आज्ञा होती. एकदा तोसली आणि समापा येथील अधिकाऱ्यांनीं कांहीं लोकांना अन्यायानें कैदेंत टाकिल्याचें व दुसऱ्या कांहीं प्रकारांनीं छळिल्याचें कळतांच अशोकानें त्या अधिकाऱ्यांची चांगलीच खरडपट्टी काढली, आणि असे प्रकार पुनः घडूं नयेत म्हणून न्यायखात्याचा कारभार सुरळीतपणें चालतो

कीं नाहीं हें पाहण्यासाठीं इतर ठिकाणच्या महामात्रांनीं दर पांच वर्षांनीं व तक्षशिला व उज्जयिनी येथील महामात्रांनीं दर तीन वर्षांनीं दौरे काढून तपासणी करावी असे हुकूम सोडले होते. कैद्यांच्याविषयींसुद्धां अशोकाच्या पोटांत फार दया वसत होती व अन्यायानें कोणी कैद केला जाऊं नये यासाठीं त्यानें अपिलाच्या वगैरे सवडी ठेविल्या होत्या. घरांतला कर्ता पुरुष कैदेंत गेल्यामुळें उघड्या पडलेल्या त्याच्या बायकामुलांस व त्याचप्रमाणें इतर अनाथ, पोरक्या मुलांस, आणि वृद्ध स्त्रीपुरुषांस सरकारांतून अन्नवस्त्र मिळण्याच्या ज्या तजविजी अशोकानें करून ठेविल्या होत्या त्या पाहिल्या म्हणजे खरा खरा प्रजावत्सल आदर्श हिंदु राजा कसा असे त्याचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहून अंतःकरण विस्मित होतें.

## वाणिज्य व व्यवसाय

मोठाल्या शहरांतून 'निकाय' नांवाचे अधिकारी असत. व्यापार, कला व उद्योगधंदे यांच्यावर त्यांची देखरेख असे. राज्यांत त्यांची वृद्धि करण्यासाठीं लोकांना ते निरनिराळ्या प्रकारच्या सवलती व उत्तेजन देत. निरनिराळ्या कामासाठीं निरनिराळ्या निकायांची योजना असे. वाणिज्यनिकाय देशाच्या अंतर्गत व बहिर्गत व्यापाराची वृद्धि कशी होईल तें पाहात, मालाचे दर सर्वांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करीत व सर्व प्रकारें व्यापाराचें नियमन करीत. शिल्पनिकाय देशांतली कारागिरी वाढेल व कारागीर उपाशीं मरणार नाहींत या गोष्टीकडे विशेष लक्ष ठेवीत. परदेशांतून कारागिरीचे निरनिराळे नमुने आणवून तसलीं कारागिरीचीं कामें आपल्या राज्यांत व्हावीं म्हणून परदेशीय कारागीर मुद्दाम आणवून त्यांच्याकडून प्रजेला शिक्षण देवविणें, हुशार व कल्पक कारागिरांना प्रोत्साहन देणें वगैरे कामें ते करीत. त्यामुळें आपली प्राचीन शिल्पकला व स्थापत्य विद्या यांचें रक्षण होऊन ग्रीककला व विद्याहि आमच्या लोकांना आत्मसात् करतां आल्या व त्यांचा इतका उत्कर्ष झाला कीं,

सारें जग तो पाहून थक्क झालें. अशोककालीन शिल्प व स्थापत्य यांच्या-संबंधाचें विवेचन एका स्वतंत्र प्रकरणांत पुढें करण्यांत येणारच आहे.

## जकात

'शुल्कनिकाय' म्हणून स्वतंत्र अधिकारी असत. कोणत्या प्रकारच्या मालावर किती जकात घ्यावयाची तें ठरविण्याचें व त्याप्रमाणें ती वसूल करण्याचें काम त्यांच्याकडे असे. कोणीं ती लबाडीनें चुकविल्यास त्याला देहान्त शिक्षा होत असे असें स्ट्राबो नांवाचा ग्रीक ग्रंथकार लिहितो. पण तें कितपत खरें आहे तें सांगतां येत नाहीं. चंद्रगुप्त अपराध्यांना फार कडक शिक्षा करी असें इतिहासकार सांगतात, तेव्हां त्याच्या काळीं कदाचित् तसा प्रकार असेल. पण अशोकासारख्या परम सात्त्विक, दयाळू व धर्मशील राजाच्या वेळींहि ही अमानुष शिक्षेची पद्धति अंमलांत असेल ही गोष्ट असंभवनीय दिसते.

## वैद्यक खातें

अशोकाच्या राज्यव्यवस्थेंत वैद्यकी खातें हें एक महत्त्वाचें खातें होतें यांत शंका नाहीं. त्या खात्यावर कोण कोण अंमलदार होते, त्यांच्याकडे कोणतीं कामें होतीं, वैद्यकशास्त्राची त्या वेळीं किती उन्नति झाली होती वगैरे गोष्टींची विस्तृत माहिती जरी त्याच्या लेखांवरून मिळाली नाहीं, तरी आपल्या प्रजेंत कोणीहि रोगग्रस्त मनुष्य औषधांची किंवा शस्त्रक्रियेची मदत मिळाल्याशिवाय राहूं नये ही राजाची इच्छा त्याच्या लेखांत स्पष्ट प्रतिबिंबित झालेली दिसते. त्या लेखांवरून व अन्य साधनांवरून त्या काळाविषयींची जी माहिती उपलब्ध झाली आहे तिच्यावरून असें दिसतें कीं, अशोकानें ठिकठिकाणीं माणसासाठींहि नव्हे तर पशुपक्ष्यांसाठींहि रुग्णालयें, चिकित्सालयें, भेषजालयें व औषधोपयोगी वनस्पति वगैरेंचे संग्रह ठेविले होते आणि तेथें सर्वांना औषधांचें व शस्त्रक्रियेचें साह्य मोफत मिळेल अशी तजवीज करण्यांत आली होती.

मगध राज्याची वैद्यक व शस्त्रक्रिया यांतल्या नैपुण्याची त्या काळीं प्रसिद्धीच होती. जीवकासारखे विख्यात भिषग्वर मगध राज्यांत ठिकठिकाणीं बौद्ध मठांतून या शास्त्राचें शिक्षण सहस्रावधि शिष्यांना देत होते. हे शिष्य बहुधा भिक्षु वर्गांतले अर्थात् निरपेक्ष रीतीनें जनसेवा करूं इच्छिणारे असत आणि ते गांवोगांव हिंडून आर्तजनांचें पीडानिवारण करीत असत. औषधांचा सगळा खर्च सरकारी खजिन्यांतून करण्यांत येई. स्वतःच्याच राज्यापुरती अशोकानें ही उत्तम व्यवस्था केली होती असें नाहीं. चोल, पांड्य, सतियपुत्र, केरलपुत्र इ. मांडलिक राज्यांत व शेजारपाजारच्या स्वतंत्र मित्रराज्यांतूनसुद्धां त्यानें हें धर्मकार्य अखंड चालू ठेविलें होतें ही गोष्ट विशेषेंकरून नमूद करण्यासारखी आहे. यावरून 'माझी प्रजा मला माझ्या मुलांसारखी वाटते. मी माझ्या पुत्रांचे ऐहिक व पारलौकिक कल्याणासाठीं जसा झटतों, त्याप्रमाणेंच माझ्या प्रजेच्या ऐहिक व पारलौकिक कल्याणासाठीं झटणें हेंहि मी माझें कर्तव्य समजतों' अशा अर्थाचे जे उद्गार अशोकाच्या लेखांतून आढळतात ते किती सत्य आहेत त्याची प्रतीति येते. मांडलिकांच्या व मित्रराजाच्या प्रजेच्या दुःखनिवारणासाठीं झटणारा राजा स्वतःच्या प्रजेसाठीं काय करणार नाहीं?

येथपर्यंत अशोकाच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें थोडक्यांत विवेचनन केलें. आतां त्या वेळच्या समाजस्थितीसंबंधानें चार शब्द लिहून हें प्रकरण समाप्त करूं. शिक्षणप्रसार आणि स्त्रियांची स्थिति या समजोन्नतीच्या दोन मुख्य कसोट्या आहेत. या कसोट्या अशोककालीन समाजाला लावून पाहिल्या म्हणजे तत्कालीन समाजाची उन्नति कोठपर्यंत झाली होती तें दिसेल.

## शिक्षणप्रसार

शिक्षणप्रसार हें सर्व प्रकारच्या उन्नतीचें मूळ आहे ही गोष्ट अशोकाच्या ध्यानांत पूर्णपणें आली होती असें दिसतें. त्याच्या दृष्टीनें धर्म व नीति यांचें

शिक्षण हें सार्वजनिक शिक्षणाचें प्रधान अंग होतें आणि आजच्या घटकेलाहि ती गोष्ट प्रत्येकजण मान्य करील यांत शंका नाहीं. धर्म आणि नीति या माणसाचें शील बनविणाऱ्या गोष्टी आहेत आणि शीलसंपन्नता हा राष्ट्रोन्नतीचा मूळ पाया आहे. धन आहे, उत्साह आहे, सत्ता आहे, पण शील नाहीं, तेथें राष्ट्रशक्ति कधीं निर्माण व्हावयाची नाहीं. व्यक्तींत काय किंवा समाजांत काय, शील हेंच बल असतें. यासाठीं राष्ट्रोन्नति करूं इच्छिणारांनीं प्रथम शीलसंवर्धनाकडे लक्ष दिलें पाहिजे. अशोकानें तेंच केलें. त्यानें धर्म व नीति यांच्या शिक्षणप्रसाराचा जो अचाट उद्योग केला व त्यापायीं अगणित द्रव्य खर्च केलें तें केवळ प्रजेच्या शीलसंवर्धनासाठीं आणि या कामीं त्याच्या प्रयत्नाला भरपूर यशहि आलें. अशोकाच्या दीर्घकालीन कारकीर्दीत मगध-साम्राज्याची सर्व प्रकारें उन्नतीच झाली.

## नालंद महाविद्यालय

धर्म आणि नीति यांचें शिक्षण प्रजेस देण्याकडे अशोकाचें विशेष लक्ष होतें हें वर सांगितलेंच आहे. शिक्षणाच्या बाकीच्या अंगांकडे त्याचें दुर्लक्ष झाललें नव्हतें हें आतां दाखवावयाचें आहे. त्या काळीं प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या शाळा होत्या, कीं हें दोन्ही प्रकारचें शिक्षण घरच्या घरीं मुलांना त्यांच्या आईबापांकडून मिळत असे तें कळण्यास आज कांहीं साधन नाहीं. पण उच्च शिक्षणाच्या सोयी मात्र हल्लींच्या काळापेक्षां पुष्कळ पटींनीं उत्कृष्ट होत्या येवढें म्हणतां येतें. अशोकाच्या राज्यांत नालंदविहार अथवा नरेंद्रविहार आणि तक्षशिला या दोन ठिकाणीं जगद्विख्यात अशीं दोन महाविद्यालयें होतीं. पैकीं नालंद महाविद्यालय स्वतः अशोकानेंच स्थापिलें होतें असें सांगतात. जुन्या राजगृह नगराजवळ हें होतें. नालंदविहार हें नांव या शिक्षणसंस्थेला कसें प्राप्त झालें याविषयींच्या दोन मजेदार दंतकथा आहेत. पहिली दंतकथा अशी आहे कीं—विहाराच्या दक्षिण भागांत एक आमराई होती आणि त्या

आमराईत एक तळें होतें. त्या तळ्यांत एक नाग राहात असे. त्या नागाच्या नांवावरून विहाराला नालंद हें नांव पडलें. दुसऱ्या दंतकथेप्रमाणें भगवान् बुद्ध पूर्वीच्या एका जन्मीं बोधिसत्त्व होते आणि त्यांचें हें जन्मस्थान होतें. हा बोधिसत्त्व एक मोठा राजा होता आणि विहाराच्या जागीं पूर्वीं त्याचा मोठा राजवाडा होता. हा राजा परम दयाळु व दानशील होता. त्या राजाचें नांव नालंद होतें. तो राजा मेला व कालांतरानें त्याचा राजवाडाहि नष्ट होऊन व ही जागा ओसाड पडून तेथें आंब्याचीं झाडें उगवलीं होतीं. पुढें गौतम बुद्धाच्या कोणी धनवान् शिष्यांनीं ही जागा विकत घेऊन त्याला अर्पण केली आणि राहण्यासाठीं एक विहारहि बांधून दिला. या विहाराला पूर्वीच्या राजाच्या स्मरणार्थ त्याचें नालंद हें नांव देण्यांत आलें. बुद्धाच्या निर्वाणानंतर शक्रादित्य नांवाचा एक राजा झाला. त्याची बौद्ध त्रिरत्नाचे ठायीं (म्हणजे बुद्ध, धर्म आणि संघ यांचेविषयीं) निरतिशय आदर व भक्तिभाव असल्यामुळें तो या स्थानाच्या दर्शनासाठीं आला होता. पूर्वीचा विहार या वेळीं नामशेष झाला असल्याकारणानें त्यानें नवीन एक विहार बांधिला. शक्रादित्याचें उदाहरण पाहून बुद्धगुप्त, तथागतगुप्त, बालादित्य व वज्र अशा चार दुसऱ्या राजांनीं येथें आणखी विहार बांधले; मध्यभारत देशांतल्या एका राजानें या जागेच्या भोंवतीं एक तट बांधला. याप्रमाणें अनेक राजांच्या दातृत्वामुळें या स्थानाला मोठें गौरव प्राप्त झालें. हें स्थान एकान्तांतलें व रमणीय असल्यामुळें पुष्कळ विद्वान् बौद्ध भिक्षु येथें राहून ध्यानधारणा व पठनपाठन करूं लागले. पुढें अशोकानें त्या विहाराला मोठी नेमणूक करून देऊन या स्थानाला महाविद्यालयाचें स्वरूप दिलें. लवकरच निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत अशा बौद्धभिक्षूंचें हें निवासस्थान होऊन या शिक्षणसंस्थेची कीर्ति दिगंतरीं पसरत गेली व दूरदूरच्या प्रांतांतले विद्यार्थी अध्ययनासाठीं या जागीं येऊं लागले. चिनी प्रवासी ह्युएन-त्सांग पंधरा महिने या विद्यापीठांत येऊन राहिला होता. तेथें असतांना त्यानें संस्कृत भाषेचें अध्ययन केलें. या

विद्यापीठांत अहोरात्र विद्याचर्चा चाले. येथें पाली भाषेंतल्या बौद्ध ग्रंथांचेंच अध्यापन चालत असे असें नाहीं. संस्कृत भाषा व संस्कृत वाङ्मय, वेदविद्या, ज्योतिष, वैद्यक, न्याय, मीमांसा, तंत्रशास्त्र इ. शास्त्रेंहि शिकविलीं जात. या विद्यालयांतून बाहेर पडलेल्या असंख्य विद्यार्थ्यांनीं पुढें अपार द्रव्य, यश व कीर्ति संपादून संस्कृत व पाली वाङ्मय संपन्न केल्याचें श्रेय मिळविलें आहे. धर्मपाल, चंद्रपाल, गुणमति, प्रभामित्र, जिनमित्र, शीलभद्र वगैरे बौद्ध ग्रंथांवरील भाष्यकार व टीकाकार याच विद्यापीठाचे छात्र होते. चिनी प्रवासी टाकाकासु इत्सिंग हा या विद्यालयांत १० वर्षें विद्यार्थी म्हणून राहिला होता. आर्यदेव, नागार्जुन, सुविष्णु इ. जगद्विख्यात ग्रंथकार येथेंच विद्या शिकले होते. येथें हजारो विद्यार्थी आरामानें राहतील येवढे मोठाले विहार (आश्रम) होते. वीस वीस हजार श्रोते बसतील अशीं सभागृहें व याशिवाय प्रचंड ग्रंथसंग्रह राहील अशा इमारती आणि इतर सर्व सोयी होत्या.

## तक्षशिला महाविद्यालय

तक्षशिला विश्वविद्यालय नालंदाहून प्राचीन होतें. महर्षि आत्रेय हे एकेकाळीं येथें अध्यापक होते आणि पाणिनि व पतंजलि हे दोघे सुप्रसिद्ध संस्कृत व्याकरणशास्त्रवेत्ते येथें विद्यार्थी होते. येथेंहि ज्ञानार्जनाच्या सर्व प्रकारच्या सोई होत्या. विद्यार्थ्यांच्या राहण्याची व अन्नवस्त्राची वगैरे व्यवस्था उत्तम प्रकारची असे. येथेंहि सर्व शास्त्रें, विद्या व कला शिकविणारे सुयोग्य अध्यापक व तसेच सुयोग्य छात्र यांची संख्या दशसहस्रांनीं मोजण्याइतकी होती ! त्यांच्या राहण्यासाठीं व त्याचप्रमाणें ग्रंथसंग्रह इ. साठीं येथें रत्नसागर, रत्नोदधि व रत्नरंजक नांवाचे नऊ नऊ मजली असे तीन मोठाले वाडे होते. यावरून या विद्यापीठाच्या व त्यासाठीं होणाऱ्या खर्चाच्या प्रचंडत्वाची कल्पना करतां येईल.

## समाजस्थिति

चंद्रगुप्ताच्या काळीं समाजाची स्थिति कशी होती तें कौटल्याच्या अर्थशास्त्रा-

वरून स्थूल मानानें कळतें. पण त्यानंतर अशोकाच्या वेळीं तीच स्थिति कायम राहिली होती कीं, तिच्यांत सुधारणा झाली होती तें कळण्यास अशोकाच्या लेखांशिवाय अन्य कांहीं साधन नाहीं. या लेखांवरून तत्कालीन समाजस्थितीचें जें चित्र काढतां येतें तें असें आहे—

तत्कालीन समाजांत सनातनी हिंदु, बौद्ध, जैन व अगदींच थोडे यवन व म्लेंच्छ होते. समाजाचे गृहस्थधर्मी व भिक्षुक असे दोन वर्ग होते. पहिल्या वर्गांत राजापासून शिपायांपर्यंत सर्व दर्जाचे नोकरपेशाचे लोक, व त्याचप्रमाणें व्यापारी, उदमी, कारखानदार, शेतकरी, मजूर व शारीरिक किंवा बौद्धक परिश्रमानें द्रव्यार्जन करून त्यावर निर्वाह करणारे इतर लोक यांचा समावेश होत असे. दुसऱ्या म्हणजे भिक्षुकवर्गांत हिंदु, पुरोहित, बौद्ध, श्रमण व पाषंड हे मोडत. पाषंडांत पुनः निर्ग्रंथ ( जैन ) व आजीवक ( ? ) असे दोन होते. या संप्रदायांची संख्या दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर होती. बौद्ध धर्मीयांमध्येंहि फूट पाडण्याचे प्रयत्न कांहीं खोडसाळ लोकांनीं चालविले होते व त्यांच्या बंदोबस्तासाठीं कडक उपायांची योजना अशोकाला करावी लागली होती. या प्रत्येक संप्रदायाचे निरनिराळे मठ होते. हे मठवासी रोज भिक्षा मागून निर्वाह करीत व धर्मचर्चा, धर्मविषयक कडाक्याचे वाद आणि अध्यापन यांमध्यें काळ घालवीत. यांच्या प्रयत्नानें जनतेला मोफत शिक्षणाचा लाभ अनायासें घडे. जनतेंत साक्षरतेचें प्रमाण अशोकाचे काळीं बरेंच मोठें असलें पाहिजे असें दिसतें. कारण, जनतेच्या माहितीसाठीं त्यानें राज्याच्या कोनाकोपऱ्यांतून व जंगली लोकांच्या मुलखांतूनहि दगडांवर लेख कोरून ठेविलेले होते. ते वाचण्याइतकी तरी त्या काळच्या लोकांच्या शिक्षणाची किमानपक्षींची मर्यादा असली पाहिजे. व्हिन्सेंट स्मिथ यानें या शिक्षणप्रसारासंबंधानें असें म्हटलें आहे—

" I think it likely that the percentage of literacy among the Buddhist population in Asoka's time was higher than it is now in many provinces of British India. "

आज ब्रह्मदेशांत हाच प्रकार आढळतो. तेथें शिक्षणप्रसार बौद्ध भिक्षूंच्या निरपेक्ष प्रयत्नांमुळें इकडच्यापेक्षां पुष्कळ अधिक झालेला आहे असें आपण पाहतों.

## भाषा

अशोकाच्या काळीं त्याच्या राज्याच्या सगळ्या भागांतून आसेतुहिमाचल एकच बोली (पाली ही) असली पाहिजे असें दिसतें. कारण, अशोकाचे सगळे लेख, मग ते नेपाळच्या तराईतले असोत किंवा म्हैसूर संस्थानांतले असोत, पश्चिमेकडच्या गिरनार पर्वतावरचे असोत किंवा पूर्व किनाऱ्यावरच्या कलिंग राज्यांतले असोत, सर्वांची भाषा एक आहे ही खरोखर आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे. सर्वसामान्य जनतेला कळावी म्हणून अशोकानें आपल्या लेखांत ग्रांथिक भाषा न योजतां मुद्दाम लोकांच्या बोलण्याचालण्याच्या परिपाठांतली ओबडधोबड पण सोपी भाषा वापरली आहे.

## स्त्रियांची स्थिति

स्त्रिया हा समाजाचा एक फार मोठा व महत्त्वाचा भाग असल्यामुळें त्यांच्या स्थितीसंबंधानें दोन शब्द सांगितल्याशिवाय समाजस्थितीविषयींचें विवेचन अपूर्ण राहील. अशोकाच्या वेळीं स्त्रियांना पडद्यांत ठेवण्याची चाल होती कीं काय ? असल्यास ती फक्त राजघराण्यांतल्या किंवा उच्च सरदारांच्या घराण्यांतल्या स्त्रियांपुरतीच होती, कीं सामान्य जनतेंतहि होती ? या प्रश्नाचें निश्चयात्मक उत्तर देण्यास अद्यापहि कांहीं साधन उपलब्ध झालेलें नाहीं. अशोकाच्या लेखांत ‘ अवरोधन ’ हा शब्द अंतःपुर किंवा जनानखाना या अर्थानें आलेला आहे ही गोष्ट खरी आहे. पण त्यावरून इतकेंच अनुमान काढतां येतें कीं, स्त्रियांच्या राहण्याची व बसण्याउठण्याची वाड्यांत स्वतंत्र जागा असे, आणि हव्या त्या माणसाला त्या जागेपर्यंत जातां येत नसे. पण याचा

अर्थ पडदा असा होऊं शकत नाहीं. हल्लींसुद्धां पुण्यासारख्या ठिकाणीं एखाद्या सुखवस्तु माणसाच्या घरांत बायकांच्या बसण्याउठण्याच्या जागेपर्यंत सर्वांना जातां येत नाहीं. पण यावरून महाराष्ट्रियांत स्त्रियांना पडद्यांत ठेवण्याची चाल आहे असें अनुमान काढल्यास तें निखालस चुकीचें ठरेल. राजघराण्यांतल्या स्त्रियांना पडदा असला म्हणजे पडद्याची चाल सार्वत्रिक होती असें म्हणतां येत नाहीं. ' अवरोधन ' या शब्दाचा अर्थ स्त्रियांची बसण्याउठण्याची अर्थात् अडोशाची जागा येवढाच घेतला पाहिजे. पडदा असा अर्थ घेणें वाजवी होणार नाहीं. आमच्या मतें सामान्य स्त्रियांना अशोकाच्या काळीं पडद्यांत राहावें लागत नसे.

हल्लींच्या प्रमाणें अशोकाच्याहि काळीं स्त्रियांमध्यें भोळेपणाच्या समजुती आणि नवससायास, व्रतेंवैकल्यें, परंपरागत निरर्थक संस्कार व विधि यांच्या-विषयींची आवड वगैरे गोष्टी होत्या. अशोकाच्या ११ व्या आदेशांत मुलाचा जन्म, लग्न, दुखणेंबाणें इ. प्रसंगीं बायकांकडून करण्वांत येणाऱ्या कित्येक विधींचा व तोडग्यांचा उल्लेख आहे. अशोकानें त्या विधींविषयीं व तोडग्यांविषयीं आपली नापसंती स्पष्टपणें दर्शविली आहे, व त्यांना क्षुद्र व निरर्थक म्हटलें आहे. अशोकाच्या या उद्गारांचा तत्कालीन स्त्रीसमाजावर कितीसा परिणाम झाला होता तें कळण्याला कांहीं साधन नाहीं. पण विशेषसा झाला असें वाटत नाहीं. बायकांचें लक्ष सामान्यतः धर्मतत्त्वाकडे नसून धर्म-विधींकडे विशेषतः असतें व ते विधीच पुढें धर्मतत्त्वांची जागा बळकावतात असा अनुभव आहे. पूर्वपरंपरागत चालीरीतींचा वाईटपणा स्त्रियांना पटवून दिला तरी त्या सहसा त्यांचा त्याग करण्याला तयार होत नाहींत हा स्त्रियांच्या अंगचा गुण किंवा दुर्गुण अजूनहि जसाचा तसा कायम आहे. आणि तो आप-ल्याच स्त्रियांमध्यें आहे असें केवळ नाहीं; तर पाश्चात्त्य स्त्रियांतहि तो तसाच आहे. वेथॅम ह्या पाश्चात्त्य ग्रंथकारानें एके ठिकाणीं म्हटलें आहे—

" The religion of a woman more generally deviates to-

wards superstition: that is towards minute observances."

आमच्या स्त्रियांच्या अंगच्या या गुणांमुळेंच धार्मिक नेमधर्म, उपास-तापास, व्रतेंवैकल्यें, आणि शकुन, दृष्ट लागणें इ. गोष्टींमधलें खरें तत्त्व विसरलें जाऊन त्यांना कवायतीचें स्वरूप आलेलें आहे.

## चालीरीति

अशोकाच्या काळच्या सामाजिक चालीरीतींवर त्याच्या लेखांनीं विशेषसा प्रकाश पाडलेला नाहीं. स्तंभलेख नं. ५ यांत कांहीं पशु, पक्षी व मत्स्य यांच्या मांसाचें सेवन निषिद्ध म्हणून सांगितलें आहे. यावरून बाकीच्या प्राण्यांचें मांस खाण्यास प्रतिबंध केलेला नव्हता असें अनुमान करण्यास हरकत दिसत नाहीं. पण मांसाशन सर्व वर्णांत प्रचारांत होतें कीं काय हा प्रश्न राहतोच; आणि त्याचें उत्तर देतां येत नाहीं. बौद्ध व जैन हे धर्म हिंसेचा निषेध करणारे असल्यामुळें त्या धर्मांचे लोक मांसाहार करीत नसतील. पण ब्राह्मणांत मांसाहार प्रचलित होता कीं ते वनस्पत्याहारी होते तें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. कदाचित् ते तेव्हां मांसाहारी असतील आणि बौद्धधर्माचा प्रभाव त्यांच्यावर पुढें पडला तेव्हां, किंवा हिंदुसमाजानें बौद्धधर्मीयांना जेव्हां आपणांत मिळवून घेतलें तेव्हां, बौद्धांनीं हिंदूंची जी मूर्तिपूजा उचलली, तिच्या मोबदल्यांत हिंदूंनीं बौद्धांचा अहिंसानियम स्वीकारून तडजोड केली, तेव्हां त्यांनीं (ब्राह्मणांनीं) मांसाहार टाकिला असेल. यासंबंधांत पंडितांत पुष्कळ मतभेद आहेत. या मांसाहाराच्या संबंधांत एक गोष्ट मात्र आश्चर्य वाटण्यासारखी आहे आणि ती ही कीं, मयूर हें सरस्वतीचें वाहन म्हणून त्याचा वध आहारासाठीं करूं नये असा स्मृतिकारांनीं निषेध केला असतां अशोकाने तो वध होऊं दिला आणि कासव, गेंडा वगैरे ज्या कित्येक प्राण्यांच्या वधाला स्मृतिकारांनीं निषिद्ध मानिलें नाहीं, त्यांच्या वधाला अशोकानें मनाई केली आहे! तेव्हां अशोकाच्या या हिंसाविषयक हुकुमाच्या मुळाशीं तत्त्व तरी कोणतें होतें तेंच कळत

नाहीं. कदाचित् या गोष्टीला कांहीं स्थानिक कारण असेल.

## चातुर्वर्ण्य

अशोकाच्या लेखांतून ब्राह्मणाविषयींचे उल्लेख आहेत. पण क्षत्रिय व वैश्य या दोन वर्णांच्या संबंधानें मुळींच उल्लेख नाहींत. क्षत्रिय वर्णच अशोकाच्या काळीं अस्तित्वांत नसावा. प्रत्यक्ष राज्य करणारे व त्यांचे नातेवाईक तेवढे काय ते क्षत्रिय समजण्यांत येत; पण क्षत्रिय म्हणून स्वतंत्र वर्णच त्या काळीं नव्हता असें प्रो. देवदत्त भांडारकर लिहितात. ( Asoka, पृ० १८३–१८४ ). त्याचप्रमाणें शूद्र असाहि स्वतंत्र वर्ण त्या काळीं नव्हता. समाजाच्या अगदीं खालचा वर्ग म्हणजे मजूर किंवा दास यांना अशोकानें आपल्या लेखांतून जीं कर्तव्यें लावून दिलीं आहेत तीं शूद्राच्या कर्तव्यासारखीं हलक्या प्रतीचीं आहेत इतकेंच; पण शूद्र असा स्वतंत्र वर्ण त्या काळीं नव्हता असें प्रो. भांडारकरांचें म्हणणें आहे. यांत किती तथ्य आहे तें प्रस्तुत लेखकाला सांगतां येत नाहीं. इतिहाससंशोधक व धर्मशास्त्रज्ञ यांनीं या गोष्टीचा विचार करावा.

प्रो. भांडारकर म्हणतात त्याप्रमाणें अशोकाच्या काळीं हल्लींच्यासारखें निश्चित स्वरूपाचें चातुर्वर्ण्य नसलें तर अर्थात्च त्यांच्यांत परस्परांमधल्या रोटीव्यवहाराचा व बेटीव्यवहाराचा प्रश्नच उरत नाहीं हें उघड आहे.

चातुर्वर्ण्य जरी या काळीं नसलें तरी ब्राह्मणांचा स्वतंत्र वर्ग त्या काळीं होता आणि समाजावर त्याचें वर्चस्वहि बरेंच असलें पाहिजे असें दिसतें. बौद्धधर्माचा प्रसार जसजसा वाढत गेला, तसतसें ब्राह्मणपुरोहितांचें वर्चस्व कमी कमी होत गेलें आणि पुढें पुढें तर हलक्या प्रतीचीं कामें वंशपरंपरा करीत आलेल्या लोकांतून विद्येच्या जोरावर कांहीं लोक पुढें येऊन पुरोहिताचीं कामें करूं लागले असावेत असें दिसतें.

अशोकाच्या काळीं समाजाचें नेतृत्व ब्राह्मणवर्गाकडे होतें असें दिसत नाहीं.

राजकारण, धर्म, समाज, उद्योग, व्यापार इ. सर्वांचीं सूत्रें राजाच्याच हातीं होतीं असें दिसतें.

अशोकाच्या पूर्वीच्याहि काळीं राजघराण्यांतल्या पुरुषांच्या विवाहासंबंधानें कांहीं निर्बंध नव्हते. राजा बिंदुसार यानें एका ब्राह्मणकन्येशीं व त्याच्याहि पूर्वी चंद्रगुप्तानें एका ग्रीक राजकन्येशीं विवाह केल्याचीं उदाहरणें घडलीं होतीं. कुमार अशोक उज्जयिनी येथें सुभेदारीच्या कामावर असतांना श्रेष्ठी जातीच्या एका तरुणीशीं त्याचा विवाहसंबंध झाला होता व या संबंधापासून त्याला संततीहि झाली होती हा कथाभाग मागें एका प्रकरणांत देण्यांत आलाच आहे.

## सामाजिक जीवन

अशोकाच्या वेळच्या सामाजिक जीवनाचें जें वर्णन तत्कालीन ग्रीक लेखकांनीं लिहून ठेवलें आहे त्यावरून असें दिसतें कीं, त्या काळचा समाज बराच सुखांत काळ काढीत होता. त्या काळचे लोक आहारविहारांत मितपणा ठेवणारे [1]होते. सणावाराच्या व उत्सवाच्या दिवशीं मात्र ते थाटामाटाचा पोशाख, मिष्टान्नभोजन, खेळ, बॉक्सिंग, तमाशे वगैरे करीत. त्या वेळीं जुगारहि खेळत असत व मद्यपानहि करीत. चंद्रगुप्ताच्या वेळीं ठिकठिकाणीं नाट्यशाळाहि होत्या असें वर्णन केलेलें आढळतें. या ख्यालीखुशालीचा अतिरेक होण्याचा रंग दिसूं लागला, व त्यामुळें कृषि आणि व्यापार इ. व्यवसायांना हानि पोहोचूं लागली, तेव्हां अशोकानें त्याला कांहीं निर्बंध घातल्याबद्दलचा उल्लेख त्याच्या लेखांत आहे. त्यानें या गोष्टीला आळा घातला, पण अजिबात बंदी केली नाहीं.

उत्सवाचे दिवशीं मल्लांच्या कुस्त्या वगैरे होत व त्या वेळीं राजा स्वतः

1. " The people were frugal in their diet and sober, except on occasions of festival " (Cambridge History of India, P. 480 )

त्या पाहण्यास जात असे व यशस्वी मल्लांना बक्षिसें देत असे. या खेळांसाठीं मुद्दाम मोठा खर्च करून त्यानें स्वतंत्र भवन Amphitheatre निर्माण केलें होतें. यावरून शारीरिक विकासाचें महत्त्व तो जाणत होता असें दिसतें. बौद्ध-धर्म माणसाला गंभीर किंबहुना उदास बनविणारा आहे, मनुष्यजीवनांत जी एक प्रकारची स्वाभाविक उल्लसित वृत्ति असते तिचा अंकुर खुरडून टाकण्याकडे त्या धर्माची प्रवृत्ति आहे, वगैरे आक्षेप बौद्धधर्मावर अज्ञानपणें घेण्यांत येत असतात. अशोकानें त्या वृत्तीचा नायनाट न करतां विशिष्ट मर्यादेंत तिला उत्तेजन देण्याचा आपला क्रम ठेविला होता हें उदाहरण वरील आक्षेपाचें निरसन करण्यास पुरेसें होईल.

✡ ✡ ✡

# प्रकरण बारावें

## अशोककालीन शिल्प व स्थापत्य

अशोकानें आपल्या साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून कोठें विहार व आश्रम बांधिले, कोठें स्तंभ उभारले, कोठें स्तूप निर्माण केले, अशीं स्थापत्यविद्येचीं व शिल्पकलेचीं अनेक स्मारकें करून ठेविलीं आहेत. त्याचा शोध आज दोन हजार वर्षांनंतर पाश्चात्त्य पंडिताच्या व सरकारच्या पुराण-वस्तुसंशोधन खात्याच्या सतत व दीर्घ परिश्रमानें लागला आहे व त्याच्या अप्रतिम कारागिरीची फर्ग्युसन, बर्केस व हॅव्हेलसारख्या कलाभिज्ञांनीं जी प्रशंसा लिहून ठेविली आहे तिनें हिंदुस्थानचें मुख उज्ज्वल केलें आहे यांत शंका नाहीं. भारतवर्षांत बौद्धधर्माचा उदय होऊन त्याचा उत्कर्ष होत गेला, त्याबरोबर स्थापत्यविद्या व शिल्पकला यांचाहि उत्कर्ष होत होत अशोकाच्या कारकीर्दीत ज्याप्रमाणें त्या धर्माचा परमोत्कर्ष झाला, त्याप्रमाणें शिल्प व स्थापत्य यांनींहि याच काळांत उन्नतीचा कळस गांठला ही नमूद करण्यासारखी गोष्ट आहे. भारतवर्षाची धर्मप्रवणता चिरप्रसिद्ध आहे. त्याची पवित्र व उत्कट भावना आज आपणांस अशोककालीन स्तूप, प्रासाद, विहार इ. च्या भग्नावशेषांत पूर्ण विकसित स्वरूपांत पाहण्यास मिळत आहे हें आपलें थोर भाग्य म्हटलें पाहिजे. बौद्धधर्म जसा विलासपराङ्मुख, तशीं त्या काळचीं शिल्पकामेंहि विलासपराङ्मुख व सात्त्विक भावानें परिपूर्ण आहेत. कारागिरांनीं ज्या उच्च धार्मिक भावनांनीं प्रेरित होऊन हीं शिल्पकामें केलीं त्या भावना त्यांच्या कामांत पूर्णपणें प्रतिबिंबित झालेल्या दिसत आहेत हेंच त्यांच्या अप्रतिम कौशल्याचें उत्कृष्ट प्रमाण आहे. सृष्टींतल्या दृश्याची नुसती नक्कल करण्यांत खरें कौशल्य नाहीं. हें काम निर्जीव यंत्रालासुद्धां करतां येतें. सृष्टिमातेच्या मुखावरील अवगुंठन बाजूला सारून तिचें अंतर्निहित सौंदर्य जनतेला प्रकट

करून दाखविणें हें कलेचें खरें कार्य आहे व तें बौद्धकालीन शिल्पानें उत्कृष्ट प्रकारें केलें आहे, असेच धन्यवाद सर्वांच्या तोंडून ऐकूं येत आहेत. प्राचीन भारताला ही निःसंशय गौरवाची व अभिमानास्पद गोष्ट आहे.

प्रत्येक राष्ट्राचे आचार, विचार व ध्येय यांचें प्रतिबिंब त्या राष्ट्राच्या शिल्पकामांत नकळत थोड्याफार अंशानें तरी प्रतिबिंबित होतेंच होतें. प्राचीनकालीन भारतीय व आधुनिक काळांतले पाश्चात्त्य यांचे आचार, विचार व ध्येय यांच्यांत प्रचंड भेद आहे. हा भेद दोघांच्याहि शिल्पकामाचे उत्कृष्ट नमुने पाहिल्यानें जसा चटकन् लक्षांत येतो तसा एरव्हीं तितका येत नाहीं. भारतीय कारागिरांच्या ठायीं अशी भावना होती कीं, आपल्या इंद्रियांच्या द्वारें या बाह्यसृष्टीच्या अस्तित्वाचा जो अनुभव आपणास मिळतो तो अनित्त्य व क्षणभंगुर आहे. एक परमात्मा तेवढा नित्य सत्य आहे. पाश्चात्त्य कारागिरांची भावना याहून अगदीं भिन्न प्रकारची आहे. पाश्चात्त्य कलेचा आदर्श कितीहि उच्च प्रतीचा असला तरी त्या कलेच्या मुळाशीं जी भावना आहे ती या जगाशीं निगडित आहे. पार्थिव सौंदर्य हेंच पाश्चात्त्य कलेचें ध्येय आहे. भारतीय कला या पार्थिव जगांत संकुचित मर्यादेंत निबद्ध होऊन न राहतां ऊर्ध्वगामी होऊन प्रत्यक्ष स्वर्गलोकाला या लोकीं आणण्याची महत्त्वाकांक्षा बाळगीत असलेली व त्या दिशेनें प्रयत्न करीत असलेली दिसते. पाश्चात्त्य कलेचें ध्येय इहलोकींच्या सौंदर्यापलीकडे धाव घेत नाहीं. दोहोंमधला हा भेद आजकालचा नाहीं, प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. पाश्चात्त्य शिल्पकलेची जननी ग्रीक कला ही आहे. प्राचीन काळचे ग्रीक शिलास्तंभ पाहिले तर त्यांच्या माथ्यावर मानवसौंदर्यव्यंजक व पिळदार स्नायूची आणि प्रमाणबद्ध अवयवांची, गुटगुटीत बांध्याची सुंदर पुरुषाकृति किंवा स्त्रीमूर्ति बसविलेली आढळते. भारतीय शिल्पकारांची पद्धत याहून निराळी आहे. भारतीय शिल्पांत याहून उच्चतर अशी भावना व्यक्त केलेली दिसते. भारतीय शिल्पी नुसते शिल्पीच नव्हते; ते शिल्पी असून कवि व तत्त्वज्ञानीहि होते. शुक्राचार्यांनीं म्हटलें आहे कीं, शिल्पकारानें

एकाग्र चित्तानें देवमूर्ति दृष्टीपुढें आणावी आणि ती ध्यानलब्ध देवमूर्ति शिल्पविद्येच्या साह्यानें जडद्रव्याच्या ठायीं प्रकट करावी. अर्थात् त्यांचें म्हणणें हें कीं, शिल्पकारानें इंद्रियग्राह्य जड वस्तूवर अवलंबून राहूं नये. कारण, आध्यात्मिक ज्ञानाच्या प्रकाशाचें साह्य घेतल्याखेरीज व त्या ज्ञानाला मार्गदर्शक केल्याखेरीज शिल्पकाराला सौंदर्याची दिव्य मूर्ति घडवितांच यावयाची नाहीं. मनुष्यमूर्ति ही पूर्ण सौंदर्याचा अंशमात्र आहे; पूर्ण सौंदर्य नव्हे. शिल्पासंबंधानें विचार करतांना दोहोंमधला हा भेद लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

भारतीय शिल्पाच्या इतिहासाशीं ज्यांचा थोडा फार परिचय झालेला असेल त्यांना हें सांगावयाला नकोच कीं, भारतीय शिल्पांत कित्येक पायऱ्या आहेत. पहिली पायरी म्हणजे ब्राह्मणकाळांतलें शिल्प; दुसरी पायरी बौद्धकालीन शिल्प आणि तिसरी पायरी मोगल शिल्प. ब्राह्मणकालीन शिल्पांतल्या देवदेवतांच्या मूर्ति मानवी मूर्तीहून फार निराळ्या प्रकारच्या असत. बौद्धकालीन शिल्पांतल्या मूर्ति मानवी मूर्तींच्या पुष्कळ जवळ जवळ आल्या आणि देवांची अप्रतिम शक्ति व अलौकिक सामर्थ्य मानवी मूर्तींच्याच स्वरूपांत—पण कांहीं विशिष्ट भेद ठेवून—व्यक्त करण्याचा प्रयत्न होऊं लागला. ब्राह्मणकाळांत ऐहिक जगताशीं शिल्पाचा बिलकूल संबंध नव्हता; तो बौद्धकालांत जडला आणि धर्म व शिल्प यांचा मेळ शिवपार्वतीप्रमाणें अच्छेद होऊन बसला. यामुळें ऐहिक प्रपंचाविषयीं विरक्त, वासनाभिमुक्त आणि ध्यानधारणानिरत असे महान् महान् योगी व तपस्वीसुद्धां शिल्प हें धर्माचेंच एक अंग आहे असें समजून शिल्पाचा व्यासंग करूं लागले. डोंगरांतून, गुहांतून आणि निर्जन स्थलांतून जीं उत्कृष्ट कारागिरीचीं लेणीं आपणांस पाहण्यास मिळतात त्याचें कारण हेंच कीं, या लेण्यांचे कारागीर पीतवस्त्र व कौपीन धारण केलेले आणि सर्वसंगपरित्यागी, गिरिकंदरांचा आश्रय करणारे बौद्ध भिक्षु हे होते.

अशोकाच्या वेळच्या शिल्प व स्थापत्य कामांचें वर्गीकरण केलें असतां त्यांचे पुढील तीन वर्ग पाडतात—

१ सार्वजनिक सोयीसाठीं केलेलीं कामें. उदा०—धर्मशाळा, विहिरी, तळीं, सडका व रस्ते, शालागृहें इ.

२ धार्मिक कामें. उदा०—विहार, स्तूप, स्तंभ, मंदिरें, मूर्ति, लेणीं इ.

३ राजवाडे वगैरे भव्य इमारती, शहरें इ.

या कामांचा आतां क्रमाक्रमानें विचार करूं.

१. **सार्वजनिक कामें**—या वर्गांतल्या अनेक कामांचा अशोकानें स्वतःच आपल्या लेखांतून उल्लेख केला आहे व त्या वेळच्या ग्रीक प्रवाश्यांनीं त्यांचीं वर्णनेंहि लिहून ठेविलीं आहेत. रस्त्यानें दर मैलागणिक अर्ध्या अर्ध्या कोसावर एकेक विहीर अशोकानें खोदविली होती आणि प्रत्येक मुक्कामाच्या जागीं एक तरी धर्मशाळा किंवा प्रवासवसतिगृह बांधविलें होतें. त्याचप्रमाणें पशूंना विहिरींतून पाणीकाढून पितां येत नसल्यामुळें त्यांच्यासाठीं जागजागीं पुष्करणी (हौद) बांधून पाणी-पुरवठ्याची सोय केली होती. हिंदुस्थानावर इंग्रजांचें राज्य होऊन दीडशेंवर वर्षें झालीं. त्याच्यापूर्वीं तीन चारशें वर्षें मुसलमानांचें राज्य होतें आणि त्याच्याहि पूर्वीं कित्येक शतकें हिंदूंचें राज्य होतें. तथापि हिंदुस्थानांत सडका, रस्ते वगैरे दळणवळणाच्या सोयी असाव्या तशा अजूनहि झाल्या नाहींत ही ओरड कायमच आहे ! पण अडीच हजार वर्षांपूर्वीं ही अडचण अशोकाच्या लक्षांत आली होती, आणि त्याच वेळीं त्यानें मोठाल्या सडका व रस्ते बांधण्यास सुरुवात केली होती. अशोकाच्या वेळीं त्याची राजधानी पाटलीपुत्र नगरी ही त्याच्या राज्याच्या जवळ जवळ मध्यभागीं होती, आणि त्या नगरीपासून चारी दिशांना मोठाल्या सडका गेलेल्या होत्या. या सडकांची लांबी किती होती व त्या बांधण्यासाठीं किती अगणित द्रव्य लागलें होतें याची थोडीशी कल्पना या एका गोष्टीवरून करतां येईल कीं, पाटलीपुत्राहून वायव्येस तक्षशिलेकडे जाणारी एकच सडक साडेअकराशें मैल लांबीची होती ! इतर दिशांकडे जाणाऱ्या कित्येक सडका तर याहूनहि जास्त लांबीच्या असल्या पाहिजेत. उदाहरणार्थ—पाटलीपुत्राहून कलिंग देशाला किंवा पांड्य, चोल वगैरे दक्षिणेकडच्या राज्यांना जाऊन

मिळणाऱ्या सडका प्रत्येकीं दोन दोन हजार मैल लांबीच्या तरी असाव्या. ही लांबी झाली. आतां रुंदीचें प्रमाण पाहूं. अशोक अशा बाबतींत कौटल्याच्या अर्थशास्त्रांत घालून दिलेल्या नियमांना अनुसरणारा होता हें मागें राज्यव्यवस्था प्रकरणावरून दिसून आलेंच आहे, आणि त्या शास्त्रग्रंथांत सडकेच्या रुंदीचें प्रमाण ३२ फूट सांगितलें आहे. शुक्रनीतींत सांगितल्याप्रमाणें अशोकाच्या वेळच्या सडका प्रशस्त, स्वच्छ व सुंदर असून त्यांच्या दोन्ही बाजूंनीं गुरेंढोरें व पायीं चालणारे यांच्यासाठीं स्वतंत्र वाटा ठेविल्या होत्या असें ७ व्या शतकांतला चिनी प्रवासी ह्युएन–त्सांग हा स्वतः सडकांची स्थिति पाहून लिहितो. या सडकांवर मुक्कामामुक्कामाला धर्मशाळा व सदावर्तें असलेलींहि त्यानें पाहिलीं होतीं. या सडका बांधण्याचें श्रेय सर्वस्वीं अशोकालाच एकट्याला देतां येत नाहीं. कारण, चंद्रगुप्तानें नंदवंशाचा उच्छेद करून मगधाचें राज्य हस्तगत केल्यानंतर स्थिरस्थावर झाल्यावर त्यानें या लोकोपयोगी कामाला हात घातला होता. अशोकानें आपल्या आजाच्या हातून अपुरें राहिलेलें काम तडीस नेलें इतकेंच नाहीं, तर सडकेच्या बाजूनें अर्ध्या अर्ध्या कोसावर मैलांचे दगड बसविणें, सडकेच्या दोन्ही बाजूंस गर्द छायेचीं झाडें लावणें इ. सुधारणाहि केल्या. अशोकाच्या मागून झालेल्या मगध राजांनीं सडकांत आणखी सुधारणा केल्या नसल्या तरी त्यांची दुरुस्ती खास केली असली पाहिजे. एरव्हीं ८०० वर्षांनीं हिंदुस्थानांत प्रवास करणाऱ्या ह्युएन–त्सांगला त्या चांगल्या स्थितींत दिसणें शक्य नव्हतें.

२. **धार्मिक कामें**—यांत विहार, स्तूप, चैत्य, स्तंभ इ. येतात. विहार म्हणजे साधूंच्या राहण्यासाठीं बांधलेले मठ. पहिला विहार अशोकानें आपल्या राजधानीच्या जवळ बांधलेला होता. त्याचें नांव अशोकाराम किंवा कुक्कटाराम. पुढें त्यानें त्यासारखे आणखी असंख्य विहार बांधले. 'असंख्य' या शब्दानें अतिशयोक्ति सूचित होते असें जे कोणी म्हणत असतील त्यांनीं ही गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे कीं, नुसत्या एका काश्मीर प्रांतांतच ५०० विहार मला माहीत आहेत असें अशोकानंतर नऊशें वर्षांनीं हिंदुस्थानांत आलेला ह्युएन–

सांग लिहितो ! व्हिन्सेंट स्मिथहि विहारांची संख्या असंख्य होती असें सांगतो.[1] नालंद येथील विहार सर्वांत मोठा होता. त्याच्याएवढी इमारत साऱ्या आशिया खंडांत त्या काळीं नव्हती असें म्हणतात.

धार्मिक इमारतींचा दुसरा प्रकार स्तूप अथवा गोल घुंमज असलेल्या इमारती हा होता. अशोकानें ८४००० स्तूप बांधले अशी दंतकथा आहे आणि ह्युएन-सांगहि तसेंच लिहितो. पण या विधानांत तथ्यांश किती व अतिशयोक्तीचा भाग किती तें सांगणें कठीण आहे. या इमारतीच्या घुमटावर एकीवर एक अशा अनेक छत्रीच्या आकारासारख्या रचना असतात. चीन व ब्रह्मदेश या देशांतल्या बौद्ध मंदिरांचीं चित्रें ज्यांनीं पाहिलीं असतील त्यांना बरोबर कल्पना करतां येईल. स्तूपाच्या चौथऱ्याच्या चारी बाजूंस प्रदक्षिणामार्ग असून भोंवतालीं दगडाचा कठडा किंवा भिंत असते. भिंती किंवा कठडा साधा अथवा नक्षीदार असतो, आणि मधोमध प्रवेशद्वार असतें. सांची व बारहूत येथील स्तूप अशोकाच्या काळचे असून सांचीचा स्तूप अद्याप कायम आहे. बारहूतच्या स्तूपाचे कांहीं अवशेष कलकत्त्याच्या पदार्थसंग्रहालयांत ठेवण्यांत आले आहेत. सांची येथें दुसरेहि दहा स्तूप भग्नावस्थेंत आहेत. या स्तूपांपैकीं सर्वांत मोठा जो स्तूप आहे तो सँडस्टोन नांवाच्या लालसर रंगाच्या दगडांनीं बांधिलेला आहे. त्याच्या खुर्चीचा व्यास १२१॥ फूट आणि उंची ७७॥ फूट आहे. भोंवतालीं कठडा आहे. या कठड्यांत मधून मधून ११-११ फूट उंचीचे स्तंभ आहेत. प्रवेशद्वाराची उंची ३४ फूट आहे. त्यावर बौद्धपुराणांतल्या कथांचीं चित्रें कोरलेलीं आहेत.

स्तूप बांधण्याची चाल अशोकाच्या पूर्वीच्या काळींहि असावी. अशोकानें पहिल्यानेंच तिचा उपक्रम केला असें दिसत नाहीं. त्याच्या एका लेखांत

1. " Such structures were extremely numerous. " Asoka, P. 109.

कनकबुद्धाच्या स्तूपाचा जीर्णोद्धार केल्याचा उल्लेख आहे. यावरून स्तूप बांधण्याची चाल अशोकाच्या अगोदरच्या काळांतली खास असली पाहिजे.

अशोककालीन व त्यानें उल्लेखिलेल्या गुहांपैकीं आतांपर्यंत सात गुहांचा तपास लागला आहे. अज्ञात अशा आणखीहि कित्येक असण्याचा संभव आहे. या गुहांच्या भिंती व छतें गुळगुळीत व तुकतुकीत आहेत. हें त्या काळच्या शिल्पाचें एक लक्षणच होतें असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे.

अशोकाच्या काळीं स्तंभ बांधण्याची चाल बौद्धधर्मी लोकांतच होती असें नाहीं. शैव, वैष्णव व जैन लोकांनीं त्या काळीं स्तंभ उभारले होते. वैष्णवांचे व जैनांचे स्तंभ बौद्धांच्या स्तंभांहून निराळ्या पद्धतीचे होते. बौद्धांच्या स्तंभांवर लेख कोरलेले व माथ्यावर सिंहाची मूर्ति बसविलेली असे.[१] जैनांचे स्तंभ दीपमाळेसारखे असून त्यांच्या माथ्यावर जिनाची मूर्ति असे; आणि वैष्णवांचे स्तंभ विष्णूच्या अवतारांपैकीं एखाद्या अवताराच्या मंदिरापुढें उभारले असून त्याच्या शिखरावर गरुड किंवा हनुमान् याची मूर्ति असते. शैवांच्या स्तंभावर त्रिशूळ किंवा पताका असावयाची हें ठरलेलें आहे. अशा खुणांवरून कोणता स्तंभ कोणाचा तें ओळखण्यास विशेषशी अडचण पडत नाहीं.

अशोकानें जे स्तंभ उभारले ते धर्मतत्त्वांचें ज्ञान लोकांना करून देण्यासाठीं. उपदेशलेख दुरूनहि वाचतां यावे हा स्तंभावर उंच जागीं लेख कोरण्याचा उद्देश असावा. हे पायथ्याशीं मोठ्या आकाराचे व चांगल्या ऐसपैस चौथऱ्यावर बसविलेले असून वरवर निमुळते होत गेले आहेत. कित्येक स्तंभांचें व

१. सांचीच्या स्तूपाजवळ मोडकेतोडके पुष्कळ स्तंभ आहेत. त्यांपैकीं एकाच्या शिखरावर एक मनुष्यमूर्ति आहे. ही मूर्ति स्वतः अशोकाचीच असावी असें जनरल कनिंगहॅम म्हणतो. हा स्तंभ मूळचा ४५ फूट उंचीचा व तकाकणारा होता. कांहीं स्तंभांवर हत्तीखेरीज, उंट, बैल, घोडे इ. इतर पशूंचींहि चित्रें आढळतात.

स्तूपांचें बांधकाम विटांचें आहे. या स्तूपांच्या व स्तंभांच्या चौथऱ्यांच्या पडक्या भागांतल्या विटांवरून मौर्यकालीन विटांचें मोजमाप कळतें. यांतल्या कांहीं विटा १९॥ × १२। × २। इंच या परिमाणांच्या आहेत. सर्वच ठिकाणीं विटांचें हें परिमाण आढळतें असें मात्र नाहीं. निरनिराळ्या ठिकाणच्या विटा निरनिराळ्या परिमाणांच्या आहेत. उदाहरणार्थ, सारनाथ येथील स्तंभाच्या पायथ्याच्या विटा १६॥। × ११ × २॥। इंच परिमाणाच्या आहेत, तर मथुरेच्या १३॥×१०।×३ इंचांच्या आहेत. पण स्तंभांच्या चौथऱ्यांच्या विटा आज दोन हजारांवर वर्षे टिकल्याच कशा हीच मुळीं खरोखर आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे.

पाषाणाच्या मोठमोठ्या शिलांवर ठळक अक्षरांनीं लेख कोरण्याची कल्पना अशोकानें पारस (पर्शिया अथवा इराण) देशचा राजा दरायस याचेपासून उचलली असें कित्येक पाश्चात्त्य पंडित म्हणतात. जणू काय या कल्पनेंत अशी कांहीं गूढ जादू आहे कीं, ती कल्पना अशोकासारख्या बुद्धिमान् व कर्तृत्वशाली भारतीय राजाला सुचणें अशक्यच होतें! शिलालेख कोरण्याची कल्पना मूळची दरायस राजाची असें घटकाभर धरून चाललें तरी उंच स्तंभ उभारून दुरून सर्वांना दिसतील असे लेख त्यांवर कोरण्याची कल्पना तर अशोकाचीच होती यांत शंका नाहीं. कारण, असे सुटे व इतके प्राचीन स्तंभ दुसऱ्या कोणत्याहि देशांत आढळत नाहींत. ते आढळते तर याहि कल्पनेचें श्रेय सदर पंडितांनीं अशोकाला मिळूं दिलें असतें कीं काय ही शंकाच आहे. थोड्या वर्षांपूर्वी पाटण्याजवळ खोदतां खोदतां पुराणवस्तुसंशोधक खात्याचे एक अधिकारी डॉ० स्पूनर यांना अशोकाच्या राजवाड्याचे कांहीं अवशेष सांपडले. त्याबरोबर त्या प्रासादाची बांधणी पारस देशच्या प्राचीन राजवाड्याच्या बांधणीची नक्कल आहे असें विधान सदर गोऱ्या अधिकाऱ्यानें बेधडक ठोकून दिलें होतें ही गोष्ट पुष्कळांच्या वाचनांत आली असेल. असो.

स्तंभासाठीं पन्नास पन्नास फूट लांबीचे आणि चार फूट रुंद व चार फूट जाडीचे दगड खाणींतून यंत्राच्या साह्यावांचून काढावयाचे, ते घडवावयाचे

आणि त्याला गोल आकार देऊन तुळतुळीत दिसतील असें करावयाचें हें काम कांहीं सोपें नव्हतें. पण याहीपेक्षां कठीण काम म्हणजे ते दूर अंतरावर नेऊन इष्ट स्थळीं उभे करणें हें होतें. हल्लींच्या संयुक्त प्रांतांत चुनार म्हणून एक ठिकाण आहे. तेथच्या खाणींतून हे सगळे स्तंभाचे दगड काढून, घडवून, तुळतुळीत घोटवून चोहींकडे पाठविण्यांत आले होते. ज्या वेळीं उत्तोलकयंत्रा-सारखीं यंत्रें ( क्रेन ) व आगगाडीसारखीं वाहनें नव्हतीं अशा त्या काळीं रानावनांतून व घाटांतून हे प्रचंड दगड नेण्याचें कठीण काम कसें केलें असेल याची आजच्या घटकेस मोठमोठ्या निष्णात इंजिनिअरांनासुद्धां कांहीं कल्पना करतां येत नाहीं; मग सामान्य जनांची काय कथा ?

अशोकाच्या वेळेपर्यंत मोठमोठ्या इमारती लाकडाच्या किंवा विटांच्या बांधण्याची चाल होती. दगडी इमारती बांधण्याचा प्रघात अशोकानें प्रथम घातला. पाटलीपुत्र राजधानीच्या भोंवतीं विस्तीर्ण तटबंदी होती ती लाकडाची होती व तिला तोफांचा मारा आंतून करतां यावा म्हणून मधून मधून खिंडारें ठेविलेलीं होतीं असें मेगॅस्थनीसनें वर्णन केलें आहे. जर खुद्द राजधानीच्या संरक्षणार्थ उभारलेली तटबंदी लाकडाची होती, तर इतर लोकांचीं घरें लाकडीच असलीं पाहिजेत असें अनुमान केल्यास तें चुकीचें होणार नाहीं पण लाकडाला कुजण्याची व कालांतरानें नष्ट होण्याची भीति असते आणि अशोकाला आपले धर्मोपदेश चिरस्थायी व्हावे असें वाटत होतें. म्हणून लाकडाचे ऐवजीं ते दगडावर कोरून ते स्तंभ दूरवर पाठविण्याची प्रचंड यातायात त्यानें केली यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

हिंदु लोकांत मृतव्यक्तींच्या अस्थि तीर्थार्पण करण्याची चाल आहे. बौद्ध लोकांत गौतमबुद्धासारख्या महान् व पूज्य साधुपुरुषांच्या मृत देहांतल्या अस्थि ( यांत दांतहि अर्थात् येतात ) काळजीपूर्वक व भक्तिभावानें जपून ठेवण्याची व त्यांच्या रक्षणासाठीं त्या अस्थि ठेवण्याच्या जागीं भव्य, मजबूत व शोभायमान इमारती बांधण्याची चाल आहे. अशा इमारतींना स्तूप ही संज्ञा आहे.

कुशीनगर येथें बुद्धाचें महापरिनिर्वाण झाल्यानंतर त्याच्या अस्थींची आठ ठिकाणीं वांटणी झाली व त्या आठ ठिकाणीं आठ स्तूप बांधण्यांत आले. बुद्धाचा एक दांत ओरिसा प्रांतांतल्या त्याच्या शिष्यांनीं नेला. दुसरा एक गांधार देशांतल्या शिष्यांनीं नेला. तिसरा अशाच रीतीनें सिंहलद्वीपांत नेण्यांत आला आणि या प्रत्येक ठिकाणीं त्या दांतांच्या रक्षणासाठीं स्तूप बांधण्यांत आले, व कांहीं ठिकाणीं तर या स्मारकाजवळ नगरेंहि वसविण्यांत आलीं. ओरिसा प्रांतांतल्या बुद्ध-शिष्यांनीं जें नगर वसविलें त्याचें नांव त्यांनीं दंतपूर असें ठेविलें. हें दंतपूर म्हणजेच हल्लींची जगन्नाथपुरी व बुद्धाच्या दांतावरचा स्तूप जेथें होता तेथेंच जगन्नाथाचें मंदिर आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण या विधानाला कांहीं आधार दिसत नाहीं. महापुरुषांचें स्मरण ताजें ठेवण्यासाठीं भाविकतेनें त्यांच्या वस्तूंचा संग्रह करण्याची व त्यांचीं स्मारकें उभारण्याची प्रवृत्ति सर्व देशांतून दृष्टीस पडते. हिंदुस्थानांतच ती आहे असें नाहीं.

**३. राजवाडे व अट्टालिका**—राज्यांतल्या मोठमोठाल्या शहराला जाण्याचे वारंवार प्रसंग राजांना येत. तेथें राहण्यासाठीं स्वतःकरितां ते मोठाले वाडे बांधीत. ही चाल अशोकाच्या वेळेपासून आतांपर्यंत हिंदुस्थानांत चालू आहे. त्याप्रमाणें अशोकाने पुष्कळसे राजवाडे व अट्टालिका अथवा महाल जागोजाग बांधले होते यांत नवल नाहीं. त्याचीं रसाळ वर्णनें फा–हयान, ह्युएन–त्सांग सारख्या परदेशी प्रवाश्यांच्या लेखांतूनच आपण आतां वाचावयाचीं. कारण, ते वाडे आतां नामशेष झाले आहेत. फा–हयान यानें पाटलीपुत्र येथील अशोकाच्या राजवाड्याचें जें वर्णन केलेलें आहे तें फारच आश्चर्यजनक आहे.

**शहरें**—अशोकानें कित्येक नवीं शहरें वसविलीं होतीं असें दिसतें. अशा नव्या शहरांपैकीं काश्मीर संस्थानची हल्लींची राजधानी श्रीनगर व नेपाळ राज्यांतलें देवपाटण हीं दोन शहरें प्रसिद्ध आहेत. श्रीनगर हें शहर अशोकानें वसविल्याबद्दलचा उल्लेख संस्कृत राजतरंगिणी नांवाच्या इतिहासग्रंथांत आहे. त्या

ग्रंथाचा कर्ता कल्हण याच्या फार अगोदरच्या काळांत झालेल्या ह्युएन–त्सांगच्या प्रवासवृत्तांतहि तसाच उल्लेख आढळतो. देवपाटण हें शहर, अशोक धर्मयात्रेला निघाला होता त्या वेळीं फिरत फिरत नेपाळांत गेला. आपल्या भेटीचें स्मारक म्हणून त्यानें हें वसविलें. या वेळीं अशोकाची मुलगी चारुमतीहि त्याच्याबरोबर होती. त्याचप्रमाणें चारुमतीचा पति देवपाल हाहि त्यांच्या संगतीं होता. कन्येला व जांवयाला हें शहर राहण्यास फार आवडल्यामुळें तीं दोघें पुढें तेथेंच मठ बांधून राहूं लागलीं अशी कथा आढळते.

## शिल्प

बौद्धकालीन स्तूपांपैकीं जे आज उपलब्ध आहेत, त्या सर्वांत भेलशाचा सांची स्तूप मुख्य आहे. भेल्सा हें ठिकाण भोपाळ संस्थानांत आहे. या ठिकाणीं एका विस्तृत भूभागावर लहान लहान असे एकंदर तीस स्तूप ओळींनें आहेत. त्यांतला सांची स्तूप हा मुख्य आहे. सांचीच्या रेल्वे स्टेशनापाशीं आगगाडीनें जातांना हा दुरून दिसतो. याचें शिल्पकाम बुद्धाच्या वेळच्या शिल्पकामापेक्षा थोडें निराळें आणि अधिक चांगलें आहे. यावरून हा स्तूप अशोकानें बांधिला असावा असा कांहीं शिल्पज्ञांचा[1] तर्क आहे. सांचीपासून ६ मैलांवर सोनारी येथें व तसेंच सद्धार, भोजपूर वगैरे आसपासच्या गांवीं अनेक स्तूप आहेत.

देवाच्या मूर्तींचें दर्शन घेतल्यानंतर देवळाला प्रदक्षिणा घालण्याची हिंदूंची चाल आहे. या प्रदक्षिणेच्या वाटेवर प्रदक्षिणा घालणारांना दिसतील अशा रीतीनें पुराणांतल्या कथाप्रसंगांचीं चित्रें किंवा इतर देवांच्या मूर्ति देवळाच्या बाहेरच्या अंगावर खालपासून वर कळसापर्यंत बसविलेल्या असतात. सनातन हिंदुधर्मीयांची ही चाल बौद्धधर्मी लोकांनीं उचलून स्तूपांच्या प्रदक्षिणेच्या वाटे-

1. History of Indian and Eastern Architecture by Fergusson.

वर बुद्धचरित्रांतल्या व बौद्ध पुराणांतल्या निरनिराळ्या प्रसंगांचीं चित्रें कोरून ठेविलेलीं पाहण्यांत येतात. या चित्रांत कारागिरांचें अप्रतिम कौशल्य पुष्कळ वेळां दिसून येतें. बुद्धगया येथें मधल्या स्तूपाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर अशा प्रकारचीं चित्रें व मूर्ति जिकडे पाहाल तिकडे दृष्टीस पडतात. या मूर्ति अशोककालीन आहेत असें पुष्कळ तज्ज्ञांचें मत आहे. या सर्वांत बारहूत येथील मूर्तींच्या शिल्पाचें हें विशेषत्व आहे कीं, तें शिल्प अस्सल भारतीय धर्तीचें आहे. परदेशीय शिल्पपद्धतीची छायासुद्धां त्याच्यावर पडलेली नाहीं. सांची येथील रेलिंग अथवा प्रदक्षिणामार्गाच्या भोंवतालच्या कठड्याला एकंदर चार प्रवेशद्वारें आहेत. त्यांच्यावरच्या तोरणाचें शिल्पकाम म्हणजे अशोककालीन कारागिरीचा उत्कृष्ट नमुना आहे. हीं चारी द्वारावरचीं चार तोरणें निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या कारागिरांच्या हातून बांधलीं गेलीं आहेत. पैकीं दक्षिणेकडचें तोरण सर्वांत जुनें—अशोककालीन—आहे. उत्तरेकडच्या तोरणावरचें बारीक नक्षीकाम अतिशय प्रेक्षणीय आणि सध्याच्या कारागिरांना आश्चर्यानें थक्क करून सोडणारें आहे. भारतीय शिल्पांचें जें ध्येय या प्रकरणाच्या आरंभीं सांगितलें आहे, तें सांची येथील स्तूपांत उत्तम प्रकारें प्रकट झालेलें दिसतें. कारागिरांचीं स्वतःचीं अंतःकरणें प्रथम सात्त्विक धर्मभावनेनें ओतप्रोत भरलेलीं असल्याशिवाय त्यांच्या हातून ती भावना इतक्या उत्कृष्ट प्रकारें दगडांत मूर्तींच्या रूपानें कधीं प्रकट केली जाणार नाहीं असें तज्ज्ञ म्हणतात.

एकंदर बौद्धकालीन शिल्प व स्थापत्य यांच्या संबंधानें लिहावयाचें असतें तर एक मोठा ग्रंथ होईल इतकें साहित्य सहज गोळा करतां आलें असतें. पण हें पुस्तक एकंदर बौद्धकालाच्या इतिहासाविषयींचें नाहीं, अशोक राजाच्या चरित्रासंबंधाचें आहे इकडे लेखकाचें लक्ष असल्यामुळें व त्यानें फक्त अशोककालीन शिल्प व स्थापत्य असा अगदीं मर्यादित विषय घेतला असल्यामुळें विषयांतर करून एकंदर बौद्धकालीन शिल्प व कला याविषयींचें विवेचन करण्याचा मोह त्यानें आवरून धरला आहे. यामुळें विषयाच्या विवेचनांत जो

त्रोटकपणा दिसून येईल त्याबद्दल लेखकाला जबाबदार धरणें न्यायाचें होणार नाहीं अशी नम्रभावाची सूचना वाचकांस देऊन ठेवणें भाग आहे. अस्तु.

## स्थापत्य

स्थापत्य अथवा इंजिनियरिंग या शास्त्रांत कालवे काढणें, बंधारे बांधणें, सरोवरें, तलाव, विहिरी वगैरे निर्माण करणें इ. गोष्टींचाहि व त्याप्रमाणें नगररचना ( Townplanning ) या विषयांचाहि समावेश होत असल्यामुळें अशोकाच्या काळीं या शास्त्रांत कितीशी प्रगति झाली होती तेंहि येथें सांगणें अवश्य आहे. प्रथम इरिगेशन हा विषय हातीं घेऊं.

येथें हें सांगितलें पाहिजे कीं, इंजिनियरिंग शास्त्राच्या या शाखेंत अशोकाच्या वेळीं विशेष कांहीं प्रगति झाली नाहीं. त्याच्या पूर्वीं झालेल्या मौर्यराजांचे वेळींच या विद्येंत निष्णात अशा शास्त्रज्ञांनीं जी पद्धति घालून दिली होती तीच इतकी उत्कृष्ट व हिंदुस्थानची नैसर्गिक रचना व लोकांची राहणी यांना अनुसरून होती कीं, तिच्यांत फेरबदल करण्याची आवश्यकताच अशोकाला दिसली नसावी. इ. स. १५० व्या वर्षीं कोरलेला रुद्रदामन् याचा एक लेख सांपडला आहे. त्यांत गिरनारजवळच्या रैवतक व ऊर्जयत् या दोन पर्वतांमध्यें पलाशिनी व दुसऱ्या कांहीं नद्या यांच्या प्रवाहांचे पाण्यास बंधारे घालून सुदर्शन नांवाचें एक मोठें सरोवर निर्माण केल्याविषयींचा उल्लेख आहे. हा लेख इ. स. च्या दुसऱ्या शतकांतला असल्यामुळें हें सरोवर त्याच्या अगोदरच्या काळांतलें म्हणजे बौद्धकालीन असलें पाहिजे हें उघड आहे. त्याच लेखांत आणखी असेंहि म्हटलें आहे कीं, मौर्यसम्राट् चंद्रगुप्त यांचा एक प्रांताधिकारी वैश्य पुष्पगुप्त याच्या आज्ञेनें हें सरोवर प्रथम निर्माण करण्यांत आलें आणि नंतर अशोकाच्या कारकीर्दींत यवन प्रांताधिकारी तुशास्प यानें या सरोवराच्या प्रणाली ( कालवे ) काढल्या. कालव्याच्या पाण्यांत गदळ, चिखल, केरकचरा वगैरे पडून पाणी खराब होऊं नये म्हणून नीट बंदोबस्त

करून त्या कालव्यांतून नळानें लांबवर पाणी नेऊन निर्जन प्रदेशांतल्या लोकांना तें पिण्यासाठीं पुरविण्यांत आलें होतें. हें वर्णन वाचून दोन अडीच हजार वर्षांपूर्वी आपल्या लोकांत इंजिनियरिंग शास्त्राचें केवढें ज्ञान होतें व स्वच्छता राखण्यासाठीं कसें जपण्यांत येत असे तें चांगलें दिसून येतें.

जें इरिगेशनसंबंधानें तेंच नगररचनेसंबंधानेंहि अभिमानपूर्वक सांगतां येतें. मौर्यकालीन इंजिनियर नगररचनेच्या कामांत फार निष्णात होते. राजा अजातशत्रूचा नातू उदय यानें प्रथम पाटलीपुत्र नगराचा पाया घातला असें वायुपुराणांत सांगितलें आहे. यापुढें त्या शहराची हळूहळू वाढ होत होत चंद्रगुप्ताच्या वेळीं तें एक भव्य, विस्तृत, समृद्धिशाली, ऐश्वर्यवंत व शोभायमान शहर झालें होतें. या शहराचें अल्पसें वर्णन मागें एका प्रकरणांत दिलें आहे. विटांनीं बांधल्यास नदीच्या पुरानें शहर वाहून जाईल या भीतीनें तें लाकडाचें बांधण्यांत आलें होतें असें मेगॅस्थनीस यानें म्हटलें आहे. या शहरांतल्य राजवाड्याची भव्यता, ऐश्वर्य व सौंदर्य याचें जें वर्णन मेगॅस्थनीस यानें प्रत्यक्ष पाहून लिहून ठेविलें आहे तें एखाद्या कल्पित कादंबरींतल्या राजवाड्याच्या अतिशयोक्तिपूर्ण वर्णनासारखें दिसतें. पण मेगॅस्थनीस हा परदेशी (ग्रीक) होता. अतिशयोक्ति करण्यांत त्याला कोणताहि मतलब साधावयाचा नसल्यामुळें त्यानें दिसलें तसें लिहून ठेविलें असणें स्वाभाविक दिसतें. शिवाय फा–हयान या चिनी प्रवाश्यानें लिहून ठेविलेल्या वर्णनाशीं तें जुळत असल्यामुळें विश्वसनीय मानिलें पाहिजे. फा–हयान लिहितो कीं, हें शहर व विशेषतः त्यांतला राजवाडा यांचा नकाशा तयार करण्यापासून तो थेट तो वाडा संपूर्ण तयार करीपर्यंतचीं सगळीं कामें अशीं उत्कृष्ट रीतीनें करण्यांत आलीं आहेत कीं, तीं माणसांच्या हातून झालेलीं नाहींत, यक्ष गंधर्व यांच्यासारख्या अलौकिक दैवी शक्ति अंगीं असलेल्या प्राण्यांनीं केलेलीं असलीं पाहिजेत असें प्रेक्षकांना वाटल्यावांचून राहात नाहीं. अशोकानें पूर्वीच्या चंद्रगुप्ताच्या वाड्याचा विस्तार करून तटाच्या भिंती उंच केल्या, कांहीं नवीन वेशी

वसविल्या, नक्षीकाम वाढविलें आणि लाकडाच्या ऐवजीं दगडीकाम केलें, अशा बऱ्याचशा सुधारणा केल्याचें फा-हयान सांगतो. यावरून पाटलीपुत्राची व तेथील राजवाड्याची रचना बहुतेक निर्दोष होती असा सामान्यतः मनाचा ग्रह होतो.

वास्तुनिर्मिति अथवा स्थापत्य याच्यासारखीच त्या काळची पुतळे करण्याची कलाहि उत्कर्षावस्थेंत होती असें दिसतें. मथुरेजवळ परखम येथें ७ फूट उंचीचा माणसाचा एक पुतळा सांपडला आहे. हा Sand-Stone जातीच्या भुरक्या रंगाच्या दगडाचा असून त्यावर इतकी जिल्हई केलेली आहे कीं, त्यांत तोंड पाहून घ्यावें! या पुतळ्याखालीं अशोककालीन लिपींत एक लेखहि लिहिलेला आहे. वेसनगर येथें एक स्त्रीचा व पाटणा आणि दिदारगज येथें दोन पुरुषांचे असेच भव्य पुतळे सांपडले आहेत. यावरून त्या काळचीं माणसें शरीरानें भव्य होतीं असें दिसतें व त्याप्रमाणेंच येवढे जंगी पुतळे तयार करण्याची व ते उभारण्याची विद्याहि त्या काळीं उत्कर्षावस्थेंत होती असें तज्ज्ञांनीं यथार्थ अनुमान काढलें आहे.

**नाणीं**—त्या वेळचीं पाडलेलीं नाणीं सांपडलीं आहेत. त्यांच्या ओबड-धोबडपणावरून नाणें पाडण्याची कला त्या वेळीं अज्ञात नव्हती येवढेंच म्हणतां येईल. पण त्या कलेंत तत्कालीन लोकांची विशेषशी प्रगति झाली होती असें म्हणतां यावयाचें नाहीं. मातीचीं चित्रें, मातीच्या कुंड्या, वगैरे बारीक-सारीक कामांत कौशल्य दाखविण्याकडे त्या काळीं कारागिरांची प्रवृत्ति विशेषशी दिसून येत नाहीं. पण चांदीसोन्याचे व हिरेमाणकांचे दागिने करण्यांत त्या काळीं कारागीर विशेष कुशल होते यांत शंका नाहीं.

एकंदरींत अशोकाच्या काळीं भारतीय कलाकौशल्य अत्यंत श्रेष्ठ पदाला पोंचलें होतें असें व्हिन्सेंट स्मिथसारख्या पाश्चात्त्य लेखकांनींसुद्धां कबूल केलें आहे. ते म्हणतात—

" The arts in the age of Asoka undoubtedly had attained to a high standard of excellence. " ( Asoka, P. 135 )

सर्वश्रेष्ठ कलाभिज्ञाच्या लेखणींतून हें वाक्य उतरलें असें समजून या अभिप्रायाला आम्ही महत्त्व देतों असें मुळींच नाहीं तर पाश्चात्त्य लेखकाचें प्रशंसावाक्य म्हणून त्याला किंमत आहे. कारण, पाश्चात्त्य पंडित लेखकांची सामान्यतः असें म्हणण्याकडे प्रवृत्ति आढळते कीं, या भारतभूमीच्या ठायीं स्वतंत्र निर्माणशक्तिच नाहीं. तिच्या पुत्रांनीं पाश्चात्त्यांचें केवळ अनुकरणच करावें. जीं कांहीं शास्त्रें निर्माण झालीं, किंवा विद्या, कला इ. मानवजातीनें उदयास आणिल्या, त्यांचा उगम पाश्चात्त्य देशांत होता, आणि त्यांच्याकडून भारतीयांना त्या कळल्या. नाट्यशास्त्र घ्या, ज्योतिष घ्या, तत्त्वज्ञान घ्या, इतिहास घ्या, संगीतविद्या घ्या, किंवा स्थापत्यकला घ्या, ग्रीक लोक सगळ्या विद्यांचे व कलांचे जनक आणि भारतीय लोक केवळ त्यांचें अनुकरण करणारे असें गृहीत धरूनच ते लिहितात. पण अशोकाच्या सुदैवानें त्याच्या बाबतींत पाश्चात्त्य लेखकांना असें भलतें विधान करण्यास वावच राहात नाहीं. कारण, ग्रीक लोकांचा या भरतभूमीशीं संबंध मॅसिडोनिआच्या अलेक्झांडर बादशहाच्या वेळीं आला त्या काळांत आणि अशोकाच्या काळांत फारच थोडें अंतर होतें, आणि इतक्या अल्प काळांत भारतीयांना ग्रीक लोकांपासून नानाविध विद्या व कला शिकून त्यांत आश्चर्य करण्यासारखी प्रगति करून गुरूवर ताण करून दाखविणें मानवी बुद्धीला व प्रयत्नालाहि शक्य नव्हतें हें कबूल करणें भागच आहे आणि शक्य आहे असें जरी म्हटलें तरी तिकडूनहि भारतीयांची बुद्धि असामान्य होती हें कबूल करावें लागेल, अशी आपत्ति प्राप्त होते. अशा पेंचांत धरलें गेल्यामुळें पाश्चात्त्यांनीं सरळ मार्ग धरून जी गुणज्ञता दाखविली आहे ती निःसंशय त्यांना भूषणावह आहे.

☆ ☆ ☆

## प्रकरण तेरावें

# तिसरी धर्मपरिषद्

### धर्मपरिषदेचा पूर्वेतिहास–पहिलें अधिवेशन

महावंश नामक सिंहली बौद्धग्रंथांत अशोकाच्या कारकीर्दीत धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची अशी एक गोष्ट घडून आल्याचें लिहिलें आहे. ती गोष्ट म्हणजे अशोकाच्या राज्याभिषेकानंतर १७ व्या वर्षी पाटलीपुत्र येथें मोग्गलीपुत्र तिष्य याच्या अध्यक्षत्वाखालीं अखिल बौद्धधर्मी पंडितांची तिसरी धर्मंमहापरिषद् भरली होती ही होय. या सभेचें निमंत्रण बुद्धाचा एक प्रमुख शिष्य महाकाश्यप यानें दिलें होतें, व निमंत्रणास मान देऊन ५०० बौद्ध भिक्षु सभेला आले होते. सभेंत बौद्धधर्मांचा प्रसार सर्वत्र करण्यासाठीं काय उपाय योजावेत याविषयींचा विचार मुख्यत्वें करून झाला. या सभेकडून अर्हत् या उच्च पदवीला पोंचलेल्या अशा कांहीं प्रमुख भिक्षूंचें प्रतिनिधिमंडळ अजातशत्रु-राजाकडे गेलें होतें. भिक्षूंना चातुर्मासांत राहण्यासाठीं विहार ( मठ ) बांधून द्यावे व जुन्या मठांचाहि जीर्णोद्धार करावा या मंडळाच्या विनंतीला मान देऊन राजानें त्यांच्या इच्छेप्रमाणें मठ वगैरे बांधून दिले होते.

लवकरच बौद्धभिक्षूंच्यामुळें खुद्द अजातशत्रूची बौद्धधर्माकडे प्रवृत्ति होऊं लागली व त्यानें भिक्षूंची एक सभा बोलाविली. या सभेला भिक्षूंचा मोठा समाज हजर होता. या सभेंत विनय, सूत्र व अभिधर्म या ग्रंथांचें संशोधन करण्याचें काम अनुक्रमें उपालि, आनंद व महास्थविर यांचेकडे सोंपविण्यांत आलें होतें. सात महिने खपून या तिघांनीं इतर भिक्षूंच्या साह्यानें आपापलें काम यशस्वी रीतीनें पार पाडलें.

यानंतर कित्येक वर्षेंपर्यंत मगधराज्यांत राज्यक्रांतीची गडबड चालली होती. तिची छाया बौद्धधर्मी लोकांवरहि पडलेली दिसूं लागली. जशी राजकारणांत

तशी धर्मकारणांतहि अराजकता माजली. संघाचे कडक नियम आचरणांत आणतांना शिथिल होऊं लागले. स्वेच्छाचारितेचा बौद्ध संघांत प्रवेश झाला. वैशाली नगराजवळच्या महावनविहारांत सहस्रावधि भिक्षूंचें वास्तव्य होतें. बुद्धानें ज्यांचा निषेध केला होता असे कित्येक आचार[1] त्यांतल्या पुष्कळांनीं उघडपणें स्वीकारले.

## दुसरें अधिवेशन

काकंदकपुत्र स्थविर यश हा तीर्थपर्यटन करीत करीत महावनविहारांत गेला असतां त्यानें तो प्रकार प्रत्यक्ष पाहिला, आणि पाटलीपुत्रास जाऊन तेथून सर्व ठिकाणच्या बौद्ध भिक्षूंना त्यानें तो कळविला. या भिक्षूंत स्थविर रेवत नांवाचा

---

१. हे दहा निषिद्ध आचार पुढें लिहिल्याप्रमाणें होत—१. पोकळ शिंगांत भरून ठेविलेल्या मिठाचा उपयोग खाण्यांत करणें; २. दोन प्रहरानंतर दोन बोटें सांवली पडण्याच्या आंत भोजन करणें; ३. निमंत्रणावरून परक्या गांवास जाण्यासाठीं निघतांना कांहीं खाऊन निघणें; ४. भिन्नभिन्न विहारांत वास करणाऱ्या भिक्षूंना उपोसथाचे दिवशीं एकाच स्थानीं उपोसथ करण्यास लावणें; ( पौर्णिमा, अमावास्या किंवा चतुर्दशी आणि शुक्ल व कृष्ण अष्टमी हे उपोसथाचे दिवस होत. या दिवशीं भिक्षु एकत्र जमत आणि एखाद्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध स्थविराला अध्यक्ष निवडून प्रातिमोक्षाचा पाठ करीत आणि गेल्या पंधरा दिवसांत हातून घडलेल्या दोषाबद्दल प्रायश्चित्त घेत. अष्टमीचा दिवस गृहस्थांसाठीं राखून ठेविलेला असे. याला उपोसथ म्हणतात ); ५. उपोसथाला हजर नसलेल्या भिक्षूंसाठीं प्रार्थना; ६. आचार्य व उपाध्याय यांनीं धर्मविरुद्ध आचरण केलें तरी त्यांची आज्ञा पाळणें; ७. अर्धवट विरजलेलें दहीं भोजनोत्तर खाणें; ८. सोन्याचांदीच्या नाण्याचा व्यवहार ( उपयोग ) करणें; ९. सुरापान; १०. अभ्रा घातलेल्या आसनाचा उपयोग.

एक महान् पूज्य पंडित होता. तो महावनविहारांतल्या भिक्षूंना सन्मार्गाला लावण्याच्या बुद्धीनें त्यांचेकडे गेला. पण त्याचें कांहीं न ऐकतां त्या स्वेच्छाचारी भिक्षूंनीं त्याला प्रलोभन दाखवून आपल्या मताच्या बाजूस वळवण्याचा यत्न केला. तेव्हां रेवतप्रभृति भिक्षु कालाशोक नांवाच्या तेथच्या राजाकडे गेले. राजाला त्यांनीं आपली हकीकत निवेदन केली. राजानें दुसऱ्याहि पक्षाचें म्हणणें ऐकून घेतलें आणि शेवटीं रेवतपक्षासारखा निकाल दिला. तेव्हां महावनविहारांतल्या भिक्षूंत मोठी गडबड उडाली. दोन्ही पक्षांत कडाक्याचे वादविवाद झाले. शेवटीं आठ विद्वान् प्रमुख भिक्षूंची कमिटी नेमण्यांत येऊन तिच्याकडे वादांच्यां मुद्द्यांचा विचार करण्याचें काम सोपविण्यांत आलें. त्या कमिटीनें रेवताच्या बाजूचा निकाल देऊन स्वेच्छाचारी भिक्षूंना दंडार्ह ठरविलें. त्यानंतर ७०० भिक्षूंना धर्मपरिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनास निमंत्रण करण्यांत आलें, व या अधिवेशनांत धर्माचरणाची संशोधित नियमावलि ठरविण्याचें काम झालें.

## तिसरें अधिवेशन

नंतर बऱ्याच काळानें म्हणजे अशोकाच्या कारकीर्दीत या धर्मपरिषदेचें तिसरें अधिवेशन अशोकारामांत अशोकाच्या राज्याभिषेकानंतर सतरा वर्षांच्या पुढें करण्यांत आलें होतें. त्या वेळीं मोग्गलिपुत्र महास्थविर तिष्य हा सर्व बौद्ध संघांचा अधिपति होता. असें म्हणतात कीं, बौद्ध भिक्षूंत स्वार्थपरायण, द्रव्यलोलुप व दांभिक भिक्षूंची संख्या वाढल्यामुळें बौद्धधर्माला आलेली ग्लानि पाहून त्या वृद्धाला मर्मांतिक वेदना झाल्या होत्या व बौद्ध धर्माचा अधःपात झालेला पाहण्यापेक्षां अरण्यवास पत्करलेला बरा असें वाटून तो आपला शिष्य महेंद्र यावर आपल्या कामाचा भार सोपवून अहोगंगा पर्वतावर तपश्चर्येसाठीं निघून गेला होता.

पूर्वीच्या राजांनीं उदार हस्तानें बौद्ध भिक्षूंना आश्रय दिल्यामुळें बरेचसे भिक्षु आळशी, लोभी व दांभिक बनले होते. त्या सर्वांना अशोकानें हांकून

ग़विलें. हे लोक बाहेर पडल्यावर त्यांनीं भलभलत्या मतांचा उपदेश व प्रचार रून बौद्ध धर्माविषयीं लोकांच्या मनांत भलभलत्या कल्पना भरवून दिल्या ोत्या. हें अशोकाला कळलें तेव्हां बौद्ध धर्मावर आलेलें हें संकट दूर करून ा धर्माला पूर्वीचें शुद्ध स्वरूप प्राप्त करून देण्यासाठीं अशोकानें अशोका-ामांतल्या बौद्ध भिक्षूंना उपोसथक्रियेसाठीं आग्रहपूर्वक निमंत्रण केलें. पण थें निमंत्रण करण्यास गेलेल्या मंत्र्याची व भिक्षूंची कांहीं बोलाचाली होऊन प्रकरण एकदम विकोपास गेलें. त्या मंत्र्यानें रागाच्या सपाट्यांत कमरेची लवार उपसून कांहीं भिक्षूंना जागच्या जागीं ठार केलें ! हा अकल्पित प्रकार ाहून अशोकाचा भाऊ भिक्षु तिष्य यानें तांतडीनें अशोकाला हें वर्तमान ळविलें. तें ऐकतांच तो धर्मपरायण राजा अतिदु:खित होऊन अशोकारामांत ांवत गेला, आणि घडलेल्या प्रकाराची जबाबदारी कोणावर आहे असें भिक्षूंना विचारूं लागला. तेव्हां संतप्त झालेले कांहीं भिक्षु उघड उघड राजाच्या ोंडावर म्हणूं लागले कीं, 'या पापकृत्याची जबाबदारी तुम्ही आणि तुमचे त्री या उभयतांवर आहे.' कांहीं भिक्षूचें मत भिन्न पडलें. तेव्हां राजानें ्चारलें कीं, या घटनेबद्दल शांतपणानें विचारपूर्वक व निश्चित मत देईल सा कोणी भिक्षु येथें नाहीं काय ? तेव्हां सर्व भिक्षूंनीं एकमत होऊन ांगितलें कीं, असा निर्णयदाता पुरुष एकच आहे आणि तो म्हणजे मोग्गलि-न तिष्य. तेव्हां राजानें तिष्याला बहुमानपूर्वक बोलावण्यासाठीं आपले मंत्री ाठविले, पण तिष्य आला नाहीं. कारणाचा शोध करतां कळलें कीं, बौद्ध र्मांत प्रविष्ट झालेल्या अनाचाराला कंटाळून तिष्य तपश्चर्येसाठीं गेला आहे. ेव्हां राजानें पुन्हा मंत्र्यांना पाठवून तिष्याला विनंती केली कीं, 'शुद्ध र्माची पुन्हा संस्थापना करण्याच्या कामीं आपल्या साह्याची अत्यंत ावश्यकता असल्यामुळें आपणांस बोलावीत आहों. तेव्हां येण्याची अवश्य ृपा करावी.' हीं युक्ति सफल झाली. तिष्याच्यानें धर्मस्थापनेच्या कामीं ाह्य देण्याचें नाकबूल करविलें नाहीं. तो आला. राजानेंहि त्याचें अत्यादर-

पूर्वक मोठ्या समारंभानें स्वागत करून रतिवर्धन नांवाच्या आपल्या बागेंत त्याला ठेविलें. नंतर भिक्षूंची हत्या झाल्याचें साग्र वर्तमान राजानें त्याला निवेदन केलें. सर्व हकीकत ऐकून घेतल्यानंतर तिष्यानें राजाला दोषमुक्त केलें. नंतर प्रत्येक भिक्षूला बोलावून तिष्यानें त्याला धर्मविषयक प्रश्न विचारावे आणि त्याची परीक्षा घ्यावी आणि ज्याच्याकडून समाधानकारक उत्तर मिळणार नाहीं त्याला संघांतून घालवून द्यावें असा क्रम सुरू झाला. अशा रीतीनें साठ हजार भिक्षु संघांतून घालवून देण्यांत आले असें महावंस ग्रंथांत म्हटलें आहे.

यानंतर धर्मपरिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनासाठीं निवडक एक हजार जितेंद्रिय, धर्मतत्त्वज्ञ, सच्छील आणि विद्वान् अशा भिक्षूंना निमंत्रण करण्यांत आलें. या अधिवेशनाच्या वेळीं महास्थविर तिष्य यानें लोकांच्या धर्मविषयक शंकांना समाधानकारक उत्तरें देऊन शुद्ध धर्माचा उपदेश केला. हें अधिवेशन नऊ महिनेपर्यंत सारखें चाललें होतें. या परिषदेंत झालेल्या उपदेशांचा व प्रवचनांचा राजाच्या मनावर फार खोल परिणाम झाला आणि अशोक राजा आतांपर्यंत ‘ भिक्षुगतिक ’ ( भिक्षूच्या मार्गांत असलेला ) होता, तो यापुढें बौद्ध भिक्षु झाला.

धर्मपरिषदेच्या या तिसऱ्या अधिवेशनाची अधिक माहिती मिळत नाहीं ही खेदाची गोष्ट म्हटली पाहिजे. हें अधिवेशन नऊ महिनेपर्यंत सारखें चाललें होतें असें बौद्धग्रंथांत म्हटलें आहे, त्या अर्थीं बौद्ध भिक्षूंच्या शंकांचें निरसन व धर्मोपदेश यांच्या पलीकडे आणखी कांहीं अधिक महत्त्वाचें व भरीव काम या अधिवेशनाच्या हातून झालें असलें पाहिजे असें वाटतें. असें काम कोणतें तें जरी निश्चितपणें सांगतां येत नाहीं, तरी तर्कानें असें अनुमान काढतां येतें कीं, ज्या अर्थीं बौद्ध शास्त्रवचनांचे निरनिराळे अर्थ घेतल्यामुळें बौद्धांत निरनिराळे पंथ निर्माण झाले होते आणि ‘ नैको मुनिर्यस्य मतं प्रमाणम् ’ अशी स्थिति झाल्यामुळें मूळच्या गौतमबुद्धाच्या मतांशीं विपरीत

असे आचारहि बौद्धभिक्षूंच्या हातून धर्माचरणाच्या नांवाखालीं घडूं लागले होते, त्या अर्थी हा प्रकार बंद करण्याकरितां सर्व मतांचें एकीकरण करून बौद्ध शास्त्रवचनांची नीट सुसंगत व्यवस्था लावण्याचें काम मोग्गलिपुत्र तिष्य याच्या अध्यक्षतेखालीं अधिवेशनासाठीं जमलेल्या विद्वान् व सदाचारसंपन्न अशा भिक्षूंकडून अशोकानें करवून घेतलें असलें पाहिजे. बौद्ध भिक्षुसंघांत जो विस्कळितपणा या वेळीं आला होता तो घालवून धर्मविषयक मतें निश्चित ठरल्यानंतर जो कोणी त्या मतांच्या विरुद्ध उपदेश करील व बौद्ध संघांत फूट पाडील तो अपराधी समजला जाऊन त्याला संघांतून बाहेर घालवून दिलें जाईल असा दंडविधि या अधिवेशनांत ठरविला गेला असेल असें वाटतें. कारण कीं, अशा रीतीनें भिक्षूंना संघांतून बाहेर घालविण्यासंबंधाचे उल्लेख अशोकाच्या कांहीं लेखांतून स्पष्टपणें केलेले आहेत.

## पाश्चात्त्य लेखकांचे आक्षेप व त्यांस उत्तर

अशोकाच्या राज्याभिषेकानंतर १७ व्या वर्षीं ही हकीकत घडल्याचें बौद्ध ग्रंथांतून लिहिलें आहे. पण व्हिन्सेंट स्मिथ व दुसरे कित्येक पाश्चात्त्य पंडित हें तिसरें अधिवेशन अशोकाच्या वेळीं झालेंच नसावें असें म्हणतात! आणि आपल्या मताच्या समर्थनार्थ ते असें सांगतात कीं, अशी महत्त्वाची घटना खरोखरच अशोकाच्या कारकीर्दीत झाली असती तर त्यानें आपल्या लेखांत कोठें तरी तिचा उल्लेख खास केला असता, पण तसा त्यानें केला नाहीं. या पंडितांना उलट असें विचारतां येईल कीं, 'अशोकाच्या कारकीर्दीसंबंधाचें संपूर्ण वाङ्मय आज तुम्हांला उपलब्ध झालें आहे काय? अशोकानें कोरविलेले सगळे लेख तरी तुम्हांस मिळाले आहेत काय? जे कांहीं ३५ लेख तुम्हांस मिळाले आहेत त्यांच्या पलीकडे आतां लेख मिळावयाचे राहिले नाहींत असें तुम्ही कशाच्या आधारें म्हणतां? जे लेख अद्याप अज्ञात आहेत त्यांपैकीं एखाद्यांत या परिषदेचा उल्लेख नसेल कशावरून? आणि वस्तुतः तुमच्यापाशीं

कांहीं आधार नसतां महावंशासारख्या बौद्धांना पूज्य असलेल्या प्राचीन ग्रंथाला तुम्ही पेनाच्या फटकाऱ्यासरशीं अविश्वसनीय ठरवितां याला काय म्हणावें ? महावंशासारख्या प्राचीन ग्रंथांत थोडी फार अतिशयोक्ति असूं शकेल; पण कधीं न घडलेल्या अशा खोट्या गोष्टी लिहून त्या ग्रंथाच्या लेखकाला काय मिळावावयाचें होतें ? महावंशासारख्या ग्रंथांत कांहींच ऐतिहासिक सत्य नाहीं, सगळ्या स्वकपोलकल्पित कथा आहेत असें का तुमचें म्हणणें आहे ? असेल तर त्या ग्रंथांतल्या कांहीं गोष्टींवर तरी तुम्हीं काय म्हणून भरंवसा ठेवावा ? धर्मपरिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाची जी हकीकत महावंशाच्या आधारें सारांशरूपानें वर दिली आहे तिच्यांत अतिशयोक्ति कदाचित् असेल; पण अशक्य, असंभवनीय किंवा अविश्वसनीय असें तुम्हांस काय दिसतें तें तरी कृपा करून सांगा. ' या प्रश्नाचीं उत्तरें न देतांच बहुतेक ग्रंथकारांनीं धर्मपरिषदे-सारख्या महत्त्वाच्या घटनेला वाऱ्यावर उडवून दिलें आहे हें आश्चर्य म्हणावयाचें !

धर्मपरिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाच्या ऐतिहासिकत्वाच्या विरुद्ध असा एक आक्षेप घेण्यांत येतो कीं, या महत्त्वाच्या घटनेचा उल्लेख अशोकावदाना-सारख्या ग्रंथांत किंवा परदेशी प्रवाश्यांच्या प्रवासवृत्तान्तांत नसल्यामुळें या घटनेला ऐतिहासिक म्हणतां येत नाहीं. हा आक्षेप फोल आहे. कारण, अशोकावदान हा ऐतिहासिक ग्रंथ मुळींच नाहीं. बोलून चालून तो अवदानग्रंथ म्हणजे पुराणग्रंथ आहे. यांत अशोकाच्या कारकीर्दीतल्या सगळ्या घटना दिलेल्या आहेत असेंहि नाहीं. अर्थात् अशोकाच्या कारकीर्दीचा तो इतिहास आहे असें बौद्धधर्मी लोकसुद्धां मानीत नाहींत. अशा ग्रंथांत धर्मपरिषदेचा उल्लेख नाहीं म्हणून ती घटनाच अनैतिहासिक समजणें ही अर्थात् चूक आहे.

चिनी प्रवास-वृत्तान्तांसंबंधाचा आक्षेपहि असाच भ्रममूलक आहे. ते प्रवास-वृत्तान्त लिहिणारे अशोकाचे समकालीन नव्हते. त्यांनीं पुढें मागें केव्हां तरी हिंदुस्थानांत येऊन जें स्वतः पाहिलें किंवा लोकांच्या तोंडून जें ऐकिलें तें

आपल्या प्रवासवृत्तान्तांत लिहून ठेविलें इतकेंच. अर्थात् त्यांच्या वृत्तान्तांत जी गोष्ट नमूद केली गेली नाहीं, ती मुद्दलांत घडलीच नाहीं असें म्हणणें इतिहास-शास्त्रज्ञांना शोभत नाहीं. विशेषतः अशोकाच्या एक-दोन शिलालेखांत संघांत फूट पाडणाऱ्यांना संघांतून हांकून द्यावें असा जो उल्लेख आहे त्याचा या धर्मपरिषदेच्या हकीकतीशीं ज्या अर्थी संबंध लावतां येतो, त्या अर्थी महा-वंशांत सदर परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाची जी हकीकत दिली आहे ती निव्वळ काल्पनिक असली पाहिजे असें म्हणतां येत नाहीं.

✡ ✡ ✡

# प्रकरण चौदावें

## अशोकाचा अंतकाळ व त्यानंतर

बौद्धग्रंथ व दंतकथा हीं सोडलीं तर अशोकाच्या चरित्राविषयीं निश्चित अशी अगदींच थोडी माहिती मिळते. पाश्चात्त्य लेखक माहितीसाठीं गिरिलेख, स्तंभलेख व परदेशीयांनीं लिहून ठेविलेले वृत्तान्त यांच्यावरच विसंबून राहिल्यामुळें अशोकाच्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसासंबंधानें त्यांना आपल्या ग्रंथांतून कांहींच सांगतां आलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं. पण बौद्ध ग्रंथांतून अशोकाच्या वार्धक्याविषयीं व मृत्यूविषयीं कांहीं माहिती मिळते. ती अशी—

१८।२२८ कि.३१

या संसारांत मनुष्यमात्राला जे सुखदुःखादि भोग प्राप्त होत असतात, ते अशोकालाहि अनुभवावे लागले होते. मगधासारख्या विस्तृत साम्राज्याचा जड राज्यकारभारशकट त्यानें चाळीस वर्षें वाहून नेला होता. हेंच एकटें काम घेतलें तरी कोणाहि माणसाची शारीरिक व मानसिक शक्ति पूर्णपणें कसोटीस लावण्यास तें पुरें होतें. त्यांतून बौद्धधर्माविषयींच्या आत्यंतिक कळकळीनें त्याला विश्रांति मिळूं दिली नाहीं. अहोरात्र प्रजेला नीतिमान्, धार्मिक व सुखी कसें करतां येईल ही त्याच्या जीवाला काळजी लागलेली होती. राजभोग भोगावयाचे ते न भोगतां भिक्षूप्रमाणें अगदीं मित आहार, व कडकडीत तपाचरण ठेविल्यानें शरीराला सहजच क्षीणता आली होती. खाजगी भानगडी व तज्जन्य शोक, क्षोभ व चिंता, यामुळें त्याचें चित्त नेहमीं व्यग्र असे. धर्मभावना तीव्र असल्यानें तिच्यामुळें जी काय शांति मिळेल तेवढीच. अशोकाच्या पूर्ववयांतच त्याचा भाऊ वीताशोक भिक्षुव्रत धारण करून घरांतून चालता झाला होता, आणि तोहि लवकरच मारला गेल्यानें अशोकाला साहजिकच फार दुःख झालें. त्याची एक राणी तिष्यरक्षिता

हिचें चारित्र्य शुद्ध नव्हतें. तिनें कपट करून सवतीचा पुत्र कुणाल याचे डोळे काढण्याविषयींचा हुकूम राजाला फसवून मिळविला, आणि कुणालाचे डोळे काढविले. त्यामुळें राजाला जें दुःख झालें त्याला सीमा नव्हती. दुसरा पुत्र महिंद व कन्या संघमित्रा हीं दोघें सिंहलद्वीपांत बौद्धधर्माचा प्रसार करण्या-साठीं निघून गेलीं होतीं. त्यामुळें अशोकाजवळ त्याच्या वार्धक्याच्या काळीं कोणी मायेचें मनुष्य राहिलें नव्हतें. आपण इतकें यत्नपूर्वक वाढविलेल्या व जतन केलेल्या राज्याचें आपल्या मागें काय होईल, आपण लावून दिलेली संघाची सुव्यवस्था टिकून राहील कीं नाहीं हीहि चिंता त्याच्या मनाला लागलेली असणें स्वाभाविक होतें. अशा स्थितींत संसाराविषयीं विरक्ति उत्पन्न होऊन व आपण स्वतः संघांत जाऊन राहिल्यानें संघाची अधिक चांगली व्यवस्था करून दाखवूं व तें तरी धर्मकार्य केल्याचें श्रेय संपादतां येईल अशा सदिच्छेनें त्यानें राजपदाचा त्याग करून भिक्षुव्रताची दीक्षा घेतली.[1]

भिक्षुव्रताची दीक्षा घेण्यापूर्वी त्यानें अतोनात द्रव्याचें दान केलें. याविषयीं एक दंतकथा आहे. ती अशी—

एके दिवशीं राजानें आपला गुरु आचार्य उपगुप्त याला विचारलें कीं बौद्धांमध्यें आजपर्यंत सर्वांत अधिक दान कोणीं केलें? उपगुप्त म्हणाला, ‘अनाथपिंडिकानें.’ अनाथपिंडिक हा श्रावस्ती नगरींत एक अतिशय श्रीमान् मनुष्य होता. गौतमबुद्धाला तो अतिशय पूज्य मानीत असे. एकदा गौतमबुद्धाची स्वारी फिरत फिरत त्या नगरीला गेली असतां अनाथ-पिंडिकानें त्याला आपल्या जेठवनांत अतिशय आग्रहपूर्वक ठेवून घेतलें. बुद्धानें त्याच्या आग्रहावरून शिष्यमंडळीसह तेथेंच चातुर्मास्याचा काळ काढला. अनाथपिंडिक रोज बुद्धाच्या दर्शनाला नेमानें जाऊन तास तास

१. अशोकानें राजपदाचा त्याग मुळीं केलाच नाहीं असें व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो (Asoka, P. 69)

त्याचे उपदेश ऐकत बसे. त्या उपदेशाचा त्याच्या मनावर फार परिणाम झाला व त्यानें कोट्यवधि रुपयांचा दानधर्म केला. ही गोष्ट जेव्हां उपगुप्तानें अशोकाला सांगितली, तेव्हां अशोकानेंहि स्तूप, बिहार, आश्रम वगैरे बांधण्यांत, लक्षावधि भिक्षूंची अन्नवस्त्राची सोय लावण्यांत व अज्ञान, दीन-दुबळे, बुभुक्षित, लंगडे, लुळे, आंधळे वगैरे अपंग मनुष्यप्राणी व पशु यांना साह्य करण्यांत आपली अपरंपार संपत्ति सगळी खर्च करून टाकिली. सुतळीचा तोडाहि जवळ ठेविला नाहीं. आपल्या मागें आपले लबाड मंत्री सरकारी खजिना लुटणार हें भवितव्य त्याला दिसतच होतें. लुच्चा लोकांची धन करण्यापेक्षां आपल्या हातानें त्याचा धर्मकार्यांत विनियोग केलेला काय वाईट ? असा विचार करून अशोकानें सरकारी खजिनाहि दानधर्मांत बराचसा खर्च करून टाकिला. ही व्यवस्था लावतांना त्याच्या मनाची अवस्था अत्यंत दुःखप्रद झाली होती. अगोदरच वार्धक्यानें शरीर क्षीण झालेलें, त्यांत मनाची अशी अवस्था ! मग काय विचारतां ? अतिशय थकवा येऊन त्यानें तक्क्यावर अंग टाकिलें. आपला अंतकाळ जवळ आला आहे असें त्याचें त्याला वाटलें आणि उपगुप्तापाशीं त्यानें तसें बोलूनहि दाखविलें.

महाराज अत्यवस्थ झाले आहेत ही बातमी हां हां म्हणतां सर्व शहरभर पसरली. मुख्य मंत्री राधागुप्त याच्या कानीं ती जातांच तो तांतडीनें राज-वाड्यांत गेला. पाहतो तों राजा डोळे मिटून तक्क्यावर अंग टाकून पडला होता व त्याच्या डोळ्यांतून अश्रूंचा लोट वाहात होता. राधागुप्तानें नम्रपणानें मुजरा करून व हात जोडून विचारलें, ‘ महाराज ! काय आज्ञा आहे ? ’ हा प्रश्न ऐकून राजानें डोळे उघडले व म्हटलें, ‘ मंत्री राधागुप्त ! धन, राज्य, संसार यांना मी लवकरच मुकणार आहें. पण त्याबद्दल मला यत्किंचित्‌हि दुःख वाटत नाहीं. मीं मनानें या सर्वांचा त्याग कधींच केला आहे. मला आतां जें दुःख होत आहे तें येवढ्याचसाठीं कीं, शंभर कोटी सुवर्णमुद्रांच्या दानाचा मीं संकल्प केला होता. पैकीं ९६ कोटींचें दान माझ्या हातून झालें. राहिल्या

चार कोटी मुद्रा. त्यांची व्यवस्था मला अजून लावतां आली नाहीं हें माझ्या दुःखाचें खरें कारण आहे.'

राजानें सरकारी खजिन्यांतला इतका पैसा उधळला हें पाहून मंत्री राधागुप्त घाबरला आणि त्यानें धावत जाऊन गादीचा वारस, कुणालाचा पुत्र संप्रति, याला ती गोष्ट जाऊन सांगितली आणि म्हटलें, 'धर्मावतार थोरले महाराज आतां थोड्याच दिवसांचे सोबती दिसतात. त्यांचें ठीक आहे. पण त्यांच्या मागें राज्याचा भार आपणावर पडणार आहे. थोरल्या महाराजांनीं तर खजिन्याची अशी वाताहत लाविली आहे. ९६ कोटी मुद्रा तर गेल्याच, पण आणखी चार कोटी मुद्रांची त्यांची मागणी आहे. तिचें कसें काय करावयाचें याविषयीं आज्ञा व्हावी.' संप्रति काय बोलून चालून पोरवयच! त्याला विचार कोठून असणार? राधागुप्तानें त्याच्या कानांत विष ओतलें तें तत्काळ परिणामकारक झालें. त्यानें कांहीं विचार न करतां एकदम मंत्र्याला ताकीद दिली कीं, 'याउपर एक कपर्दिकहि दानधर्मासाठीं देऊं नये.' अशोक राजा रोज सुवर्णपात्रांत भोजन करीत असे व भोजनोत्तर तें पात्र उपगुप्ताच्या कुक्कुटारामाकडे पाठवून देत असे. यापुढें राधागुप्ताच्या आज्ञेनें सुवर्णपात्राच्या ऐवजीं रजतपात्रांत ( चांदीच्या ताटांत ) राजाकडे भोजन जाऊं लागलें. तरी राजा कांहीं बोलला नाहीं. नित्यक्रमाप्रमाणें भोजनोत्तर चांदीचें ताट कुक्कुटारामाकडे जाऊं लागलें. पुढें चांदीचेंहि ताट बंद होऊन मृत्तिकापात्रांत भोजनाचे पदार्थ वाढून ते राजाकडे पाठविण्यांत येऊं लागले. तें पाहून राजाला फार विस्मय वाटला. तथापि त्याच्या मनाची शांति ढळली नाहीं. एके दिवशीं मंत्री राधागुप्त राजाच्या समाचारास गेला असतां जवळ पडलेलें आंवळ्याचें अर्धें शकल हातांत घेऊन राजानें विचारलें, 'मंत्रिमहाराज! या देशावर सध्यां कोण राज्य करीत आहे?' हा प्रश्न ऐकून मंत्री मनांत चरकला; पण बाह्यात्कारी दुःखाचा आविर्भाव आणून म्हणाला, 'हें काय विचारणें, महाराज? हें राज्य आपलेंच आहे. आपणच याचे मालक आहां.' हें उत्तर ऐकून राजाचे डोळे अश्रूंनीं

भरून आले. तथापि आत्मसंयमन करून तो म्हणाला, “ खरें बोलतां ? मी राज्यभ्रष्ट झालों नाहीं काय ? तुम्हांला ठाऊक नाहीं असें दिसतें. हें पाहा, मी सांगतों तुम्हांला. आतां हातांतल्या या अर्ध्या आंवळयाच्या पलीकडे कशावरहि माझी सत्ता राहिलेली नाहीं. मी सार्वभौम राजा असून कोणाला दिडकी देईन म्हटलें तर ती सुद्धां देण्याला माझेपाशीं नाहीं ! धिक् या राजाच्या जिण्याला आणि अशा नश्वर साम्राज्याला ! मी कोट्यवधि प्रजाजनांचा राजा म्हणवितों, पण दुःखानें माझ्यावरहि राज्य चालविलें. ज्यानें अखिल भरतखंडावर एकछत्री सत्ता स्थापित केली, अनेक देशांवर स्वामित्व भोगलें, असंख्य प्राणांची हानि करून साम्राज्याची तृष्णा शमविली, मी मी म्हणविणाऱ्या शत्रूंना खालीं पाहण्यास लाविलें, कारस्थानी बंडखोरांना हां हां म्हणतां गप बसविलें, व असंख्य दीनदुबळ्या गरिबांना अन्नवस्त्र देऊन तृप्त केलें, तोच हा मी अशोक राज्यभ्रष्ट होऊन अशा लाजिरवाण्या स्थितींत काळ कंठीत आहें ! याहून दैवाचे विलास दुसरीकडे कोठें पाहण्यास मिळणार ? झाडावरचें पान किंवा फूल झाडावर असतें तोंपर्यंतच त्याची शोभा पाहून घ्यावी. तें आपल्या जागेपासून भ्रष्ट झालें कीं आटोपलें त्याचें ऐश्वर्य ! तशीच आज माझी स्थिति झाली नाहीं काय ? झाडावरून गळून पडलेल्या सुगंधहीन व तेजोहीन, शुष्क पुष्पाप्रमाणें मी मातीला मिळालों आहें. मला कोणी पुसतसुद्धां नाहीं. ”

नंतर अशोकानें दुसऱ्या एका माणसाला बोलावून त्याला म्हटलें, “ गड्या ! माझ्या हातीं हुकूम करण्याचा कांहीं अधिकार राहिला नाहीं खरा; पण विनंती करण्याला हरकत नाहीं. माझी शेवटची एक विनंती आहे. तेवढी तूं मान्य कर. कुक्कुटारामामध्यें हा आंवळ्याचा अर्धा भाग घेऊन जा. तेथें असलेल्या आचार्यांना माझा नम्र प्रणाम सांगून हा त्यांना दे आणि माझा त्यांना निरोप सांग कीं, अशोकाच्या ऐश्वर्याचा अवशेष मी पाठवीत आहें तो प्रेमानें ग्रहण करावा अशी विनंती आहे. ”

मग राधागुप्ताकडे वळून अशोक म्हणाला, “ मंत्रिमहाराज ! या देशच्या

गादीवर हल्लीं कोण आहे ? " राधागुप्तानें पूर्वीप्रमाणेंच " आपण या गादीचे मालक आहां " असें उत्तर केलें. तें ऐकून राजा आसनावरून उठला आणि आकाशाकडे चारी दिशांस दृष्टि फिरवून म्हणाला, " आज आपलें धनभांडार खेरीज करून बाकीची ही सगळी बहुरत्ना वसुंधरा मीं बौद्ध संघाला अर्पण केली आहे. या पुण्यकर्माचें फळ मला मिळो. पुढल्या जन्मीं मला राजपद किंवा इंद्रपद मिळावें अशी माझी इच्छा नाहीं. ब्रह्मलोकाची प्राप्तीहि मला नको. या सगळ्या गोष्टी पाण्यावरच्या बुडबुड्याप्रमाणें क्षणभंगुर आहेत नश्वर आहेत. माझ्या अढळ दृढ श्रद्धेचा मोबदला मला येवढाच मिळावा कीं, मीं इंद्रपदाचा नव्हे तर इंद्रियांचा स्वामी व्हावें. त्यांचें दमन मला पुरतें करतां यावें. त्रैलोक्यावर नव्हे, तर स्वतःच्या आत्म्यावर माझें साम्राज्य चिरस्थायी व्हावें. "

याप्रमाणें बोलून सगळ्या पृथ्वीचें दानपत्र लिहून आणण्यास त्यानें राधागुप्त मंत्र्याला सांगितलें. दुसरे दिवशीं त्यानें तें आणिल्यावर राजानें आपल्या हातानें त्यावर शिक्कामोर्तब केलें आणि तें कुक्कुटारामांत आचार्य उपगुप्त यांच्याकडे पाठवून दिलें. तें पत्र तिकडे आचार्यांच्या हातीं पडलें त्याच वेळीं इकडे राजाचें प्राणोत्क्रमण झालें ( ख्रि. पू. २३२ ).

याप्रमाणें जो मौर्यकुलविरमध्यान्हकाळच्या अत्यंत देदीप्यमान सूर्यासारखा दीर्घकाळपर्यंत तळपत होता तो अस्ताचलास गेल्यानंतर थोड्याच काळानें सगळें मगध साम्राज्य निबिड अंधकारानें व्यापिलें गेलें. मगध राज्याचें वैभव लयाला गेलें. अशोकाच्या मागून त्याच्या खालोखाल योग्यतेचा असा सुद्धां राजा मौर्यवंशांत कोणी झाला नाहीं.

अशोकाच्या मागून त्याचा नातू ( कुणालाचा पुत्र ) दशरथ हा त्याचा कायदेशीर वारस म्हणून मगधाच्या गादीवर बसला असें वर सांगितलें आहे.

जैन पुराणांत संप्रति अशोकाच्या मागून राजा झाल्याचें वर्णन आहे. दिव्यावदान ग्रंथांतहि तसाच उल्लेख आहे. पण विष्णुपुराण व वायुपुराण यांनीं दिलेली राजावलि निराळ्या प्रकारची आहे. ती दिव्यावदानांतल्या राजावलीशीं ताडून पाहतां यावी म्हणून दोन्ही समोरासमोर मांडून दाखवितों—

| विष्णु व वायु पुराण | दिव्यावदान |
| --- | --- |
| दशरथ | संप्रति |
| \| | \| |
| संगत | बृहस्पति |
| \| | \| |
| शालिशुक | वृषसेन |
| \| | \| |
| सोमशर्मन् | पुष्पधर्म ( मित्र ? ) |
| \| | |
| शतधन्वा | |
| \| | |
| बृहद्रथ | |

कित्येक इतिहासकार असें लिहितात कीं, अशोकाच्या मागें त्याचें राज्य त्याचे दोघे नातू दशरथ व संप्रति या दोघांत अर्धें अर्धें वांटलें गेलें. दशरथाला पूर्वेकडचा अर्धा भाग व संप्रतीला पश्चिमेकडचा अर्धा भाग मिळाला. हें मत बरेंच सयुक्तिक दिसतें, आणि वर दिलेल्या दोन राजावलींत सकृद्दर्शनीं दिसणारा विरोधहि या मतानें नाहींसा होतो.

अशोकाच्या कारकीर्दींत जसा बौद्धधर्माचा उत्कर्ष व प्रसार झाला, तसा दशरथाच्या वेळीं जैनधर्माचा झाला. त्याचा विस्तृत वृत्तान्त जैन ग्रंथकारांनीं लिहून ठेविला आहे. विष्णु व वायु पुराणांच्या मतें मौर्यकुळांतला शेवटचा

राजा बृहद्रथ याला त्याचा सेनापति पुष्पमित्र यानें मारून मगधाची गादी बळकाविली.[१].

असें सांगतात कीं, बृहद्रथ हा बौद्धांचा मोठा द्वेष्टा होता. अशोकानें सर्व धर्मांच्या व संप्रदायांच्या प्रजेस समदृष्टीनें वागवून स्वतःच्या अपत्यांप्रमाणें तिचें संगोपन व परिपालन केलें व त्यावरून त्याची कीर्ति आज साऱ्या जगभर अमर होऊन राहिली आहे. पुष्पमित्राचें वर्तन याच्या उलट होतें. त्यानें बौद्धधर्मीयांचा अनन्वित छळ केला. त्यांच्या मठांना व संघांना अशोकानें दिलेल्या नेमणुका बंद केल्या व त्यांना लुटलें. त्यांच्या मूर्ति फोडल्या व इमारती उद्‌ध्वस्त केल्या. बुद्धगया हें बौद्धधर्मीयांचें एक अत्यंत पवित्र स्थान आहे. त्याला बौद्धांची काशी म्हणतात. येथें बुद्धाची एक भली जंगी मूर्ति होती ती काढून पुष्पमित्रानें तिच्या जागीं शिवाची मूर्ति स्थापन केली. पाटलीपुत्र शहराजवळ बौद्धधर्मी आचार्यांच्या निवासासाठीं अशोकानें कुक्कुटाराम किंवा अशोकाराम नांवाचा विहार मोठा खर्च करून बांधिला होता. पुष्पमित्रानें त्या विहाराचा नाश करून त्यांत राहात असलेल्या बौद्ध भिक्षूंचा क्रूरपणानें वध केला अशी एक दंतकथा आहे. तिच्यांत कितीसें तथ्य आहे तें सांगतां येत नाहीं. तथापि त्यानें बुद्धांच्या मूर्ति, मठ, स्तूप वगैरे स्थानांचा उच्छेद केला व कांहींना आगी लावून दिल्या येवढें तरी खरें आहे.

अशोकाच्या मागें मगधसाम्राज्याचा अधःपात व नाश विद्युद्वेगानें झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. तो होण्यास कोणतीं कारणें झालीं हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. कोणी म्हणतात कीं, अशोकानें अहिंसा तत्त्वाचा प्रसार केल्यामुळें लोकांतलें क्षात्रतेज नष्ट झालें आणि मगधसाम्राज्याच्या नाशाचें बीज

---

१. हर्षचरित ( निर्णयसागर प्रत पृ. १९९ ) सहावा उल्लास यांत म्हटलें आहे कीं, सेनापति पुष्पमित्र यानें सैन्याची पाहणी करण्याच्या निमित्तानें बृहद्रथास बोलावून दगलबाजीनें त्याला ठार मारलें.

यांतच आहे. या मतांत सत्याचा अंश असला तर तो फारच अल्प आहे. क्रिया आणि प्रतिक्रिया यांचा नियम जसा भौतिक सृष्टींत तसाच राजकारणांतहि खरा आहे. अशोकानें आपल्या सत्तेच्या बळावर नव्हे, तर चारित्र्यबळावर राज्यांत पूर्ण शांतता व प्रजेंत सात्त्विकवृत्ति स्थापित करण्याचा अहर्निश प्रयत्न केला, व त्याच्या विशुद्ध चारित्र्यबळावर तो त्या काळीं सिद्धीलाहि गेला. पण शांतता व सात्त्विकवृत्ति पूर्णपणें अंगीं बाणण्यास व त्यांना चिरस्थायित्व येण्यास जो कालावधि लागतो तो मिळण्या-पूर्वींच प्रतिक्रिया सुरू झाली व तिचे परिणाम मगधसाम्राज्याला भोवले. दुसरें कारण, अशोक सात्त्विकवृत्तीचा होता तसा कार्यदक्षहि होता. पण मगध राज्याच्या दुर्दैवानें अशोकाच्या मागून मगधाच्या गादीवर जे राजे झाले त्यांच्या ठायीं सात्त्विकवृत्ति नव्हती, चारित्र्यबळ नव्हतें, आणि कार्यदक्षता तर मुळींच नव्हती. उलटपक्षीं त्यांच्या भोंवतीं जें प्रधानमंडळ व सल्लागारांचें मंडळ जमलें होतें कारस्थानी, मतलबी आणि कपटी असल्यामुळें त्यांनीं भोळ्याभाबड्या व मूर्ख राजांना आपल्या हातांतलें भावलें करून ठेविलें होतें. अशोकाच्या वेळीं राजाच्या दक्षतेमुळें व चारित्र्यबळामुळें या मंडळाचें कांहीं चाललें नाहीं. राजाची आज्ञा त्यांना आवडो न आवडो, मुक्या यंत्राप्रमाणें त्यांना आज्ञे-प्रमाणें करावें लागे. पण दशरथ व बृहद्रथ यांचे वेळीं त्यांना कह्यांत ठेवणारी प्रबळ शक्ति नसल्यामुळें या मंत्रिमंडळाला आपल्या धन्याशीं निमकहरामपणा व दगलबाजी करण्याची संधि मिळाली व त्यांनीं तिचा पूर्ण फायदा घेतला. यामुळें राज्याच्या कारभारांत एकसूत्रीपणा राहिला नाहीं. अशा स्थितींत अशोकाचे वेळीं आपलें वर्चस्व नष्ट झाल्यामुळें व यज्ञयागादि क्रिया बंद पडल्यामुळें मनांतल्या मनांत चरफडत असलेल्या ब्राह्मणवर्गाला आपली सत्ता पूर्ववत् स्थापन करण्यास आयतेंच फावलें. राजे मूर्ख व दुर्बळ मनाचे, मंत्री दगलबाज व मतलबी आणि समाजांत बुद्धीनें, मानानें व परंपरेनें श्रेष्ठ गणिलेल्या ब्राह्मणवर्गांत तीव्र असंतोष माजलेला, याहून राज्यक्रांतीला अधिक अनुकूल

वातावरण कोणतें असणार ? या संधीचा फायदा घेऊन कलिंग, विदर्भ, आंध्र वगैरे कित्येक मांडलिक राज्यें मगधसाम्राज्यांतून फुटून स्वतंत्र झालीं. याच वेळीं त्या साम्राज्यावर आणखी एक विपत्ति येऊन कोसळली. ग्रीक राजा मिन्यांडर हा मोठी फौज घेऊन पंचनद ( पंजाब ) प्रांतावर आक्रमण करून आला. पण मगध सेनापति पुष्पमित्र यानें त्याचा पराभव करून त्याला मगधसाम्राज्याच्या हद्दीबाहेर पिटाळून लाविलें. पुष्पमित्राचा हा विजय हें बौद्धधर्माच्या अहिंसा-तत्त्वामुळें लोकांतलें क्षात्रतेज नष्ट झालें असें म्हणणारांच्या टीकेस खासें उत्तर आहे. असो. पुष्पमित्राच्या या विजयामुळेंच त्याच्या मनांत बृहद्रथाला मारून किंवा पदभ्रष्ट करून मगधाचें सम्राट्पद स्वतःला प्राप्त करून घेण्याच्या इच्छेचा अंकुर उत्पन्न झाला असावा. कारण, त्यानें यानंतर लवकरच आपला हेतु पार पाडला. तो कशा युक्तीनें तडीस नेला त्याचा उल्लेख मागें आलाच आहे.

याप्रमाणें चंद्रगुप्तानें मगधांवर मौर्यवंशाची स्थापना केल्यापासून १५० वर्षांच्या आंतच ( वायुपुराणाच्या हिशेबानें १३३ वर्षांत ) या वंशाची सत्ता उदय, उत्कर्ष व क्षय या तिन्ही अवस्थांतून जाऊन अखेर कायमची नष्ट झाली, आणि मौर्यांच्या जागीं शुंग घराणें मगधावर राज्य करूं लागलें.

☆ ☆ ☆

# परिशिष्ट

# निरनिराळ्या दंतकथा

## १. सिंहली कथा

अजातशत्रूपासून नागदासकापर्यंत[1] झालेल्या राजांनीं मगधाचें राज्य केल्यानंतर तो राजवंश खुंटला. तेव्हां या शेवटच्या राजाचा हुषार व धर्मपरायण मंत्री शिशुनाग यानें इतर मंत्र्यांच्या आग्रहावरून राजपदाचा स्वीकार केला. शिशुनागानें अठरा वर्षें राज्य केलें. त्याचा पुत्र कालाशोक यानें बावीस वर्षें राज्योपभोग घेतल्यावर त्याच्या पुत्रपौत्रांनीं बावीस वर्षेंपर्यंत राज्य केलें. त्यांच्या मागून नंदवंश मगधाच्या गादीवर आला. या वंशांतल्या नऊ पुरुषांनीं मिळून बावीसच वर्षें मगधावर आपली सत्ता गाजविली. शेवटच्या नंदराजाच्या वेळीं पाटलीपुत्र नगरांत चाणक्य नांवाचा एक ब्राह्मण राहात होता. तो नंदवंशाचा अतिशय द्वेष करणारा होता. त्यानें धननंद राजाच्या विरुद्ध कारस्थानें रचून अखेर त्या राजाला मारल्यामुळें मगध राज्याचें स्वामित्व मौर्यवंशांतल्या चंद्रगुप्ताकडे गेलें.

चंद्रगुप्ताच्या मागून त्या वंशांत बिंदुसार व अशोक हे दोन मोठाले राज्यकर्ते झाले. बिंदुसाराला सोळा राण्या व १०१ पुत्र होते. सर्वांत वडील सुमन व सर्वांत धाकटा तिष्य. कुमार अशोक हा सोळाव्या राणीचा पुत्र होता. याला बिंदुसार राजानें उज्जयिनी येथें कामगिरीवर पाठविलें असतां मागें राजाला कांहीं रोग होऊन राजा आसन्नमृत्यु झाला. हें कळतांच अशोक पाटलीपुत्राला धावत आला. तेव्हां वारसाबद्दल बरीच भाऊबंदकी माजून तिच्या पायीं

---

१. ही कथा महावंश नामक ग्रंथांत दिलेली आहे.

अशोकाचे हातून ९९ भाऊ मारले गेले. सर्वांत धाकटा तिष्य तेवढा उरला. अशा रीतीनें रक्ताच्या नद्या वाहविल्यावर अशोकाला मगधाची गादी मिळाली. या भ्रातृहत्येच्या क्रूर कृत्यावरून अशोकाला ' चंडाशोक ' हें नांव प्राप्त झालें.

युवराज सुमन मारला गेला, तेव्हां त्याची स्त्री गरोदर होती. राजवाड्यांत भयंकर कत्तल चाललेली पाहून कोणास न कळूं देतां ती पूर्वद्वारानें पळून एका निबिड अरण्यांत गेली व तेथें चांडाल लोकांच्या वस्तीच्या आश्रयानें राहिली. तिला पाहून चांडालांच्या नायकाला तिची फार दया आली आणि त्यानें तिचा सांभाळ केला. तेथें ती प्रसूत होऊन मुलगा झाला. तोहि तेथें चांडालपुत्रांच्या संगतींत वाढला. या मुलाचें नांव न्यग्रोध असें ठेवण्यांत आलें होतें. न्यग्रोध चांडालांचे मुलांबरोबर खेळत असतां एके दिवशीं महावरुण नांवाचा एक बौद्ध स्थविर तेथें गेला. न्यग्रोध याच्या शरीरावर पावित्र्याचीं कांहीं चिन्हें पाहून तो चकित झाला, आणि त्यानें त्या सात वर्षांच्या मुलाला बौद्धधर्माची दीक्षा दिली. पुढें एके दिवशीं हा मुलगा पाटलीपुत्र येथें राज-वाड्यापुढच्या रस्त्यानें चालला असतां अशोकराजानें खिडकींतून त्याला पाहिलें. त्या अल्पवयी तरुण भिक्षूची ती प्रशांत, गंभीर व लावण्ययुक्त मूर्ति पाहून राजानें त्याला बोलावून नेलें. हा तरुण राजापुढें जाऊन नम्रपणानें उभा राहिला. राजा तेव्हां दरबारांत बसलेला होता. राजानें त्याला बसण्यास सांगितलें, पण बौद्ध भिक्षूला जेथें बसतां येईल असें आसन त्याला कोठें दिसेना म्हणून तो सरळ राजाच्या सिंहासनाकडे जाऊं लागला. राजाला त्या मुलाचें फार कौतुक वाटलें आणि त्यानें त्याला आपल्या सिंहासनावरच जागा देऊन त्याला बौद्धधर्मासंबंधानें माहिती विचारली. तेव्हां तो बौद्धशास्त्रांतलीं वचनें[1] घडाघड तोंडानें पाठ म्हणून दाखवूं लागला व त्याचा अर्थ सांगूं लागला. तीं ऐकून

१. हीं वचनें धम्मपद ( अप्पमाद वग्ग ) यांतलीं होतीं.

व त्यांतलें मर्म समजून घेतल्यावर राजाचें मन बौद्धधर्माकडे आकर्षिलें गेलें. नंतर राजानें आणखी कांहीं बौद्ध भिक्षूंकडून बुद्धाचा आर्य अष्टांगिक[1] मार्ग व चार आर्यसत्यें[2] यांचा महिमा समजावून घेतल्यावर त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला, व त्यानें कालांतरानें बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

अशोकानें आपला धाकटा भाऊ तिष्य याला युवराज केलें. हाहि बौद्ध झाला. या दोन उदाहरणांमुळें मगधांत बौद्धधर्माचा प्रसार फारच झपाट्यानें झाला. साठ हजार ब्राह्मण राजाचे आश्रित होते. त्यांचा आश्रय आतां तुटला आणि तो बौद्धभिक्षूंना मिळूं लागला. अशी दंतकथा आहे कीं, राजा रोज ४०००० सुवर्णमुद्रा भिक्षूंना दान देत असे व त्यांचा उपदेश ऐकण्यांत काळ घालवी. त्यानें ८४००० विहार, स्तंभ इ. बुद्धस्मारकें बांधण्याची प्रतिज्ञा करून आपल्या राजधानींत अशोकाराम नांवाचा एक मोठा विहार बांधला.

नंतर अशोकानें बौद्ध भिक्षूंची एक प्रचंड परिषद् बोलाविली व स्वतः त्या परिषदेंत बसून धर्मचर्चा श्रवण केली. त्याच्या वृत्तींत झालेल्या विलक्षण परिवर्तनावरून त्याला ‘ धर्माशोक ’ हें नांव मिळालें.

## २. भारतीय कथा

चंपा नांवाच्या नगरींत एक ब्राह्मण राहात होता. त्याला सुभद्रांगी नांवाची एक मुलगी होती. तिचें अप्रतिम लावण्य पाहून ब्राह्मणाला वाटलें कीं, राजा बिंदुसारानें हिचें लावण्य पाहिलें तर तो तिला तत्काळ आपली पट्टराणी करील. म्हणून त्यानें तिला नोकरीच्या निमित्तानें राजाच्या अंतःपुरांत

---

१. सम्यक् दृष्टि, सम्यक् संकल्प, सम्यक् वाक्, सम्यक् कर्मान्त, सम्यक् जीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृति व सम्यक् समाधि हीं अष्टांगें.

२. दुःख, त्याची उत्पत्ति, व त्याचा नाश करण्याचा उपाय हीं चार आर्यसत्यें.

पाठविलें. तेथें बिंदुसार राजाच्या दुसऱ्या राण्या होत्या. त्यांना तिच्या सौंदर्याबद्दल मत्सर वाटला व त्यांनीं तिचा अपमान करण्यासाठीं तिच्याकडे नखें काढण्याचें काम दिलें. हें काम न्हाविणीचें असतें. तरी सुभद्रांगी त्या कामावर राहिली. कालांतरानें एकदा राजाची दृष्टि तिच्याकडे गेली. राजा तिच्या सौंदर्याला मोहित झाला आणि तूं कोण ? म्हणून तिला विचारलें. जवळपास कोणी नाहीं असें पाहून तिनेंहि मी खरोखर ब्राह्मणकन्या आहें ही गोष्ट राजाच्या कानावर घातली. तेव्हां राजानें तिच्याशीं विवाह करून तिला पट्टराणी केलें. तिला दोन पुत्र झाले. वडील मुलाचें अशोक व धाकट्याचें विगताशोक अशीं नांवें ठेवण्यांत आलीं.

अशोक अतिशय कुरूप होता. म्हणून राजाची त्याच्यावर जरा वक्रदृष्टीच होती. एके दिवशीं राजाकडे वत्सजीव नांवाचा एक महान् ज्योतिषी आला होता. त्याला राजानें राजपुत्रांचें भविष्य विचारलें. त्यानें अशोकाच्या शरीरावरचीं राजचिन्हें पाहून हा पुढें मोठा नामांकित सम्राट् व्हावयाचा आहे असें मनांत ओळखलें. पण राजा कदाचित् रागावेल म्हणून खरी गोष्ट राजाला न सांगतां सुभद्रांगी राणीला सांगितली.

पुढें तक्षशिला येथें उद्भवलेलें बंड मोडण्याच्या कामगिरीवर राजानें अशोकाला पाठविलें; परंतु त्याच्या बरोबर रथ, सैन्य, शस्त्रें वगैरे दिलीं नाहींत. हेतु हा कीं, तिकडे तो मारला जावा. पित्याच्या आज्ञेवरून अशोक तक्षशिलेला गेला. तेथें युक्तिप्रयुक्तीनें व गोड बोलून त्यानें लोकांच्या मनाचें समाधान केलें. राजपुत्र सुसीम हा तक्षशिला येथें राजप्रतिनिधि म्हणून गेला होता व तेथें लोकांशीं उद्दामपणानें वागला होता, म्हणून त्याच्यावर लोकांचा सारा राग होता. अशोकाचा गोड स्वभाव पाहून ते त्याच्यावर फार खुष झाले होते. अशोक त्या लोकांना शांत करून परत पाटलीपुत्राला आला. पुनः एकदा तक्षशिला येथें सुसीमाच्या जुलमी कारभारावरून लोकांनीं बंड केलें. तें मोडण्यासाठीं अशोकाला पुनः तिकडे पाठवून सुसीमाला परत बोलावण्यांत

आलें. अशोक तिकडे गेल्यावर इकडे बिंदुसार मरण पावला. हें ऐकून सुसीम पित्याचें सिंहासन हस्तगत करण्यासाठीं तातडीनें पाटलीपुत्राला जाण्यास निघाला. पण पूर्वी नंदराजाच्या वेळीं सेनापति असलेल्या व हल्लीं मौर्य-राजाच्या पदरीं त्याच पदावर काम करीत असलेल्या राक्षसाच्या सैन्यानें प्रतिबंध करून सुसीमाला पाटलीपुत्राच्या तटाच्या आंत येऊं दिलें नाहीं. तेव्हां तटाच्या भोंवतालच्या खंदकांत अग्निकाष्ठें पेटवून ठेविलीं होतीं, त्यांवरून उडी मारून जाण्याच्या प्रयत्नांत अपयश येऊन सुसीम त्या खंदकांत पडून मेला आणि अशोकाला मगधाचें राज्य मिळालें.

## ३. तिबेटी कथा[१]

मगधाच्या गादीवर अजातशत्रूच्या मागून नऊ राजे झाल्यानंतर धर्माशोक नांवाचा दहावा राजा झाला. त्यानें ५४ वर्षें राज्य केलें. धर्माशोक पूर्ववयांत अतिशय दुष्ट व क्रूर होता. क्षुद्र कारणावरून तो माणसांना ठार मारीत असे. पण पुढें त्याच्या स्वभावांत आश्चर्य वाटण्यासारखें परिवर्तन घडून आलें. या राजाला त्याच्या कारकीर्दीच्या ३० व्या वर्षी एक मुलगा झाला. हा मुलगा मोठा भाग्यवान् होणार आहे, बापाच्या हयातींतच तो राजा होईल, असें त्याच्याविषयीं कोणीं भाकीत केल्याची गोष्ट राजाच्या कानीं जाऊन राजानें त्याचा त्याग केला होता.

त्याच वेळीं चीन देशांत गिंया नांवाचा कोणी राजा राज्य करीत होता. त्याला ९९९ पुत्र होते. तरी हजाराची संख्या पूर्ण होण्यासाठीं त्यानें देवा-जवळ आणखी एक पुत्र मागितला. तेव्हां देवानें मगध राजानें टाकून दिलेला वरील पुत्र त्याला नेऊन दिला. चिनी राजानेंहि त्याचें पुत्रवत् पालन केलें. पुढें हा मुलगा मोठा झाल्यावर त्यानें ली–युल (कुस्तन अथवा खोतान)

१. ही Rockhill's Life of Buddha या ग्रंथांत दिलेली आहे.

नांवाचें एक स्वतंत्र राज्य स्थापिलें. मगधराजा धर्माशोक याचा यश नांवाचा एक मंत्री होता. तो सैन्यासह तेथें त्याला जाऊन मिळाला. पुढें त्यानें मगधावर स्वारी करून तें राज्य घेतलें व बापाला पदच्युत करून आपण राजा झाला.

## ४. ब्रह्मदेशीय कथा[1].

मगधराज बिंदुसार याला पुष्कळ राण्या होत्या. पैकीं मुख्य राणी धम्मा ही होती. तिला दोन पुत्र झाले. वडील पुत्र अशोक याच्या वेळीं ती गरोदर असतां एके रात्रीं तिला असें स्वप्न पडलें कीं, तिचा मुलगा एक पाय चंद्रावर व दुसरा सूर्यावर देऊन उभा आहे; आकाशांतले ग्रह व नक्षत्रें यांचा ग्रास करीत आहे; केव्हां केव्हां मेघांना गिळून टाकीत आहे; केव्हां झाडांचीं पानें खात आहे व केव्हां कीटपतंगादिकांचें भक्षण करीत आहे. या स्वप्नाचा अर्थ तिनें शास्त्रज्ञांना विचारला, तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, जन्मास येणारा राजपुत्र जंबुद्वीपाचें राज्य करील, व भाऊबंदांना ठार मारून तिन्ही लोकांत आपला दरारा बसवील.

शास्त्रज्ञांनीं सांगितल्याप्रमाणें राणीला मुलगा झाला. त्याचें नांव अशोक ठेवण्यांत आलें. तो सोळा वर्षांचा झाला तेव्हां त्याला उज्जयिनी प्रांताचा अधिकारी करून पाठविण्यांत आलें. तेथें तो नऊ वर्षें राहिला. इकडे बिंदुसार मरणासन्न आहे असें ऐकून तो पित्याच्या भेटीसाठीं धावून आला. लवकरच बिंदुसार मरण पावला. बिंदुसाराला १०१ पुत्र होते. त्यांच्यांत गादीच्या संबंधानें भांडणें लागलीं. ते सगळे अशोकाचा भाऊ सुमन याला पुढें करून त्याच्याशीं लढण्यास उभे राहिले. पुष्कळ दिवस लढाई चालल्यावर अखेर अशोकाचा जय झाला व सुमन मारला गेला. तेव्हां अशोकाच्या हातीं मगधाचें राज्य आलें. हातीं सत्ता आल्याबरोबर त्यानें बाकीच्या भावांना मारून टाकिलें.

---

१. ही कथा बिशप बिगंडेर यांच्या Life of Buddha या ग्रंथांत दिलेली आहे.

## ५. काश्मीरी कथा

काश्मीरच्या कल्हण नांवाच्या पंडिताचा ‘ राजतरंगिणी ’ नांवाचा एक संस्कृत इतिहासग्रंथ आहे. त्यांत अनेक राजांचीं चरित्रें दिलीं आहेत. त्यांत अशोकासंबंधाचेहि कांहीं उल्लेख आहेत. अशोकाच्या बौद्धधर्माविषयींच्या आत्यंतिक निष्ठेचा त्यांत उल्लेख केलेला आहे. काश्मीरांतल्या अनेक इतिहासप्रसिद्ध स्थळांशीं अशोकाचा संबंध आलेला आहे. शुष्कलेत्र व वितस्तत्र या दोन ठिकाणीं अशोकाचे स्तूप व स्तंभ होते. यांचा उल्लेख राजतरंगिणींत आहे. याशिवाय काश्मीरांत ज्या कित्येक दंतकथा प्रचलित आहेत त्यांवरून अशोकाचें धर्मौदार्य आणि सर्वधर्मसंप्रदायांविषयीं समबुद्धि हे गुण दृष्टोत्पत्तीस येतात. उदाहरणार्थ, विजयेश्वर नांवाचें एक पुरातन शिवतीर्थ काश्मीरांत आहे; त्याला अशोकानें बरीच मोठी देणगी दिली होती. शिवाय या तीर्थस्थानाची वीटबंदी भिंत जीर्ण झाली होती, ती पाडून अशोकानें ती मजबूत चिरेबंदी करून दिली होती. अशोकानें कांहीं हिंदुमंदिरें बांधून दिलीं. त्यांपैकीं दोन मंदिरें अशोकेश्वराचीं मंदिरें या नांवानेंच प्रसिद्ध होतीं. अशोक हा शिवभूतेश नांवाच्या शैव देवतेचा उपासक होता, अशी एक कथा राजतरंगिणींत दिलेली आहे. काश्मीरची राजधानी श्रीनगर हें अशोकानेंच मूळ वसविलें होतें असेंहि कल्हणानें म्हटलें आहे. राजतरंगिणींत दिलेल्या वंशावळींत अशोकाच्या आज्याचें नांव शाकुनि असें दिलेलें आहे. हें नांव दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथांत दिलेलें आढळत नाहीं.

## ६. नेपाळी कथा

नेपाळांत अनेक बौद्ध ग्रंथ होते. त्यांतले बरेचसे हॉजसन् नांवाच्या एका युरोपियन पंडितानें नेऊन एशिआटिक सोसायटीला दिले. डॉ. राजेंद्रलाल मित्र यांच्या Nepalese Buddhist Literature नांवाच्या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, या नोपाळी बौद्धवाङ्मयांत एक ग्रंथ आहे. त्यावर त्याच्या कर्त्यांचें.

नांव दिलेलें नाहीं, पण त्यांत अशोकाच्या बालपणींची व आचार्य उपगुप्तानें त्याला बौद्धधर्माचा व नीतीचा उपदेश केल्याची साद्यंत हकीकत दिलेली आहे. त्याचप्रमाणें पाटलीपुत्र नगराजवळच्या कुक्कुटारामांत जयश्री नांवाचा एक मोठा बौद्ध भिक्षु कित्येक दिवस राहिला होता. त्यानें आपल्या शिष्य-मंडळीस साग्र अशोकचरित्र सांगितल्याचाहि उल्लेख आहे. याशिवाय नेपाळांत अवदान नांवाचा एक बौद्धग्रंथ आहे. त्यांत बौद्धधर्मांचे निरनिराळे संप्रदाय, त्यांचे संस्थापक, विशिष्ट मतें व मतभेद, आचार, विचार वगैरेंचा साद्यंत व विस्तृत इतिहास वर्णिला आहे.

## ७. महींद्र आणि संघमित्रा

अशोक हा उज्जयिनी येथें राजाचा प्रतिनिधि असतांना त्याचा तेथें देवी नांवाच्या श्रेष्ठी जातीच्या एका स्त्रीशीं स्नेहसंबंध जडला होता. तिला त्याच्यापासून एक पुत्र झाला. त्याचें नांव महींद्र (अथवा महेंद्र) असें ठेवण्यांत आलें होतें. दोन वर्षांनीं देवीला एक मुलगी झाली. तिचें नांव संघमित्रा. अशोक पाटलीपुत्रास जाऊन त्याला राजपद मिळालें तरी देवी त्याच्याकडे गेली नाहीं. ती आपल्या माहेरीं विदिशा नगरींत राहिली होती. मुलें मात्र अशोकाबरोबर गेलीं. पुढें संघमित्रेचा विवाह अग्निब्रह्मा नांवाच्या अशोकाच्या एका नातलगाशीं झाला. या विवाहाचें फळ सुमन नांवाचा पुत्र होय.

अशोकाच्या राज्याभिषेकानंतर चार वर्षांनीं अशोकाचा भाऊ तिष्य, अग्निब्रह्मा व त्याचा पुत्र सुमन या सर्वांनीं बौद्धधर्माची दीक्षा घेतली. अशोकानें ८४००० धर्ममंदिरें व स्तूप, विहार वगैरे बांधण्याची प्रतिज्ञा केली होती. ती पूर्ण झाल्याबद्दल राजाला फार समाधान वाटलें आणि त्यानें लक्षावधि बौद्ध भिक्षु व भिक्षुणी यांना निमंत्रण करून बोलाविलें आणि स्वतः भिक्षूंमध्यें जाऊन बसला. भ्रातृहत्येच्या पातकाचा दोष त्यानें अशा रीतीनें धुऊन काढला व तेव्हांपासून त्याला धर्माशोक हें नांव मिळालें.

महींद्राला बौद्धधर्माची दीक्षा देण्यापूर्वी युवराजपदावर तिष्याचे जागीं त्याला नेमण्याचा अशोकाचा विचार होता. पण मोग्गलिपुत्र तिष्य याच्या उपदेशावरून त्यानें आपला बेत पालटला आणि महींद्राला भिक्षुधर्माची दीक्षा दिली. कारण तो या वेळीं २० वर्षांचा वयांत आलेला कुमार होता. संघमित्रेनेंहि याच वेळीं पीतवस्त्रें धारण केलीं. पण ती वयांत आलेली नव्हती. यामुळें तिला भिक्षुणींच्या संघांत प्रविष्ट होता आलें नाहीं.

पुढें अशोकराजानें बौद्धधर्माचा सर्वत्र प्रसार करण्यासाठीं निरनिराळ्या देशांतून प्रचारक पाठविले. त्यांत सिंहलद्वीपांत जाण्याच्या कामगिरीवर महींद्राची नेमणूक झाली. त्याच्याबरोबर आणखी पांच भिक्षु गेले. त्यांत त्याचा भाचा (संघमित्रेचा पुत्र) सुमन हा एक होता.

सिंहलद्वीपाला जाण्याच्या मार्गावरच विदिशा नगरी होती. तेथें महींद्राची आई देवी ही राहात होती. बापाच्या परवानगीनें महींद्रानें मातेचें दर्शन घेतलें. तिनें त्याला आपल्या गांवीं ६ महिने आग्रहानें ठेवून घेतलें. त्याला राहण्यासाठीं तिनें भव्य मठ बांधून दिला होता. हाच हल्लींचा सांचीचा स्तूप असावा असा कित्येक पंडितांचा तर्क आहे. महींद्र तेथें स्वस्थ बसला नव्हता. तेथें त्यानें बौद्धधर्माचा उपदेश करण्याचें काम चालविलेंच होतें व कांहीं शिष्यहि त्याला मिळाले होते.

आईच्या इच्छेप्रमाणें विदिशा येथें ६ महिने राहिल्यावर महींद्र आपल्या सोबत्यांसह आकाशांतून उडून सिंहलद्वीपाला गेला, आणि मिस्सा नामक डोंगरावर उतरला. सिंहलदेशचा राजा तिष्य यानें त्याचें उत्तम प्रकारें स्वागत केलें व त्याच्यापासून बौद्धधर्माची माहिती करून घेतली. महींद्राच्या उपदेशावरून तिष्यराजाच्या मनाची प्रवृत्ति बौद्धधर्माकडे वळली व तो आणि त्याच्या बरोबर ४०००० इतर लोक बौद्धधर्मांत प्रविष्ट झाले. राजकन्या अनुला हिच्याहि मनांत बौद्धधर्माची दीक्षा घ्यावयाची होती; पण महींद्रानें सांगितलें कीं,

स्त्रियांना दीक्षा देण्याचा अधिकार आम्हां पुरुषांना दिलेला नसल्यामुळें आम्हांला ती देतां येत नाहीं. स्त्रियांनीं स्त्रीकडूनच दीक्षा घ्यावयास पाहिजे.

येथें हें सांगणें अवश्य आहे कीं, महींद्र सिंहलदेशास जाण्यापूर्वींच तेथील राजा तिष्य व मगधराज अशोक यांच्यामध्यें दृढ स्नेहसंबंध जडलेला होता. यांच्यामध्यें पत्रव्यवहार होत असे व परस्पर परस्परांना नजरनजराणा वगैरे पाठवीत असत. एकदा तिष्यराजानें आपला पुतण्या महाअरिष्ट याला बरोबर कांहीं सरदार व उंची वस्त्रें आणि नजराणा देऊन पाटलीपुत्राला अशोकाकडे पाठविलें होतें. अशोकराजानें त्यांचें प्रेमादरपूर्वक स्वागत व पाहुणचार केला आणि पांच महिनेपर्यंत पाहुण्यांना ठेवून घेतलें आणि निरोप देतांना त्यांच्या हातीं तिष्यराजाला सांगून पाठविलें कीं, मीं भगवान् बुद्ध, धर्म व संघ यांना शरण जाऊन बौद्धधर्माचा स्वीकार केला आहे. मी बौद्ध–उपासक झालों आहे. आपणहि त्रिरत्नांची माहिती करून घेऊन त्यांवर श्रद्धा ठेवावी, आणि या महान् गुरूचा आश्रय करावा अशी आमची इच्छा आहे. त्यावर तिष्य-राजानें बौद्धधर्माची माहिती करून देणारे प्रचारक पाठविण्याविषयीं अशोकास लिहिल्यावरून महींद्राला पाठविण्यांत आलें होतें.

अनुलेला दीक्षा देण्याच्या मार्गांत वर सांगितलेली अकल्पित अडचण उभी राहिली, तेव्हां तिष्यराजानें पुनः पूर्वीप्रमाणें आपला पुतण्या महाअरिष्ट व कित्येक सरदार यांना अशोकाकडे पाठविलें, आणि संघमित्रेला बोधिवृक्षाची एक शाखा बरोबर देऊन पाठविण्याविषयीं विनंती केली. अशोकानें ती मान्य करून स्वतः मोठें सैन्य बरोबर घेऊन ताम्रलिप्ति बंदरापर्यंत तिला पोंचविलें. तेथून पुढें ती एकटीच गेली.

ज्या जहाजांत बोधिवृक्षाची फांदी घेऊन संघमित्रा बसली होती तें जहाज समुद्रांत हाकारल्याबरोबर समुद्र अगदीं शांत झाला. त्या फांदीला पांच निर-निराळ्या रंगांचीं फुलें आलीं आणि हवेंत गायनाचे सुस्वर ऐकूं येऊं लागले.

तिष्यराजानें संघमित्रेचें आदरपूर्वक स्वागत केलें आणि मोठ्या थाटामाटानें बोधिवृक्षाची ती शाखा आपल्या महामेत्रोद्यानांत लाविली.

महींद्रासाठीं त्यानें महाविहार नांवाचा एक मोठा मठहि बांधून दिला. त्याच्या मागून चेतियगिरि नांवाचा दुसराहि एक मठ बांधण्यांत आला.

राजकन्या अनुला हिला व तिच्याबरोबर राजमहालांतल्या पांचशें कुमारी व पांचशें स्त्रिया यांना संघमित्रेनें बौद्धधर्माची दीक्षा दिली, व त्यामुळें ती ( संघमित्रा ) तत्काळ अर्हत्पदाला पावली. राजानें तिच्या राहण्यासाठीं एक आश्रम ( मठ ) बांधून दिला. तेथें ती तिच्या मृत्युकाळापर्यंत राहात होती. महींद्र तिच्या अगोदर एकच वर्ष मरण पावला होता.

८

महींद्राविषयीं आणखी एक निराळ्या प्रकारची दंतकथा प्रचलित आहे. ती अशी—

राजा अशोक याला त्याच्याहून लहान एक सावत्रभाऊ होता. तो अतिशय उनाड, उधळ्या आणि क्रूर स्वभावाचा होता. तो राजासारखा पोशाख करी आणि लोकांत राजाची ऐट आणी. प्रजा त्यामुळें फार चिडली आणि तक्रारी घेऊन राजाकडे गेली. प्रजेच्या तक्रारी दूर करून त्यांना न्याय देणें हा राजाचा धर्म. म्हणून अशोकराजानें आपल्या भावाला बोलावून आणून आणि डोळ्यांत अश्रु आणून त्याला म्हटलें, 'वाडवडिलांपासून चालत आलेल्या राजधर्माचें परिपालन करण्याचें निष्ठुर कर्तव्य सध्यां माझेकडे आलें आहे. मीं आजपर्यंत तुला प्रेमानें आणि मायाळूपणानें वागविलें, तें तूं विसरलास काय ? राजधर्माचा अनादर मला करतां येत नाहीं, एकीकडे आड आणि दुसरीकडे विहीर अशा पेंचांत मी सांपडलों आहें. मी तुला राजधर्मा-प्रमाणें शिक्षा केली तर माझें प्रेम व नात्याचा संबंध आड येतो; न केली तर मीं पक्षपात करून अन्याय केला, राजधर्म पाळला नाहीं, असें दूषण

लोक मला लावतील. ' कुमारानें ( अशोकाच्या भावानें ) खालीं मान घालून आपली चूक कबूल केली आणि विचारासाठीं सात दिवसांची मुदत मागून घेतली. राजानें ती मुदत दिली आणि त्या अवधींत कुमाराला अंधारकोठडींत ठेवण्याचा हुकूम केला. तेथें कुमार बंदींत होता तरी राजकुमाराला उचित अशी त्याच्या राहण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. एकेक दिवस गेला म्हणजे पहारेकरी ' पहिला दिवस गेला, सहा राहिले, ' ' दुसरा दिवस गेला, पांच राहिले, ' असें रोज रात्रीं ओरडून कुमारास सांगे. याप्रमाणें होतां होतां सहा दिवस निघून गेले. या अवधींत कुमार महींद्र याच्या पश्चात्तापाची पूर्णता झाली. सातवा दिवस उजाडतांच तो अर्हत्पदाला पोंचला आणि आपणास अलौकिक दैवी शक्ति प्राप्त झाल्या आहेत याचें त्याला ज्ञान झालें. तें होतांच तो पक्ष्याप्रमाणें आकाशांत संचार करूं लागला. अशोकराजाला हें वर्तमान कळतांच तो तुरुंगाकडे धावत गेला आणि महींद्राला म्हणाला कीं, ' पश्चात्तापानें तुला ज्या अर्थी पवित्रता प्राप्त झाली आहे त्या अर्थी तुला आतां राजमहालांत परत येण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. ' यावर महींद्रानें उत्तर केलें कीं, ' इहलोकींच्या विषयसुखांचा आतां मला पुरा वीट आला आहे आणि इतःपर एकान्तस्थळीं राहून ध्यानधारणा इ. गोष्टींतच राहिलेले आयुष्याचे दिवस काढण्याचा माझा विचार आहे. ' अशोक म्हणाला, ' तें मला मान्य आहे, पण त्यासाठीं गिरिकंदरांतच जाऊं राहिलें पाहिजे असें नाहीं. आपल्या राजधानींतच तुझ्यासाठीं मी एकान्त जागा पाहून आश्रम बांधून देतों. तेथें राहा. ' त्याप्रमाणें राजानें त्याला आश्रम बांधून दिला.

महींद्रानें नंतर रीतसर बौद्धधर्माची दीक्षा घेतल्यावर दक्षिणेकडे प्रयाण केलें. दक्षिणेंत कावेरी नदीच्या कांठीं त्यानें एक मठ बांधिला होता. त्याचे अवशेष नंतर ९०० वर्षेपर्यंत पाहण्यास मिळत होते असें बीलसाहेब आपल्या ग्रंथांत लिहितो.

महींद्राला आकाशांत संचार करण्याची जी दिव्यशक्ति प्राप्त झाली होती तिनेंच तो सिंहलद्वीपास गेला व तेथें त्यानें बौद्धधर्माचा प्रसार केला.

## ९. अशोकाची क्रूरता

अशोक पूर्ववयांत अतिशय तामसी, दुष्ट व क्रूर होता, अशाविषयीं पुष्कळ गोष्टी बौद्ध ग्रंथांतून दिलेल्या आढळतात. क्षमा हा गुण त्याच्या गांवींहि नव्हता. कोणीं कितीहि क्षुद्र अपराध केला तरी त्याला तो देहान्त शिक्षा देत असे. यामुळें कोणत्याहि कारणावरून राजाच्या तावडींत सांपडणें म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंत जाण्यासारखें लोकांना भय वाटे. अशोकाच्या राण्यासुद्धां त्याच्या रागाच्या तडाख्यांतून सुटल्या नव्हत्या. एके दिवशीं अंतःपुरांतल्या स्त्रिया एकमेकींशीं मोकळ्या मनानें सुखदुःखाच्या गोष्टी बोलत बसल्या असतां बोलण्याच्या ओघांत राजाच्या कुरूपतेबद्दल दोन शब्द चुकून बोलून गेल्या. ती गोष्ट गुप्त हेरांकडून राजास कळल्यावर राजाचे डोळे इंगळासारखे लाल झाले आणि त्यानें चंडगिरिक नांवाच्या चाकराला बोलावून त्याच्या कडून त्या स्त्रियांना फराफरा ओढीत आणवून त्यांना अग्निकुंडांत ढकलून देण्याविषयीं त्याला आज्ञा केली.

हीच गोष्ट अशोकावदान ग्रंथांत थोडी निराळ्या रीतीनें दिलेली आढळते राजाच्या कुरूपतेबद्दलची चर्चा केली म्हणून नव्हे, तर राजाच्या उद्यानांत एक अशोकवृक्ष होता त्याच्या फांद्या तोडल्या हा त्या स्त्रियांचा अपराध होता आणि या अपराधाबद्दल त्यांना वरील शासन मिळालें !

## १०. नरकाची स्थापना

अशोकाला दयामाया ठाऊक नव्हती. तो शुद्ध राक्षस होता. यामुळें त्याचें नांव काढतांच मंत्रीसुद्धां चळचळा कांपत. मांडलिक राजांवरसुद्धां त्याचा मनस्वी दरारा होता. राजा कोणत्या वेळेला कोणाचें काय करील याचा नेमच नव्हता.

यामुळें सर्वजण त्याला भीत. हें पाहून तो अधिकच उन्मत्त झाला होता. त्याला आपल्या सत्तेचा इतका गर्व झाला होता कीं, तो प्रत्यक्ष इंद्राशीं स्पर्धा करूं लागला ! आपलें ऐश्वर्य, अधिकार व सामर्थ्य इंद्राच्या ऐश्वर्याहून, अधिकाराहून व सामर्थ्याहून मुळींच उणें नाहीं, आपण सर्वतोपरीं इंद्राच्या बरोबरीचे आहों; जर कांहीं उणीव असली तर ती एकाच बाबतींत आहे— इंद्राच्या राज्यांत अपराध्यांसाठीं घोर नरक हें दंडस्थान आहे तेवढें मात्र आपल्या राज्यांत नाहीं—असें तो समजत असे. ही उणीव भरून काढण्याच्या उद्देशानें त्यानें नरकस्थापनेची योजना तयार करून ती तावडतोब अमलांत आणिली होती.[1] एका विस्तीर्ण मैदानाच्या सभोंवार मजबूत तटबंदी करून त्याच्या आंत शस्त्रें, तीक्ष्ण दांत्यांचीं निरनिराळीं चक्रें, लोहशूळ, तप्ततेलाच्या कढया इ० घोर यातना देण्याच्या वस्तूंचा जंगी संग्रह जय्यत ठेविला होता आणि अपराध्यांना शिक्षा द्यावयाची झाली म्हणजे त्यांना येथें पाठवीत असत. पुढें पुढें तर असा प्रकार होऊं लागला कीं, अपराधीच नव्हे, पण कोणी वाटसरूसुद्धां चुकीनें किंवा फसून येथें आला कीं, त्याला आंत नेऊन नानाप्रकारें त्याच्या हालअपेष्टा करण्यांत येत आणि मर्मांतिक वेदना होतील अशा शिक्षा देऊन ठार मारण्यांत येई[2]. असें मनुष्यवधाचें सत्र सारखें सुरू असतां एके दिवशीं एक अपूर्व चमत्कार घडला तो असा—

---

१. अशोक उज्जयिनी येथें राजप्रतिनिधीच्या कामावर असतां तेथेंहि त्यानें एक नरक स्थापिला होता असें Cunningham's Bhilsa Topes, P. 96 यांत म्हटलें आहे.

२. Beal's Si-Yn-Ki, P. 46 Legg 's Translation of Fa-Hien 's Travels, P. 91 यांत असें लिहिलेलें आढळतें कीं, या नरकस्थानाचा बाह्य भाग रम्य उद्यान, कारंजीं, स्वच्छोदकाच्या पुष्करणी, लतामंडप इत्यादिकांनीं इतका मनोहर करून सोडला होता कीं, सहज एखाद्या पांथस्थास

एक बौद्ध भिक्षु फिरतां फिरतां अशोकाच्या नरकस्थानापाशीं गेला आणि तें रम्य स्थल व स्वच्छोदकाचें कारंजें आणि लतामंडप वगैरे पाहून विश्रांति घेण्यास हें स्थल चांगलें आहे असें पाहून आंत शिरला. लगेच द्वारपालानें त्याला पकडून यमयातनांचा अनुभव घेण्यासाठीं आंत वरिष्ठ अधिकाऱ्याकडे नेलें. वरिष्ठ अधिकाऱ्यानेंहि बौद्ध भिक्षु खरोखर अपराधी आहे कीं नाहीं याची चौकशी न करतां शिक्षा फर्मावली. पण भिक्षूनें मोठ्या मिनतवारीनें ध्यान, चिंतन वगैरे करण्यासाठीं चार घटकांची मुदत मागून घेतली. मध्यंतरीं दुसरा एक पुरुष तशाच रीतीनें फसून आंत शिरल्यावरून त्यालाहि पकडून आणिलें होतें. नरकावरील कामदारानें त्याचें डोकें चक्रांत अडकावून चेंचलें. त्यापासून उडालेली रक्ताची चिरकांडी पाहून आणि त्या माणसाची अंतकाळची भयंकर वेदनायुक्त किंकाळी ऐकून त्या भिक्षूचें अंतःकरण चर्रर झालें आणि मानवी जीविताची क्षणभंगुरता व देहाची नश्वरता त्याच्या हृत्पटलावर पूर्णपणें ठसून तो एकदम अर्हत् या श्रेष्ठ पदास प्राप्त झाला. दिलेल्या मुदतीच्या चार घटका संपल्यावर तो शिक्षा भोगण्यास आनंदानें तयार झाला, तेव्हां शिपायांनीं त्याला उचलून तापलेल्या तेलाच्या कढईत ढकलून दिलें. पण चमत्कार असा कीं, अग्नि तत्काळ आपला स्वभावधर्म टाकून देऊन शांत झाला. तापलेलें तेल एकदम थंड झालें, आणि त्या भिक्षूच्या चर्येवर त्याला यातना होत असल्याचें कांहींच चिन्ह दिसलें नाहीं. हा प्रत्यक्ष पाहिलेला अपूर्व चमत्कार नरकावरील अधिकाऱ्यानें राजाला निवेदन केला. प्रथम राजाला तो खरा वाटला नाहीं. म्हणून तो स्वतः नरक-

---

(पृष्ठ २२३ वरून पुढें चालू)

तेथें क्षणभर जाऊन बसण्याची बुद्धि व्हावी. तेथें आंत जाण्यास कोणाची मनाई नसे; पण एकदा आंत गेलेला मनुष्य पुनः क्वचित्च जिवंतपणें बाहेर येई. अशा रीतीनें फसवून निरुपद्रवी व निरपराधी माणसाचा वध केलेला पाहण्यांत अशोकाला मौज वाटे.

स्थानाकडे गेला, आणि त्यानें तो चमत्कार पाहिला. तेव्हां तो अत्यंत चकित झाला, आणि त्यानें भिक्षूला तेलाच्या कढईतून बाहेर काढून त्याच्या ऐवजीं त्या नरकावरील अधिकाऱ्यास कढईत टाकून मारविलें, आणि त्या नरकस्थानाचा संपूर्ण नाश करविला. मग त्या भिक्षूला मोठ्या सन्मानानें राजमंदिरांत नेऊन तो कोण काय याची माहिती विचारून घेतली, आणि तो मोठा विद्वान् सत्पुरुष आहे अशी खात्री झाल्यावर त्याच्यापासून राजानें धर्मोपदेश घेतला. तो धर्मोपदेश ऐकून राजाच्या मनाला पूर्ण उपरति झाली. बौद्धधर्मावर त्याची श्रद्धा बसली आणि तेव्हांपासून राजाच्या वागणुकींत कल्पनातीत परिवर्तन घडलेलें दिसून आलें. बौद्धधर्माचा प्रचारक, संरक्षक व पुरस्कर्ता होण्याचा त्यानें संकल्प केला.[१] या संकल्पाप्रमाणें कुक्कुटोद्यानांत व अन्यत्र अनेक चैत्य ( मृत देहाची रक्षा ठेवण्याचीं मंदिरें ) व स्तूप त्यानें बांधिले. एकंदर ८४००० स्तूप बांधण्याचा अशोकाचा विचार होता. ही ८४००० संख्या निश्चित करण्याचें कारण डॉ. राजेंद्रलाल मित्र हे सुप्रसिद्ध बंगाली विद्वान् व पुराणवस्तुसंशोधक आपल्या ग्रंथांत असें लिहितात कीं, माणसांच्या शरीरांतल्या अस्थींच्या परमाणूंची संख्या ८४००० आहे असें बौद्ध लोक मानतात. तेव्हां प्रत्येक परमाणूस एकेक स्तूप अशा हिशेबानें ८४००० ही संख्या निश्चित करण्यांत आली असावी.

अशोकानें यापुढें हीं व अशींच दुसरीं जीं अनेक कृत्यें केलीं त्यावरून चंडाशोक हें त्याचें नांव जाऊन धर्माशोक हें नांव त्याला प्राप्त झालें.

---

१. या चमत्काराविषयींची हकीकत अशोआवदान, फा–हयान याचा प्रवासवृत्तान्त व सी–यू–की वगैरे पुष्कळ ग्रंथांतून बहुधा सारखीच दिलेली आढळते. यावरून अशोकाच्या काळीं त्याच्या स्वभावपरिवर्तनासंबंधानें हीच गोष्ट बहुधा सर्व लोकांच्या तोंडीं असेल असें मानण्यास हरकत नाहीं.

## ११. राजपुत्र कुनाल

अशोकाला पद्मावती नांवाची एक राणी होती. तिला एक पुत्र होता. त्याचें खरें नांव धर्मविवर्धन असें होतें. पण या मुलाचे डोळे कुनालपक्षाच्या डोळ्यांप्रमाणें पाणीदार आणि काळेभोर होते, यावरून त्याचें कुनाल असें नांव पडलें होतें. त्याचें कांचनमाला नांवाच्या कुमारीशीं लग्न झालें होतें. परंतु लहानपणापासून बापाच्या धर्मशिक्षणाखालीं वाढल्यामुळें त्याचें लक्ष संसारावरून उडून तो विरक्त झाला होता. त्याचा स्वभाव अतिशय सौम्य व सात्त्विक असल्यामुळें तो राज्यकारभाराच्या वगैरे भानगडींत बिलकूल पडत नसे. सदासर्वदा धर्मचिंतन आणि धर्मचर्चा यांत तो निमग्न असे. प्रसंगवशात् त्याची सावत्र आई तिष्यरक्षिता हिची दृष्टि त्याचेकडे गेली आणि त्याचें सौंदर्य पाहून कामवासनेनें ती पीडित झाली. तिनें त्याचें मन आकर्षण करण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले; पण सारे व्यर्थ झाले. शेवटीं क्रोधानें संतप्त होऊन त्याचा नाश करण्याचा विचार ती करूं लागली. तिनें राजाला त्याचे-विषयीं खोट्यानाट्या गोष्टी सांगून तक्षशिला येथील सुभेदारीच्या कामावर त्याला पाठवून दिलें. त्याला कांहीं दिवस लोटल्यावर तिनें हसत हसत एके दिवशीं राजाच्या जवळून त्याचें शिक्कामोर्तब मागून घेतलें आणि तक्षशिला येथील एका अधिकाऱ्याला राजाच्या नांवानें हुकूम लिहून त्यावर राजाचें शिक्कामोर्तब केलें. राजपुत्र कुनाल याचे दोन्ही डोळे काढून त्याला तक्षशिला येथून हाकून द्यावें, असा मजकूर त्या आज्ञापत्रिकेंत लिहिला होता. इकडे कुनाल आपल्या सुस्वभावामुळें प्रजेस आणि हाताखालच्या अधिकाऱ्यांस अत्यंत प्रिय झाला होता. तेव्हां अशी ही राजाज्ञा पाहतांच त्यांना विलक्षण आश्चर्य वाटलें. राजाज्ञा होती तरी ती पाळण्यास त्यांचें धैर्य होईना आणि कुनालाचे असे हाल करण्यास त्यांचे हात धजतना. शेवटीं कुनाल यानें पित्राज्ञा शिरसावंद्य करून ती पार पाडण्यास जो कोणी तयार होईल त्यास बक्षीस देऊं केलें. तरी कोणी चांगला माणूस पुढें येईना. अखेर बक्षिसाच्या लालचीनें एक चांडाल तें काम करण्यास

सिद्ध झाला. सभोंवतीं प्रजाजन स्फुंदत स्फुंदत डोळे पुशीत आहेत, परंतु स्वतः कुनाल आपला डोळा काढण्याविषयीं त्या चांडालाला मोठ्या आग्रहानें विनंती करीत आहे, असा तो तेव्हांचा देखावा अति हृदयद्रावक होता. एक डोळा काढला तेव्हां तो हातीं घेऊन आणि लोकांकडे वळून कुनाल त्याला म्हणाला—" अरे हतभाग्य मांसपिंडा ! जो तूं या सुंदर मूर्ति येवढा वेळ पाहात होतास, त्या तुला या पुनः दिसतील काय ? तुला मी 'माझा माझा' म्हणून समजत होतों; परंतु हाय ! हाय ! ती माझी केवढी चूक होती ! " इतक्यांत दुसराहि डोळा काढला तेव्हां कुनाल म्हणाला—'सगळें पाप डोळ्यांकडून घडत असतें. तेव्हां ते गेल्याबद्दल आनंदच मानला पाहिजे. चर्मचक्षु जाऊन त्याचे-बद्दल ज्ञानचक्षू आले हा काय सामान्य लाभ म्हणावयाचा ? राजानें माझा त्याग केला खरा; परंतु धर्मराजानें मला पुत्र म्हणून पोटाशीं धरलें आहे. या कष्टमय राज्यांतल्या उंच पदवीपासून मी भ्रष्ट झालों खरा; परंतु आनंदमय अशा धर्मराज्यांत माझा प्रवेश झाला आहे.'

नंतर तो आपल्या स्त्रीसहवर्तमान दारोदार भिक्षा मागत पाटलीपुत्रास येण्यास निघाला, आणि वीणा वाजवीत वाजवीत व तोंडानें भक्तिपर पदें म्हणत तो आपल्या बापाच्या राजधानींत राजवाड्याच्या अगदीं जवळ जाऊन पोहोंचला. राजानें तो वीणानाद आणि संगीतध्वनि ऐकून त्याला आंत बोलाविलें. परंतु हा आपला पुत्र कुनाल आहे असें त्यानें ओळखलें नाहीं. तूं कोण, कोठून, कशासाठीं आलास ? वगैरे विचारतां त्यानें झालेली हकीकत निवेदित केली. तेव्हां राजाच्या अंगाचा संताप होऊन त्यानें तिष्यरक्षिता राणीचा एकदम वध करण्याची आज्ञा दिली. ती ऐकून कुनाल साष्टांग नमस्कार घालून म्हणाला, " महाराज, स्त्रीवध करणें हें कधीं न्याय्य होणार नाहीं. स्त्रीहत्या हें महत्पाप गणिलें आहे. अपराध्यावर दया करण्यासारखें दुसरें औदार्य नाहीं, असें तथागत धैर्य यांचें वचन आहे. " पुनः पित्याच्या पायांवर डोकें ठेवून कुनाल म्हणाला—" महाराज, डोळे गेल्याबद्दल माझ्या मनाला यत्किंचित्‌हि वाईट

वाटत नाहीं. किंवा मला त्यापासून यातनाहि भोगाव्या लागत नाहींत. तेव्हां कृपा करून मातुश्रीवर माझ्याकरितां राग काढूं नका. हें भोगणें माझ्या प्राक्तनीं होतें. हा माझ्या प्राक्तनाचा गुण आहे. मागल्या जन्मीं कांहीं पाप केलें असेल त्याचें प्रायश्चित्त या जन्मीं भोगावें लागलें. महाराज, मी सत्य बोलतों. आपला माझ्या वचनावर विश्वास बसत नसेल, तर हे डोळ्यांनो ! तुम्ही पूर्ववत् व्हा. " असें म्हटल्याबरोबर डोळे पूर्ववत् आले[1].

सेनप्रणीत अशोकचरित्र पृ. ७७. धर्माविषयींची आस्था आणि सद्धर्मप्रसाराविषयीं कळकळ या दोन बाबतींत अशोक याची प्रसिद्धि ख्रिस्ती बादशहा कॉन्स्टंटाइन याच्याशीं तुलना करीत असतात. परंतु नुसत्या धर्माच्याच बाबतींत नव्हे, तर गृहसंबंधीं सुखदुःखांतहि या दोघांमध्यें सादृश्य होतें असें जनरल कनिंगहॅम म्हणतो. तिष्यरक्षितेप्रमाणें कॉन्स्टंटाईनच्याहि राणीची आपल्या सापत्न पुत्रावर पापदृष्टि गेली होती. परंतु अशोकाची पुण्याई जबर म्हणून नुसत्या दृष्टीपलीकडे अधिक पापाचरण तिष्यरक्षितेकडून घडलें नाहीं. रोमन बादशहा मात्र एवढा भाग्यवान् नव्हता. ( Bhilsa Topes, P. 124 )

1. Burnouf's Introduction P. 403 et seq. " Buddhist poetry has nowhere glorified in more beautiful fashion, forgiveness and the love of enemies than in the narrative of Kunal " [ Oldenberg's Buddh, P. 294 ]